# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर यांची प्रवचने आणि पत्रे

भाग-९

(सुधारित आवृत्ती)

# आनंदलहरी

## श्री दत्तमहाराज कवीश्वर
## यांची प्रवचने - भाग - ९

(सुधारित आवृत्ती)

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन


प्रकाशन दिवस
गुरुपौर्णिमा (शके १९३४)
मंगळवार, दि. ३ जुलै २०१२

मुखपृष्ठ
आमोद दामले

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांति नगर समोर,
जालना - ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५/२४०१०२

आनंदलहरी - ९ / २



प. पू. दत्तमहाराज कवीश्वर



प.पू. ताईमहाराज चाटुफळे

## खर्डा येथील प्रवचनाचा उपलब्ध भाग

वनवासामध्ये पांडव गेलेले असतानासुद्धा दुर्योधनाला वाटलं आपण आपल्या सगळ्या स्त्रिया, हत्ती, घोडे, सैन्य वगैरे बरोबर घेऊन वनामध्ये पांडवांकडे जावं म्हणून. म्हणजे पांडवांना जास्ती दुःख द्यायचंय. राज्य तर घ्यायचंय, पण आपण किती समर्थ आहोत. आपल्याजवळ किती ऐश्वर्य आहे, किती सैन्य आहे, किती नोकरचाकर आहेत, किती दासदासी आहेत हे ऐश्वर्य दाखवून त्यांना आणखी जास्ती दुःख द्यायचा विचार दुर्योधनाने केला आणि तो गेला वनामध्ये. परंतु वाटेत एका ठिकाणी एका गंधर्वाची नदीमध्ये, जलक्रीडा त्याची चालू होती. कौरव आणि तो गंधर्व यांची काही बोलाचाली झाली. त्यांचं युद्ध झालं. आणि त्या गंधर्वाने दुर्योधनाला कैद केलं. पराभव तर केलाच. दुर्योधनाला कैद करुन तो घेऊन गेला. आपलं ऐश्वर्य दाखवायचं पांडवांना, जास्ती त्यांना दुःख द्यायचं अशी इच्छा बाळगून तो गेलेला होता उलट त्यालाच त्यांचं कैदी व्हावं लागलं.

दुर्योधनाचे सगळे नोकर चाकर घाबरले. आणि ते धावत धावत आलेले आहेत. धर्म राजांना सांगितलं 'महाराज अशी आज लढाई झाली. त्यात त्या गंधर्वाने दुर्योधनाला धरुन नेलेलं आहे. त्याला आपण मुक्त करावं'. भीमसेन म्हणाला 'बरं झालं की आम्हीच त्याला कैद करणार होतो. ते आमचं काम गंधर्वांनी केलं. चांगलं झालं' भीम हा जशास तसे वागलं पाहिजे म्हणणाऱ्यांपैकी होता. धर्मराज म्हणाले 'भीमा, अर्जुना तुम्ही लवकर जा. त्या गंधर्वाचा पराजय करा आणि दुर्योधनाला सोडवून घेऊन या. आज गंधर्व हे वेगळे आहेत. आपल्यापैकी आणखी कौरव जरी असले तरी आपलेच आहेत. त्या दुर्योधनाला धरुन नेलं तेच परकीय आमच्यावरती येणार. म्हणून आपण परकीयांशी विरोध ज्या वेळेला उपस्थित होतो त्यावेळेला आपण एकशे

पांच राहिलं पाहिजे.' म्हणून त्यांनी सांगितलं. परस्पर आमच्यामध्ये जर कलह सुरु झाला तर ते १०० आणि आम्ही पांच, ते आमचं आम्ही पाहून घेऊ पण आज हे गंधर्व निराळे आलेले आहेत. त्या वेळेला आपण सगळ्यांनी एकत्र राहिलं पाहिजे ही नीति धर्मराजांनी मुद्दाम सांगितलेली आहे. अर्जुनाने मग त्या गंधर्वांचा पराजय केला. आणि दुर्योधनाला घेऊन आला तो. काय त्याला बोलायला तोंड आहे का? खाली मान घालून आपला उभा राहिला. ''जा बाबा असं साहस परत करु नको. सोडून दे.'' म्हणाले.

म्हणजे रागाने आपण वागलो द्वेषाने आपण वागलो. वनवासामध्ये पांडवांना घालवून दिलं तरीसुद्धा दुर्योधनाचा तो अभिमान कायम आहे. आणि त्यांना जास्ती दु:ख देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. दैवयोगाने तो साध्य झाला नाही ही गोष्ट निराळी.

**म्हणून कामक्रोधादिक हे जे विकार आहेत. त्यांना आवरावं म्हणून सांगतात भगवान. काम, क्रोध तुमच्या जवळ असू देत. वेळेवर त्याचा उपयोग तुम्ही करा. जे असे वैरी उत्पन्न होतील, शत्रू उत्पन्न होतील. अन्यायाने वागणारे असतील त्यांच्याविरुद्ध त्या क्रोधाचा उपयोग करा. स्वत:ची जी एकंदर मंडळी आहेत. भाऊबंद वगैरे यांच्याबद्दल कामक्रोधादिक विकारांचा उपयोग नको हे त्यांना सांगायचंय. मुख्य म्हणजे संतांचं लक्षण ते कोणच्याच विकाराला आपल्या मनामध्ये ठेऊन घेत नाहीत. भगवंतांनी दुसऱ्या एका स्वरुपामध्ये हे सगळे विकार सोडले पाहिजेत असं सांगितलं आहे. तीन विकार मुख्य आहेत.**

**काम, क्रोध, लोभ हे तीन विकार म्हणजे नरकाचं द्वार आहे. म्हणून हे सगळं सोडण्याचा अभ्यास केला पाहिजे. हा महत्त्वाचा सिद्धांत आहे. मनुष्यजन्माचे ध्येय काय आहे हे या श्लोकामध्ये**

**सांगितलेलं आहे. कामक्रोधादिक विकार सोडता येत नसतील तर निदान आवरा तरी. तो प्रयत्न करा. नाहीतर मोठी हानि आहे.**

आज आपल्याला किती संग्रह झालेला दिसतो आहे. जगामध्ये अलीकडे उत्पादनाची सोय झाली. रेडिओ वगैरे सगळी सोय आहे. त्यामुळे कुठं काय चाललेलं आहे हे आपल्याला कळू शकतं. काय चाललेलं आहे एका जातीची मंडळी पण त्यांच्यातही विरोध आहे ना? तो असतो ना म्हणून भिन्न भिन्न जातींच्या मध्ये विरोध आहे, असतो. अहंकार उत्पन्न झाला, क्रोधही मनामध्ये आहेच आहे. त्यांचा उपयोग काय? सर्वांचं द्रव्य एक झालं पाहिजे. असा एक वाद सध्या आहे. अर्थसाम्य आहे. साम्यवाद आहे. प्रत्येकाने द्रव्य आपल्या आपल्या शक्तिप्रमाणे मिळवायला हरकत नाही असाही एक वाद आहे पण त्या वादामुळे जगाचं किती नुकसान होणार आहे, काय होणार आहे कोणाला ठाऊक. आपला पक्ष बरोबर आहे अशा प्रकारचा अभिमान आहे. एक व्यक्ति किंवा समुदाय याच्यामध्ये निर्माण होतो. आमच्या पक्षाचं ध्येय हे आहे. या पद्धतिप्रमाणे आम्ही राज्य करणार आहोत. राज्य एकच आहे. सगळ्यांचं कल्याण करण्याची इच्छा सगळ्याच पक्षांना आहे. परंतु त्या पक्षामध्येसुद्धा भिन्न भिन्न जातीची दरी आपल्याला दिसून येईल. एकमेकांबद्दल स्पर्धा करुन आणि ही काय आजच आहे असं नाही. अनादिकालापासून चालू आहे. त्यात नेता कसा असला पाहिजे. कसा मिळाला पाहिजे. त्यामुळे समाजाचं कल्याण होतं. हे आपल्याला पूर्वीच्या इतिहासावरुन समजून घेता येण्यासारखं आहे. नेता रामचंद्रासारखा असावा म्हणून वाल्मीकींनी रामायण लिहिलं. सर्वगुणसंपन्न, सर्व मर्यादा धर्माच्या पालन करण्याकरता संपूर्ण जीवन आणखी त्यांनी घालवलेलं आहे. धर्माची मर्यादा व्यक्तिंचीच उभारणी आहे. एक कोणी मनुष्य बोलला म्हणे आपल्या बायकोला. हे रामाला कळले बाहेरुन

वेषांतर करुन फिरत असताना. तो आपल्या स्त्रीला सांगतो की मी तुला घरात घेणार नाही. तू दुसऱ्याच्या घरात गेलेली होतीस. रामासारखा मी नाही. रामाने रावणाच्या घरात राहिलेल्या सीतेला आपल्या घरी आणलं तसा मी तुला घेणार नाही. आपल्या चारित्र्याबद्दल प्रजेच्या मनामध्ये आणखी काहीतरी दोष दिसतो आहे. मतं पाडली आहेत. एकही मत आपल्याविरुद्ध असून उपयोग नाही. असे रामाला वाटतं. त्याने काही सत्तेचा उपयोग केला नाही. त्याला बोलवून आणलं 'का बाबा असं का बोललास?' परंतु सर्वांच्याही मनामध्ये राम हा नेता योग्य आहे असं असेल तर राम हा नेता राहील. नाहीतर रहाणार नाही. म्हणून सीतेचा त्याग केला त्यांनी. आपल्या शक्तिचा उपयोग करुन प्रजेच्या मनामध्ये आणखी ज्याने त्याने आपल्या पक्षासंबंधी प्रेम निर्माण करणं हे खरं नेतृत्व नाहीये. जनांचा अनुराग संपादन केला म्हणून राज्यादिक कारभार करण्याच्या वेळेला हे कामक्रोधादिक विकारांची जरुरी आहे. संतोष, असंतोष वगैरे सर्व दाखवले पाहिजेत. म्हणून प्रत्येक वर्णाचे धर्म निराळे. म्हणून प्रत्येक धर्माची कर्तव्य आणखी शास्त्रकारांनी वेगवेगळी सांगितली आहेत.

**व्यवहार कमी कमी करुन केवळ ईश्वराचं दर्शन करणं, चिंतन करणं, तत्त्वज्ञानाचा विचार करणं, इत्यादी ब्राह्मणाची कर्तव्यं आहेत.** क्षत्रियांचा धर्म आणखी सर्वांचं संरक्षण करण्याचं कार्य त्यांच्याकडे दिलेलं आहे. संरक्षण करणं याचा अर्थ केवळ शांत राहणे असा नाही. शांत राहून, क्षमा करुन संरक्षण होऊ शकत नाही. ब्राह्मणाचा धर्म निराळा, संन्याशाचा निराळा, गृहस्थपुरुषाचा निराळा हे वेगवेगळे आहेत त्या करता कामक्रोधादिक विकार हे अजिबात सोडण्याचा प्रयत्न करणं म्हणजे व्यवहारापासून अगदी दूर राहिलं पाहिजे किंवा सगळे सहन करीत क्रोधादिक विकार मनामध्ये उत्पन्न होणार नाहीत, पूर्ण शांति. या करता

मनाची तयारी फार मोठी आहे.

**संपूर्ण व्यवहार जो आहे त्या संबंधी ममता आपल्या मनात पुष्कळ भरलेली आहे. वासना मनामध्ये अत्यंत भरलेल्या आहेत. आणि त्यांचा आपल्याला रागही येत नाही. प्रत्येक ठिकाणी आमचं मन गुंतून राहिलं आहे, वस्त्र आहे, घरदार आहे, शेतीवाडी आहे. त्याप्रमाणे स्त्रीपुत्रादिक परिवार आहे. आत्मीय सगळी मंडळी आहेत. मित्रपरिवार आहे. या प्रत्येक ठिकाणी माझं म्हणून आम्ही समजतो सगळं. मग याच्याविरुद्ध वागणाऱ्याबद्दल राग येणार नाही. हे कसं शक्य आहे ? सामाजिक ममता जरी मनामध्ये असली तरी त्या समाजाच्या कल्याणाकरता त्याला राग येतोच आहे. राग येऊन त्याप्रमाणे तो प्रयत्न करतो आणि तसा तो आवश्यक आहे. त्याचं कर्तव्य हे ही शास्त्रकारांनी सांगितलं आहे. म्हणून व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचं आणखी कर्तव्यकर्म त्याचप्रमाणे सामुदायिक कर्तव्यकर्म जे आहे, हे सांगत असताना कामक्रोध अगदी बाळगू नयेत असं मात्र सांगता येत नाही. भगवंतांनी तसं सांगितलेलं नाही ज्या एकंदर समुदायाचं कल्याण करायची इच्छा आहे. प्रत्येकाची संस्कृति भिन्न आहे. आणि त्या संस्कृतीचा एक प्रकारचा अभिनिवेष मनामध्ये असतो.**

आमची संस्कृति अशी आहे. प्रत्येक गावाचा आणि प्रत्येक गावात रहाणाऱ्या माणसालाही आपल्या आपल्या गावाचा अभिमान असतो, जिल्ह्याचा अभिमान, प्रांताचा अभिमान, देशाचा अभिमान, असे अनेक प्रकारचे अभिमान आहेत. **त्या त्या अभिमानाला अनुसरुन प्रयत्न आणखी चाललेले आहेत. त्यामध्ये जर काही संघर्ष निर्माण झाला तर मनामध्ये क्रोधादिक विकार उत्पन्न होणं साहजिक आहे. परंतु त्याचा उपयोग कसा करायचा या करता त्या विकाराबरोबर विचाराची आवश्यकता आहे. म्हणजे ते विचार त्याच्यामध्ये पाहिजेत.**

आज अणुबाँबसारखी अनेक प्रकारची शस्त्रास्त्र तयार होतात. एकेक लाख वस्तीचं शहर पार दहा मिनिटांमध्ये उध्वस्त होऊन जातं. सबंध राखरांगोळी. ही शस्त्र निर्माण करण्याला अब्जावधी रुपये खर्च होतात. पण त्याचाच संग्रह आज चाललेला आहे. एकमेकांबद्दल क्रोध आहे. त्याचं तत्त्व बरोबर नाही. आमचं तत्त्व बरोबर आहे. भांडवलशाही चांगली आहे. ते म्हणतात साम्यवाद चांगला आहे.

पण त्या त्या समुदायांचे कामक्रोधादिक विकार जे आहेत त्या विकारांनी अशी भयंकर शस्त्र निर्माण होऊन राहिलेली आहेत. आणि तसं जर युद्ध झालं तर काय होईल काही सांगता येत नाही. जगाची दुर्दशा किती होणार आहे. कुणाला काही हातपाय रहाणार नाहीत. काही नाही. अशी काही विलक्षण स्थिति त्यांची होईल. एकतर अर्थव्यय किती होतो. प्राचीन भारतीय संस्कृतीमध्ये हा मुद्दाम त्यांनी विचार केलेला आहे. 'महायंत्र निर्माण म्हणून जे आहेत म्हणजे ५० माणसांचं काम एक यंत्र करु शकतं. असं जर यंत्र निर्माण केलं कुणी तर ते महापाप म्हणून सांगितलेलं आहे. पापामध्ये त्याची गणना होते. इतके लोक बेकार आहेत. हा विचार आहे परंतु महायंत्र निर्माण करुन आपल्याकडून पुष्कळ आपल्याला आणखी वस्तू उत्पन्न करता येईल. त्याचा व्यापार करता येईल. म्हणजे हा जो लोभविकार मनामध्ये उत्पन्न झाला. एक व्यक्ति असो किंवा त्या व्यक्तीचं राष्ट्र असो. या लोभविकारामुळे इतके लोक आणखी बेकार झाले. अन्न वस्त्र ज्यांना मिळत नाही त्यांची मन:स्थिति चांगली राहिली पाहिजे. असा कायदा कसा करता येईल? हे आणखी वाटेल तशी चैन करतात. आपल्याला मिळालं. साधी भाजी भाकरीसुद्धा मिळत नाही असं त्यांना वाटून त्यांच्या मनाची स्थिति जर बिघडली तर त्याला दोष म्हणता येईल का? ती येऊ नये याच्याकरता प्रयत्न केला पाहिजे. तो प्रयत्न प्राचीन संस्कृतीमध्ये मूलत: केलेला आहे. सर्वांनाही

आणखी त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणे कामं मिळाली पाहिजेत. प्रत्येकाची कर्तव्य त्याकरता ठरवून दिलेली आहेत. कोणीही कोणचे काम वाटेल तसं करावं असं नाही. स्पर्धा अवश्य निर्माण होणार. एकमेकांबद्दल आणखी असूया निर्माण होणार. आणि अशांति निर्माण होणार म्हणून याप्रमाणे आणि अशा रीतीनं मनामध्ये उत्पन्न होणारे जे विकार आहेत ते विकार पूर्णपणे शांत करावेत. मनुष्यजन्म त्याकरता आहे.

मोठे महात्मे, साधूपुरुष यांनी ईश्वराचं चिंतन करण्याचं ध्येय जे ठरवलेलं असते ते या करता. **कामक्रोधलोभ विकार वाढवण्याकरता मनुष्यजन्म नाही आहे. ते कमी करता आले तर त्याचे फल काय आहे. काय फायदा आहे तो अनुभवाने आपल्याला माहिती होऊ शकतो.**

म्हणून अर्जुनासारखा आणखी विशेष बलाढ्य नेता होता. त्याला त्या नेत्याचं कर्तव्य म्हणून त्यांनी सांगितलं. कामक्रोधादिक विकार तुला टाकता येणार नाहीत. ताब्यामध्ये ठेव आणि ताब्यामध्ये ठेऊन असे जे आणखी शत्रू आहेत, समाजाची दुर्दशा करणारे जे नेते असतील त्या नेत्यांना शासन करण्याकरता म्हणून तुझ्या कामक्रोधादिक विकाराचा उपयोग तू याकरता केला पाहिजेस. अर्जुनाला राग नव्हता असं नाही. त्यानी सगळी परिस्थिति पाहिलेली होती. काय द्रौपदीची दुर्दशा झाली, वनवास कसा भोगला, धर्मराजाला किती कष्ट सहन करावे लागले. द्रौपदीला किती कष्ट सहन करावे लागले. हे सगळं त्यांनी पाहिलेलं आहे. म्हणून त्याला राग आलेला आहे. म्हणून व्यासमहर्षींनी त्याला उपदेश केला की अर्जुना तू आता तपश्चर्या करायला निघून जा. १२ वर्ष तुम्ही काही हालचाल करु नका. दुर्योधनाची तयारी तर चाललेली आहे. राज्य ताब्यामध्ये आहे त्याच्या. तुम्ही १ वर्षानंतर आल्यावर तयारी करणार आहात. कशी होणार तयारी? त्याकरता तप:शक्ति ज्याला म्हणतात,

ईश्वराची कृपा, ही ईश्वराची कृपा संपादन करण्याकरता तू तप:श्चर्या कर. म्हणजे तुझी शक्ति वाढेल. म्हणून व्यासांनी त्याला मंत्रोपदेश करुन मुद्दाम त्याला तपश्चर्येकरता पाठवलेलं आहे. तर तुम्ही कौरवांना शासन करायचं आहे. केवळ कौरव नाही, तर कौरवांच्या पक्षाला सहाय्य करणारे जे जे असतील, **अन्यायाने वागणारे किंवा अन्यायाचे समर्थन करणारे दोघेही समान दोषी.** म्हणून त्यांनी तपश्चर्या केली आणि सगळी अस्त्रविद्या मिळवली. शंकरांचं पाशुपतास्त्र त्याला मिळालं. इंद्रादिक देवांची कृपा संपादन करण्याकरता स्वर्गलोकामध्ये तो राहिला. इंद्र, अग्नि, यमधर्म, कुबेर वगैरे सगळी अस्त्र त्यानी देवांच्या पासून मिळवली. तर ही जी अस्त्रविद्या त्यांनी मिळवली होती त्याचा उपयोग केव्हां करायचा. त्याचा विचार त्याच्या मनामध्ये नव्हता. नुसते आपले शत्रू आहेत म्हणून करा, एकेक लाख वस्तीचं १०/१० लाख वस्तीची शहरं सगळी उध्वस्त करुन टाका असं नाही.

महाभारतामध्ये कथा आलेली आहे. मंडळी बसली होती म्हणे, प्रत्येकाने भीष्माचार्यांना विचारलं ''हे सैन्य तुम्ही किती दिवसात, किती वेळात मारु शकाल?'' ते म्हणाले ''मी हे दहा दिवसात करतो.'' त्यांनी आपलं संयमाने सांगितलं. अर्जुन म्हणाला, ''दहा दिवस कशाला पाहिजेत. डोळ्याचं पातं लवतं न लवतं इतक्यात सबंध सैन्य मारुन टाकू शकेन इतकी शक्ति मला मिळाली पण त्याचा उपयोग काय?''

**सगळं जे काही सामर्थ्य ते सामर्थ्य मिळवून त्या सामर्थ्याचा दुरुपयोग न करणं ही सुद्धा एक शक्ति आहे. मनामध्ये शक्तींचा विकास आहे. पण त्याचा उपयोग कुठं करायचा? लोककल्याणाकरता करायचा आहे. आपल्याला मानसन्मान मिळावा म्हणून काही योगसिद्धीचा उपयोग करायचा नाहीये. म्हणजे मग तो योगभ्रष्ट झाला. त्या मार्गापासून तो भ्रष्ट होतो.**

म्हणून सामर्थ्य जरी अर्जुनानी मिळवलं होतं तरी त्याच्याजवळ संयमही आहे. त्याला विचार आहे. मनाच्या संयमाने त्यांनी आवरुन धरलेलं आहे. म्हणजे क्रोधादिक विकार सगळे आवरुन धरलेले आहेत. म्हणजे ताब्यात आहेत. क्रोध टाकला असं नाही आहे. त्याला शासन करायचंय, व्यवहार करायचाय, **व्यवहारामध्ये असणाऱ्या माणसांनी राग टाकून चालत नाही. त्या रागानीही आणखी काही मार्गदर्शन करावं लागतं. वारंवार दोष होऊ लागल्यानंतर त्या क्रोधाचाही उपयोग करायला पाहिजे.** राग आवरण्याचेही अनेक प्रकार आहेत. भीति. ज्याच्याबद्दल भीति उत्पन्न होती त्याच्याबद्दल राग आपल्याला दाखविता येत नाही. दैन्य ज्याला म्हणतात. सामर्थ्यबल असतानासुद्धा इतकी दैन्यवृत्ति झालेली आहे की त्यांनी बोलायचं नाही. काही उपयोग होणार नाही.

**म्हणून भगवंतांनी या श्लोकामध्ये अगदी सूचकतेनं सांगितलं आहे. राग आवरत चला. राग टाका असं नाही. कुणी तुमच्या रोज घरात घुसून काही घेऊन जायला लागला, 'शांतं पापं' म्हणून तुम्ही हात जोडून बसणार काय? समाजव्यवस्था व्यवस्थित रहाण्याच्या दृष्टीनं हा उपदेश आहे. क्रोधादिक विकार ताब्यामध्ये असले पाहिजेत. केव्हांही ते विकार आणखी व्यक्त करता यावेत आणि त्याचा उपयोग करता यावा, स्वजनांच्या किंवा आपल्या स्वसंरक्षणाकरता. अनेक जन्माच्या सुकृताने सांसारिक सुखाबद्दल काहीही इच्छा नाहीये अशी मन:स्थिति जर मिळाली असेल, ईश्वरभक्ति ज्याला कराविशी वाटत असेल आणि तशी शक्यता असेल त्यांच्या आयुष्यामध्ये तर तसं घडत असेल अवश्य त्यांनी काम, क्रोधादिक विकार सोडून द्यावेत. ते विकार जितके शांत होत जातील तितकी शांति मोठीच आहे. ईश्वर त्याच्याजवळ आहे.**

**''कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे''**

द्वेष, ईश्वराची पूजा म्हणजे कोणाबद्दलही रागद्वेष मनामध्ये उत्पन्न होऊ नये, शत्रू असू नये. शत्रू मित्र ही कल्पनाच मनामध्ये नाही आहे. सर्व विश्व हे परमेश्वराचे स्वरुप आहे. हा एक अभ्यास चालू आहे. त्याच्यामुळे त्यांच्यासमोर आणखी शत्रू मित्र ही कल्पनाच नाही. इतकं अंतःकरण शुद्धं झालेलं आहे. जितके शुद्धं करेल तितके शत्रू मित्र होतील असे तुकाराम महाराजांनी सांगितलं आहे.

शत्रूला सुधारण्याकरता क्रोधादिक विकार आपल्याजवळ पाहिजेत हा एक मार्ग आहे. तर त्या मार्गाने शत्रूची बुद्धि सुधारेल असेही काही सांगता येत नाही. भीति वाटलीच तर त्रास देण्याचं काही काळ तो सोडून देईलही परंतु स्वतः धर्म बदलणं हे केवळ आमच्या क्रोधाने कसं शक्य आहे?

कार्तवीर्यार्जुनराजाला सगळ्या प्रधान मंडळींनी सांगितले, आपण आता राज्य घ्या ताब्यामध्ये. राज्य करा. राजाने विचारले, मी राज्य करायचं म्हणजे मला खरी स्थिति, परिस्थिति राज्याची समजली पाहिजे. कोण दोषी, खरा दोषी कोण आहे कळलं पाहिजे. आणि हे कळायचं साधन तुमचं जे काही हेरखातं असेल त्यांनी येऊन त्याप्रमाणे सांगायचं आणि त्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन अमुक मनुष्य दोषी आहे, राजद्रोही आहे. त्यांनी सांगायचं अमक्याला शिक्षा करा म्हणून सांगायचं. खरा दोषी सुटून जाईल. आणि दोषी नसणाऱ्याला शासन करावं लागेल. आणि हे सगळे दोष माझ्या हातून घडणार आहेत. तेव्हां मला हे राज्य करायचं नाही.

हेरांच्यावर विश्वास ठेवावा लागतो. गुप्तहेर खात्यामध्ये जमाखर्च कधी विचारीत नाहीत म्हणे. इतके खर्च झाले, इतके आम्हांला द्यावे लागले. अमक्यांना द्यावे लागले... त्यांचं मान्य करावं लागतं. ऑडिट वगैरे तिथं नाही. पैसे खर्च केल्याशिवाय कसं होणार? बातम्या कशा

लागणार, त्या खात्यातही सुधारणा करायचं चाललंय म्हणे. ते खातं अत्यंत महत्त्वाचं खातं आहे. त्यातही जर फितुरी उत्पन्न झाली तर? मोह विकार आहे, दुसरं काय? जास्तीत जास्त द्रव्य हे प्रधान आहे. बातम्या सांगितल्यामुळे आपले राष्ट्र वगैरे त्याला काही हानी होईल हा विचार नाही. आपलं राष्ट्र ही भावनाच गेलेली आहे. काम, क्रोध, लोभ या विकारांच्या पाठीमागे जायला लागल्यानंतर मग परिस्थिति काय आहे त्या व्यक्तिला अर्थार्जन होईल, ती व्यक्ति पैसा मिळवेल किती काळ? त्या पैशाने तिला समाधान होतं का? राष्ट्राची हानी झाली, काही नाही. जे अधिकारी नेमलेले असतील त्यांनी येऊन सांगायचं, न्यायाधीशाचा निर्णय तरी तो काय आहे. दोषी मनुष्य आहे, खून केलेला आहे. म्हणून आणखी कोर्टामध्ये गुन्हा दाखल झालेला आहे. आरोप आहे त्याच्यावर. त्याचा वकील म्हणतो त्याला वाचवण्याकरता 'त्याने खून केलेला नाही', दुसरा वकील म्हणतो 'खून केलेला आहे'. आता त्या दोघांच्या शब्दावरुन न्यायाधीशांना निर्णय द्यायचा. दोघे काय म्हणतात ते ऐकून घ्यायचं मन असं निश्चल ठेवलं पाहिजे न्यायाधीशाला. मात्र त्याची तटस्थ बुद्धि असते म्हणून तो न्याय देऊ शकतो पण केवळ शब्दावरुन चाललेलं आहे. प्रत्यक्ष खून केलेला आहे किंवा नाही हे न्यायाधीशांनी तरी कुठं पाहिलेलं असते फक्त त्या दोघा वकीलांच्या भाषणावरुन त्यांच्या त्या शब्दावरुन जे पुरावे ते शाब्दिक जे आलेले असतात त्या शाब्दिक पुराव्यावरुन -- योग्य पुरावा कोणचा आहे, दोषी आहे किंवा नाही -- त्याला अनुकूल जो पुरावा ती भाषणं सगळी ऐकून घेऊन जो पुरावा योग्य वाटेल त्याप्रमाणे निर्णय दिला जाईल म्हणजे खरोखर मोठा दोषीसुद्धा त्यातून सुटू शकतो आणि कोर्टामध्ये तो दोष सिद्ध झाला नाही तर. मी जिंकलो अशी बुद्धि पुन्हा उत्पन्न झाल्यानंतर पुन्हा दोष करण्याची बुद्धि कायम राहते आहे की हे एक साधन बरे आहे. सामाजिक गुन्हा केलेला

असतानासुद्धा कोर्टामध्ये सिद्ध झाले की तो गुन्हेगार नाही. मग त्या ऋषींनी कार्तवीर्याला सांगितलं, त्याकरता तुला ज्ञान झालं पाहिजे. सगळं तुला कळलं पाहिजे. आणि सगळ्यांचं नियंत्रण करण्याची शक्ति तुला पाहिजे तर मग दत्तात्रेयांना तू शरण जा. योगविद्या त्या करता हवी.

योगसामर्थ्य इतकं विलक्षण आहे की मनाची शक्ति इतकी वाढते की बसलेल्या जागीही त्याला एकट्याला सगळं कळू शकतं. त्याला सहाय्य म्हणून कुणाचा रेडिओ नको, टेलिफोन नको, हेर नको, काही नको, त्याची मन:शक्ति इतकी वाढते आहे की कोण दोषी आहे कोण निर्दोष आहे त्याकरता मग त्याने दत्तात्रेयांची उपासना केली. व्यवहाराकरता हा विचार चाललेला आहे. व्यवहार आणखी व्यवस्थित सर्व असला पाहिजे. सामाजिक सुव्यवस्था असली पाहिजे याकरताच तो कार्तवीर्यार्जुन प्रयत्न करतो आहे. दत्तात्रेयांनीही त्याची परीक्षा घेतलेली आहे. प्रसन्न झाले दत्तात्रेय. त्याला ते सामर्थ्य देऊन टाकलेलं आहे. आणि त्याचं राज्य त्याने केलेले आहे. त्यांनी अगोदरची सगळी सिद्धि सगळं सामर्थ्य ज्ञान मिळाल्याबरोबर दत्तात्रेयांच्या कृपाप्रसादाने त्याने अगोदर बंदी केली. कुणीही हातामध्ये शस्त्र घ्यायचं नाही. म्हणजे सैनिक सुद्धा कमी केले. एकटा तो राज्य करत होता. त्याला ज्ञानशक्ति मिळाली. कुठं आणखी काय चर्चा चालू आहे, आज अमक्याच्या घरावर, अमुक दिवशी, अमुक तारखेला दरोडा घालायचा विचार अगोदर होतो. नंतर आचार होतो. चांगला विचार आणि चांगला आचार. वाईट विचार आणि वाईट आचार. विचारानंतर आचार. **जशी मनाला सवय लागली त्याप्रमाणे घडेल.** तर अशी काही विशिष्ट मंडळी दुर्वासना मनामध्ये ज्यांच्या आहेत त्यांचा विचार चालू आहे की अमुक ठिकाणी आपल्याला अमुक दिवशी जायचं तर त्यांचा विचार ते जंगलामध्ये कुठेही बसून करतात. त्याला हे कळल्याबरोबर लगेच हा धनुष्यबाण

घेऊन त्यांच्या समोर उभा राहिला कार्तवीर्यार्जुन. अकार्य चिंता । अकार्याचा नुसता विचार करुन झालेल्या वेळेला हा एकदम त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिला, काय चाललं आहे? कुठं जाणार आहे? लगेच शासन ही अनेक रुपं धारण करुन ज्या ज्या ठिकाणी अशा प्रकारचे विचार चाललेले असतील त्या ठिकाणी जायचा आणि त्यांना शासन करायचा.. ज्या ज्या ठिकाणी आणखी अशा प्रकारचे दुर्वासना असलेली मंडळी त्या त्या ठिकाणी त्या रुपामध्ये जाऊन एकरुपाने आणखी सर्वांचा निग्रह करण्याची शक्ति कार्तवीर्यार्जुनाने मिळवली आहे. व्यवहार आणखी सुरक्षित ठेवण्याकरता त्याने प्रयत्न केला. पुष्कळ वर्ष राज्य केले पण हा व्यवहार सुरक्षित राहिला काय? हा ही विचार आहे. ती सगळी मोठी मोठी मंडळी, संतमहात्मे, ज्यांना काही मानवांच्या मनाचा निरोध करता येणार नाही असं नाही पण काय उपयोग काय? तेवढ्यापुरता निग्रह झाला भीतिनं आणखी विरोध कमी झाला स्थगित झालं एवढं म्हणाले. कमी झालं म्हणाले. काही जरी कितीही कठोर नियम केला कठोर दंड केला चोरी झाली अमुक झाली की त्याला फटके मारायचे. गोळी घालायची. काय केलं तेवढ्यापुरतं हे झालं स्थगित झालं म्हणायचं. शेवटी तो ही कंटाळलेला आहे. मनुष्याची बुद्धि जी आहे ती बुद्धि बदलणे कठीण काम आहे म्हणून शेवटी तो दत्तात्रेयांच्याकडे जाऊन म्हणाला, ''तुम्ही तुमची दिलेली शक्ति परत घ्या. मला नको. माझं काहीतरी आत्मकल्याण करण्याकरता काहीच प्रेरणा मिळत नाही. सगळीकडं फिरतो, सगळ्यांना शासन करतो, सगळं जे आणखी दुष्कर्म जे आहे ते बंद करण्याचा प्रयत्न करतो सगळं चाललेलं आहे, वाईट विचार काही थांबत नाही, चालूच आहे.

जगाची स्थिति ही आहे. ही स्थिति सुधारण्याकरता काही काळपर्यंत अशा प्रकारचे श्रेष्ठ नेते असतील, स्वतः त्यांनी समाजकल्याणाचा

विचार करणारे त्यांच्याकरता भगवान सांगतात तुम्ही राग वगैरे काम वगैरे अवश्य धारण करा. त्याचा उपयोग चांगल्या ठिकाणी करा. म्हणून अर्जुनाने सगळी अस्त्रविद्या मिळवली आणि त्याचा उपयोग करण्याची वेळ आलेली असताना तो हातपाय गाळून स्वस्थ बसून राहिला आहे. एक मोठा समाजातला नेता आणि धर्माच्या नावाखाली या कौरवांना शासन करायचे मनामध्ये ठरवून ५ वर्षे १० वर्षे तपश्चर्या केली त्याने. अस्त्रविद्या मिळवली, त्या अस्त्रविद्येचा पडताळाही घेतला अज्ञातवासामध्ये. आणखी पांडव असताना, पांडव कुठे आहेत? कौरवांनी पुष्कळ शोधलं. विराटराजाच्या नगरामध्ये वेगळी वेगळी रुपं धारण करुन हे ५ बंधू आणि द्रौपदी राहिलेली आहेत. अर्जुन तर नपुंसकाच्या वेषामध्ये आणि त्या राजकन्यांना गायन नृत्य शिकवण्याचं काम करत होता. धनुष्यबाण ठेऊन गेले होते ते बाहेर एका झाडावर बांधून सगळं त्या वेळेस. आणखी द्रौपदीची विटंबना, द्रौपदीचं पातिव्रत्यहरण करण्याचा प्रयत्न कीचकानी केल्यानंतर त्याला भीमाने ठार मारलं. त्याचे भाऊही मारले. ही बातमी सगळीकडं पसरली. कीचकही मोठा पराक्रमी होता. तो एका रात्रीत मारला गेला कसा? म्हणजे इथं भीम असला पाहिजे. अर्थात इथं पांडव असले पाहिजेत. ही बातमी कौरवांना समजली. आणि त्यांना शोधून काढण्याकरता म्हणून त्याने दुसरा एक प्रयत्न केला. विराट राजाच्या संग्रही पुष्कळ गायी होत्या. पुष्कळ गोधन होतं. पुष्कळ राजे लोक पूर्वी गायी बाळगत होते. अनेकांच्याजवळ गायी असायच्या. गायीचं दूध, तूप वगैरे सगळं आणखी विद्यार्थ्यांना मिळायचं. त्यावेळेला अरण्यामध्ये राहणारी ऋषिमंडळी, त्यांच्याकडेसुद्धा शिक्षण घेण्याकरता समाजातले अनेक विद्यार्थी जाऊन रहात होते, त्यांच्या बुद्धीचं योग्य संवर्धन करणारी विद्या तपासून घेऊन ती बुद्धि तपासून त्यांना ती दिली जात असे. समाजहित

कसं होईल, हे निर्भयपणाने सांगणारे अशा प्रकारचे विद्यार्थी तयार करण्याचे कार्य त्यावेळचे कुलगुरु वनात राहून करत होते. कोणालाही काहीही द्रव्याची आशा नाही. त्यांच्या पदरीही पुष्कळ गायी असायच्या. लोक द्यायचे पुष्कळ आणि गायींनाही चरण्याकरता सकाळी वनं काय, अरण्य काय, सगळे डोंगर आणखी मोकळे असायचे. आता सगळ्यावरती नंबर घातलेले आहेत. जो अर्जुन रागावलेला आहे त्याने सगळी अस्त्रविद्या कौरवांना शासन करण्याकरता मिळवलेली आहे. त्याची परीक्षा पहायची वेळ त्याला आलेली आहे की एका बाजूनं त्या कौरवांनी आपल्या काही मित्रमंडळींना आपल्या मित्रराजांना पाठवलं. तुम्ही उत्तरेकडं काही गायी घेऊन चला. दक्षिणेकडं आम्ही काही गायी घेऊन जातो मग खरे जर पांडव या ठिकाणी असतील तर ते गायींच्या रक्षणाकरता प्रगट होऊन युद्धामध्ये भाग घेतील. पांडव प्रगट झाले आणि तसंच घडलं तिकडे. आणखी युद्ध करण्याकरता भीम, नकुल, सहदेव सगळे तिकडे गेले. इकडे हे कौरव या बाजूला गायी घेऊन चाललेले आहेत. गायी नेल्या. सगळं सैन्य तिथे गेलं. कौरवांनी हल्ला केला त्या बाजूला. कुठलं सैन्य ? तो विराटाचा मुलगा उत्तम म्हणाला, ''काय करावं मला सारथी जर मिळाला असता तर मी एकट्याने जाऊन कौरवांचा नाश केला असता.'' धर्मराज आणि त्यांनी सांगितलं त्या बृहन्नडाला घेऊन जा की. त्याला उत्तम सारथीपण करता येतं. आणि निघाले एकटा उत्तम आणि बृहन्नडाच्या वेषामध्ये म्हणजे नपुंसकाच्या वेषामध्ये असलेला अर्जुन, केस बांधलेले आहेत. हातामध्ये चुडे घातलेले आहेत आणि रथामध्ये बसून घोडे हाकण्याचं काम अर्जुन करतो आहे.

उत्तमला घेऊन निघाला आणि बाहेर आल्याबरोबर ते सैन्य त्याने पाहिलं, भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन सगळी मोठी मोठी मंडळी. समुद्रासारखं ते सैन्य पसरलं. पाहिल्याबरोबर तो उत्तम घाबरला त्याला

शौर्य कुठंय नुसतं बोलण्यापुरतं सगळं. शेवटी त्याने आणखी रथातून खाली उडी मारली आणि पळून जायला लागला. मग त्या अर्जुनाने त्याला थांबवलं. तो म्हणाला तू इथं घोड्याचे लगाम हातात घेऊन बैस मी युद्ध करतो. कोण आहे त्यांनी सांगितलं. मी खरा कोण आहे. घाबरु नकोस. झाडावर आणखी सगळे धनुष्यबाण ठेवले होते. ते गांडीव धनुष्य व सगळे बाणांचे भाते, नेहमी भरलेले भाते अग्निनारायणांनी त्याला दिले होते. म्हणजे त्याला बाण कुणीतरी आणून द्यायला पाहिजे, बाण संपले अशी म्हणायची पाळी आली नाही. ते सगळं बांधलेलं आहे. केस बांधलेले आहेत. आणि धनुष्यबाण घेऊन युद्धाला एकटा अर्जुन उभा राहिलेला आहे. आणि बाजूला सगळं सैन्य भीष्म, द्रोण, कर्ण, दुर्योधन. सगळे मोठे अतिरथी, महारथी त्यांचं सैन्य, त्यावेळेला त्या सगळ्यांच्यो बरोबर एकट्या अर्जुनानी युद्ध केलं. तो सारथी सुद्धा पळपुटा आहे. घाबरलेला आहे.

दुर्योधन म्हणाला, हे पांडव १२ वर्षे किंवा अज्ञातवास १३ वर्षे पूर्ण व्हायच्या आत प्रगट झालेले आहेत. तेव्हां त्यांनी पुन्हा वनवासात जायला पाहिजे. नाही. त्यांची वेळ झालेली आहे. बरोबर १३ वर्षे होऊन गेलेली आहेत. कालगणना कशी करायची त्यांना माहीत आहे. पांडव हे आपल्या वचनातून मुक्त झालेले आहेत. आणि पांडवांचा पराक्रम थोडा पहायला मिळालेला आहे. तेव्हां मुकाट्यानं त्यांच्याशी संधी कर.

म्हणजे आपल्याजवळ किती बल आहे या बलाची परीक्षाही स्वत: अर्जुनाने पाहिलेली आहे. एकट्याने सगळ्यांचा पराजय केला आत्मविश्वास त्याला किती निर्माण झालेला असेल. कोणीही समोर उभा राहू शकणार नाही इतकी अस्त्रविद्या आहे.

तो अर्जुन आणखी त्यावेळेला असं म्हणायला लागला.

धनुष्य माझ्या हातात रहात नाही. मी काही युद्ध करणार नाही.

नको. आपल्या हातून आपले लोक कशाला मारायचे बाबा? हिंसा नको. चांगलं आहे, बरं आहे. ज्ञान चांगलं आहे, म्हणून गोपाळकृष्णांना त्यांना सांगावं लागलं, ''बाबा, तू इथपर्यंत आलास आत्तापर्यंत कौरवांना शासन करण्याची तुझी बुद्धि होती. तुझ्या मनामध्ये त्यांच्याबद्दल राग होता आणि आता हा राग गेला कसा? तुझ्यासारखा जर असा हातपाय गाळून बसायला लागला तर व्यवहार कसा चालेल? समाज सुरक्षित कसा राहील?'' म्हणून त्याला संपूर्ण भगवद्गीता ज्ञान सांगितले. त्याच्याकडूनच युद्ध करवलेलं आहे.

''तुझं कर्तव्य आहे. क्षत्रियांचे कर्तव्य आहे. युद्धाला समोर प्रत्यक्ष धावून जरी सख्खा भाऊ आला तरी त्यावेळेला विचार करायचा नाही. ठार मारायचं, काही नाही मारुन टाकायचं. त्यावेळेला तुम्हाला धर्म नाही. 'अहिंसा परमो धर्मः ।' तुम्हाला नाही. (समाजामध्ये जे नेते आहेत किंवा जे विचारशील आहेत त्यांना सामाजिक कार्य करण्याच्या दृष्टीने हा उपदेश आहे.) तुम्ही क्रोधादिक विकारांचा उपयोग करताना विचार करत चला. जे कोणी दुर्जन असतील त्यांना शासन करणं हे तुमचं कर्तव्य आहे. तुम्ही आणखी अहिंसा धर्म म्हणून बसल्यावर शासन होणार कसं? म्हणून रामाचं उदाहरण, भीष्माचं उदाहरण सगळी या करताच आहेत त्यांनी हे सगळं केलेलं आहे. ते काही तपश्चर्या करत रानावनात निघून गेलेले नाहीत. काय होईल ते होईल आपल्याला काय शक्य नाही हे असंच व्हायचं. असाच भ्रष्टाचार उद्या व्हायचा. त्याला कोणी अडवू शकणार नाही. ते होऊ शकणार नाही म्हणून काय स्वस्थ बसायचं. **त्या करता जे प्रयत्न करायचे आहेत ते सगळे प्रयत्न साम, दाम, दंड, भेद सगळ्या प्रकारांनी करायला हरकत नाही. या दृष्टीनं हा उपदेश मुख्य जो उपदेश आहे तो त्यांनी केलेला आहे.**

'तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ।' म्हणतात कामक्रोधादिक विकार हे कधीही

मनामध्ये असू नयेत. त्याशिवाय आणि मुक्ति मिळणार नाहीये. जन्ममृत्यूचा प्रवाह सारखा सुरु झालेला आहे. मृत्यू आला म्हणजे संपलं दुःख असा अर्थ नाही. हा जन्म संपला. या मृत्यूनंतर पुन्हा जन्म येणार आहे. जन्म याचा अर्थ पुन्हा दुसऱ्या देहाशी संबंध येणार आहे. तो दुसऱ्या देहाचा संबंधी म्हणजे कोणचा येईल याचा काही नेम नाही. पशूचा देह येईल का माणसाचा येईल, पक्षाचा येईल कोणाचा येईल कुणास ठाऊक म्हणजे पुन्हा देहाचा संबंध म्हणजे पुन्हा जन्म आहेच, पुन्हा गर्भवास आहे. ही सगळी दुःख कायमची जर सुटायची असतील तर आणखी ईश्वराचं दर्शन करणं, आत्मज्ञान झालं पाहिजे. त्याकरता हा प्रयत्न. **या व्यवहारातून बाजूलाच जो झालेला आहे, ज्याला केवळ आणखी परमात्मदर्शनाची इच्छा उत्पन्न झालेली आहे, आपण या जन्ममरणाच्या फेऱ्यातून कायमचं मुक्त व्हावं अशी इच्छा आहे, त्यानी मात्र हे कामक्रोधादिक विकार मनातनं सोडावेत असं सांगितलं आहे.**

काही नाही. व्यवहारात लक्ष नाही. **सगळ्यांनीच व्यवहार केलाच पाहिजे असं नाही.** मनुष्याची, प्रत्येकाची बुद्धि वेगवेगळी असते, सात्विक बुद्धि आहे, राजस बुद्धि आहे, तामस बुद्धि आहे. सत्वगुण बुद्धित वाढलेला आहे. रजोगुण, तमोगुण कमी झालेला आहे. त्याच्याकडून असंच वदवलं की मी कोणावरही रागावणार नाही तर ठीक आहे. आशा त्याच्या कमी कमी होत जातात, लोभविकारापासून बाजूलाच राहाण्याचा निरंतर प्रयत्न तो करीत आहे. आपल्या जीवनामध्ये दोष होऊन देणारच नाही त्याच्याकरता हा मार्ग सांगितलेला आहे. **पण असे अधिकारी अगदी विरळा असतात.**

त्या गुलाबराव महाराजांच्या चरित्रात गोष्ट सांगतात. त्यांना कोणी विचारले, "जेवायला बसल्यानंतर हे तिखट झालंय, आंबट झालंय, खारट झालंय हे सांगावं का नाही?" त्यांनी सांगितलं, "तो जर संन्यासी

असेल, सर्वसंगपरित्याग करुन आणखी फिरतो आहे पृथ्वीवर, एक रात्री शिवाय जास्त त्यांनी गावामध्ये रहायचं नाही. असे त्या संन्यासाचे नियम आहेत. कोणाबद्दलही त्याला आसक्ति, पक्षपात निर्माण होऊ नये या करता प्रयत्न आहे. तो जर जेवायला बसलेला असेल पंक्तिमध्ये तर त्याने मुकाट्याने जसं असेल तसं जेवण करावं आणि निघून जावं पण जो कुटुंब प्रमुख आहे. **त्यांनीही तसंच खाऊन निघून जायचं मग सुधारणा कशी व्हायची? स्पष्ट सांगितलं पाहिजे. रागावून सांगितलं पाहिजे. आज जास्ती तिखट झालेलं आहे, आज खारट झालेलं आहे. अमुक झालेलं आहे. हे स्पष्ट केलं पाहिजे. त्याशिवाय सुधारणा होणार नाही. ती सुधारणा करणारा जो गृहस्थाश्रमी असेल त्याचं कर्तव्य आहे. त्यांनी त्या संन्याशासारखं मुकाट्यानं आपलं पाणी पीत पीत खायचं आमटी भात, भाजी भात आणि निघून जायचं का डोळे पुसून. त्याचं कर्तव्य निराळं आहे. संन्याशाचं कर्तव्य निराळं आहे. म्हणून समाजामध्ये अशाप्रकारचे अधिकारी जे असतील किंवा त्यांचे अनुयायी यांना आणखी क्रोधादिक विकार हे अवश्य सांगितले आहे.**

म्हणून समर्थांनी त्या वेळेला हाच उपदेश केला. सामर्थ्य जवळ असून त्याचा तुम्ही उपयोग करत नाही. म्हणजे जास्ती अराजकता. किती हे आणखी संघर्ष निर्माण होतील म्हणाले. अत्यंत दुर्जन हे समाजाची घडी अत्यंत विस्कळित करुन टाकत आहेत. त्याकरता तुमचं सामर्थ्य हे वाढवायचं असेल किंवा त्यांना दहशत बसवायची असेल तर हे जे विकार मनामध्ये आहेत त्याचा चांगला उपयोग करा. **कामक्रोधादिक विकार चांगले नाहीत. चांगल्या इच्छा करा. काहीच इच्छा न करणं हे सगळ्यांना शक्य नाही. तुकाराममहाराजांसारखे जे महात्मे आहेत, त्यांना काही इच्छा नाही. 'आता उरलो उपकारापुरता' म्हणाले. आता मला माझ्याकरता काही मिळवायचे नाही. सगळ्यांना मार्गदर्शन**

करायचे, उपकार करायचा फक्त. बाकी काही नाही. आणि खरा उपकार त्याच महात्म्यांच्या हातून होतो.

ज्याच्या मनामध्ये वैयक्तिक सुखाची अभिलाषा असेल स्वार्थ ज्याला म्हणतात, त्याच्याकडून होणारा उपकार हा सापेक्ष उपकार आहे. पण महात्म्यांच्या मनांत सामान्य जीवांच्यात आढळते तशी कोणतीच एषणा नसते. असे महात्मे फार थोडे असणार, ईश्वराची कृपा आपल्यावर असावी या करता त्यांचे प्रयत्न तसे चाललेले असतात.

ईश्वराची कृपा निर्दोष बुद्धि असल्याशिवाय असू शकत नाही. खरी कृपा मागितल्यानंतर कोणीही देईल. समर्थ आहे तो परमात्मा. तुम्ही जे जे मागाल ते ते देणारा समर्थ आहे तो. पण ते त्याच्याकडून मागून घेऊन आपले क्रोधादिक विकार वाढतात. आणि आपल्या मनाची आशा वृत्ति कायम रहाते आहे. हा विचार आमच्या मनामध्ये येत नाही. तो महात्म्यांच्या मनामध्ये आहे. म्हणून काहीही मागायचं नाही.

ईश्वराचं स्मरण अखंड आपल्या मनामध्ये असावं एवढंच देवाला मागावे. 'तुझा विसर न व्हावा, हेचि दान देगा देवा ।' द्यायचं असेल तर एवढंच तू दे. हे देणं ईश्वर परीक्षा पाहिल्याशिवाय देऊ शकत नाही. वाटेल तो ईश्वराचं स्मरण करु शकत नाही. त्यांच्या मनामध्ये उत्पन्न होणारी जी स्वार्थ बुद्धि आहे त्या स्वार्थबुद्धिनं त्याला ज्या ज्या काही इच्छा होत असतील त्या इच्छाच तो देवाजवळ व्यक्त करतो आणि तेच मागून घेऊन त्यांच्यामध्येच तो निमग्न रहातो. कुठं ईश्वराचं स्मरण?

ज्या वेळेला संसार सगळा विसरुन जाण्याची वेळ आली असेल त्यावेळेला ईश्वराच्या स्मरणाची योग्यता उत्पन्न होते.

अशा रीतीनं हे सगळे मार्ग भगवद्गीतेमध्ये भगवंतांनी एकंदर मनुष्याची बुद्धि, इंद्रिय, त्यांचे सामर्थ्य पाहून हे नियम धर्मशास्त्रात सांगितलेले आहेत. हळू हळू मनाची तयारी करायची आहे. अनेक

**जन्म त्याकरता अभ्यास लागतो. आणि मग ईश्वराची कृपा, सद्गुरुंची कृपा होते. आणि मग त्याचा उद्धार होतो आहे.**

तेव्हां असं हे तत्त्वज्ञान अनेक संतांनीही आपल्यासमोर मांडलेलं आहे. संतांचेही पुष्कळ ग्रंथ आहेत. **या ग्रंथांचं वाचन करुन आपण हे पक्कं निश्चित ठरवायचं आहे त्याप्रमाणे वागून आपल्या जीवनाचं सार्थक करुन घ्यावं** 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः। सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात्।

**पुंडलिकवरदा हरी विठ्ठल ।**
**गोपाळकृष्ण महाराज की जय ।**
**वक्रतुंड महाराज की जय ।**

***रसज्ञावशा तारकं स्वादुलभ्यम् । गृहीतम् कदाचिन्न ते नाम दत्त***
***क्षमस्वापराधम् क्षमस्वापराधम् क्षमस्वापराधम् प्रभो क्लिन्नचित्त ।।***

ईश्वराजवळ या स्तोत्रात अपराधांची क्षमा मागितली आहे. अपराध कोणते याचा उल्लेख करताहेत महाराज, ''गृहीतम् कदाचिन्न ते नाम दत्त ।'' हे दत्तात्रेया आपलं नांव मुखातून मी कधीही घेतलं नाही. हा अपराध आहे. ''तारकं स्वादु लभ्यम्'' असं नांव आहे. तारक नांव आहे. नामस्मरण जर झालं असतं तर त्याच्या योगाने सर्व दुःखातून मी सुटलो असतो. आणि ''स्वादु'' म्हणजे अत्यंत मधुर आहे. समाधान देणारं आहे. ''रसज्ञा'' म्हणजे जीभ ताब्यात आहे माझ्या. वाटेल ते बोलू शकतो. पण आपलं नांव तेवढं घेऊ शकत नाही. म्हणून हा अपराध झालेला आहे. वाणीही ताब्यामध्ये आहे. वाणीने पुष्कळ बोलणे होते आहे. पण ईश्वराचे नांव तेवढे घेतले जात नाही. हा अपराध माझ्याकडून झालेला आहे. याची आपण क्षमा करावी. क्षमस्वापराधम्..... अत्यंत दयाळू ज्यांचे अंतःकरण आहे असे आपण आहात. म्हणून या अपराधांची आपण क्षमा करावी. या पहिल्या श्लोकात मी नामस्मरण कधीच केलेले नाही असा उल्लेख केलेला आहे. केव्हा घेता येईल तेही सांगताहेत महाराज पुढच्या श्लोकात.

***वियोन्यन्तरे दैव दार्ढ्याद्विभो प्राग्गृहीतं कदा... ।।***

या जन्मात केव्हांही घेतलं नाही. या पूर्वीच्या जन्मात मी दुसऱ्या योनीत गेलो होतो तेव्हाही माझ्याकडून नामस्मरण झाले नाही. दैव हे इतकं बलवत्तर आहे की, त्यावेळेस काही कल्पना नाहीये. ईश्वराचे नांव घ्यावं म्हणजे आपला उद्धार होईल असं अज्ञानयोनीत असताना कधीही वाटलं नाही. पण तेव्हा नामस्मरण घडले नाही ही सबब सांगण्याचे काय कारण आहे? दैव तरी तयार कोणी केलं? म्हणून स्वतःकडेच अपराध घेतला आहे. त्या अपराधाची क्षमा करावी.

***मया मातृगर्भस्थितिप्राप्त कष्टात् गृहीतं... ।।***

गर्भवासामध्ये असताना मला फार कष्ट झाले. त्या अवस्थेची सध्या आपल्याला जाणीव नसल्यामुळे त्या कष्टांची कल्पना येत नाही. पण गर्भवासासारखे दुसरे दुःख नाही असे म्हणतात. पण त्यावेळीही नामस्मरण घडलं नाही. कारणे असतील त्याची, पण तो अपराधच आहे. परंतु त्यावेळी कष्टामुळे तरी नांव घ्यायला पाहिजे होतं. पण वेदनेमुळे, दुःखामुळे ईश्वराचे स्मरण होत नाही. पण दुःखातही ईश्वराचे स्मरण करणारे भक्त आहेत.

***मया जातमात्रेण संमोहितेन गृहीतं..... ।।***

जन्माला आल्यानंतर मोहामध्ये मी पडलो. गर्भामध्ये असताना जीव ईश्वराची स्तुति करतो. अतिशय वेदना झाल्यावर विस्मरणही होते आहे. पण जन्माला आल्यानंतर मोहात पडल्याने सगळे ज्ञान गेलं. त्यामुळे ईश्वराचे नामस्मरण काहीच घडले नाही. हा जन्माला आल्यानंतरचा अपराध आहे. त्या अपराधाची क्षमा करावी. पूर्वीच्या जन्मी ज्यांनी चांगली ईश्वराची भक्ति केलेली असते अशा ज्ञानी जीवांना जन्माला आल्यावरही विस्मरण घडत नाही. पण मी तितका भाग्यवान नसल्याने इतर सामान्य लोकांप्रमाणे मी मोहात पडलो आणि विस्मरण घडले.

***मया क्रीडनासक्तचित्तेन बाल्ये गृहीतं..... ।।***

बाल्यावस्थेत खेळातच माझे मन आसक्त झाल्याने नामस्मरण कुठून घडणार? प्रल्हाद, ध्रुवासारखे एखादेच असतात. लहान वयातसुद्धा बालक्रीडा करण्याकडे त्यांचे लक्ष नाही. लहानपणापासून ईश्वराची भक्ति करा, असे प्रल्हादजींचे सांगणे आहे. भगवंताच्या नामाचे माहात्म्य, आत्मानात्म विचार त्यांनी आपल्या सवंगड्यांना सांगितला आणि त्या मुलांना तो पटला. तेव्हां बालवयात नामस्मरण घडले नाही या अपराधाची क्षमा करावी.

***मया यौवनेऽज्ञानतो भोगतोषाद् गृहीतं..... ।।***

यौवनांत विषयभोगांकडेच लक्ष गेलेले आहे. विषयभोगांचाच

आनंद मिळावा असे वाटून, त्या आनंदात अज्ञानाने सापडलो. त्यामुळे नामस्मरण घडले नाही. विषयभोगाकरता द्रव्यार्जन पाहिजे. त्याच्यामध्ये आयुष्य जाते. म्हणजे संपूर्ण यौवन नामस्मरणरहीत गेले, त्या अपराधाची आपण क्षमा करावी. तारुण्यातही ईश्वराची भक्ति करणारे भरतासारखे आहेत. आईने राज्य मिळवून दिले, पण रामराय येत नाहीत. त्यांना चौदा वर्षे वनांत रहावे लागले. हे दोघांचे कर्तव्य आहे. असं सांगितल्यामुळे अगदी ऐन तारुण्यामध्ये भरताने सर्व भोग सोडून दिलेले आहेत. ईश्वरनिष्ठा, ईश्वरप्रेम यांमुळे सर्व इंद्रियांवर ताबा आहे भरताचा. तेव्हां यौवनात अज्ञानाने विषयभोगाकडे लक्ष गेल्यामुळे आपले नांव घेतले नाही. हा अपराधच आहे, त्याबद्दल आपण क्षमा करावी.

***मया स्थाविरेनिघ्न सर्वेंद्रियेण गृहीतं..... ॥***

***''स्थाविर'' म्हणजे वृद्धावस्था,*** म्हातारपण प्राप्त झालेलं आहे. म्हातारपणामध्येही नामस्मरण घडले नाही. इंद्रिये ताब्यात राहिलेली नाहीत. इंद्रियांच्या शक्ति कमी झाल्यात. मानसिक शक्ति, शारीरिक शक्ति सगळंच कमी झालं. त्या शक्ति असतांनाही घेतलं नाही (नाम) आणि आता तर शक्तिच गेली. पूर्वी तशी तयारी करुन ठेवली नाही. प्रल्हाजींच्या उपदेशाप्रमाणे बालपणापासून नामस्मरण करण्याचा अभ्यास केला असता तर वृद्धावस्थेतही ते घडू शकले असते. पहिल्यापासून चुकलेलं आहे. म्हणून त्याबद्दल आपण क्षमा करावी.

***हृषीकेश मे वाङ्मनःकायजातम्। हरे ज्ञानतोऽज्ञानतो विश्वसाक्षिन्। क्षमस्वापराधम्........***

आतापर्यंत ''गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त'' हाच अपराध पुढे मांडला होता. बाल्यावस्थेत नाही, तारुण्यावस्थेत नाही, वृद्धावस्थेत नाही, दुसऱ्या योनीत - पशुपक्ष्यांच्या जन्मांत घेतलं नाही, असं म्हटलं होतं.

आता या श्लोकामध्ये नामस्मरण न घडणं म्हणजे वाणीचा

अपराध ही कल्पना करताहेत. वाणीने, मनाने आणि शरीराने या तिघांकडूनही अपराध झालेले आहेत. ज्ञानतः - बुद्धिपूर्वक अपराध घडलेले आहेत आणि अज्ञानतः ही अपराध घडलेले आहेत. ते सगळे अपराध मी केलेले नाहीत असे म्हणून काही भागणार नाही. कारण आपण विश्वसाक्षी आहात. त्यामुळे माझ्या सर्व अपराधांची नोंद आपल्याकडे आहे, असे कबूल करायचे आहे. शिवाय त्यांनी देवाला हृषीकेश म्हणून संबोधन केले आहे. ***"हृषीक" म्हणजे इंद्रिय.*** शरीराच्या सर्व इंद्रियांचे आपण स्वामी आहांत. आणि असं असताना माझ्या हातून अपराध घडलेले आहेत. म्हणजे आपले जर लक्ष असते, तर माझ्याकडून अपराध कदाचित घडलेही नसते, असेही सुचवायचे आहे त्यांना. परंतु माझ्या पूर्व दुष्कर्माने म्हणा अपराध झाले खरे माझ्या हातून. तरीही वाणी, मन, शरीर या तिघांकडून झालेल्या अपराधांची आपण क्षमा करावी.

***स्मृतो ध्यात आवाहितो स्यर्चितो वा ।***
***न गीतः स्तुतो वंदितो वा न जप्तः ॥***
***क्षमस्वापराधम्.......***

अपराध काय काय घडलेत ते सांगताहेत. मनानं आपलं स्मरण सुद्धा केलं नाही, ध्यान केलं नाही, आपले मी कधी साधे आवाहनही केले नाही आणि अर्चनही घडले नाही. आपले गुणानुवादही मी गीतांच्या माध्यमातून वर्णन केले नाहीत. स्तुतीही केली नाही. वंदन केलं नाही. जप म्हणजे नामस्मरण केले नाही. यापैकी काहीही माझ्याकडून घडले नाही.

बार्शीला जोगा परमानंद म्हणून होऊन गेले. श्री भगवंत मंदिराजवळ त्यांची समाधी आहे. भगवद्गीतेतला एक श्लोक म्हणून एक साष्टांग नमस्कार घालायचा. असे रोज सातशे श्लोक म्हणायचे आणि सातशे नमस्कार घालायचे. कोणाकडे काही मागायचे नाही काही नाही. ही

वंदनभक्ति चालू होती. कोणी त्यांना एक पीतांबर नेसायला दिला एकदा. नेसले ते. आणि त्या दिवशी त्या पीतांबराकडे लक्ष गेले. नमस्कार घालताना ''पीतांबराला माती तर लागणार नाही ना असा विचार मनांत आला. त्यामुळे नमस्कार घालायला वेळ लागला. मग त्यांनी स्वतःला काहीतरी शिक्षा करायचे ठरवले. चूक झाल्याचे त्यांना जाणवले. सकाळची वेळ एक शेतकरी बैल घेऊन शेतात निघाला होता. त्याला त्यांनी बोलावून सांगितले तुला हा पीतांबर देतो. बैलाच्या दोरीला माझे पाय घट्ट बांध आणि बैलाला चाबूक मार. त्या शेतकऱ्याला पीतांबर मिळाल्यावर ह्यांनी सांगितल्याप्रमाणे केले. फरपटत गेल्याने ह्यांचे शरीर रक्तबंबाळ झाले. देवाने सोडविले त्यांना. शरीराने सुद्धा इतकी सेवा करीत होते ते. म्हणून स्वतःच शासन करुन घेतले.

नरसोबावाडीला एक सेवेकरी होते. त्यांना पिशाच्च बाधा होती. ते देवाला रोज फूलं आणून घालायचे. रात्री बाहेर पडून पांच-दहा मैलावरच्या आसपासच्या गावांत जाऊन पुष्कळ फुले घेऊन यायचे. हार तयार करुन घातले की समाधान मिळायचे, दुसरे काही नाही. माधुकरी मागून आणायची. कोणी दिला तर चहा वगैरे घ्यायचा, अशी त्यांची भक्ति होती.

तेव्हा अशा तऱ्हेने माझ्या हातून कोणतीच भक्ति घडली नाही. या स्तोत्रामध्ये सगळा पश्चात्ताप व्यक्त केलेला आहे. अशी सेवा घडण्याचा योग असताना अशी सेवा घडली नाही, याबद्दल मनाला अत्यंत व्यथा होत आहेत. याचा पश्चात्ताप होऊन त्या अपराधांची क्षमा मागितली आहे.

***दयाब्धिर्भवादृङ्न सागाश्च मादृग् । भवत्याप्तमंतोर्भवान्मे शरण्यः ।***
***यथा लंबनम् भूर्हि भूर्नि सृतांघ्रेरिति । प्रार्थितम् दत्तशिष्येण सारम् ॥***

शेवटची प्रार्थना करताहेत. आपल्यासारखे दयासागर दुसरे कोणीही नाही. दयेला काही आपल्याकडे कमी नाही. माझ्यावर जर आपण दया

केलीत तर दया संपून जाईल असे नाहीये. आणि माझ्यासारखा अपराधी कोणी नाही. म्हणजे दया करायला मी पात्र आहे, असे या श्लोकात म्हटले आहे. माझ्यासारख्या अपराध्याला आपण संरक्षण देणारे आहांत. त्याला दृष्टांत (उदाहरण) देताहेत महाराज.

जमिनीवर चालताना पाय घसरला तर त्याला आधार कोणाचा? जमिनीचाच. त्याप्रमाणे मी या संसारात चुकलेलो आहे, मला दुसरा आधार कसला असणार? कोणाकडे जायचे? आपलाच. अपराधाची ज़ाणीव आहे, पश्चात्ताप झालेला आहे. अत्यंत तळमळीने ही प्रार्थना केली आहे. ईश्वराने आमचे रक्षण करायचे आहे. दुसरे कोणीही करु शकत नाहीये. कारण आमचे रक्षण करायची आम्हांला बुद्धि असती तर असं घडलंच कसं असतं? सगळी इंद्रिये आमची वाटेल तशी दुसरीकडे जाऊ शकतात. आम्ही त्यांना जाऊ देतो. पण देवांचे वंदन, अर्चन इत्यादी करणे मात्र घडत नाही. म्हणजे आम्ही स्वत:सुद्धा आमचा उद्धार करु शकत नाही. आपण सर्वज्ञ आहांत, हृषीकेश आहांत आणि दयासागर आहांत. त्यामुळे आपणच उद्धार करावा अशी तळमळीने प्रार्थना आहे.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

## पं. काशीनाथशास्त्री जोशी
## भागवतावर प्रवचने, खुन्या मुरलीधर मंदीर
## मार्गशीर्ष महिना
## उद्घाटन प्रसंगी - प.पू. श्रीदत्तमहाराज यांचे प्रवचन दि. ३.१२.१९९८

***वसुदेवसुतं देवं कंस चाणूरमर्दनम ।***
***देवकीपरमानंदं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।।***

पंडितवर्य काशीनाथशास्त्रीजी यांनी वेदामध्ये अभ्यास केला आणखी शास्त्राचाही अभ्यास करुन पुण्यामध्ये उत्तम प्रवचनसेवा, भागवतसेवा, भगवद्गीता सांगितली. शंकरानंदी टीकेसह ज्ञानेश्वरी सांगितली, असं हे लोकसंग्रहाचं कार्य हे त्यांचं पुष्कळ वर्ष चालू आहे. त्यांचं हे निर्हेतुक प्रेम आमच्यावर आहे हे एक आमचं भाग्य समजतो आम्ही. त्यांच्यासारखे विद्वान 'निर्मत्सराणां सताम्' भागवताचे अधिकारी कोण आहेत. ही निर्मत्सरता. मनामध्ये कोणचेही विकार यांच्या येत नाहीत तेच भागवताचे वक्ते आणि श्रोते असू शकतात, असं आरंभाला वेदव्यास महर्षि सांगतात. त्याप्रमाणे त्यांचा हा व्यासंग आहे. केवळ लोकरंजनाकडं दृष्टि नाही. जे काही आणखी शास्त्र, प्रमाणसिद्ध असेल ते लोकांपुढं मांडायचं. त्यातूनच हे काही ग्राहक खरे आणखी अधिकारी असतील ते घ्यायचे ते घेतील, आचरण करतील आणि आपलं कल्याण करुन घेतील अशी त्यांची धारणा आहे. श्रीमद्भागवत हा ग्रंथ भक्तिमार्गाचा आहे. त्यात ज्ञान आहे, वैराग्य आहे. कर्ममार्गही आहे. सगळं आहे त्यात, पण भगवद्भक्तीचा प्रसार होण्याच्या दृष्टीने वेदव्यास महर्षींना नारदांनी प्रेरणा केली. म्हणून हा ग्रंथ झालेला आहे, वेदव्यासांनी वेदविभाग केले. महाभारताची रचना केली. अष्टादश पुराणांची रचना केली. पण चित्ताला शांति मिळाली नाही असं त्यांनीच लिहून ठेवलेलं आहे. वेदव्यासांसारख्यांना शांति,

समाधान लाभलं नाही इतकं ज्ञान असून. मग नारद महर्षि आले. त्यांना हाच प्रश्न त्यांनी केला. शांति का नाही? त्यांनी कारण सांगितलं तुमचं एक न्यून राहिलंय म्हणाले. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष चारही पुरुषार्थ महाभारताच्या रुपानं आपण पुढे मांडलेले आहेत. परंतु वासुदेवाचा महिमा आपण अद्यापि कुठं वर्णन केलाय म्हणाले. वासुदेवाचं माहात्म्य जर वर्णन आपण केलं असतं तर आपल्याला शांति मिळाली असती. ते काम आपण करा. अशी प्रेरणा नारदमहर्षींनी वेदव्यासांना दिलेली आहे. हे मोठे मोठे महर्षि वनामध्ये रहात होते. भगवद्‌चिंतन करतात. कर्मानुष्ठान अनेक यज्ञयाग करतात. पण लोकाविरोध त्यांची प्रवृत्ति आहे. नारदांनी भक्ति, ज्ञान, वैराग्य यांना सुस्थिति प्राप्त करुन देण्याकरता म्हणून भागवत सप्ताह स्वत: ऐकला. सनत् कुमारांच्या उपस्थितित आणि वेदव्यासांनाही त्यांनी उपदेश केला. तुम्ही भागवत ग्रंथ करा. मग त्यांनी सबंध चिंतन केलं. अगोदर पूर्ण तयारी होती. शांति मिळाली नाही हे लोकांच्याकरता त्यांनी मांडलेलं आहे. तर अगोदर भगवंताचं स्वरुप कसं आहे. शक्ति, त्याची मायाशक्ति कशी आहे? शक्तीचं कार्य म्हणजे सृष्टि कशी आहे? सगळं चिंतन करुन आणि मग भागवताची रचना त्यांनी केलेली आहे. भागवत ग्रंथ म्हणजे वेदव्यास महर्षींची समाधी भाषा आहे असं सांगतात. अत्यंत अंत:करण स्थिर करुन भगवत् चिंतन करुन आणखी हा भागवतग्रंथ निर्माण झालेला आहे. आणि त्याच्या योगानी भक्ति ही अंत:करणामध्ये उत्पन्न होते. अनेकांच्या कथा आहेत. कितीतरी कथानक आहेत. भक्तांच्या कथा आहेत. राजांच्या कथा आहेत. सूर्यवंश आहे. चंद्रवंश आहे. त्या त्या वंशामध्ये उत्पन्न झालेले अवतार त्या अवतारांच्या कथा सगळंही पुष्कळ आहे. परिपूर्ण भागवतामध्ये आहे. विद्वान लोक भागवत ग्रंथ जर सांगू शकले व्यवस्थितपणानी,

तर ती खरी परीक्षा आहे. आणखी ही भक्ति अंत:करणामध्ये उत्पन्न होती या ग्रंथाच्या चिंतनानी, असाही उल्लेख वेदव्यासांनी केलेला आहे. आणि शेवटी भागवताच्या, हेच सांगितलं, भक्ति उत्पन्न होणं हे त्या भक्तीचा निराळा उपयोग मानायची जरुर नाही, भक्ति उत्पन्न होणं हाच फायदा आहे, फळ हेच आहे. पण त्या भक्तीचं कार्य काय आहे हेही शेवटी सांगितले.

अविस्मृति शब्दांनी भक्तीचा उल्लेख करतायत, शुकाचार्य महाराज, वेदव्यास महर्षि. म्हणजे ईश्वराचं विस्मरण कधीही न होणं, स्मृति शब्दांनी उल्लेख केलेला नाही. स्मृति म्हणजे कोणती स्मृति, संसारामध्ये स्मृति आहे. 'कृष्णपदारविन्दयो:', अविस्मृति, ही म्हणजे भक्ति आहे. याचं फल 'क्षिणोति अभद्राणि ।' अभद्र कधीही नाही. जीवनामध्ये अमंगल घटना कधीही घडणार नाहीत. हे त्या भक्तीचं फल आहे. कारण ज्ञानाचाही लाभ त्या भक्तीच्या योगानीच होणार आहे. ज्ञान, वैराग्य सगळं भक्तीनं मिळतं म्हणाले. त्याप्रमाणे आणखी अंत:करणामध्ये भगवद्प्रेम निश्चित उत्पन्न झालं, अखंड स्मरण राहिलं त्याचं फल म्हणजे अमंगल घटना कधीही पहायचा प्रसंगच येत नाही. मोठे मोठे संत महात्मे हे आणखी या भगवद्भक्तीच्या प्रभावानी मंगलमय त्यांचं झालेलं आपल्याला दिसतं आहे. ७०० वर्ष ज्ञानेश्वर महाराज होऊन गेले. ज्ञानेश्वरी लिहून त्यांनी ठेवली. पण आजही आणखी त्या ज्ञानेश्वरीबद्दल आदरभाव कायम आहे. आणि 'शमं तनोतिच।' हे फार मोठं महत्त्वाचं फल आहे. शम शब्दाचा अर्थ आचार्य महाराजांनी सांगितला. मनामध्ये कोणचीही वासना न राहणं म्हणजे शम आहे. सर्व एकंदर साधनामध्ये शम हा प्रधान आहे. निर्वासन अंत:करण झालं पाहिजे. हे भक्तीचं फल सांगतायत. भक्तीमुळे निर्वासन अंत:करण होतं. कोणचीही इच्छा, कामना, वासना मनामध्ये रहात नाही. आणि वासनाक्षय झाला म्हणजे ज्ञानाचं ते स्वरुपच

आहे. तर हे जे आहे, शम हे फल उत्पन्न झालं पाहिजे. अर्जुनाच्या मनामध्येसुद्धा रणांगणावर उभा राहिलेल्या वेळेला आणखी शोक, मोह त्याला उत्पन्न झालेला आहे. मोह शब्दाचा अर्थ 'मोहः अविवेकः' टीकाकार करतात. आणि 'शोकः मनस्तापः.' इदं मम, इदंमम हे माझं, हे सगळे माझे लोक आहेत, माझे आहेत यामुळे मनाला जो ताप होतो, दुःख होतं त्याला शोक म्हणायचं आणि त्याला कारण म्हणजे मोह आहे. अविवेक आहे. विवेक न राहणं. शरीरापेक्षा आत्मस्वरुप वेगळं आहे, हा क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेकही नाही. त्याचप्रमाणे आणखी परमात्मस्वरुप आपणापेक्षा वेगळं आहे हेही समजलं पाहिजे. मी शरीरापेक्षा वेगळा आहे. परमात्मा आणखी निराळा आहे, नियामक आहे ही आरंभाची स्थिति आहे. आणखी नंतर हेयोपादेय विवेकही आहे, नित्यानित्य विवेक असे विवेकाचे पुष्कळ प्रकार आहेत. तर हा विवेक मनात न राहणं त्यामुळे शोक होतो.

इदं मम, इदं मम अशा प्रकारची ममता निर्माण झाली म्हणजे आणखी शोक होतो. अर्जुन त्यात सांपडलेला आहे. त्याचा उद्धार करण्याकरता भगवंतांनी आणखी गीताज्ञान त्याला सांगितलं आणि त्यात भगवद्भक्तीचंही आणखी महत्त्व वर्णन केलेलं आहे. भक्तियोगाचेही ५-६ अध्याय त्याच्यामध्ये आहेत. भगवदगीतेमध्ये आणि सर्वही संतमहात्म्यांनी भक्तियोगाचं माहात्म्य हे अधिक रीतीनं वर्णन केलेलं आहे. कारण भक्तीच्या योगानी ही सगळी फलं मिळणारी आहेत. भगवद्भक्तीच्या योगानी काय मिळतं तर भगवद्भक्ति तशीच झाली पाहिजे. अविस्मृति हा शब्द वापरलेला आहे त्यांनी नुसती भगवद्भक्ति म्हणजे देवाला शरीरानी आणखी वाणीनं, मनानी आपण करतो त्या भगवद्भक्तिपेक्षा ही वेगळी आहे. ज्याचं वर्णन नारद महर्षींनी 'यथा व्रजगोपिकानाम्।' व्रजामध्ये राहणाऱ्या गोपिका स्त्रियांची भक्ति कशी

होती तशी उत्पन्न झाली पाहिजे. असा दृष्टांत दिलेला आहे.

तेव्हा संसारामध्ये राहूनही भगवंताचं अखंड स्मरण रहाणं याचं हे फल आहे. पूर्ण समाधान वासनाक्षय होतो. ज्ञानोत्तर सुद्धा वासनाक्षयाचा अभ्यास करावा लागतो. पाचव्या सहाव्या भूमिकेमध्ये. तत्त्वज्ञानाचीही दृढता व्हावी वासनाक्षय व्हावा, मनोनाश व्हावा याकरता प्रयत्न करावा लागतो ते फळ भगवद् प्रेमानी अविस्मृति जर झाली तर त्यानी मिळतं. चित्त शुद्धं होऊन जात आहे. चित्तशुद्धीची व्याख्याच ही आहे की वासनाक्षय होणं आणखी त्या चित्तामध्ये कोणच्या प्रकारचे विकार न राहणं, निर्विकार अंत:करण होणं. परमात्मभक्ति हे ही पुन्हा त्याच्या भक्तीचं वर्णन करता करता आणि अखंड भक्ति परमात्मस्वरुपाची, त्याला ज्ञान असंही आचार्य महाराजांनी म्हटलेलं आहे. भक्तीचंच पर्यवसान हे आत्मसाक्षात्कारामध्ये होतं. ज्ञान आणि भक्ति वेगळी नाहीच आहे. वासुदेवः सर्वम्। हे जे ज्ञान सांगतात भगवान्, सर्व विश्वच वासुदेवस्वरुप आहे आणि वासुदेव आपल्या चित्तामध्ये अखंड राहिलेले आहेत.

अकरावा स्कंध संपूर्ण आणखी उद्धवजींना केलेला उपदेश आहे. कर्ममार्ग आहे, भक्तिमार्ग आहे, ज्ञानमार्ग आहे, योगमार्ग आहे. सर्वही विवेचन त्याच्यामध्ये केलेलं आहे. नाथ महाराजांनी आणखी त्या अकराव्या स्कंधावरती टीका केलेली आहे. नाथ महाराजही भागवत सांगत होते रोज. त्यांच्या वाड्यामध्ये पुष्कळ मंडळी यायची. त्याचप्रमाणे उद्धवजींना भगवंताचा उपदेश मिळण्याचा काय अभिप्राय आहे तो त्यांनी स्पष्ट केलेला आहे. मराठी भाषेमध्ये ज्ञानराजांनी ज्ञानेश्वरी सांगितली. भगवद्गीतेचं आणखी स्पष्टीकरण केलं. नाथ महाराजांनी नाथ भागवत लिहिलं. त्यात भगवंताचा अभिप्राय आला. भगवंतांनी उद्धवजींना उपदेश केला त्याचं स्पष्टीकरण आहे. लोकांना कळावं, काय मार्ग आहे. शास्त्रमार्ग

कोणचे आहेत ते लोकांना कळावेत आणखी त्याप्रमाणे लोकांनी आचरण करुन ते स्वत:चं कल्याण करुन घ्यावं हाच संतांचा उद्देश आहे.

तेव्हां त्या दृष्टीनं भागवतासारख्या ग्रंथाचं परिशीलन करुन आणखी पंडितवर्य काशीनाथशास्त्रीजी आज बरीच वर्ष ते सांगतायत. भगवद्गीताही त्यांनी शंकरानंदीटीकेसह सांगितली. सबंध आणखी लोकांनाही त्यांच्यापासून पुष्कळ ग्रहण करता आलं असेल त्याप्रमाणे त्यांनी आणखी हे कार्य चालू ठेवलेलं आहे. त्याचा विकास आणखी काय व्हायचा. त्यांची श्रद्धा भक्ति असल्याशिवाय अखंड हे चालू कसं राहिलं. विकास शब्दाचा अर्थ त्यांनी शास्त्रीय दृष्टीनं केलेला आहे. तो विकास, प्रकाश त्या ठिकाणी व्हावा आणि भगवद्भक्तीचं जे पूर्ण फल आहे ते सर्वही लोकांना त्यांच्या द्वारानी प्राप्त व्हावं असं ज्ञानेश्वर महाराजांनीही शेवटी लिहिलेलं आहे.

**किंबहुना सर्व सुखी । पूर्ण होऊनि तिन्ही लोकी ।।**
**भजी जो आदि पुरुषि । अखंडित ।।**

देवाला विसरुं नका. देवाचं स्मरण सर्वांच्या चित्तामध्ये रहावं म्हणजे अखंड भक्तियोग सर्वांना मिळावा हीच प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांची आहे. सर्व संतमहात्म्यांची आहे आणि त्याला अनुसरुन आपल्या शास्त्रीजींनी हे कार्य संतांचच कार्य चालवलेलं आहे. त्यांच्यावरही भगवद् कृपा पूर्ण आहेच आहे. ज्ञान आहे, कर्मानुष्ठान आहे त्याचप्रमाणे करवूनही घेतात ते याज्ञिक करवून घेतात व्यवस्थितपणानी आणि यजमानांना सांगून आणखी व्यवस्थितपणानी करवून घेणं ही शक्ति आहे, त्याप्रमाणे वाक्शक्ति आहे. तेव्हां त्यांच्यासारखे महात्मे आपल्याला मिळालेले आहेत. आपण सर्वांनाही श्रद्धेने त्यांच्या अधिकारवाणीतून जे काही आपल्याला मिळेल ते घ्यावं आणि आपलं कल्याण करुन घ्यावं एवढीच प्रार्थना आणखी सर्वांतर्यामी सर्वसाक्षी

भगवंताच्याजवळ करुन आणि त्यांनाही पूर्ण आयुरारोग्य लाभावं त्याचप्रमाणे त्यांच्या हातून हे कार्य उत्तरोत्तर जास्तीत जास्त वृद्धींगत व्हावं एवढीच प्रार्थना करुन भाषण संपवतो.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

# श्री चिदंबर स्वामी जयंती

सद्गुरु श्री शिव चिदंबर महाराजांचा आज जन्मोत्सव आहे. कर्नाटक प्रांतामध्ये भगवान शंकरांनी हा अवतार घेतला. गृहस्थाश्रमामध्ये राहून सर्वही यज्ञादिक कर्मांचं अनुष्ठान केलं. सर्व लोकांना मार्गदर्शन केलं. आपली जी काही दैवी शक्ति आहे त्या दैवी शक्तीचाही अवलंब करुन लोकांची दु:ख पुष्कळ दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यांचा अवतार होऊन गेल्याला जवळ जवळ २०० वर्षांचा काळ होऊन गेला, जास्तीच असेल.

नारायण स्वामी महाराज म्हणून जे होऊन गेले नरसोबा वाडीला तेही आणखी श्री शिव चिदंबर महाराजांच्या भेटीला मुद्दाम गेले होते. त्या ठिकाणी दोन महिने त्यांचा निवास झाला. चिदंबर महाराजांनीही त्यांचा मोठा सत्कार केला. दोघेही ब्रह्मज्ञानी महात्मे, अवतारी पुरुष, तर अशा रीतीनं त्यांचं चरित्रही उपलब्ध असलेलं हे छापलेलं आहे. जे काही सद्भक्त आहेत त्यांनी त्या चरित्राचं आणखी चिंतन करुन मनाला शांति प्राप्त करुन घ्यायची आहे.

**संतांच्या चरित्राच्या वाचनाने, चिंतनाने मन स्थिर होतं असा एक स्वतंत्र उपाय योगशास्त्रकारांनी दाखवलेला आहे. प्राणायाम वगैरे आहे. पण प्राणायामाचा अभ्यास हा स्वतंत्र आपल्याला करता येत नाही. कुणीतरी मार्गदर्शक जवळ असल्याशिवाय प्राणायामाचा अभ्यास होऊ शकत नाही. त्यापेक्षा हा एक उपाय.**

वीतरागविषयं वा चित्तम् । असं एक स्वतंत्र सूत्र योगशास्त्रकारांनी या करता घातलेलं आहे. ज्यांच्या अंत:करणामध्ये रागद्वेष काहीही विकार राहिलेले नाहीत. निर्विकार, अत्यंत स्थिर ज्यांचं अंत:करण झालेलं आहे. सर्वेपि सुखिन: सन्तु । ही ज्यांची भावना आहे. सर्व लोक सुखी व्हावेत. ईश्वराचं भजन सर्वांनी करावं हा उपाय ते सांगत

असतात. अशा महात्म्यांचं जर चिंतन केलं तर ते चित्त अत्यंत स्थिर होतं. म्हणून हा स्वतंत्र उपाय, सोपा उपाय आहे. प्राणायामादिक अवघड आहे. **तर अशा प्रकारच्या महापुरुषांच्या चरित्राचं नित्य वाचन, सवडीने रोज घडलं पाहिजे.**

चिदंबर महाराज हे तर भगवान शंकरांचेच अवतार, त्यांच्या पिताजींनी तपश्चर्या केली. भगवान शंकरांनी वरप्रदान केलं आणि त्याप्रमाणे त्यांनी आपण स्वतः त्यांच्या पत्नीच्या उदरातून अवतार धारण केला. कर्नाटक प्रांताचं हे फार मोठं पुण्य आहे की असे महात्मे त्या प्रांतात जन्माला आले. अजूनही त्या ठिकाणी उत्सव वगैरे होतात. संस्थांमध्ये नित्य त्याचप्रमाणे काही वृत्तपत्र वगैरे निघत असतात, उत्सव होत असतात. त्यांचीच परंपरा त्या ठिकाणी चालू आहे.

तर चिदंबर महाराज महास्वामी यांचं आपल्याला प्रत्यक्ष दर्शन घेणं फार कठीण आहे. ज्ञानेश्वर महाराजांना समाधी घेऊन ७०० वर्षे झाली पण त्या ठिकाणी अद्यापि यात्रा होत आहे. लक्षावधी लोक त्या ठिकाणी जातात. त्यांच्या यात्रेचा समय ४/५ दिवसांनी आलेला आहे. त्रयोदशीला ज्ञानेश्वर महाराजांचा समाधिदिन आहे तर त्या ठिकाणी सुद्धा **ज्ञानेश्वरीचं वाचन करणारे, चिंतन करणारे अत्यंत श्रद्धा भक्तीनं मनन करणारे जे आहेत त्यांच्यावर आणखी ज्ञानेश्वर महाराजांची कृपा होते. कदाचित पूर्वीचं सुकृत असेल तर पुण्याने त्यांना दर्शन ही होत आहे त्या ठिकाणी. चिदंबर महाराजांचेही दर्शन घडणारे पुण्यात्मे असतील. नाही कोणी म्हणू नये. भक्ति कोणाच्या मनात कशी आहे काही सांगता येत नाही आपल्याला. तर त्यांची संगती, त्यांनी घालून दिलेला जो मार्ग आहे त्या मार्गाप्रमाणे वागणं, आचरण करणं हे त्यांच्या कृपेचे फल आहे.**

ज्ञानेश्वर महाराजांकडे चांगदेव आले, कशाकरता हे सगळ्यांना माहीत आहे. चांगदेव मोठे योगी होते. १४०० वर्ष आयुष्य त्याचं होतं. त्यांनी

स्वत:चा मृत्यू चुकवला व समाधीतून उठल्यानंतर ज्यांना ज्यांना मृत्यू आला असेल त्यांना ते जिवंत करत होते ही त्यांची प्रसिद्धी होती पण त्या चांगदेवांना सुद्धा आपण अजून अपूर्ण आहोत असं वाटतं आपण पूर्ण व्हायचं झालं तर ज्ञानेश्वर महाराजांची कृपा आपल्यावर झाली पाहिजे. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांना भेटावं. त्यांची कृपा प्राप्त व्हावी आणि पूर्ण ज्ञान प्राप्त करुन घ्यावं त्याशिवाय सुख, शांति नाही म्हणून ते वाघावर बसून आले म्हणतात. कथा सगळ्यांना माहिती आहे. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर महाराज, सोपानदेव, मुक्ताबाई, थंडीचे दिवस, उन्हामध्ये एका भिंतीवर बसले होते. निवृत्तीनाथ म्हणाले, 'हे चांगदेव मोठे योगी आहेत. त्यांना सामोरं जायला पाहिजे, सत्कार केला पाहिजे आपल्याला. ज्ञानेश्वर महाराजांचा संकल्प म्हणा, गुरुमहाराजांची इच्छा आणि ती भिंतच चालायला लागली. ही एक अलौकिक कथा ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्रात आलेली आहे. दगडामातीची भिंत आहे ती, चालायची कशी! ते पाहिल्याबरोबर चांगदेवांचा अभिमान गेला. आपण वाघावर बसून येतो, वाघाला ताब्यात ठेवलंय इतकी आपली शक्ति आहे हे दाखवण्याकरता ते आले पण ही शक्ति काही मोठीच आहे. वाघ हा चेतन आहे त्याला ताब्यात ठेवणं शक्य आहे. पण भिंतीला क्रिया उत्पन्न होणं, दगडामातीची भिंत आणखी माणसाप्रमाणे चालायला लागणं हे अतिशय कठीण आहे. अहंकार त्याग करुन ते शरण आले, मुक्ताबाईंकडून त्यांचं कल्याण करुन टाकलं ज्ञानराजांनी ही कथा ज्ञानेश्वर महाराजांच्या चरित्रामध्ये आहे.

चिदंबर महाराजांच्या चरित्रात अशी एक कथा आलेली आहे. लहानपणी एका ठिकाणी गजगौरीचं व्रत होतं. त्या यजमानाच्या घरी पूजा सांगण्याकरता म्हणून हे गेले. तो हत्ती मातीचा होता. त्या बाई पूजा करायला बसल्या यांनीही या हत्तीवर अक्षद टाकली. आवाहन केलं. देवतेचं त्या गजामध्ये आवाहन झालं. पूजा वगैरे झाली आणि हे घरी

निघून आले. आणि तो हत्ती घरामध्ये फिरायला लागला. हे सांड, ते सांड. म्हणजे मातीचा हत्ती, मातीच्या हत्तीमध्ये आवाहन केलं आणि त्याला चैतन्य निर्माण झालं आणि तो घरामध्ये फिरु लागला. सगळे लोक घाबरले, यांच्या घरी आले. यांना सांगितलं. तो हत्ती कसं करतो. यांच्या लक्षात आलं, विसर्जन केलं नाही म्हणाले. पुन्हा गेले आणखी ते विसर्जन केलं. निग्रह, अनुग्रह दोन्ही शक्ति आहेत. मातीच्या हत्तीला चेतन करणं, पुन्हा त्याची चैतन्य शक्ति काढून घेणं, दूर करणं. दोन्ही प्रकारची शक्ति आहे. त्या ज्ञानेश्वरमहाराजांच्या गोष्टीप्रमाणे अचेतनामध्ये चैतन्य निर्माण करायची शक्ति चिदंबर महास्वामींच्या मंत्रामध्ये होती. **मग चेतन जे आहे, मानव जन्मामध्ये जे आलेले आहेत. त्यांचं कल्याण करणं त्यांना काही अशक्य नाही.** कोणच्या जन्मातून हा आलेला आहे हे सगळं त्यांच्या दृष्टीसमोर आहे, डॉक्टर वगैरे तपासणी करतात, कोणचा रोग झालेला आहे, काय खाणं, पिणं झालं, अपथ्य काय झालं, हे सगळं विचारुन घेतात आणि त्या रुग्णाच्या शब्दावर विश्वास ठेऊन त्याप्रमाणे औषधयोजना, आपल्या शास्त्रामध्ये जी सांगितलेली आहे त्याप्रमाणे योग्य औषधाची योजना केल्यानंतर रोगनिवृत्ती होते. हे आपल्याला व्यवहारामध्ये अनुभव येतात, त्याप्रमाणे 'भवरोगवैद्य' म्हणतात.

जन्माला येणं, काही काळ रहाणं, आयुष्य संपलं की निघून जाणं, कुठं जातो, काय जातो, कुणालाही पत्ता लागत नाही. विज्ञानवादसुद्धा या ठिकाणी थांबलेला आहे. जीव कुठं जातो, कुठून आलेला आहे याची कल्पना कुणालाही येत नाही. ईश्वराबद्दल भावना ठेवणारे जे महात्मे आहेत ते ईश्वराची कृपा संपादन करतात. पूर्वसुकृताने संतमहात्म्यांच्या गाठीभेटी पडल्या तर त्यांचीही कृपा संपादन करुन, त्या मार्गामध्ये, मनुष्यजन्मामध्येच आपलं पूर्ण कल्याण करुन घेतात आणखी कृतार्थ होतात.

**तर ही जी काही शक्ति आहे ही ईश्वरशक्ति अवश्य मानली पाहिजे. आम्हांला काही ईश्वर प्रत्यक्ष दिसू शकत नाही. पण ज्यांना ईश्वराचं प्रत्यक्ष दर्शन घडलेलं आहे, असे जे महात्मे आहेत त्यांची कृपा संपादन करण्याकरता निरहंकार वृत्तीनं त्यांची सेवा झाली पाहिजे.**

कर्नाटक प्रांतातली या ठिकाणी राहणारी सर्वही मंडळी मिळून हा उत्सव या ठिकाणी करतायत. पुष्कळ वर्ष झाली. तिकडे वासुदेव निवासात जागा पुरत नव्हती. इकडे स्वतंत्र जागा आहे म्हणून इकडे सुरुवात केली आणि अत्यंत श्रद्धा भक्तिनं चिदंबर महास्वामींची कृपा सर्वांवर व्हावी म्हणून सर्वांना बोलावून, हा उत्सव करताहेत.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

## श्रीगणेशदत्तगुरुभ्योनम:

भारतवर्षामध्ये **भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला खरं तत्त्वज्ञान काय आहे, धर्म म्हणजे काय, भक्तियोग म्हणजे काय आहे हे सगळं आणखी पुढं मांडलं आहे.** अर्जुनही काही कमी अधिकारी भक्त नव्हता. त्याच्याजवळ ईश्वरभक्ति आहे. सेवाही त्याने पुष्कळ केलेली आहे. पराक्रमी आहे. शंकरांचा प्रसाद त्याच्यावर झालेला आहे. पण **ऐन युद्धाच्या वेळी त्याची बुद्धि गोंधळून गेली. हिंसा होणार माझ्या हातून, त्यापेक्षा आपण युद्ध सोडून दिले पाहिजे, कर्तव्य कर्म जे करायचे आहे ते कर्तव्य कर्म नको असे त्याला वाटायला लागलं. म्हणून भगवंतांनी त्याला उपदेश केलेला आहे.**

**हिंसा अहिंसेचा पुष्कळ मोठा विचार शास्त्रकारांनी केलेला आहे. एखाद्याने खून केला म्हणून न्यायाधीशांनी त्याला फाशीची शिक्षा दिली म्हणजे न्यायाधीशांनी खून केला असे म्हणायचे का? शिक्षा दिली पण ती बुद्धिपूर्वक नाही कर्तव्य म्हणून दिली आहे. न्यायदेवतेचे ते कर्तव्य आहे.** दुसऱ्याची हिंसा करणारा जो आहे त्याला दंड करायचा अधिकार आहे. स्वत:च्या बुद्धीने तो काही हिंसा करीत नाही. न्यायाधीशही आपल्याला ईश्वराने जी बुद्धि दिली आहे त्या बुद्धीने कार्य करताहेत यात वाद नाही. **बुद्धिवाद नको असे कोणी म्हणत नाही. बुद्धिनेच सगळा संसार आहे आणि परमार्थही बुद्धिनेच करता येतो. मोक्षही बुद्धिनेच मिळवता येतो. पण ती बुद्धि चांगली संस्कारयुक्त झाली पाहिजे एवढेच मोठमोठ्या महात्म्यांचे सांगणे आहे.**

तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।

**हा उपदेश आहे सद्गुरुनाथांचा. शास्त्रप्रमाण आहे. शास्त्राने जी आज्ञा केली आहे त्याप्रमाणे कर्तव्य कर्म केले पाहिजे तरच तुमचे कल्याण होईल. हा उपदेश करताना, मी उपदेश केला असे म्हणत**

**नाहीत, भगवान. त्या शास्त्राप्रमाणे आपल्या बुद्धिवर संस्कार झाले पाहिजेत. कसं वागावं, कोणचं कर्म योग्य आहे, कोणचं अयोग्य आहे हा सगळा निर्णय शास्त्ररुपाने, वेदरुपाने परमेश्वराने करुन ठेवलेला आहे. हे फक्त भारतामध्येच आहे.** भारतामध्ये बदलणारी घटना स्वराज्य मिळाल्यानंतर तयार झालेली आहे. अनादि काळापासून अनेक ऋषिमंडळींनी वेदांचे उत्तम ज्ञान संपादन करुन आपली बुद्धि चांगली बनवून मग लोकांचे हित काय आहे ते सांगितले आहे. मनु, अत्रि, पराशर अशा अनेक मोठमोठ्या ऋषींनी तपश्चर्या करुन, अभ्यास करुन आचारधर्म सर्वांपुढे मांडला आहे. **आपली आचारप्रधान संस्कृति आहे. केवळ विचारांना महत्त्व नाही. विचारांप्रमाणे आचार झाला पाहिजे. आचरण म्हणजेच तपश्चर्या आहे.**

**सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे चरित्र उद्बोधक आहे.** लहानपणापासून शास्त्राने सांगितल्याप्रमाणे आचरण करायचे. एकादशीला रात्री झोपायचे नाही असे शास्त्र सांगते. उपवास म्हणजे देवाच्या जवळ राहायचे. त्यामुळे झोप नाही. नामस्मरण करीत बसून राहायचे. झोप येऊ नये म्हणून शेंडीला एक दोरी बांधायची तिचे दुसरे टोक खुंटीला अडकवायचे. पेंग आली झटका बसायचा. आता शेंडीच नाही कोणाला. पण शेंडी किंवा शिखा म्हणजे एक प्रतीक आहे. चिन्ह आहे. संस्कृतीची निदर्शक अशी काही चिन्हं आहेत. झोपेवर नियंत्रण आहे, आहारावर नियंत्रण आहे. पवित्र आहार पाहिजे. **पवित्रपणा हा शास्त्राशिवाय समजत नाही.**

उत्तम फूल आहे. वास घेतल्यानंतर ते देवाला वाहता येत नाही. वास घेतला म्हणून काय झाले? असेच बुद्धिवादी विचारणार. पण वास घेतल्यामुळे ती पवित्रता गेली. **स्वच्छता निराळी आणि पवित्रता निराळी. भांडी किंवा वस्त्र धुतल्यावर स्वच्छ झाले हे डोळ्यांना दिसू शकते. पण पवित्र किंवा अपवित्र केवळ दृष्टीने ठरविता येत नाही.**

रावणाला बिभीषणाने, मंदोदरीने, एवढेच काय त्याच्या मुलाने सांगितले सीता ही परस्त्री आहे. पण रावणाने ऐकले नाही. तो म्हणाला, मला कोणतीच स्त्री परस्त्री नाही. सगळ्या स्त्रिया मी आणू शकतो. मला सगळ्या स्त्रिया सारख्याच आहेत. ही संस्कृति जर भारतात राहिली असती तर काय झालं असतं. त्याच्या या विचारांमुळे बिभीषणाने त्याची संगत सोडली. रामचंद्रांनीही प्रतिज्ञा केली की अशा संस्कृतीचे लोक जिवंत ठेवायचे नाहीत. बिभीषण शरण आला म्हणून त्याला आश्रय दिलेला आहे. राक्षस असला तरी त्याचे चांगले विचार आहेत.

परंतु अर्जुन हिंसाअहिंसा करीत बसला म्हणून त्याला सांगितले भगवंतांनी की हिंसा अहिंसा हे तुझ्या बुद्धिने ठरविता येणार नाही. दुर्विचारी व कुसंस्कृत लोकांना शासन केलेच पाहिजे. म्हणून त्याला बोध करुन त्याचा मोह दूर करा. त्याच्याकडून लढाई करिवली. सर्व धर्मविरोधी लोकांचा नाश केला. धर्मराज धर्मनिष्ठ आहे म्हणून त्याला राजा केला केवळ तो आपला आतेभाऊ आहे म्हणून नाही. धर्मासाठी प्राण गेला तरी हरकत नाही पण धर्म संरक्षण व्हायला पाहिजे ही बुद्धि ठेवणारा राजा पाहिजे. तर धर्माचे रक्षण होते.

महिषासुरमर्दिनीचे वाहन सिंह आहे. **सिंह हे धर्माचे रुप आहे.** त्या सिंहाच्या सहाय्याने महिषासुरमर्दिनीने महिषासुराचा नाश केलेला आहे. कुठे दया करायची, कशी करायची किंवा करायची की नाही हे सगळे बुद्धिला समजण्याकरता बुद्धिमध्ये शास्त्रसंस्कार पाहिजेत. ते असल्यानंतरच बुद्धिने कार्य होत राहणार. पूर्वीचे राजे लोक हे सगळे ज्ञान संपादन करीत. शास्त्रज्ञान, राजनीतीचे ज्ञान वगैरे सगळे समजले पाहिजे ना । राजनीतीमध्ये स्वार्थ येणार नाही. स्वार्थ नको म्हणून कायदा करुन उपयोग नाही. कायद्याने मनातली वासना, लोभ, विकार जाणार नाहीत. हे सगळे मानसिक विकार नाहीसे झाले पाहिजेत. **पापभीरुता मनामध्ये**

**उत्पन्न झाली तरच राज्य व्यवस्थित होईल. केवळ कायदा करुन चांगला राज्यकारभार होऊ शकणार नाही. याचा अनुभव आपल्याला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुष्कळ मिळालेला आहे.** अनेक निरपराध लोक मारले जात आहेत. परदेशातल्या राजनीति/घटना डोळ्यासमोर ठेवून आपली राजनीति/राज्यघटना तयार केली गेलेली आहे. अभ्यास नसल्याने आपल्या प्राचीन राजनीतीचा विचार केला गेलेला नाही. बदलत जाणारी घटना आमची नाही. लक्षावधी वर्ष झाली पण वेद शास्त्राची परंपरा भारतामध्ये अखंड चालू आहे. भगवद्‌गीता प्रगट होऊन पुष्कळ वर्ष झाली. आजही गीतेवर श्रद्धा ठेवणारी मंडळी आहेत. वाङ्मय तप करताहेत. वाणी शुद्धी होते आहे. तर हा अभ्यास करुन जी बुद्धि तयार झाली आहे तो बुद्धिवाद भारताला मान्य आहे. त्या बुद्धिवादाने कोणाचेही नुकसान होणार नाही. किंवा जास्ती कोणाला सवलतही दिली जाणार नाही. राजनीतीचे ज्ञान नसल्याने अपराधी माणसाच्या शिक्षेत सवलत द्यायची. स्वार्थी बुद्धि उत्पन्न होऊन राष्ट्राची पुष्कळ हानी होते आहे. हे टाळण्याकरता हे सगळे **ज्ञान मिळवले पाहिजे. संत महात्म्यांच्या ग्रंथातून हे ज्ञान मिळतं.**

**भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे**

**हा ज्ञानेश्वर महाराजांचा उपदेश राष्ट्राला कितीतरी उपयोगी पडणारा आहे. सगळ्यांनी एकमेकांवर प्रेम करावे, मैत्रीची भावना ठेवावी हे जे ज्ञानेश्वर सांगताहेत ते राष्ट्राच्या कल्याणाकरताच आहे. परस्पर सौहार्द्रभाव जर निर्माण झाला तर दुसरा कोणताही शत्रू होऊ शकत नाही. पण तो सौहार्द्रभावच निर्माण होत नाही. कारण बुद्धिमध्ये विकार आहेत. स्वार्थ मनामध्ये असल्याने आपल्याला अनुकूल तेवढे आपले आणि आपल्याविरुद्ध असणारे निराळे अशीच भावना होते आहे. एक राष्ट्र ही कल्पनाच आमच्या मनामध्ये होत नाही. बुद्धिमध्ये**

**चांगले संस्कार नसल्याने राष्ट्राचे खरं कल्याण होत नाही. हित कशाला म्हणायचे याची आम्हांला कल्पनाच नाहीये. त्यामुळे कितीतरी संकटाचे प्रसंग येताहेत.**

**ईश्वराला आपण शरण जायचे आहे. सर्वांच्या बुद्धिला प्रेरणा करणारी शक्ति म्हणजे ईश्वरशक्ति आहे असे संतांचे अनुभवाचे सांगणे आहे. भारतात जन्मलेल्या सगळ्यांनी ईश्वराचे अस्तित्व मान्य करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. ईश्वराबद्दल आस्तिक्यबुद्धि प्रत्येकाच्या अंत:करणात निर्माण व्हावी म्हणून सगळ्या संत महात्म्यांचे प्रयत्न चालू आहेत. याकरताच त्यांनी त्यांचे ग्रंथ केले आहेत. ईश्वरभक्ति कशी आहे हे सर्वांपुढे त्यांनी मांडलेले आहे.**

विदर्भ, मराठवाड्यात सद्गुरु वासुदेवानंदसरस्वतीस्वामी महाराजांचा सर्वत्र पायी संचार अधिक झालेला आहे. कारण त्यांना अशा प्रकारची संस्कृत बुद्धि इथे पहायला मिळाली. ज्ञानाचे संस्कार झालेली बुद्धि त्यांना जास्त पसंत होती. **कारण अशी बुद्धि समाजाला, राष्ट्राला कल्याणकारक आहे. म्हणून आपली बुद्धि चांगली ठेवली पाहिजे. बुद्धीमध्ये चांगले संस्कार झाले पाहिजेत. ती बुद्धीच मृत्यूनंतर आमच्याबरोबर येणार आहे. भौतिक संग्रह कितीही केला तरी तो बरोबर नेता येत नाही. स्वत:चा देहसुद्धा इथे राहातो. बुद्धि, मन आपल्याबरोबर येतं. पुढच्या जन्मात जाताना जर चांगले संस्कार आपण नेले तर ते वाढत जातात. ईश्वराचा साक्षात्कार बुद्धिनेच होतो म्हणून या बुद्धिवादाचा केवळ या जन्मापुरता विचार करुन भागणार नाही.**

काही लोकांच्या मते फक्त अर्थ व काम हे दोनच पुरुषार्थ आहेत. पण केवळ अर्थ कामाकरता प्रयत्न करुनही काही पूर्णता नाहीये. कल्याण नाहीये. परदेशांतील लोकांना विशेष धर्मभावना, संस्कार नाहीयेत.

मोक्षाचा तर विचारही त्यांना शिवत नाही. अर्थ आणि काम हे दोन पुरुषार्थ पूर्ण करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. तिकडच्या सुधारणा म्हणून आपण ज्या कांही समजतो त्या इथे झाल्या पाहिजेत असे आपल्याला वाटते.

सध्या **स्त्रीमुक्ति**चाही पुष्कळ प्रयत्न चाललेला आहे. भारतात स्त्रियांना पारतंत्र्य दिले आहे असा एक विचार मांडताहेत कांही जण. पुरुषमुक्तिसाठीही प्रयत्न करताहेत. पण स्त्रियांना स्वातंत्र्य दिले नाही म्हणजे काय दिलेले नाही हे स्पष्ट होत नाहीये. हिटलरलासुद्धा प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **मनु**बद्दल आदर होता म्हणतात. मनुने स्त्रियांची कर्तव्य कर्म कोणची हे सर्व लिहून **ठेवले आहे. त्यातले पहिले कर्तव्य म्हणजे स्त्रियांनी घरचा जमाखर्च ठेवावा. स्त्रियांनी हे कधी वाचलय ? आणि त्या करता प्रयत्न केला आहे का ? स्वयंपाक, चूल आणि मूल आमच्याकडे दिले आहे आणि पुरुषांनी वाटेल तसे फिरायचे म्हणतात पण पुरुषांनी आपल्या स्वतःच्या जवळ पैसा ठेवायचा नाही असे मनु राजाने सांगितले आहे.** द्रौपदीकडे अर्थखाते होते. ती मोठी अर्थशास्त्रज्ञ होती.

**त्यानंतर शुचिता, पवित्रपणाची जबाबदारी स्त्रियांवर टाकली आहे. काया वाचा मनाने पवित्र राहिले पाहिजे. आपले कुलदैवत, कुलधर्म कुलाचार कोणते हे सगळे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. स्त्रियांना मुद्दाम घरात ठेवायचं हा मनुराजाचा उद्देश आहे असे कसे म्हणता येईल ? कारण उपनिषदांमध्ये सांगितलेले आहे की आपले मन अन्नापासून तयार होते. पवित्र मनाने आणि धर्मशील बुद्धिने राहणाऱ्या स्त्रीने स्वयंपाक केला आणि ते अन्न जर पुरुषांच्या पोटात गेले तर त्यांचे मन तसेच तयार होणार. अन्नाच्या श्रेष्ठ अंशापासून मन तयार होते.** सर्वांची मनं तयार करण्याकरता कायदासुद्धा अपुरा आहे, राष्ट्रपतींचा

वटहुकूमसुद्धा अपुरा आहे आपण पहातोच आहोत. एकेक प्रांत स्वतंत्र व्हायला पहाताहेत. कायदा करुन कांही जमत नाही. स्वातंत्र्य मिळून कांही उपयोग नाही. स्वातंत्र्य पूर्व काळात कोणी वरती डोकेसुद्धा काढत नव्हते. कांही दरारा होता. राजकारणामध्ये थोडे धैर्य पाहिजे ते आज नाहीये. सर्वही राष्ट्रातल्या पुरुषांची मनं चांगली झाली पाहिजेत. कुंतीने उपदेश केलेला आहे आपल्या मुलांना, तुम्ही असे वैर भावाने राहू नका. चांगले नाही. तर चांगली मनं तयार करण्याकरता स्वयंपाक स्त्रियांनी केला पाहिजे. सर्वांच्या मनात आपल्या संस्कृतीबद्दल कांही अभिमान निर्माण झाला पाहिजे. **शिवाजी महाराजां**नी तानाजींसारखे राष्ट्रभक्त वीर निर्माण केले. तानाजींच्या मुलाचे लग्न ठरले आणि महाराजांचा निरोप आला, कोंढाणा सर करायचा आहे. तानाजींनी लग्न थांबविले आणि लढाईवर गेले आहेत. लढाई म्हणजे कांही ट्रिपला जायचे नाही. मुलाचे लग्न ठेवून गेले तानाजी. ही राष्ट्रभक्ति असणारी मनं तयार झाली पाहिजेत. ती जबाबदारी स्त्रियांवर मनुने सोपवली आहे. दुपारच्या वेळेला माधुकरी मागायला आलेल्याला पाहिले की तिच्या मनांत येते माझाही बाळ असाच कुठे तरी गुरुकुलामध्ये शिकत असेल. तोही असाच माधुकरी मागायला गेला असेल. अशा प्रेमाने त्याला ती माधुकरी वाढते आहे. पवित्र मनाने तयार केलेल्या अन्नाचा देवाला नैवेद्य दाखवून सेवन केल्यावर चांगले मन तयार होते. नाही तर पाश्चात्त्यांचा बुद्धिवादच बरोबर वाटू लागतो. अशी चांगली मनं तयार झाल्यावर भारताकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही.

घरामध्ये कपडालत्ता, भांडीकुंडी, जुने नवे किती आहेत हे पाहायची जबाबदारीही स्त्रियांची आहे.

मन पवित्र होऊन ईश्वराकडे लागले पाहिजे. तुकाराम किंवा नामदेवमहाराजांजवळ संपत्ती नव्हती पण पांडुरंग साक्षात् त्यांच्याशी

बोलत होते, त्यांच्या हातचे जेवत होते. आमच्या बुद्धिवादात याला कांही स्थान नाही. कुठला ईश्वर, कुठला स्वर्ग, कुठला नरक, कुठला धर्म सगळं खोटं आहे आमच्या बुद्धिवादाप्रमाणे. पण हे संस्कार वाढत गेल्यावर सी.आय.डी.खात्याने कितीही प्रयत्न केला तरी खरा अपराधी सांपडणे शक्य नाही. कारण त्याच्याकडे, सी.आय.डी. तपासायला, पकडायला येणार आहेत, असा आधीच निरोप गेलेला असतो. मग तो कसा मिळणार? सी.आय.डी.वर सी.आय.डी. नेमावा असे सांगितले आहे. त्याचा राजकारणात उपयोग आहे पण सगळ्याच सी.आय.डींची बुद्धि अशी भ्रष्ट झाल्यावर किती नेमणार? सगळं राष्ट्र सी.आय.डी.खात्याचे होईल. म्हणून प्रत्येकाच्या मनाची तयारी झाली पाहिजे. आपण जे करतो आहोत हे पाप आहे पुढे आपल्याला याचा जाब द्यावा लागेल असे मनात आले तर पापापासून निवृत्त होण्याची बुद्धि होईल. **त्यावेळी हळूहळू सुधारणा होण्याची शक्यता आहे. ती सुधारणा होण्याकरता ईश्वराच्या उपासनेची आवश्यकता आहे.**

**ईश्वराकडे कसे मन लावायचे हे संतांनी सांगितले आहे.** स्वतःच्या मनाची तयारी स्वतः करु शकत नाही. अयोग्य संगतीमुळे चांगले सगळे विसरुन जातो. इतर लोकांप्रमाणे आपल्याकडे घर दार मोटारगाडी आहे आपण नुसते बसून कसे चालेल. आपणही ते सगळे मिळवले पाहिजे असे वाटू लागते. आपल्या अर्थार्जनामध्ये समाजाचाही कांही भाग आहे हे लक्षात ठेवून जर अर्थार्जन झाले तर त्यागबुद्धि उत्पन्न होणार. पण मी एकटाच याचा मालक आहे, माझ्या इच्छेप्रमाणे या सगळ्याचा मी विनियोग करणार असे म्हटले की संपले. तो कांही स्थिर निर्णय घेतला असे नाही. ती मनाची धारणा आहे.

**कालीदासांनी** सांगितलंय पूर्वीचे राजे लोक त्यागाकरता संग्रह करीत. ही जर त्यागबुद्धि असेल तर **साम्यवाद** कधीच येणार नाही. मग

साम्यवाद येऊ नये म्हणून प्रयत्नही करायची गरज नाही. साम्यवादी लोक सांगतात ज्या दिवशी एकाही मनुष्याजवळ थोडीसुद्धा वैयक्तिक संपत्ती राहाणार नाही त्या दिवशी आमचा प्रयोग यशस्वी झाला असे आम्ही समजू.

आमच्या शास्त्रकारांनी सगळं सांगून ठेवलं आहे. आपण कर्तव्याचं पालन करायचं आहे आणि दुसऱ्यालाही सहाय्य करायचं आहे. पेशव्यांच्या तोफ़खान्यावर पुष्कळ मुसलमान होते. ज्यांच्या मनांवर चांगले संस्कार आहेत, आत्मीयता आहे ते सगळे आपलेच लोक आहेत. त्यांना दूर करण्याचे कारण नाही. पण ज्यांची बुद्धि रावणाप्रमाणे आहे त्यांना शासन झाले पाहिजे. शिवाजी महाराजांनी स्वत:ला राजा करण्यासाठी प्रयत्न केला नाही तर लोकांत चांगली बुद्धि निर्माण व्हावी म्हणून केला. स्वत:च्या धर्माचे संरक्षण व्हायला पाहिजे. सर्व लोकांच्या मनामध्ये राष्ट्रभक्ति निर्माण झाली पाहिजे. धर्मानुकूल बुद्धि झाली पाहिजे.

गीतेमध्ये भगवंतांनी हाच उपदेश केला आहे. कर्मयोग प्रथम सांगितला. पहिल्या प्रथम प्रत्येकाने आपापले कर्तव्य कर्म समजून घेऊन त्याप्रमाणे वागलं पाहिजे. देवांनी माणसाला सहाय्य करायचे, माणसांनी देवांना सहाय्य करायचे. देव म्हणजे ज्यांची चांगली बुद्धि असेल असे. इह लोकामध्ये आपण एकट्यानेच सुखी व्हावे अशी इच्छा असणाऱ्याला असुर म्हटले पाहिजे. तो दैत्य आहे. तो मनुष्यसुद्धा नाही. देव तर नाहीच नाही. त्याकरता ही असुरी वृत्ति गेली पाहिजे. आणि दैवी बुद्धि निर्माण झाली पाहिजे. निदान मनुष्य बुद्धि तरी निर्माण झाली पाहिजे. दैत्य बुद्धि जाण्याकरता संत महात्म्यांनी प्रयत्न केले आहेत. आजही सुरु आहेत. ईश्वराची तशी इच्छा आहे. ईश्वरकृपा आहे हे लक्षात ठेवून आपण वागायचे आहे.

वैदिक धर्मात कांही वावगं नाहीये. कुणाचाही विरोध नाहीये. आपलं कर्तव्य करणे म्हणजे दोष नाही. ते आपले कर्तव्य कर्म विशिष्ट रीतीने पार पडण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करायचा आहे. कलीयुगात सामुदायिक शक्तिला महत्त्व दिले आहे. कारण एका व्यक्तिजवळ तसे कार्य करण्याची शक्ति नाही, तप नाही. आणि ईश्वराची कृपाही नाही.

संत महात्मे एकटेच होऊन गेले. मारुतीराय एकटेच लंकेला गेले. सीतामाईंचा शोध लावून धैर्य दिले. रावणाची शक्ति काय आहे ओळखून आले. लंका जाळून आले. पण सध्याच्या काळामध्ये एकट्याकडे अशी शक्ति उत्पन्न होणे कठीण आहे. म्हणून सामुदायिक शक्ति जर एकत्र झाली तर त्याचा पुष्कळ उपयोग होऊ शकतो. सामुदायिक शक्ति उत्पन्न होण्यासाठी लोकमान्यांनी गणेशोत्सवासारखे कांही उत्सव सुरु केले. त्या निमित्ताने कां होई ना लोकांना एकत्र येऊ दे, हा त्यांचा उद्देश होता.

**आधुनिक बुद्धिवादामध्ये सगळाच दोष आहे असे नाही. पण पारमार्थिक दृष्टीने आपल्याला किती लांबचा प्रवास करायचा आहे, त्या करता कसे वागले पाहिजे याचाही विचार केला पाहिजे. हा विचार सामाजिक दृष्टीनेही उपयोगी पडणारा आहे. हाच आमचा सर्व समाजाला उपयोगी पडणारा भारतीय धर्म आहे. त्यात कोणाचा द्वेष नाही, द्रोह नाही. हे आपण समजून घेतले पाहिजे. इतरांना समजून दिले पाहिजे. त्याप्रमाणे कार्य झाले तर समाजाचाही उत्कर्ष होणार आहे. धर्म हा कांही अर्थाला सोडून आहे असा याचा अर्थ नाही. अर्थ कामाकरताही धर्म आहे.** हे सगळं समजून घेऊन सर्वांची बुद्धि आणखी ईश्वर भक्तिकडे वळावी, धर्माचरणाकडे प्रवृत्ति व्हावी, सर्वांचेही पूर्ण कल्याण व्हावे. ही कृपा अंतर्यामी भगवंताने करावी अशी प्रार्थना करुन ही वाङ्मय सेवा पूर्ण संपवतो.

**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

# श्रीमद् भगवतगीतेवरील प.पू. श्री दत्तमहाराजांचे निरूपण

विषय : समत्वबुद्धि, ज्ञान, बुद्धीची सुधारणा, मन:शक्ति, प्रयत्नवाद, क्षेत्रक्षेत्रज्ञविवेक, ध्यानाभ्यास, मनाची स्थिरता, अभ्यास, कर्मयोग, संतचरित्र दृष्टांत.

भगवत् गीतेवर अभ्यासपूर्वक प्रवचनं या ठिकाणी प्राध्यापक राजाभाऊ जोशी यांची चालू आहेत.

व्यास महर्षि सांगताहेत - भगवत् गीता ही त्या पद्मनाभाच्या मुखातून निघालेली आहे. सर्व विश्व ज्याने निर्माण केले किंवा ज्याच्या नुसत्या संकल्पाने निर्माण होते अशी ज्याची क्रियाशक्ति आहे, त्याची ज्ञानशक्ति केवढी आहे! हे या भगवत् गीतेवरून समजून येते. त्रिकालदर्शी व्यासमहर्षींनी भगवंतांनी केलेला हा उपदेश लोकांना उपयोगी पडावा म्हणून सातशे श्लोकांमध्ये लिहून ठेवला आहे. या भगवत् गीतेचा अर्थ समजून घ्यायची इच्छा असलेली जिज्ञासू मंडळी इथे आहेत. आणि त्यांची इच्छा पूर्ण करणारेही वक्ते आपल्याला मिळाले आहेत.

सतरा अध्याय झालेले आहेत असं त्यांच्याकडून समजलं. चांगलं आहे. एक अध्याय राहिला आहे. सर्व उपनिषदांमध्ये असलेल्या ज्ञानाचे सार भगवंतांनी गीतेच्या रूपाने आपल्यापुढे ठेवले आहे. सर्वही आबालवृद्धांना समजावे या उद्देशाने त्यांचेच अवतार असलेल्या ज्ञानेश्वर महाराजांनी भावार्थ दीपिका - ज्ञानेश्वरी रूपाने आपल्यापुढे ठेवला आहे. हे आपले मोठे भाग्य आहे. ईश्वररूप झालेल्या महाराष्ट्रातील संतांनी गीतोपदेश आपल्या भाषेत लिहून ठेवला हे महाराष्ट्राचे भाग्य आहे.

भगवंतांचे दुसरे प्रिय शिष्य म्हणजे उद्धवजी. मोठे राजनीतिज्ञ मंत्री होते यादवांचे. पण देवाचे मोठे भक्त होते. गीतेप्रमाणेच उद्धवजींना भगवंतांनी जाताना केलेला उपदेशही व्यास महर्षींनी लिहून ठेवला आहे.

म्हणून तो आज आपल्याला पहायला, ऐकायला मिळतोय. भागवताच्या एकादश स्कंधामध्ये तो आला आहे. तीव्र जिज्ञासा ज्याच्या मनामध्ये आहे, त्याच्याकरता ही सगळी सोय आहे. त्याचे वाचन, मनन केल्यानंतर तो समजणार नाही असे नाही. पण ज्या मंडळींनी त्याचा अभ्यास केला आहे, मनन केलेले आहे, त्यांचे थोडे मार्गदर्शन होत राहिले म्हणजे आपल्या बुद्धीत खरा ज्ञानप्रकाश होतो आणि तो दृढ होऊन टिकतो.

भगवत् गीतेच्या शेवटी भगवान सांगतात -

**ईश्वरः सर्वभूतानाम् ।**

हे सगळ्याचे सार आहे. ईश्वर आपल्याला दिसत नाही, पण या चर्मचक्षूंनीही त्याला पहाणारे महात्मे आहेत. होऊन गेलेले आहेत. परंतु आपल्यासारख्या सामान्य माणसाची तेवढी योग्यता नाहीये. म्हणून ईश्वराचे स्थान कुठे आहे हे मुख्यत्वेकरून भगवान सांगताहेत. आणखी त्याची शक्ति केवढी आहे हेही सांगताहेत. सर्व भूतांचे हृदय हे स्थान सांगताहेत. सर्वांच्या हृदयामध्ये भगवान आहेत. बुद्धिस्थ आहे परमात्मा. भगवंताचे स्वरूप कसे आहे, शक्ति कशी आहे, उपनिषदातल्या अंतर्यामी ब्रह्माचे वर्णन वगैरे सर्व आचार्य महाराजांनी आपल्या श्रीकृष्णाष्टकम् या स्तोत्रात केले आहे.

ते म्हणतात, 'हे संपूर्ण विश्व या परमेश्वरापासून निर्माण झाले. केवळ संकल्पाने पंचमहाभूते निर्माण झाली. अशी त्याची संकल्पशक्ति आहे. संरक्षण करण्याच्या वेळेलासुद्धा आपल्या आनंदरूपाने भगवान संरक्षण करताहेत. प्रलयाच्या वेळेला उपसंहारही करतात.'

**शरण्यो लोकेशो ।**

माझ्या नेत्राला परमात्मा हा विषय व्हावा. परमात्म्याचे दर्शन नेत्रांनी होणे शक्य आहे हे आचार्य महाराज सांगताहेत. तो हृदयामध्ये आहे.

तटस्थ होऊन सांगताहेत. आपला ईश्वरभाव काही वेळा भगवंतांनी प्रगट केला आहे. अर्जुनाला आलेली शंका दूर करण्याकरता आपण कोण आहोत हेही सांगितले, पण इथे मात्र तटस्थपणे सांगताहेत -

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।। ४.१ ।।**

सूर्यनारायणाला मी ज्ञानयोगाचा उपदेश केला. त्याने मनुला सांगितला. पुढे परंपरेने हा मार्ग आलेला आहे. ते ऐकून अर्जुनाच्या मनामध्ये संशय निर्माण झाला. त्याने विचारले, ''देवा, सूर्यनारायण किती अनादि कालापासून आहे. तू तर अगदी अलिकडच्या काळात माझ्याबरोबर जन्माला आला आहेस. मग तू सूर्यनारायणाला उपदेश केंव्हा केलास?'' सामान्य माणसाला येणारी शंका आहे ही. कारण शरीर समोर दिसतंय, ईश्वर नेत्रांनी दिसत नाही हे आहे. ईश्वर समोर असतानासुद्धा ईश्वर आहे ही कल्पना आमच्या मनाला येत नाही. ईश्वर दिसून काय उपयोग? प्रत्यक्ष भगवान गोपालकृष्ण समोर उभे आहेत ते सांगताहेत की मी सूर्याला उपदेश केलेला आहे. त्यांचे वय आणि देहाकडे पाहून अर्जुन प्रश्न करतोय की, ''तू सूर्यनारायणाला उपदेश केंव्हा केलास?'' परंतु भगवान गोपालकृष्णांनी अर्जुनाच्या प्रश्नांची उपेक्षा केली नाही. ते म्हणाले, ''माझे पुष्कळ जन्म झालेले आहेत. या जन्मामध्ये तू मला तुझ्या बरोबरीचा समजतोस. पण माझ्याबरोबर तुझेही अनेक जन्म झाले आहेत. परंतु तुला त्यांचे ज्ञान नाहीये. ते सगळे मला माहीत आहेत. माझ्या केवळ शरीराकडे पाहून तुझ्या मनात ही शंका आली आहे.''

ईश्वराचे स्वरूप हे अंतर्यामी आहे असे उपनिषदांमध्ये सांगितले आहे. पंचमहाभूतांच्या सुद्धा देवता आहेत. आधिदैविक सृष्टि फक्त वैदिक संस्कृतीमध्येच दाखवलेली आहे. बुद्धिवादी जगात फक्त भौतिक सृष्टीचाच विचार सध्या चालू आहे. आपला बुद्धिवाद श्रेष्ठ आहे अशीही

त्यांची समजूत आहे. तो जर श्रेष्ठ आहे तर आधिदैविक सृष्टि नाही असे कशाला म्हणायचे ? उपनिषदांसारख्या ग्रंथांमध्ये ज्या सृष्टीचं वर्णन आहे त्याबद्दल श्रेष्ठ बुद्धिवाद्यांनीही विचार करायला काय हरकत आहे. 'नाही' म्हणून एकदम कसा निर्णय द्यायचा ? पण तो निर्णय झालेला आहे आणि तोच बुद्धिवाद खरा आहे अशी ठाम समजूत होऊन बसलेली आहे. त्या बुद्धिवादाचा अहंकारही निर्माण झालेला आहे. त्यामुळे जिज्ञासा संपलेली आहे. आधिदैविक सृष्टिबद्दल जिज्ञासा असणार तरच बुद्धि तिचा विचार करू शकणार !

वैदिक संस्कृतिमध्ये शब्दप्रमाण आहे. मोठमोठ्या बुद्धिवादी महर्षींनी या शब्दप्रमाणाच्या आधारेच आधिदैविक शक्तीचा, सृष्टीचा विचार केला आहे. भौतिकशक्ति असेल, पण भौतिकशक्तीचं नियंत्रण करणारी अशाच प्रकारची एक निराळी आधिदैविक शक्ति आहे. त्या दृष्टीनं पंचभूत ही केवळ जड नाहीयेत. त्यांच्यामध्ये अंतर्गत जीव आहे. देवता आहेत. पृथ्वी ही देवता आहे, जल ही देवता आहे. त्याचप्रमाणे शरीराला धारण करणारी अशाच प्रकारची देवता जीवकोटीमध्ये आहे. आणि या सर्वही जीवांचे नियमन करणारी शक्ति प्रत्येक जीवाच्या अंतर्यामी आहे. आपल्या मायाशक्तीने सर्वही जीवांना जन्ममृत्यु यामध्ये फिरवण्याचे काम ही शक्ति करते आहे. आमच्या बुद्धिला पटत नाही म्हणून हे थांबणार आहे असे नाही. इथे कोणाच्याही पटण्याचा न पटण्याचा संबंध नाहीये. जिज्ञासा हा मोठा गुण आहे. शास्त्रसिद्धांत काय आहेत हे जाणून घेण्याची जिज्ञासा ज्यांच्या मनात आहे ते अभ्यास करतात, प्रयत्न करतात. जिज्ञासा ही मुख्य आहे ना ! जिज्ञासाच नसेल तर प्रयत्न कशाला होईल?

कर्तुम अकर्तुम अन्यथा कर्तुम असे त्या ईश्वराचे सामर्थ्य आहे. आपल्या मायाशक्तीने सर्वही जीवांना तो जन्ममृत्युच्या चक्रात फिरवतो.

भगवान सांगताहेत त्या ईश्वराला शरण जा. मी ईश्वर आहे असे नाही म्हणाले. प्रसंगाने बोलले असतील तसे. 'मी कालरूप आहे' असे म्हणाले असतील, अर्जुनाचा अभिमान दूर करण्याकरता. त्याला आपले विश्वरूप दाखवले. त्याला योग्यता प्राप्त करून दिली. ज्ञानदृष्टि दिली. त्याला सांगितलं, 'सगळ्यांचा संहार करण्याचा माझा संकल्प होऊन गेलेला आहे. तू युद्ध सोडून निघून गेलास तरी यांच्यापैकी कोणी जीवंत राहणार नाही. तू ह्यांचे संरक्षण करणार काय?' हे पटवून देण्यासाठी त्याला विश्वरूप दाखविले.

**निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥**

असेही सांगितले. तू निमित्तमात्र हो. सगळ्या वीरांना मारण्याचा माझा संकल्प झालेलाच आहे. निमित्तमात्र का होईना कर्तृत्व जीवाचं असलं पाहिजे हे देवालाही मान्य आहे. पण तसंच राहिले पाहिजे. मी फक्त निमित्तमात्र आहे. खरा संकल्प, खरी शक्ति ईश्वराची आहे. ही जाणिव मनामध्ये ठेवून आपण जर कर्म केलं तर ते कर्म शुद्ध होतयं. मग ते कर्म बंधनकारक होत नाही.

भगवान सांगतात, लहान-मोठी सर्व कार्य माझ्या शक्तींमुळे होताहेत. त्याचा संकल्प आहे, त्याचे संरक्षण आहे. ईश्वर दर्शनाला शास्त्र हेच प्रमाण आहे, दुसरे प्रमाण नाही. ईश्वर प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे तो नाहीच अशी धारणा झाल्यावर त्याच्या दर्शनासाठी प्रयत्न कसा होणार? पण ईश्वर नाही असे म्हणायलाही आमच्याकडे प्रमाण नाही. आमच्या बुद्धीला समजत नाही म्हणून तो नाही हा काही युक्तिवाद नव्हे. सीतेचा शोध करणाऱ्या वानरांना सीता दिसली नाही. ते निराश झाले पण जटायुचा बंधू संपाती तिथे आला आणि त्याने सीतेचा ठावठिकाणा प्रत्यक्ष पाहून सांगितला. आता जर का वानरांनी विचार केला असता, आमच्या पैकी कोणालाच दिसत नाही. तुला एकट्याला तेवढी दिसते

हे खरं कसं मानायचे ? तर सीतेचा शोध लागला असता का ? प्रत्यक्षदर्शी जे महात्मे आहेत त्यांची शक्ति आमच्या बुद्धीला आकलन होऊ शकत नाही. पण ते सांगताहेत त्याप्रमाणे प्रयत्न करून पाहूया असेही आमच्या बुद्धीला पटत नाही. त्यामुळे आमच्याकडून प्रयत्नच होत नाहीत. जिज्ञासाच निर्माण होत नाही.

भगवंतांनीही सांगितले - शास्त्रप्रमाण आहे. शास्त्रानुसारिणी बुद्धि शुद्ध समजली गेली आहे. बुद्धीला समाधान ज्याच्यामध्ये असेल तोही बुद्धीचा विषय होऊ शकतो. पण ती बुद्धि फार मोठी असली पाहिजे. दुष्यंत राजा एकदा शिकार करून परत येताना कण्व ऋषींच्या आश्रमात थांबला. कण्व ऋषि बाहेर गेले होते. शकुंतलेने त्याचे आदरातिथ्य केले. तिच्यावर दृष्टी पडताच त्याच्या मनात मोह उत्पन्न झाला. प्रथम त्याच्या मनात आले की, मी क्षत्रिय आहे आणि ती ऋषिकन्या म्हणजे ब्राह्मणाची कन्या आहे. तिच्यावर माझे मन जाणे बरोबर नाही. तो शास्त्र मानणारा असल्यामुळे त्याने आपले मन आवरले. पण पुन्हा त्याला वाटलं, ज्या अर्थी माझे मन तिच्यावर गेले, त्या अर्थी ती क्षत्रिय कन्याच असली पाहिजे. माझं आर्य मन शास्त्रानुसारी आहे. शास्त्राने सांगितलेले शब्दप्रमाण आणि महात्म्यांच्या शब्दावर विश्वास आहे. त्याप्रमाणे विचार करणारी माझी बुद्धि आहे. माझं अंतःकरण ज्या अर्थी या कन्येवर गेलेले आहे, त्या अर्थी ही क्षत्रिय कन्याच असली पाहिजे.

पण माझं मन असं आर्य मन आहे हे सांगण्याचे धाडस एरव्ही कोण करील ? नेहमी आम्हाला आर्यच आमचं मन आहे असे वाटत असतं. अनेक प्रकारचे दोष बुद्धिमध्ये भरलेले असतानासुद्धा बुद्धिप्रेरक शक्ति आहे हे मानायचीही आमच्या बुद्धीची तयारी नाही. मग त्या ईश्वरशक्तीची कृपा असणं, त्या कृपेने मन आर्य बनवणं, शुद्ध बनवणं ही लांबची गोष्ट आहे. आम्ही चुकतो हेच आम्हाला मान्य नसते, पटत

नसते. आम्ही केलेले सर्व बरोबर आहे अशीच आग्रही वृत्ति जोपर्यंत मनाची व बुद्धीची आहे तोपर्यंत बुद्धीची सुधारणा होणार कशी? दोष आहेत समजल्यावर त्यावर उपाय करायचा ना ! दोषज्ञान स्वत:ला तरी होऊ शकेल. रोग्याला सर्व दोषांचे ज्ञान होत नाही. काही चिन्ह त्याला समजतात. आपल्या शरीरात काही बिघाड झालाय, दोष निर्माण झालाय हे समजते, म्हणून तो डॉक्टर, वैद्याकडे जातो. ते त्याला तपासून रोगाचे निदान करून औषध योजना करतात. पण जर डॉक्टरांच्या शब्दावर विश्वास न ठेवता तो रोगी चिकित्सा करू लागला, तुम्ही कशावरून सांगता हा रोग झाल्याचे, त्या रोगावर हेच औषध कशावरून, ही चिकित्सा करण्याची पद्धत आहे का वगैरे म्हणून लागला तर ! आणि ती वेळ आहे का?

**तूष्णिम् अवस्था परमोपशांतिम् ।।**

ही परा शांति आहे. मन स्वस्थ राहणं याचं नांव शांति आहे. मन स्वस्थ राहणं शक्य आहे का? आम्ही आमच्या बुद्धीचा फक्त अभिमान धरतो. आमची बुद्धि चांगली आहे, आम्ही बुद्धीने सर्व कार्य करतो वगैरे अभिमानाने सांगतो. आग्रह धारण करतो. तर मनाच्या या वृत्ति बंद करणं, मनाची स्वस्थता करणं हे आमच्या मनाच्या स्वाधीन आहे का? आमच्या मनाची शक्ति आहे का ती? मन स्थिर होणं कठिण आहे. अर्जुनासारखासुद्धा बोलून गेला की, 'या सैन्याचा निग्रह मी करू शकेन पण मनाचा निग्रह मी करू शकणार नाही.'

भगवानही म्हणाले, ''मनाचा निग्रह करणे अत्यंत कठिण आहे.'' असे ते अगोदर बोलून गेले, पण पुढे म्हणाले, ''अभ्यासेन तु कौन्तेय''. मनाची शक्ति इतकी मोठी आहे की, त्या मनाला आवरण्याची शक्तीही त्या मनामध्येच आहे. मन बाहेर जाणे म्हणजे ईश्वरापासून बाजूला होणे. ते ईश्वराकडे लागणे आणि ते स्थिर होणं, पूर्ण शांति म्हणजे मनाची

निश्चल अवस्था प्राप्त करून घेणे हीसुद्धा मनावरच अवलंबून आहे. त्याकरता अभ्यास आणि वैराग्य हे दोन उपाय, योगसूत्रकारांनी सांगितले आहेत. भगवंतांनी हेच दोन उपाय अर्जुनाला सांगितले. **ते म्हणाले, मनाला स्थिर करण्याचा एक अभ्यास आहे. त्याकरता अंतर्यामी ईश्वराला सतत प्रार्थना करीत राहणे एवढेच मुख्य कर्तव्य आहे. ईश्वर शक्ति आपल्याला सहाय्य करणारी आहे एवढं जरी आपल्या मनाला पटले तरी पुष्कळ झाले. आम्ही मनाचा निरोध करण्याचा प्रयत्न करणार आहोत. त्या प्रयत्नांना कोणाचे तरी सहाय्य पाहिजे. तशी सहाय्य करणारी ईश्वर शक्ति आहे हे मनाला पटलं तरी पुष्कळ झाले ना ! सहाय्य म्हणून तरी ईश्वराकडे जायला पाहिजे ना !** आपलं कर्तृत्व काहीच नाही. ईश्वरशक्तीच सर्व कार्य करणारी आहे. विश्वरूपही तो झालेला आहे आणि विश्वकर्ताही तोच आहे. ही दृष्टि उत्पन्न होणं फार कठिण आहे. तेंव्हा सहाय्य करणारी ईश्वरशक्ति आहे, त्या ईश्वरशक्तीच्या सहाय्याने आमचा जो प्रयत्न चालू आहे, तो प्रयत्न निर्विघ्नपणे शेवटास जावो.

### अंतराय अभावीच ..... म्हणतात.

जीवाचं खरं स्वरूप काय आहे? अहम् कोण आहे? हे त्या ईश्वरशक्तींच्या कृपेने समजून येईल. आम्हाला 'मी कोण आहे' हेसुद्धा सांगता येत नाही किंवा समजत नाही. देह म्हणजे मी आहे, इंद्रिय म्हणजे मी आहे, तो 'मी'च किती ठिकाणी गुंतून राहिला आहे. तादात्म्यध्यास किंवा संसर्गाध्यास इतका बसून गेलेला आहे की, त्या मनात घर, शेत म्हणजे मीच आहे. माझंच आहे म्हणजे हा 'मी' त्यात मिसळला गेलाय. प्रत्येक ठिकाणी मिसळल्या गेलेल्या 'मी'ला बाजूला करायचे आहे सर्वांपासून. सर्वांपासून तो 'अहम्' पदार्थ वेगळा आहे, हे समजून घेणं कितीतरी कठिण आहे. देहापासून आरंभ होतो. हा देह म्हणजेच मी आहे,

ही बुद्धि कमी झाली पाहिजे. म्हणून गीतेमध्ये भगवंतांनी क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक सांगितला आहे -

शरीर जे आहे त्याला भगवंतांनी क्षेत्र म्हटले आहे आणि ह्या क्षेत्रात राहणारा जो आहे त्याला क्षेत्रज्ञ. तो अहम् आहे. पण तो शरीरात इतका मिसळून गेला आहे की, शरीरापेक्षा मी वेगळा आहे असं त्याला कधी वाटतच नाही. आणि शरीररापेक्षा मी वेगळा आहे ही बुद्धि झाल्याशिवाय तो धर्मकार्य, कर्मयोगाचाही अधिकारी होऊ शकत नाही. या जन्मात मिळालेल्या शरीराचा संबंध सोडून मला दुसऱ्या जन्मात दुसऱ्या शरीरात जायचं आहे आणि त्याही शरीरात गेल्यावर मला सुख मिळालं पाहिजे, माझी प्रगति झाली पाहिजे अशी बुद्धि असल्याशिवाय धर्माचरणही होणार नाही. लौकिक कार्य चाललेली आहेत. त्याकरता देहात्मबुद्धीचा उपयोग होत असेल. परंतु पुढे जे फल आपल्याला मिळवायचे आहे त्याकरता मी देहापेक्षा वेगळा आहे ही अंशतः तरी बुद्धि झाली पाहिजे. पूर्ण होणे शक्य नाही.

शेवटपर्यंत आणखी देहतादात्म्य कायम असतं. मी ब्रह्मरूप आहे, मी सच्चिदानंदरूप आहे हे प्रत्यक्ष ज्ञान झाल्यानंतर देहबुद्धि निघून जाते. देहाचा संबंध कायमचा सुटतो. तो जीवात्मा जीवनमुक्त होतो. तोपर्यंत मात्र ही स्थिति प्राप्त होणे कठिण आहे. चांगदेवांसारख्यांना सुद्धा ही स्थिति प्राप्त झाली नाही ना ! क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक त्यांनासुद्धा झाला नाही. ज्ञानेश्वर महाराजांची कीर्ति ऐकली आणि त्यांना शरण जावे अशी इच्छा झाली चांगदेवांना. ज्ञानेश्वरांचे मार्गदर्शन आपल्याला मिळाले तर आपली पूर्णता होईल असेही वाटले. श्रद्धा, विश्वास वाटला. परंतु ज्ञानेश्वरांना पत्र लिहिताना मात्र नमस्कार लिहावा किंवा आशीर्वाद लिहावा या गोंधळातच ते सापडले. ज्ञानेश्वर महाराज मोठे, गुरुस्थानी मानायचे म्हणून नमस्कार लिहायचा. पण नमस्कार तरी कसा लिहिणार ?

कारण मी चौदाशे वर्षांचा आणि ते वीस वर्षांचे. आशीर्वाद लिहावा तर त्यांना गुरु म्हणून शरण जायचे आहे. ज्यांचा शरण जायचंय त्यांना आशीर्वाद तरी कसा लिहायचा? या संशयामुळे कोणताच निर्णय करता आला नाही, त्यांनासुद्धा. आणि तसाच कोरा कागद पाठवून दिला.

निवृत्तिनाथांनी तो कागद पाहिला आणि ज्ञानदेवांना उत्तर लिहिण्याची आज्ञा केली. ज्ञानदेवांनी लगेच उत्तर लिहिले. ते 'चांगदेव पासष्टी' म्हणून प्रसिद्ध आहे. निश्चयात्मक बुद्धीचे, पूर्णतेचे ते लक्षण आहे.

**स्वस्तिश्रीवटेषु जो लपोनि जगदाभासु.....**

चांगदेवांची ज्ञानदेवांकडे पहाण्याची दृष्टि म्हणजे मी चौदाशे वर्षांचा ज्ञानदेवांपेक्षा मोठा आणि ज्ञानेश्वर वीस वर्षांचे म्हणजे माझ्यापेक्षा लहान. म्हणजे ज्ञानेश्वर महाराजांचा वीस वर्षांचा देह आणि आपला चौदाशे वर्षांचा देह. ज्या देहाला कालाचा अधिक संबंध असेल त्याला ज्येष्ठ म्हणतात. म्हणजे चांगदेवांची बुद्धि देहापर्यंतच आली. चांगदेव मोठे योगी होते. पण त्यांच्या योगज्ञानाचा इथे काय उपयोग झाला? शरीराच्या पुढे त्यांची बुद्धि गेलीच नाही. ज्या बुद्धिला आत्म्यापर्यंत, सच्चिदानंद ब्रह्मस्वरूपापर्यंत जायचंय ती जर शरीरातून बाहेर पडलीच नाही तर पुढे कशी जाणार?

पण ज्ञानेश्वर महाराजांनी सुरवात करताना लिहिले, 'वटेश्वर चांगदेवांचे कल्याण असो'. व्यवहार दृष्टीनेसुद्धा चांगदेव स्वतःला मोठे समजत असले तरी 'मोठ्यांचे कल्याण असो' असे म्हणण्याचा लहानांना अधिकार आहे. यात काही चूक नाही. नमस्कार लिहायला नको कि आशीर्वाद लिहायला नको. स्वस्ति वाचन केलेले आहे.

**जो लपोनी जगदाभासु.....**

चांगदेव म्हणजे सर्व जगाला अधिष्ठानरूप आहे. आत्मा परमात्मा तोच चांगदेव आहे. सर्वरूपी जर तो आहे तर चांगदेव त्याचेच रूप नाही

का? आत्मा देहाच्छादित झाला त्यामुळे जग दिसू लागले. बुद्धिमध्ये संसार आला आणि मग 'प्रगटीला करी'. तो आत्मा जर प्रगट झाला तर त्याच्या कृपेने सबंध जगदाभास निघून जातो. ''मावळीत विश्वाभासू'' हा सबंध विश्वाभास मावळून जातो. ज्ञानदेव आत्मदृष्टीने हे लिहिताहेत. चांगदेव पासष्टीमध्ये त्यांनी किती विवेचन केले आहे ! ती आत्मदृष्टि त्यांनी कशी मिळवली असेल? किती त्यांची बुद्धि निर्णय घेणारी असेल ! परिपूर्ण झाली असेल ! हे सर्व विचार करण्यासारखे आहे. ही परिपूर्णता ईश्वरकृपेवाचून प्राप्त होत नाही.

म्हणून भगवंतांनी अर्जुनाला सांगितले, ''त्या ईश्वराला तू शरण जा. अर्जुना, बुद्धि निर्मळ केल्याशिवाय ईश्वराला शरण जाता येत नाही. त्याचा प्रसाद झाला म्हणजे तुला पराशांति मिळेल. मन स्थिर होईल. अज्ञान जाईल. अश्रद्धा/संशय सर्व जाईल. तुझ्या मनातले सर्व विचार जाऊन तुझे अंतःकरण स्थिर, निर्विकार झाले म्हणजे तुला पूर्ण शांति प्राप्त होईल.'' मनाची स्थिरता जितकी जितकी वाढत जाईल, तसतसा समाधीचा अभ्यास होईल. समाधिपूर्वी ध्यानयोगाचा अभ्यास करावा लागतो पण ध्यानयोगाचा अभ्यास करण्यासाठीसुद्धा पुष्कळ मन निर्मळ व्हावं लागतं. त्याशिवाय ध्यानयोगाचा अभ्यास जमू शकत नाही. अंतःकरण केव्हा बाजूला जाईल सांगता येत नाही.

सगुण मूर्तीचे ध्यान करायला सांगितले तरीसुद्धा मन त्या मूर्तीच्या ठिकाणी स्थिर होऊ शकत नाही. जपाच्या वेळाला मंत्रार्थाकडे लक्ष स्थिर होत नाही. अनंत बाहेरचे विचार मनात येतात. येतात अन् जातात. अनेक शुभाशुभ संस्कार त्या मनावर झाले आहेत. त्यामुळे मन कधी कोणत्या विषयाकडे जाईल सांगता येत नाही. जर साकार मूर्तीच्या ठिकाणी जिथे अंतःकरण स्थिर राहू शकत नाही तिथे जे अंतर्यामी ईश्वरस्वरूप आहे तिथे कसे स्थिर राहिल? ही मनाची सवय कशी मोडेल? म्हणून हा

ध्यानयोगाचा अभ्यास फार कठिण आहे. त्याला फार अभ्यास करावा लागतो. ईश्वराची महात्म्यांची कृपा असेल तर मन त्या स्वरूपाच्या ठिकाणी स्थिर होईल.

योगसिद्धीमध्ये सांगितले आहे की, आपल्या डोळ्यांनी न दिसणारे अनेक पदार्थ आहेत. आपल्याला जर त्या पदार्थांचे ज्ञान करून घ्यायचे असेल तर अंत:करण त्या वस्तूच्या ठिकाणी स्थिर झालं पाहिजे. ध्यानाचा परिपाक म्हणजे अत्यंत स्थिर अंत:करण. एकाग्र चित्ताने एखाद्या वस्तूचे ध्यान झाल्यावर त्या वस्तूचा एकदम साक्षात्कार होऊन जातो. आविर्भाव बुद्धिमध्ये होतो, प्रकाश होतो. म्हणजे ती वस्तू बुद्धिग्राह्य होऊ शकते. बुद्धीला पटत नाही, समजत नाही असे आपण म्हणतो. पण अत्यंत सूक्ष्मबुद्धीला कोणत्याही वस्तूचे प्रत्यक्ष ज्ञान होऊ शकते. त्याचप्रमाणे परमात्म्याकडे जर बुद्धीची धारणा झाली, अंत:करण स्थिर झालं तर त्या ध्यानाचा परिपाक समाधिमध्ये होईल. सगुण साक्षात्कार होईल. हे सगळं आपोआप होऊन जातं ना ! योगशास्त्रकारांनी अंत:करणाच्या शक्तीचं वर्णन केलेलं आहे. मनामध्ये इतकी विलक्षण शक्ति आहे कि ते मन ज्या वस्तूचे ध्यान करेल, तद्रूप होऊन जातंय.

आचार्य महाराजांचे प्रथम पट्टशिष्य पद्मपादाचार्य म्हणून होऊन गेले. नरसिंहांचे मोठे भक्त होते ते. आचार्य महाराजांच्याबद्दल अत्यंत श्रेष्ठ भक्ति त्यांच्या मनात होती. ब्रह्मचर्याश्रमातून त्यांनी संन्यासाश्रम ग्रहण केला. आचार्य महाराजांच्या मुखातूनच प्रस्थानत्रयी त्यांना ऐकायला मिळाली. आचार्यांनी आपले सगळे सिद्धांत आपल्या पट्टशिष्याला समजावून सांगितले. हेही त्यांचे मोठे भाग्य. वेदसिद्धांत, उपनिषदज्ञान खरं काय आहे हे सगळ्यांना समजावून सांगण्याकरता सर्व देशभर संचार केला. तेही एक मोठं राष्ट्रकार्य आहे. सगळ्यांची बुद्धि सन्मार्गाला लावणं. यालाच लोकसंग्रह म्हणतात.

भगवंतांनी अर्जुनाला सांगितले, ''तुला कर्म सोडता येणार नाही. तुला जरी काही कर्तृत्व नसलं तरी लोकसंग्रहाकरता तरी तुझ्या कर्माचा उपयोग होईल ना ! **(कुमार्गाकडे जाणाऱ्या लोकांना सन्मार्गाकडे प्रवृत्त करणं हा लोकसंग्रह शब्दाचा अर्थ आहे)**. केवळ पक्षातल्या सभासदांची संख्या मोठी आहे म्हणजे पक्ष मोठा, बहुमत आहे याला लोकसंग्रह म्हणत नाहीत. तू स्वत:ला श्रेष्ठ समजत असशील. तुला कर्म करण्याशिवाय राहणे शक्य नाही. काहीही कर्तव्य नाही म्हणून भागत नाही. कर्म सुटत नाहीत. त्याकरता तुला सत्कर्म करावी लागतील'' असा कर्मयोगाचा आग्रह अर्जुनाला भगवंतांनी मुद्दाम केला आहे. कोणीही अकर्मक रहात नाहीयेत. लोकांची बुद्धि सन्मार्गाकडे वळवणे राज्यशासनालाही शक्य नाहीये. ज्ञानेश्वर महाराजांच्यासारख्या ईश्वररूप झालेल्या महात्म्यांच्या संकल्पाने जे कार्य होतंय ते राज्यशासनही करू शकत नाहीये. पंढरपूरची वारी सुरू करून सातशे वर्ष झाली. ती आजही चालू आहे. अखंड. ऊन नाही, वारा नाही, पाऊस नाही. काही नाही. बायका, पुरुष, तरुण, वृद्ध पाच-पाचशे मैलांवरून पंढरपूरला चालत येताहेत. ही जी देहातून त्यांची बुद्धि बाजूला झाली ती कशाने झाली? देहामध्येच बुद्धि राहिली असती तर घरदार सोडून ते बाहेर पडलेच नसते. काही काही जणांचे असंही सांगतात, 'शुद्धातल्या एकादशीला पंढरपूरला येऊन दर्शन घेऊन निघायचे आणि वद्य एकादशीला आळंदीला जायचे. असे बारा महिने चालू आहे. अशीही काही तपस्वी मंडळी आहेत. ती तपोनिष्ठ बुद्धि कशी तयार झाली? देहाची आसक्ति, जर मनामध्ये असती तर हे शक्यच झालं नसतं.

आचार्य महाराज संचार करताहेत. शास्त्राचा खरा अर्थ काय आहे हे सर्वांसमोर त्यांना ठेवायचंय. अज्ञान हा मोठा दोष आहे. लोकांचे अज्ञान दूर करायचे हा पहिला प्रयत्न आहे. श्रद्धा नसणे हा दुसरा दोष

आहे. श्रद्धा असली तरी संशयामुळे ती डळमळीत होते. तो संशय दूर केला पाहिजे. म्हणजे वाणीमध्ये, बुद्धीमध्ये अलौकिक शक्ति असली पाहिजे. त्या शक्तिशिवाय बुद्धीतले सर्व दोष दूर करून योग्य मार्गावर स्थिर करण्याचे कार्य करता येत नाही.

आचार्य संचार करीत एका गावात आले. तिथे एक भैरवाचा तांत्रिक भक्त होता. आचार्यांबरोबर झालेल्या वादविवादात ह्याचा पराजय झाला. तंत्रमार्ग योग्य नाही हे आचार्यांनी त्याला पटवून दिले. सर्व मंडळींच्या समोर त्याचा मार्ग चुकीचा आहे हे सिद्ध झाल्यावर त्याला काही बोलता आले नाही. तेवढ्यापुरतं त्याने कबूल केला पराभव. पण त्या उग्र भैरवाच्या मनात मात्र आचार्यांबद्दल द्वेषबुद्धि निर्माण झाली. आज भर सभेमध्ये माझ्या अनुयायांसमोर ज्या आचार्यांनी माझे खंडन केले त्यांचा नाश केला पाहिजे. अशा प्रकारची सूडबुद्धि त्याच्या मनात उत्पन्न झाली. दोन-चार दिवसांनी आचार्य महाराज एकटे बसले असताना तो त्यांना भेटून म्हणाला, 'गुरुमहाराज, मी एक भैरवाचा यज्ञ केला आहे. त्यात पूर्णाहुति देण्यासाठी मला एक तर सर्वज्ञ पुरुषाचे तरी मस्तक पाहिजे किंवा सार्वभौम राजाचे तरी मस्तक पाहिजे. ते जर दिले तर मला याच देहाने भैरवलोकाला जाता येईल. आता सार्वभौमराजाचे मस्तक मागितले तर तत्क्षणी माझेच मस्तक जाईल. आपण सर्वज्ञ आहात. आपलं मस्तक मिळालं तर माझं कार्य होईल.'

देह म्हणजे मी नाही हे आचार्यांचे ज्ञान नुसते सांगण्यासाठी नाहीये. देहात्मविवेक प्रथमच भगवंतांनी अर्जुनासमोर ठेवला. देह म्हणजे आत्मा नाही हे समजून घेऊन गीता ऐक. तरच तुला या गीताज्ञानाचा उपयोग होईल, म्हणाले.

आचार्यांनी ह्या उग्रभैरवाला सांगितले, ''उद्या मी अमुक-अमुक गुहेमध्ये जाऊन बसतो. कोणालाही समजणार नाही अशा रीतीने तू माझं

मस्तक तोडून घेऊन जा.'' त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सांगितलेल्या ठिकाणी कोणालाही न सांगता आचार्य समाधि लावून बसले. उग्र भैरवाने विचार केला. आपल्या तंत्र मार्गावर आलेले संकट आचार्यांचा नाश केला म्हणजे दूर होईल. आचार्यांचा शिरच्छेद म्हणजे ज्ञाननाश नाही हे त्या उग्रभैरवाला कळलेले नाही. ज्ञान हे बुद्धिमध्ये आहे आणि बुद्धि ही नष्ट होणारी नाहीये. आत्मज्ञान होईपर्यंत बुद्धिबरोबर राहते. शरीरं किती येतात आणि जातात, पण बुद्धि कायम आहे जीवाबरोबर. ही कायम राहणारी बुद्धि किंवा अंतःकरणतत्व ज्याला म्हणतात ते चांगलं बनवण्याचा प्रयत्न जर मनुष्यजन्मामध्ये केला गेला तर ती चांगली बुद्धि पुढच्या जन्मात आपल्याबरोबर येते. गजेंद्र मोक्षाच्या कथेत हत्ती देवाची स्तुति करतो यावर आमचा विश्वास बसत नाही. हत्ती पशु आहे तो देवाची स्तुति काय करणार? पण त्याच्या मागच्या जन्माचा विचार केला पाहिजे. मागच्या जन्मात त्याने ईश्वराची उपासना केली होती. त्यामुळे या जन्मात त्याच्या मनामध्ये इतकी ईश्वरभक्ति निर्माण झाली. आपल्या स्तुतीच्या आरंभी तो म्हणतो, संपूर्ण विश्वामध्ये भरून राहणारा, सर्व प्रेरक अशा प्रकारचा जो आहे परमात्मा त्याला मी नमस्कार करतो. तत्पदार्थशुद्धि ज्याला म्हणतात ती त्याची झाली आहे. इतक्या मोठ्या ज्ञान भूमिकेवर तो गेला असेल हे आम्हाला खरं वाटत नाही. कारण आम्ही त्याच्या देहाकडे पाहून त्याला पशु समजतोय. देह म्हणजे आत्मा नाहीये. देहात आलेला आत्मा. मागच्या जन्मात हा हत्ती चांगला राजा होता. आपल्या अंतःकरणावर त्याने चांगले संस्कार केले. ईश्वराबद्दल एक दृढ निष्ठा त्याच्या अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली. ते अंतःकरण घेऊन तो या हत्तीच्या जन्माला आला.

अर्थात परमेश्वराची स्तुति करणं हे त्याच्या बुद्धीचे कार्य आहे. शरीराचे कार्य नाही.

आचार्य महाराजांना मारण्यासाठी जेव्हा तो उग्रभैरव निघाला, तेंव्हा पद्मपादाचार्य नृसिंहांचे ध्यान करीत होते. त्यांची उपासना इतकी सिद्ध झाली होती की, ध्यानामध्ये त्यांच्या उपास्य देवतेशी - नृसिंहांशी - ते इतके एकरुप होत की नृसिंहरूप होऊन जात. बुद्धि इतकी स्थिर व्हायला पाहिजे की ज्या वस्तूचे ध्यान करू, तद्रूप होता आले पाहिजे. पद्मपादाचार्यांना त्या ध्यानावस्थेत आचार्यांचा वध करण्याच्या तयारीत असलेला उग्रभैरव दिसू लागला. आणि पद्मपादाचार्यांचे शरीर नाहीसे होऊन ते नरसिंहस्वरूप झाले आणि धावत-धावत त्या गुहेत गेले त्या उग्रभैरवाला आचार्यांचा शिरच्छेद करण्यापूर्वीच त्याला गाठले, खाली पाडले आणिं हिरण्यकश्यपूप्रमाणे त्याचे पोट फाडले. तोंडाने मोठमोठ्याने गर्जना चालू होती. तोपर्यंत आचार्यांचे इतर शिष्यही आले. त्यांना पद्मपादाचार्य दिसेनात. नृसिंह दिसत होते. आचार्यांची समाधि उतरली. आचार्यांनी नृसिंहांची स्तुति केलेली आहे.

थोड्या वेळाने नृसिंहस्वरूप अदृश्य होऊन पद्मपादाचार्य दिसू लागले. त्यांनी आपल्या गुरुमहाराजांना वंदन केले. काय प्रत्यक्षात घडले याची त्यांना आठवणही नव्हती. **हा एक प्रयत्नाचा, अभ्यासाचा विषय आहे. बुद्धिमध्ये अगोदर ईश्वरस्वरूपाबद्दल अत्यंत निष्ठा पाहिजे. प्रथम आस्तिक्य बुद्धि पाहिजे. आस्तिक्य बुद्धि झाल्यानंतर प्रयत्न घडणार. प्रयत्नसुद्धा दीर्घकाळपर्यंत करायला पाहिजेत. ज्या मनामध्ये ईश्वराचे अधिष्ठान ठेवायचे ते मन निर्मळ व्हायला पाहिजे. मगच ते ईश्वरस्वरूप त्या मनात कायम राहणार. ते मन अत्यंत स्थिरही पाहिजे. त्या करताही प्रयत्न करावा लागतो ना!** चार-सहा वर्षांचा महाविद्यालयाचा कोर्स निराळा आणि हा अभ्यास निराळा. एवढ्या लहान कालावधीच्या कोर्समध्ये हा अभ्यास कसा पूर्ण होईल?

**सुखेषु अनुद्विग्नमनः दुःखेषु विगतस्पृहः**

गीतेच्या ह्या अर्ध्या श्लोकाचा अभ्यास करायला सहा वर्षांचा काळ पुरेल काय? कोणतीही अनुकूल गोष्ट घडली असताना मनाला आनंद होत नाही आणि प्रतिकूल गोष्ट घडली असताना मनाला विषाद वाटत नाही, इतकी मनाची निर्विकारता साधायला किती दिवस अभ्यास करायला पाहिजे ! तेवढी आमच्या मनाची तयारी आहे का? हर्ष, विषादादि सगळे विकार मनातून दूर झाले पाहिजेत.

**मानापमानयोस्तुल्यः ॥**

ही मनाची निर्विकार, साम्यस्थिति यायला किती काळ पाहिजे ! तो अभ्यास करताना येणारी सगळी विघ्नही दूर करणारी कोणीतरी शक्ति आपल्या पाठीशी नको का? त्या शिवाय आपला अभ्यास यशस्वी कसा होणार? म्हणून या सगळ्या दृष्टीने तमेव शरणं गच्छ म्हणतात, भगवान्. त्या ईश्वरालाच तू शरण जा. दुसरीकडे जाऊ नकोस. दुसरे कोणीही तुझे संरक्षण करू शकणार नाही. गजेंद्राने पुष्कळ स्तुति केली पण एकही देव त्याला सोडवण्याकरता आला नाही. काय बाकीच्या देवांना त्याची सुटका करता आली नसती? भगवान श्रीहरिच आले शेवटी. कारण बाकीचे ब्रह्मा, इंद्रादि देव म्हणाले, आमचे नाव घेऊन कुठे गजेंद्राने बोलावलंय? आम्हाला कुठे हाक मारली आहे? मग आम्ही कशाला जावं?

म्हणजे इंद्रादि देवसुद्धा जीवच आहेत. ईश्वर नाहीयेत. त्यांनासुद्धा ईश्वर साक्षात्कार झालेला नाहीये. काही काही देवयोनीमध्ये आलेले महात्मे आहेत. यमधर्म आहेत, इंद्र, वरूण आहे असा उपनिषदांमध्ये उल्लेख आहे. पण सर्वसामान्य अशी स्थिति आहे.

तर भगवान सांगताहेत, त्या ईश्वरालाच तू शरण जा. अंतर्यामी आहे तो. बुद्धीला प्रेरकशक्ति आहे तिकडे तू लक्ष दे. **तुझ्या मनामध्ये पुष्कळ**

**शक्ति आहे. ते मन जर ईश्वराकडे वळवून स्थिर केलंस तर त्या मनात मोठी शक्ति निर्माण होईल. मनाला स्थिर करणं हीसुद्धा मनाचीच शक्ति आहे. मनाला जास्ती जास्ती विकारी बनवण्याकडे मनाची प्रवृत्ति असते. तोच अभ्यास झाला म्हणजे विकार जास्ती जास्ती वाढत जातात. मनाला निर्विकार करणं, सद्विचारशील बनवणं यासाठी मनानेच प्रयत्न केला पाहिजे ना !** नुसता उपदेश ऐकून पुस्तक वाचून हे कसं होणार?

भरताला रामचंद्र राज्य कर म्हणून स्वतः सांगताहेत. आणि ते कर्तव्य आहे. मला पित्याने वनात जाण्याची आज्ञा केलेली आहे. तुला पित्याचे वचन उल्लंघन करून माझ्याबरोबर वनात येता येणार नाही, राज्य सोडता येणार नाही. भरताची बुद्धि निर्मळ असल्यामुळे त्याने रामचंद्रांची आज्ञा मान्य केली. रामचंद्रांच्या पादुकांची सिंहासनावर स्थापना केली. पादुकारूपी रामचंद्र हे स्वामी आहेत. मी फक्त त्यांचा सेवक आहे ही भावना आहे. भरताने रामचंद्र वनवासात जायला निघाल्यावरच सांगितले, ''फक्त चौदा वर्षे मी राज्य करीन. तुमची आहे, पित्याची आज्ञा आहे म्हणता. पंधराव्या वर्षाचा सूर्योदय होईपर्यंत भरत जिवंत राहील. पुढे नाही. भरत तुम्हांला दिसणारच नाही.''

आईने मिळवून दिलेले राज्य भरताच्या हातात आहे तरीसुद्धा सुरवातीपासूनच त्याची भूमिका होती, 'राज्य माझे नाहीये'. त्यामुळे चौदा वर्षांनंतर रामचंद्र आल्यावर लगेच त्यांचे राज्य त्यांना देऊन टाकले आणि नमस्कार करून उभा राहिला. ही निर्मळ बुद्धि प्राप्त होण्यासाठी किती अभ्यास करावा लागेल, किती कठिण आहे तो अभ्यास !

महाभारतकारांनी दुर्योधनाचेही चरित्र लिहिले. त्यानेही असेच पांडवांना तेरा वर्षे वनवासात पाठवले. परत आल्यावर आपल्याला त्यांना अर्धे राज्य द्यावे लागेल ना ! पांडव म्हणाले, ''आम्हाला एकेक

गाव दिलं तरी चालेल.'' पण दुर्योधनाने सांगितले, ''सुईच्या टोकावर राहील एवढीसुद्धा जमीन तुम्हाला युद्धाशिवाय देणार नाही.'' म्हणजे किती गुंतून गेलाय दुर्योधन ! त्याग नाहीच त्या बुद्धीमध्ये. त्यागाचा अभ्यासच नाहीये. दुर्योधनाचे चरित्र सांगून त्याग कसा नसतो आणि भरताचे चरित्र सांगून त्याग कसा असतो असे दोन्ही दाखवले आहे.

रघुवंशात कालिदासांनी वर्णन केले आहे भरताच्या त्यागाचे. रामचंद्र आलेले आहेत रावणादिकांचा नाश करून. भेटी झालेल्या आहेत. भरताने रामचंद्रांनाही नमस्कार केला आणि सीतादेवींच्या पायावर मस्तक ठेवले. त्यावेळी कालिदास विचार करताहेत, सीतादेवीचे चरण पवित्र आहेत की भरताचे मस्तक पवित्र आहे. काय हे जनकात्मजा जानकीदेवीचे चरण किती वंद्य आहेत. लंकेश्वर मोठा पराक्रमी राजा. सर्व आधिभौतिक शक्तींचा विकास त्याने करवून घेतला होता, तो सीतादेवींना म्हणतोय, ''माझी राणी हो.'' नाही. सीतादेवींचे त्याच्याकडे लक्षही नाहीये. भाषणही करीत नाहीयेत. अशा सीतादेवींचे चरण वंद्य आहेत.

आपला ज्येष्ठ बंधू वनवासात गेला आहे. त्याला अन्नपाणी नीट मिळत नसेल तर आपणही घेऊ नये असे त्याला वाटते. सर्व राज्य ताब्यामध्ये आहे पण कोणत्याही विषयाचा उपभोग घ्यायची इच्छा नाही. पण राज्य कारभार उत्तम चाललाय. हाच खरा आणखी कर्मयोग आहे. हेच खरं ज्ञान आहे. त्याग आहे, अंत:करणामध्ये. मी फक्त निमित्तमात्र आहे. माझं काहीही कर्तृत्व नाही. मी राज्यकर्ता नाही. कालिदास म्हणतात, ''ज्येष्ठाची अनुवृत्ति करावी. ज्येष्ठ बंधू जटा धारण करून वनात गेला तर आपणही जटा धारण करायच्या, आपणही अन्न खायचे नाही. हेही वंद्य आहे. पण निर्णय काय करायचा? शेवटी कालिदासांनी असा निर्णय दिला की, जानकीच्या चरणांनी भरताचं मस्तक पवित्र केलं

म्हणा किंवा भरताच्या मस्तकानं जानकीचे चरण पवित्र केले म्हणा. श्रेष्ठ-कनिष्ठ निर्णय देणे शक्य नाहीये. इतका त्याग त्या भरताच्या बुद्धिमध्ये आहे. देहाची आस्था नाही. देहाची आसक्ति नाही. सत्ता नको. आपला ज्येष्ठ बंधू आपला स्वामी आहे हे जाणणारी बुद्धि आहे. त्यामुळे अशी त्यागी वृत्ति बनू शकते. चौदा वर्षांची राजसत्ता लगेच सोडून दिलेली आहे. राष्ट्राला कल्याण करणारा आदर्श नेता कसा मिळाला पाहिजे हे दाखविण्याकरिता वाल्मिकी महर्षिंनी रामायण लिहिले.

पण आता ते कोण वाचतंय? बुद्धिस्वातंत्र्याचा उपयोग रामायणावर आक्षेप घेण्यासाठी, राम-सीतेची निंदा करण्यासाठी, त्यावर विपरीत लेख लिहिण्यासाठी चाललाय. त्याबद्दल कोणालाही प्रतिकार करायची बुद्धि नाही. दामाजीपंतांचे उदाहरण बुद्धि स्वातंत्र्याचे उदाहरण म्हणून घ्यायला हरकत नाही. दुष्काळात सापडलेली माणसे धान्य मागायला आली त्यांचा प्राण जातोय. त्यांना काय सांगायचं? खलीता पाठवतो बादशहाला आणि त्याचे उत्तर आले की देतो? तोपर्यंत हे लोक जिवंत राहतील का? दामाजीपंत म्हणाले, सगळं धान्य घेऊन जा. काय होईल ते होईल. पण आधी प्रजाजन जगले पाहिजेत ना! आपण करतोय ते कर्म अत्यंत योग्य आहे असा बुद्धीने निर्णय दिला. ह्याला बुद्धिस्वातंत्र्य म्हटले पाहिजे. परंतु त्यांच्या सगळ्या धान्याचे बिल दिले गेले. त्यांच्या पोथीमध्ये बादशहाची पावती मिळाली. तुमचं सगळं बिल आम्हाला मिळालेलं आहे. तुमच्याकडे काही देणे नाही. असं कसं झालं? बुद्धीचा संकल्प ईश्वर शक्तिशी जोडला गेला. पूर्ण आस्तिक्य बुद्धि आणि श्रद्धेने प्रयत्न चालू आहेत. ते करीत असताना देहाची आसक्ति नाही. संसाराची आसक्ति नाही. फक्त अखंड अंत:करणामध्ये परमेश्वराचे स्मरण चालू आहे. इतकी जर अंत:करणशक्ति त्या ईश्वरशक्तिंशी एकरूप झाली तर अशक्य काहीच नाहीये. अंत:करणशक्तिही मोठी आहे. ईश्वरानेच

अंतःकरण निर्माण केलंय ना ! ही बुद्धिशक्ति म्हणजे भगवतीचेच एक स्वरूप आहे.

**या देवी सर्वभूतेषु बुद्धिरूपेण संस्थिता ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ॥**

बुद्धि हे भगवतीचेच स्वरूप आहे असे सांगताहेत मार्कंडेय ऋषि. बुद्धिवाद कमी मानणारे नाहीयेत ऋषि ! पण त्यांचं म्हणणं एवढंच आहे कि, बुद्धि चांगली बनवून अभिमान धरा. निर्दोष बुद्धि करा. त्या बुद्धीने वाटेल ते कार्य करता येईल. पण सर्वसामान्यांची बुद्धि निर्दोष नाहीये. पदोपदी अहंकारादि विकार, कामक्रोधादि विकार भरलेले आहेत. लोभामुळे अखंड पापं घडताहेत. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांच्यासारखे प्रार्थना करताहेत.

**दुरितांचे तिमिर जावो ।**
**विश्वस्वधर्म सूर्ये पाहो ।**
**भूता परस्परे पडो मैत्र जीवांचे ।**

हे राष्ट्राला उपकारक नाही का? केलं पाहिजे ना ! वैय्यक्तिक, सामाजिक पातकांचा नाश झाल्याशिवाय स्वधर्माचे ज्ञान, आचरण होणार नाही.

**जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ।**

इतकं त्यांनी आश्वासन दिलेले आहे. तिकडे कुणाचे लक्ष आहे? केवळ अर्थकारणप्रधानबुद्धि आमची बनून गेलेली आहे. त्याला राजशासनाचीच अनुकूलता आहे. राजशासनाने धर्माची उपेक्षा करून कसे होणार? संत महात्म्यांनी घालून दिलेले मार्ग आहेत. ईश्वराची भारतवर्षावर कृपादृष्टि आहे म्हणून थोड्याफार अंशाने काहीतरी अद्यापि जिवंत आहे.

तर त्या दृष्टीने

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।**
**तत् प्रसादात् परां शान्तिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ।।**

हा भगवंतांचा उपदेश आहे. आपणही सर्वजण प्रत्येक आठवड्यामध्ये गीतेबद्दल श्रवण करता. ज्ञानेश्वर महाराजांचा ग्रंथही त्याच्यावरच आहे. ज्ञानेश्वर महाराजांनीही गीतेचं सगळं सार आपल्यापुढे मांडलेले आहे. हे ग्रंथ म्हणजे त्यांची संगतीच आहे. प्रत्यक्ष ज्ञानेश्वर महाराजांच्या संगतीत राहण्याइतके आमचे भाग्य कुठे आहे? त्यांचे ग्रंथ हेच त्यांचे स्वरूप आहे. त्या स्वरूपाची संगती जर आपल्याला मनःपूर्वक घडली, आपलं मन निर्दोष व्हावं अशी तळमळ मनाला लागून राहिली तर त्यानेही कार्य होऊ शकते. अशा ग्रंथांचा जर अभ्यास झाला, त्यांचे मनन झाले तर ते ज्ञान दृढ होतं आणि त्या ज्ञानाचं फलही आपल्या पदरात पडतं. त्याकरता अशा प्रकारचं श्रवण, मनन, निदिध्यासन अखंड चालू राहिले म्हणजे कार्य होते. आपली बुद्धि निर्मल, निर्विकार बनवणं हा बुद्धिविकास आहे. हा बुद्धीचा विकास कसा करायचा हे ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानामध्ये समजावून सांगितले आहे.

ते कार्य आपण करता आहात. ईश्वराची तुमच्यावर कृपा आहे. चांगली बुद्धि आहे. अंतर्यामी भगवान पांडुरंग जो आहे त्याच्या कृपेने हे अशा प्रकारचे कार्य भारतवर्षामध्ये चालू आहे. असाच भारतीयांचा बुद्धिविकास परमेश्वराच्या कृपेने घडून यावा, सर्वांना शांति, सौख्य, समाधान प्राप्त व्हावं एवढीच त्या अंतर्यामी परमेश्वराजवळ प्रार्थना करून ही सेवा पूर्ण करतो.

**पुंडलिक वरदा हरि विठ्ठल**
**श्री ज्ञानदेव तुकाराम**
**मंगलमूर्ति मोरया**

।। श्री गणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

(प.पू. श्रींनी बीड येथे श्री नृसिंहसरस्वती दत्तात्रेय प्रार्थनाष्टकावर केलेले निरुपण.)

## श्री नृसिंहसरस्वती दत्तात्रेयप्रार्थनाष्टक

## दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

ईश्वर शब्दाची व्याख्या गीतेत, देवीभागवत आणि उपनिषदात करताना म्हणतात - **तो सर्वांच्या हृदयांत राहणारा, सर्वांचे नियमन करणारा आणि सर्वांचा अंतर्यामी आहे.**

प्रत्येक जीवाची बुद्धि वेगळी-वेगळी आहे आणि बुद्धीने कार्य होते पण बुद्धीच केवळ कारण आहे की आणखी काही कार्य होण्यास कारण आहे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

व्यवहारामध्ये केवळ बुद्धीने कार्य होतं असं आपण समजतो. कार्य करणारा मी आहे असं जीवाला वाटतं. बुद्धीच्या द्वाराने मी कार्य करतोय असं तो समजतो. परंतु भगवंतांनी अर्जुनाला उपदेश करताना

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोसि ददासि यत्**

**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्** । ९.२७ ।

खाण्यापिण्यासारखी सामान्य कर्मसुद्धा ईश्वरार्पण करावी असे सांगतात.

**ईश्वरार्पण याचा अर्थ ईश्वर कर्ता आहे, मी कर्ता नाही अशी बुद्धि ठेवावी.** संत महात्मे ईश्वराचेच कर्तृत्व मानतात. शास्त्राचाही तोच सिद्धांत आहे.

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वम् प्रवर्तते ।**

**इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः** । १०.८ ।

भगवान् म्हणतात, सर्वही कर्म माझ्यामुळेच होत असतात. ईश्वराचे कर्तृत्व एकदा पटल्यानंतर मी कर्ता आहे असा जीवाच्या मनातला

अभिमान दूर होतो. भगवत् भक्तांच्या मनात तसा अभिमान नसतो. कर्ता करविता ईश्वर आहे ही जाणीव सतत त्या भक्तांच्या मनात आहे म्हणून संसारामध्ये त्यांचा दु:खाचा संबंध नाही. अहंकार धारण केल्यानंतर मी कर्ता आहे, माझ्यामुळेच सगळं कार्य चाललेलं आहे, सर्वही कार्य माझ्या बुद्धीने मी करु शकतो ही जर भावना मनात असेल तर एखाद्या वेळेला आपल्या मनाप्रमाणे कार्य झाले नाही तर मग दु:ख आहे. त्यापेक्षा भगवत् भक्तांनी अगोदरच निर्णय केलेला आहे कर्तृत्व आमचं नाहीये. ईश्वराची आज्ञा म्हणून कर्म करायची. शास्त्रही देवाची आज्ञा आहे. त्या आज्ञेप्रमाणे आणखी कार्य करायचे. म्हणजे 'करावं' म्हणून सांगितलं की 'करायचे'. 'करु नये' अशी असेल तर 'करायचे नाही'. सर्व संतांचे आचरण त्याप्रमाणे चालत आलेले आहे.

असे सर्वांनाही मार्गदर्शन करण्याकरता भगवंतांचे पुष्कळ अवतार झाले आहेत. निरनिराळ्या देवतांनी अवतार घेऊन मार्गदर्शन केले आहे. त्यापैकी दत्तात्रेय अवतार आहे.

माहूर हे भगवतीचे अत्यंत प्रिय स्थान आहे. सहगमन करण्याकरता रेणुकामाता तिथे आलेल्या आहेत. परशुराम त्यांना घेऊन आलेले आहेत. माहूरगडावर आल्यावर आकाशवाणी झाली की 'सहगमन करावे योग्य आचार्य मिळेल'. पुढे दत्तात्रेयांनी त्या सहगमनाचे पौराहित्य केले.

दत्तात्रेय, शंकराचार्य वगैरे सद्गुरुस्वरुप अवतार झालेत. शास्त्र काय सांगते ते सामान्य लोकांना समजावून सांगायचे, पटवून द्यायचे. **ज्याच्या बुद्धीमध्ये चांगले संस्कार असतील त्याला ते पटते. आपला उद्धार तो करुन घेतो. ज्याच्या बुद्धीला त्यांचे सांगणे पटत नाही तो आपल्या बुद्धीप्रमाणे वागतो.**

सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांनी संस्कृतमध्ये श्री दत्तपुराण व मराठीत श्री दत्तमाहात्म्य या ग्रंथात दत्तात्रेयांचे चरित्र वर्णन

केलेले आहे. ईश्वर आहे याच्याबद्दल तरी संशय नसावा, कारण त्याची चरित्रं वर्णन केलेली आहेत. मराठीत श्रीगुरुचरित्र या ग्रंथांतही श्री दत्तात्रेयांचे व श्रीदत्तात्रेयांनी कलियुगात धारण केलेल्या श्रीपादवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती या अवतारांचे विस्तृत चरित्र दिले आहे. शास्त्राचे सर्व सिद्धांत त्याच्यामध्ये मांडले आहेत. सद्गुरुंचे माहात्म्य त्यात वर्णन केलेले आहे. त्याच गुरुचरित्रातल्या काही कथा सद्गुरु श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी श्री नृसिंहसरस्वती दत्तात्रेय प्रार्थनाष्टक या स्तोत्रांत आणल्या आहेत. सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांचे स्तोत्रवाङमयही मराठी व संस्कृतमध्ये पुष्कळ आहे. या श्री नृसिंहसरस्वती दत्तात्रेय प्रार्थनाष्टक या स्तोत्रांचा विचार करायचा आहे.

**भगवंताचे स्मरण, त्याच्या गुणांचे स्मरण हे जितके जितके होईल तितकी मनाची शुद्धि होते.** नामस्मरण, चरित्रस्मरण, काही काही नावांनीसुद्धा गुणांचे स्मरण दाखविलेले आहे. गुणप्रवृत्त नावे आहेत ही. दामोदर म्हणतो आपण. दाम म्हणजे उखळ ते ज्याच्या उदराला बांधले तो दामोदर. या नावाबरोबर तो प्रसंग आपल्याला स्मरतो. बालकृष्णाने कुठे जाऊ नये म्हणून यशोदेने त्याला उखळाला बांधून ठेवले. पण तिची नजर चुकवून तो बाहेर अंगणात गेला. तिथे दोन जवळजवळ असलेले वृक्ष होते. त्यांच्यामधून उखळ पोटापासून सोडवण्याचे निमित्त करुन तो गेला. एकीकडे ते वृक्ष उन्मळून पडले आणि कृष्णाच्या पोटाला बांधलेल्या उखळाची दोरी तुटून उखळ बाजूला झाले. दुसरीकडे त्या उन्मळून पडलेल्या वृक्षांच्या जागी दोन दिव्य पुरुष प्रगट झाले. तेही शापमुक्त झाले. आपले मूळ स्वरुप त्यांना प्राप्त झाले आणि श्रीकृष्णांना वंदन करुन ते आपल्या लोकाला निघून गेले.

एकदा गोकुळातल्या यादवांना त्रास देण्याकरता इंद्राने प्रचंड पाऊस पाडायला सुरवात केली. तेव्हा गोधनासह सर्व यादवांचे श्रीकृष्णांनी

आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून त्यांचे संरक्षण केले म्हणून कामधेनूने 'आमचा इंद्र तू आहेस' असे म्हटले. गायींचा इंद्र तो गोविंद.

म्हणजे अशी नावे घेतली की त्या सर्व लीलाचरित्राचे स्मरण होते.

दत्तात्रेयांच्या नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज या अवताराचे स्मरण श्रीनृसिंहसरस्वती दत्तात्रेय प्रार्थनाष्टक या स्तोत्रांत आपल्याला करायचे आहे.

**ऋतकृत्स्वगिरोऽमरोऽभवद्विजपत्न्यास्तनयोऽपियो भवः ॥**

**स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥**

नृसिंहसरस्वती स्वामीमहाराजांची यात प्रार्थना केलेली आहे. **भगवान् नृसिंहसरस्वती स्वामीमहाराज हेच माझी गति आहेत. त्यांच्याजवळ मला जाऊन पोहोचायचे आहे.** नृसिंहसरस्वती स्वामीमहाराज कोण हा परिचय या स्तोत्रात करुन देताहेत महाराज.

**संत हे ईश्वराच्या अस्तित्वाचे प्रमाण आहेत. त्यांनी ईश्वराला पाहिलेले असते, ईश्वराचा साक्षात्कार त्यांना झालेला असतो. आणि त्याप्रमाणे ते सांगत असतात. म्हणजे त्यांचा शब्द हा एक प्रमाण आहे.**

वेदव्यासांनी अनेक अवतारांची चरित्रे लिहिली आहेत. यावरुन त्यांचा कोणीतरी कर्ता असला पाहिजे ही कल्पना आपल्याला येते. आणि **अखंड त्या ईश्वर स्वरुपाचे स्मरण जसजसे घडत जाईल, दर्शनाची तळमळ जितकी वाढत जाईल तसा ईश्वराचा साक्षात्कार होतो.**

**तुकाराम महाराजांना ईश्वराचा साक्षात्कार झाला कारण त्यांना ती तळमळ होती, त्यांची तशी उपासना होती. प्रेम होते.**

लगेच काही आपल्याला दर्शन होत नाही. राष्ट्रपती तरी प्रत्येकाला कुठे भेटतात? वर्तमानपत्रांत त्यांचे फोटो छापून येतात. पण सर्वांना

प्रत्यक्ष दर्शन कुठे होते? **तसेच ईश्वराच्या दर्शनाकरता अधिकार प्राप्त करून घेतला पाहिजे. शुद्धबुद्धि झाली पाहिजे. तळमळ वाढत गेली पाहिजे. म्हणजे ईश्वर दर्शन होते.**

या स्तोत्रात महाराज म्हणतात, भगवान् नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज हेच माझे स्थान आहेत, माझी गति आहेत.

भगवान् नृसिंहसरस्वतीस्वामीमहाराज कोण आहेत? साक्षात् परमेश्वर आहेत.

ईश्वराचे वर्णन करीत असताना त्याला अमर म्हटले आहे. म्हणजे त्याला जन्म नाही किंवा मृत्यु नाही. आता जन्म नाही किंवा मृत्यु नाही याचा अर्थ कसा घ्यायचा? कारण दत्तप्रभु तर जन्माला आलेले आहेत. अवतार घेतलेला आहे. मृत्यु नाही कदाचित म्हणता येईल. पण सामान्य जीवांच्याप्रमाणे जन्ममृत्यूचा व्यवहार त्यांच्या ठिकाणी होत नाही. आम्ही सामान्य जीव आमच्या कर्मांचे फल भोगण्याकरता जन्माला येतो. सगळेही जीव कर्माच्या आधीन आहेत. आपण केलेली जी कर्मे आहेत त्या कर्मांप्रमाणे आपल्याला जन्म घ्यावा लागतो. जन्म म्हणजे सुखदु:ख भोगण्याचे स्थान. नवीन शरीराचा संबंध म्हणजे जन्म. आणि मिळालेल्या शरीराचा संबंध सुटणे म्हणजे मृत्यु. जीवावस्था कायम आहे. जीवात्मा अनादि, अनंत आहे. जन्म-मृत्यु झाले तरी त्याचा नाश होत नाही. त्याला शरीराचा संबंध मात्र वेगळ्या वेगळ्या कारणांनी येतो. त्याचाच अर्थ जन्म आणि मृत्यु. जीव स्वभावत: उत्पन्न झाला आणि गेला असा अर्थ नाही. मिळालेल्या शरीराचा संबंध सुटणे म्हणजे मृत्यु. जीव गेला नाही. शरीर गेलं. नवीन शरीरामध्ये त्याला स्थान मिळणं याचा अर्थ जन्म.

हा जो जीवाचा जन्ममृत्यूचा व्यवहार होतो तसं ईश्वराचे नाही. अनंत जन्मांमध्ये जीवाच्या हातून कर्म घडताहेत ना सारखी ! याच

जन्मांत किती कर्म झाली आपल्याला काही पत्ता नाही. पापकर्म किती झाली, पुण्यकर्म किती झाली ही आपल्या कर्मांची नोंद काही आपण ठेवत नाही. ती सवयच नाही आम्हाला. तशी सवय केली पाहिजे. रोज रात्री निजताना आज सकाळपासून माझ्या हातून चांगली कर्म किती झाली आणि वाईट कर्म किती झाली याचे चिंतन करायला सांगितले आहे. मी आज सकाळपासून सत्पुरुषांप्रमाणे वागलो की पशुप्रमाणे असा आपल्या कर्माचा जर रोज जमाखर्च केला तर त्याच्यामध्ये कितीतरी अंतर पडेल. ती सवय नाही आपल्याला.

दुसऱ्याची कर्म पहायची मात्र आम्हाला सवय आहे. दुसरा कसा वागतो? तो चांगला वागत नाही. काय त्याचा उपयोग आपल्याला? आणि तेसुद्धा त्याच्या तोंडावर सांगण्याचे धैर्य नाही आमच्याकडे. 'तू चुकला आहेस' असं तोंडावर सांगावे. **तो वाईट वागतो हे तिसऱ्याजवळ सांगायचं म्हणजे आणखी एक पापाची भर पडली.** पैशून्य म्हणतात त्याला. या एका जन्मात आपल्या हातून किती कर्म झालेली आहेत याचे आपल्याला काही ज्ञान नाही, स्मरण नाही.

तर ही अनंत कर्म झालेली आहेत, सारखी होताहेत. अशीच प्रत्येक जन्मात होतात. असे किती जन्म झाले कोणाला ठाऊक ! किती देहांचा संबंध आला आणि सुटला कोणाला ठाऊक ! काहीही कोणाला सांगता येणार नाही. अनंत योनीमध्ये जन्माला गेल्यानंतर झालेली कितीतरी कर्म असतील त्यांचे फल भोगण्याकरता पुन्हा-पुन्हा देहाचा संबंध येतो. म्हणजे जीव हा स्वतः कर्माच्या आधीन आहे आणि त्याचा जन्मही त्या कर्मांच्या आधीन आहे.

ईश्वर तसा नाही. त्याला स्वतःला काही कर्म नाही. कर्म नाही त्यामुळे क्लेश नाहीत. रागद्वेषादिक विकार त्याच्या मनात नाहीत. असा स्वतंत्र ईश्वर आहे. म्हणून तो सर्वशक्तिसंपन्न आहे. सर्वही जीवांची कर्म

तो जाणू शकतो, त्यांची फलं देऊ शकतो, ती बदलू शकतो. सगळी शक्ति त्याच्याकडे आहे. म्हणून जीव आणि ईश्वर यांच्यामध्ये ईश्वर हा स्वतंत्र आहे. जीव कर्मपरतंत्र आहे.

आम्ही स्वतंत्र आहोत, आमचं आम्हाला सगळं करता येतं अशी समजूत करुन घेतो आम्ही. पण ते खरं नाहीये. सगळंच आमच्या ताब्यामध्ये असतं तर आम्ही डॉक्टराकडे गेलो असतो काय? साधं उदाहरण आहे. मला बरं करा असं कशाला सांगितलं असतं? अशी कितीतरी परतंत्रता आहे जीवाला.

व्यवहारामध्ये आपली कामं करण्याकरता दुसऱ्याकडे आपण जाऊ शकतो. तसं संसारातल्या इच्छा पूर्ण करण्याकरता ईश्वराचा आश्रय करावा लागतो. **संतांना सर्व दुःखाची निवृत्ति कशी करायची हे माहिती आहे.**

तर ईश्वराचं वर्णन करताना या स्तोत्रांत अमरः आणि अभवः ही दोन विशेषणे लावली आहेत. ईश्वराला जन्ममरण काही नाहीये. त्याने काही पाप-पुण्यकर्म केली म्हणून त्याला जीवाप्रमाणे जन्म आला असे नाहीये. त्याच्या इच्छेने सर्व होतंय. असं असूनसुद्धा त्यांनी एका स्त्रीला वचन दिले होते. दोन कथा या पहिल्या श्लोकामध्ये आल्या आहेत. श्रीपादवल्लभांच्या जन्माची कथाही याच श्लोकामध्ये आलेली आहे आणि कारंज्याला झालेला जो दुसरा अवतार नरसिंहसरस्वती त्या अवताराची कथाही याच श्लोकामध्ये महाराजांनी दिलेली आहे. स्त्रियांना त्यांनी आणखी वचन दिले होते. जगन्नाथपुरीला जाताना आंध्र प्रांतामध्ये पीठापूर लागते. तिथे श्रीपादवल्लभांचा अवतार झाला आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्याही पूर्वी असावा किंवा त्या वेळेला असेल, तिथे आपळराज नावाचा एक ब्राह्मण आणि त्याची स्त्री सुमती रहात होते. दोघही मोठे भगवत्भक्त. दत्तात्रेयांची उपासना करणारे. त्या सुमतीला

प्रथम दोन मुले झाली होती. पण दैवयोग असा की, एक मुलगा आंधळा झालेला आहे आणि एक पांगळा. एकाला चालायला येत नाही, एकाला दिसत नाही. म्हणजे या आईलाच त्यांचे सर्व करायला लागत होतं ना ! ती दोन्ही मुले पराधीन होती. **संसारामध्ये हे सगळं दुःख आहे. परंतु एक समाधान मानण्याकरता म्हणून धर्माचे आचरण जे सांगितलं आहे, शास्त्रकारांनी ते धर्माचरण जर व्यवस्थित आपल्या हातून घडत असेल तर अशाही दुःखाच्या परिस्थितीत आपल्या मनाला समाधान, शांति मिळते.**

सुमतीचे धर्माचरण चालू आहे. काय धर्माचरण चाललेलं होतं? अतिथिदेवो भव, मातृदेवो भव, पितृदेवो भव या सगळ्या शास्त्राच्या आज्ञा आहेत. माताही देव आहे. पिता देव आहे. अतिथि देव आहे. आचार्य देव आहेत. म्हणजे कुठही बाहेर जायला नको. कोण देव समर्थ आहे, काही कोणाला विचारायला नको. शास्त्राने सांगितल्याप्रमाणे ईश्वरबुद्धीने आणखी त्या ठिकाणी आदरभाव ठेवून वागल्यानंतर काही आपल्याला फसण्याचा संबंध नाही, बुवाबाजी झाली म्हणून तक्रार करण्याचाही संबंध नाही.

शास्त्र आम्ही सोडून दिलं. आमच्याच बुद्धीचा सर्व व्यापार आम्ही करु लागलो. जिथं काही चांगलं दिसलं तिथं आमची बुद्धि जाती. अनुभव आला नाही की पुन्हा तिथून दुसरीकडे. असं चाललेलं आहे.

ह्या सुमतीची नावाप्रमाणे उत्तम बुद्धि आहे. चांगले संस्कार आहेत. ईश्वरभावना आहे. अतिथिदेवो भव हे व्रत करते आहे. अनुसयामातेनेही याच व्रताचे आचरण केले. काही दुसरं करायला नको व्यवहारात, संसारामध्ये गृहस्थाश्रमी माणसाला. पण ती भावना मात्र पाहिजे. आतिथ्य करणं हीसुद्धा ईश्वराची आज्ञा आहे. पण लोकांनी चांगलं म्हणावं म्हणून आतिथ्य करायला लागला की संपलं. काय हो त्यांच्या

घरी आल्यागेल्याला चहापाणी सगळं व्यवस्थित करतात, कधी कंटाळा नाही अशी कीर्ति व्हावी म्हणून करायचे नाही. कर्तव्य म्हणून करायचे. ईश्वराची आज्ञा आहे. अतिथि म्हणजे साक्षात् महाविष्णु आहेत. ही एक सुमतीची भावना होती आणि तिच्याकडून ते व्रताचरण चाललेलं आहे. म्हणून घरात जरी आंधळा, पांगळा मुलगा असला तरी ते दुःख ती विसरुन जात होती आणि आपल्या त्या धर्माचरणाच्या आनंदामध्ये रहात होती. सद्बुद्धि आहे.

एके दिवशी त्या आपळराजाच्या घरी अमावास्येला पितरांचे श्राद्ध होते. ब्राह्मण मंडळी अजून यायची होती. स्वयंपाक तयार झालेला आहे, बारा वाजलेले आहेत आणि भगवान् दत्तात्रेय हे आणखी बैराग्याच्या वेषामध्ये त्यांच्या दारामध्ये येऊन उभे राहिले. **धर्माचरणाचे फल हे एकदम मिळते. सत्कर्म योगे वय घालवावे म्हणून संतांनी सांगितलेलं आहे. आम्ही इतके धर्माने वागलो, इतका दानधर्म केला, इतकी देवाची सेवा केली काय फल मिळाले? असे आम्ही विचारतो. पण लगेच फळ मिळत नाही. झाड लावले की लगेच आंबे येत नाहीत. त्याप्रमाणे सत्कर्म करीत राहायचे. सत्कर्माचे फल म्हणजे ईश्वराचा साक्षात्कार !**

त्या सुमतीच्या भाग्योदयाची वेळ आलेली आहे. आजपर्यंत तिने मनातले सगळे दुःख बाजूला ठेवून अतिथींची सेवा म्हणजे साक्षात् विष्णूंची सेवा केली. अतिथीला अन्नदान म्हणजे विष्णूंना अन्नदान या भावनेने ती कर्म करीत होती. आणि दत्तात्रेय त्या दिवशी आले. आता श्राद्ध आहे. शास्त्राची आज्ञा आहे. ब्राह्मणांचे जेवण झाल्यावर मग इतरांनी अन्न घ्यायचे. आता श्राद्ध झाल्याशिवाय स्वयंपाकातून भिक्षा कशी घालायची? शास्त्रीय विषय आहे तो. अतिथि जर विन्मुख परत गेला तर सगळं पुण्य घेऊन तो जातो म्हणतात.

सुमतीने अतिथिधर्माचे पालन करुन बैराग्याच्या वेषातील दत्तात्रेयांना भिक्षा घातली. ते प्रसन्न होऊन म्हणाले, ''माते, काय इच्छा आहे तुझी?''

सुमती म्हणाली, ''आपण मला जे माते म्हणून संबोधन केले ते खरे व्हावे. आपल्यासारखा पुत्र मला व्हावा. या आधी दोन मुलगे झालेत. त्यातला एक आंधळा आहे तर एक पांगळा.''

दत्तात्रेय हसून म्हणाले, ''आता माझ्यासारखा दुसरा कुठून आणणार? म्हणजे मलाच तुझ्या पोटी यायला पाहिजे. माझ्यासारखा मुलगा होईल पण त्या मुलाच्या इच्छेच्याविरुद्ध तुम्ही जाऊ नका.'' आणि त्याप्रमाणे त्यांनी सुमतीच्या पोटी श्रीपादवल्लभ म्हणून जन्म घेतला. पुढे यथावकाश त्यांचे अध्ययन झाले. त्यांच्या विद्वत्तेमुळे दूरदूरचे लोक त्यांच्याकडे अध्ययनाला येऊ लागले.

पुढे श्रीपादवल्लभांच्या लग्नाचा विचार सुरु झाला. तेंव्हा त्यांनी त्यांना लग्नच करायचे नाही असे सांगितल्यावर त्यांच्या आईला दत्तात्रेयांनी वर देताना काय सांगितले होते त्याचे स्मरण झाले. त्यामुळे काही बोलता येईना. तरी ती म्हणाली, ''देवा, आजपर्यंत तुमचा सहवास घडला. पण आता आमचे काहीतरी पापकर्म आड आलेले आहे. आता आम्हांला तुमचे दर्शन होणार नाही. आजपर्यंत या दोन मुलांच्या अपंगत्वाचे दुःख तुझ्याकडे बघून कमी होत होते. मला त्यांचे सगळे करावे लागत होते. त्यांचे ते प्रारब्धच आहे. अशी संतती जर उत्पन्न झाली तर काय करायचं? आता तुम्ही निघून गेल्यावर आता मला एकटीलाच ते दुःख भोगावे लागणार.'' असे ती अतिशय आर्ततेने कळवळून बोलली.

आईचे हे शब्द ऐकताच, श्रीपादांनी आपल्या दोन्ही भावंडांना आपला दिव्य हस्तस्पर्श केला. एकदम त्या भावंडांचे व्यंग दूर झाले. जो आंधळा होता त्याला दृष्टि आली, पांगळा होता तो चालू लागला.

त्यांचे शरीर उत्तम झाले, त्यांना सगळे ज्ञान झाले. त्या दोघांना आईबापांची सेवा करायची आणि शास्त्राप्रमाणे वागायची आज्ञा करुन श्रीपादवल्लभ तीर्थयात्रेला निघून गेले. जेंव्हा तू माझे स्मरण करशील, तेंव्हा मी तुला दर्शन देईन असे आश्वासन दिलेले आहे आईला. ईश्वराने दिलेले वचन ईश्वराने पाळलेले आहे. त्यावेळी मी काय बोललो मला आठवत नाही असे नाही म्हणाले.

त्या भावंडांचे प्रारब्ध आड आलेले आहे. त्यांच्याच कर्माचे ते फल आहे. **सुखही कर्माचे फल आहे, दु:खही कर्माचे फल आहे. असं मान्य करावं लागतं. युक्तिवादानेसुद्धा हे सिद्ध होते.**

एकच औषध तोच रोग झालेल्या सर्व रोग्यांना का लागू पडत नाही? एकाला गुण येतो मग तोच रोग, तेच औषध आणि तोच डॉक्टर असताना दुसरा रोगी का बरा होत नाही? त्या रोग्यापुरते डॉक्टरांचे औषधाचे ज्ञान कमी पडले असे म्हणायचे का? बुद्धीवादाने याचे काय उत्तर देणार?

**'भोगणे ते फळ संचिताचे ।'** तुकाराम महाराजांनी लिहून ठेवले **आहे. हे पूर्वीच्या कर्माचे फल आहे. म्हणजे कर्मानेच सुख मिळते, कर्मानेच दु:ख मिळते.**

प्रल्हादजींनी आपल्या मित्रमंडळींना उपदेश करताना हा युक्तिवाद मांडला आहे. व्यवहारामध्ये संपत्ति, सत्ता, सुख मिळावं म्हणून जीव किती प्रयत्न करतो ! त्याच्या त्या इच्छा काही संपत नाहीत कधी. पण त्यांच्याकरता प्रयत्न करण्याची आवश्यकता नाहीये असे प्रल्हादजींचे म्हणणे आहे - त्यांनी त्यांचे म्हणणे पटवून देण्याकरता असा युक्तिवाद मांडला आहे. 'ताप यायचे मला तुम्ही औषध द्या असे कोणी तरी डॉक्टरला सांगतो का? मग ताप का येतो? **तापाकरता काही प्रयत्न न करता ताप येतो की नाही? तसं सुखाकरता प्रयत्न न करता सुख का मिळू नये? दैव दैव ज्याला म्हणतात ते पूर्वीचे कर्मच आहे.''**

**पूर्वी केलेली चांगलीही कर्म असतील. त्याही कर्मांचे चांगले फळ मिळेल हा एक मनाचा निश्चय, मनाची स्थिरता ही संतांना, भगवत् भक्तांना साधलेली आहे.**

**आमच्या पूर्वीच्या काही वाईट कर्माने दुःख मिळतंय. पूर्वीची आमची सगळीच कर्म वाईटच झाली असतील कशावरुन? चांगलीही झाली असतील. त्यांचे फल म्हणजे सुखही मिळेल. मग आता मिळालेले आयुष्य ईश्वरभक्तिमध्ये घालवावं. त्याकरता मनाची स्थिरता विचारांनी केली पाहिजे.**

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।**
**हरिकृपे त्याचा नाश आहे ।**

म्हणतात. **प्रारब्ध कर्म कितीही बलवत्तर असली तरी ईश्वराच्या शक्तीने त्यांचाही नाश होतो.** प्रत्यक्ष अवतार घेतल्यावर अनेक भक्तांच्या सांसारिक, पारमार्थिक अडचणी दूर करता येतात असे सद्गुरुंचे सामर्थ्य आहे. हेही कार्य मोठंच आहे ना ! म्हणून सुमतीने जरी मुलगा व्हावा असा वर मागितला तरी देवाने तो दिला.

आता याच श्लोकातील आणखी एक कथा सांगताहेत.

श्रीपादवल्लभ कुरवपुरात रहात होते. ते त्या काळात मोठे गाव असावे. तिथल्या एका विद्वान् ब्राह्मणाला आपल्याला मुलगा व्हावा अशी उत्कट इच्छा होती. म्हणून त्याने शास्त्रात सांगितलेली पुष्कळ पुण्यकर्म केली. शेवटी एक मुलगा झाला. मुलगा पाहिजे, मुलगा पाहिजे ही इच्छा असते सर्वांना. मुलगा झाला तरी तो दीर्घायुषी पाहिजे, निरोगी पाहिजे, शहाणा पाहिजे, श्रीमंत होणारा पाहिजे. सगळ्या गोष्टी कशा एकदम मिळतील? झाला मुलगा शेवटी. पुढे योग्य वयात त्याचे उपनयन झाले पण त्याला काहीही बुद्धि नव्हती. अनेक विद्यार्थी त्या ब्राह्मणाकडे विद्याध्ययनाला येत. ज्ञानसंपन्न होऊन जात. पण त्याला आपल्या

मुलाला ज्ञान देता आले नाही.

**भोगणे ते फळ संचिताचे ।।**

**मान्य करावेच लागते. युक्तिवादानेच सिद्ध होते. आपल्या मुलाला ज्ञान द्यायचे नाही अशी त्या बापाला इच्छा असेल का?** अर्थात त्या मुलाचे कर्म आहे त्यामुळे त्याला ज्ञान नाही ग्रहण करता आले. त्याची बुद्धि असमर्थ आहे. ज्ञान देणारा प्रत्यक्ष पिता आहे, पाहिजे तितके ज्ञान देण्याची त्याची इच्छा आहे. पण देऊ शकत नाही. त्या ब्राह्मणाने पुष्कळ प्रयत्न केले, पण मुलाला ज्ञान देता आले नाही. तो मुलगा अत्यंत निर्बुद्ध होता. मुलगा पाहिजे, मुलगा पाहिजे. झाला मुलगा. पुढे तो ब्राह्मण मेल्यावर त्याच्या बायकोने भिक्षा मागून आणून त्या मुलाला पोसावे. गावातले लोक त्याची निंदा करु लागले. त्याला म्हणाले, ''आईच्या जीवावर जगतोस. त्यापेक्षा नदीत जाऊन जीव दे. तुझा बाप किती विद्वान होता आणि तू असा?'' आता त्या लोकांना तरी असे बोलायचे काय कारण? त्यांची निंदा असह्य होऊन त्या मुलासह देहत्याग करण्याकरता नदीतीरावर आली. श्रीपादांचा आश्रम त्या नदीतीरावर होता. त्यांनी श्रीपादांना वंदन करुन आत्महत्येचा विचार त्यांना सांगितला. श्रीपादांनी त्यांना जवळ बोलावून आत्महत्या करण्याचे कारण विचारले. तिने आपली सर्व हकीकत सांगितली.

श्रीपादवल्लभांनी तिला सांगितले, ''तुम्हांला जो जन्म मिळालेला आहे तो काही असा घालवण्याकरिता मिळालेला नाही. अविचाराने केलेली आत्महत्या हा सर्वात मोठा दोष आहे. जर योगमार्गाने प्राणत्याग केला तर ते पाप नाही किंवा समरांगणावर युद्ध करीत असताना मृत्यु आला तर स्वर्गप्राप्ति आहे. ती काही आत्महत्या नाही. तेव्हा आत्महत्येसारखे पाप तू करु नकोस. सध्याचे दुःख दूर होण्याकरता तू शनिप्रदोषाचे व्रत कर. त्यांच्या कृपेने तुझे कल्याण होईल. लोकांची निंदा

तू जरा सहन कर. भगवत्गीतेचा उपदेश सुरु केल्यावर भगवंतांनी प्रथमच सांगितले.

**मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदुःखदाः**
**आगमापायिनोऽनित्यास्तांतितिक्षस्व भारत ।। २.१४ ।।**

**सगळं सहन करायला शिक. सहनशीलता असल्याशिवाय परमार्थ घडत नाही. मानसिक त्रास होतात, आधिदैविक आहेत, आधिभौतिक क्लेश आहेत. चाललेलं आहे. तर ह्या तितिक्षेचा तू अभ्यास कर.**

श्रीपादांच्या आज्ञेने त्या स्त्रीने शनिप्रदोषाचे व्रत आचरण करायला सुरवात केली. तिच्या मनाचे समाधान झाले, लोकांच्या निंदेकडे ती लक्ष देईनाशी झाली. लोक आपोआपच निंदा करायचे थांबले. प्रदोषकाली श्रीपादांनाच शंकर मानून त्यांची पूजा-अर्चा करायची.

**'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः'**

**आपण पुष्कळ म्हणतो. पण प्रत्यक्षात आपली तशी भावना असते का?** शिवलिंगाची पूजा करण्यापेक्षा गुरुंची पूजा का करु नये? ते काही शास्त्राच्या विरुद्ध नाही. जर गुरुंची शंकर म्हणून पूजा केली तर गुरु रागावणार नाहीत. ती सुमती काय किंवा ही स्त्री काय ही त्यांची भावना आहे. अधूनमधून श्रीपादांच्या दर्शनाला यावं, त्यांच्याजवळ बसावं, त्यांच्या मुखातून काय निघेल ते ऐकावे. सद्गुरु श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांनी चित्तसद्बोधनक्षत्रमालेत म्हटले आहे -

**गुरु देव हे एक मानूनि भक्ति ।**
**तयांची करी त्या करी येई मुक्ति ।**
**सुयुक्ति अशी ही धरी नित्य चित्ता ।**
**त्वरे आदरे तूं स्मरे नित्य दत्ता ।**

गुरु आणि देव एकच आहेत. हे सगळे श्लोक त्याप्रमाणे चित्तवृत्ति बनवण्याकरता सांगितले आहेत. किंवा त्याचे ते द्योतक आहेत.

अधूनमधून श्रीपादांना ती म्हणायची, "काय महाराज, हा माझा जन्म असाच जाणार का? आपल्यासारखा मुलगा असावा ही माझी इच्छा या जन्मात कशी पुरी होणार?"

श्रीपाद म्हणत, "हो, असाच जाणार."

पण त्या स्त्रीने श्रीपादांनी सांगितल्याप्रमाणे शनिप्रदोषाचे व्रत शेवटपर्यंत केले. पुढे श्रीपादांच्या कृपेने तो मंदबुद्धीचा मुलगा सर्व ज्ञानसंपन्न झाला. श्रीपादांनीच आपला पुत्र व्हावे अशी इच्छा तिने व्यक्त केल्यावर श्रीपादवल्लभ म्हणाले, "माझ्यासारखा म्हणजे दुसरा कुठून आणणार? मलाच तुझ्या पोटी यायला पाहिजे. ठीक आहे. पुढच्या जन्मी मी तुझा मुलगा होईन." त्याही जन्मामध्ये श्रीपादवल्लभांच्या कृपेने ती स्त्री सुखी झालेली आहे.

कुरवपुरातील ती एक सामान्य स्त्री असली तरी तिच्या भक्तीमुळे श्रीपादवल्लभांना तिचे पुत्र व्हावे लागले. तिचा पुढचा जन्म शिवभक्त कुळात विदर्भातल्या कारंजा नगरात अंबा नावाने झाला. पूर्वसंस्कारांमुळे लहानपणापासूनच तिच्याकडून शिवभक्ति घडली. तिला पुढे पतीही शिवभक्तच मिळाला. शनिप्रदोषाचे व्रत तिने गुरु आणि ईश्वर एकच आहेत या बुद्धीने केलेले आहे ना! आणि दिलेल्या वचनाप्रमाणे श्रीपादवल्लभांनी तिच्या पोटी नृसिंहसरस्वती म्हणून जन्म घेतला. सुमतीच्या पोटी श्रीपादवल्लभ आणि अंबेच्या पोटी नृसिंहसरस्वती म्हणून दत्तात्रेयांचे अवतार झाले. अशा स्त्रियांचे मानवावरती किती उपकार झाले आहेत? अनुसयामातेचे किती उपकार आहेत? सुमतीचे किती उपकार आहेत? अंबामातेचे किती उपकार आहेत? त्यांच्या पुण्याईने भगवंताने अवतार धारण करुन लोकांचा उद्धार करण्याचे कार्य सारखं चालू आहे. स्त्री जन्माला येऊनसुद्धा त्यांनी स्वतःचे तर कल्याण करुन घेतलेच परंतु सर्वही जीवांच्यावरती उपकार करुन ठेवलेले आहेत. देवाचा अवतार

त्यांच्या भक्तीमुळे झाला आहे. देवमाता त्या झाल्या आहेत. त्याही वंद्य आहेत.

याप्रमाणे दोन कथा महाराजांनी या पहिल्या श्लोकात सांगितल्या आहेत.

व्यक्तीचेही सामर्थ्य आहे आणि सामुदायिकही सामर्थ्य आहे. भारतवर्षामध्ये व्यक्तीला किंमत नाही म्हणतात, पण मत मिळवण्याच्या वेळेस व्यक्तीलाच किंमत दिली जाते. तिथे कुठे लोकशाही आहे? सगळ्यांनी मिळून एकत्र विचार करुन मतं दिली असे होते का? एकेक व्यक्तीचे मत होऊ शकते. मत दिल्यानंतर लोकशाही सुरु झाली असे म्हणायचे.

भारतीय सिद्धांतामध्ये व्यक्ति ही महत्त्वाची आहे आणि जनसमुदाय - समष्टीही महत्त्वाची आहे. एक व्यक्तीची इच्छा पूर्ण करण्याकरता देवाने अवतार घेतले. व्यक्तीचे महत्त्व आहे हे देवाने जाणले. आम्ही १८ वर्षांचे वय झाले म्हणजे मताधिकार देतो. मत देईपर्यंत त्या मत देणाऱ्या व्यक्तीला महत्त्व, समुदायाला नंतर महत्त्व. त्या समुदायात ती व्यक्ति असली तरी तिला महत्त्व नाही. देवाच्या राज्यात तसे नाही. स्त्री असो, पुरुष असो, लहान असो मोठा असो ती व्यक्ति जर अधिकारसंपन्न असेल तर तिलाही महत्त्व आहे. ती स्त्री उदरनिर्वाहाकरिता भिक्षा मागत असेल पण सद्‌गुरु साक्षात् ईश्वर आहेत ही भावना निर्माण व्हायला तिला किती जन्म भक्ति करावी लागली असेल ! म्हणून एका व्यक्तीलाही महत्त्व आहे.

रुक्मिणीने एकटीने भावाचा विरोध असताना श्रीकृष्णांना पत्र पाठवले. ती भावना श्रीकृष्णांनी स्वीकारली आहे, मान्य केली आहे. युनियन पाहिजे वगैरे नाही. एका व्यक्तीला किंमत नाहीये लोकशाहीमध्ये. व्यक्तीलासुद्धा किंमत दिली पाहिजे. युनियन असली तरी काय किंमत

दिली जाते कोणास ठाऊक? भारतीय संस्कृतीमध्ये हा सिद्धांत आहे. एक व्यक्ति अधिकारी असेल, बुद्धीने मोठी असेल तर तिला महत्त्व आहे.

तर पौष शुद्ध द्वितीयेला मध्यान्हकाली कारंज्यामध्ये दत्तप्रभूंचा अवतार झाला आणि गणेश चतुर्थीला श्रीपादवल्लभांचा अवतार सूर्योदयाला पीठापूरमध्ये झाला. कारंज्याला दीड महिना उत्सव चालू असतो. कथा, कीर्तनं, प्रवचनं, यज्ञयाग वगैरे अखंड चाललेलं आहे. धर्मनिरपेक्ष राज्य असले तरी धर्माचरणाला प्रतिबंध होत नाही हा शासनाचा मोठेपणा आहे की ईश्वराची कृपा आहे कोणास ठाऊक. त्यांचा काही उद्देश असेल. राज्य चालवण्याकरिता असे म्हणावे लागत असेल. असेना का. तर याप्रमाणे भक्ताला दिलेले वचन पूर्ण करण्याकरिता महाराजांचे अवतार झाले आहेत. भक्ताच्या तळमळीमुळे झालेले आहेत.

गुरुचरित्रातल्याच कथा महाराजांनी या स्तोत्रात लिहिल्या आहेत. त्या कथासंबंधी विचार उद्यापासून करायचा आहे.

**कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा ।**
**बुद्ध्यात्मना वा प्रकृति स्वभावात् ।।**
**करोमि यद् यद् सकलं परस्मै ।**
**नारायणायेति समर्पयामि ।।**

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ।।**

# दिवस दुसरा

## दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

**ऋतकृत्स्वगिरोऽमरोऽभवद्विजपत्न्यास्तनयोऽपियो भवः ॥**

**स नृसिंहसरस्वती यतिर्भगवान्मेऽस्ति परा वरा गतिः ॥**

कलीयुगात भक्तांचा उद्धार करण्याकरिता श्रीपादवल्लभांचा अवतार झाला आहे. तेच श्रीपादवल्लभ कारंजा क्षेत्रामध्ये नृसिंहसरस्वती म्हणून आलेले आहेत.

सद्गुरु आणि ईश्वर एकच आहेत अशी त्या कुरवपूरमधल्या स्त्रीची भावना आहे. हा एक भक्तिमार्गातला मोठा सिद्धांत आहे. ईश्वरप्रसादाने ईश्वरप्राप्ति होते हा जरी एक सिद्धांत असला तरी ईश्वरच सद्गुरुरुपाने भेटतो म्हणजे गुरु आणि ईश्वर यांच्यात अंतर नाही. ही मोठी गुरुभक्ति आहे. ही भावना तिच्या मनामध्ये होती. गुरुर्देवोमहेश्वरः ही दृढबुद्धि मनात धारण करुन तिने श्रीपादवल्लभांची सेवा केली. शिवलिंगाची पूजा ती रोज करीत असेल पण शनिप्रदोषाच्या दिवशी मात्र श्रीपादवल्लभांचीच शंकर म्हणून ती पूजा करीत असे. महाराजांच्या आज्ञेप्रमाणे तिचे आचरण झालेले आहे. आणि त्याचे फल म्हणजे श्रीपादवल्लभच तिच्या पोटी आले आहेत.

**भारतीय संस्कृतीमध्ये पुनर्जन्माचा सिद्धांत आहे. जीवात्मा जर सत्कर्म करीत राहिला तर त्याला पुढचा जन्म चांगला मिळतो.**

कुरुगड्डी कुठे आणि कारंजा कुठे? पूर्वजन्मांतले संस्कार आहेत. या जन्मातही तिचे आईबाप शिवभक्त होते. तिला पतीही मोठा शिवभक्त मिळाला.

पुढे तिला यथावकाश मुलगा झाला. पूर्वजन्मात वर दिल्याप्रमाणे श्रीपादवल्लभांनीच तो अवतार घेतला. पण इतर मुलांप्रमाणे तो मुलगा बोलेना. तो जन्मापासून फक्त ओंकाराचाच उच्चार करी. पाच-सात

वर्षांपर्यंत तेच काम. मुलाला बोलायला येत नाही, अशीच आईबापांची व इतरांची समजूत झाली. कोणी काहीही त्याला बोलले तरी त्याच्या तोंडून ओंकाराशिवाय काहीही यायचे नाही. सगळ्यांना आश्चर्य वाटले. ओंकार हे भगवंताचे एक नाम आहे. उपनिषदामध्ये त्याचे पुष्कळ महत्व सांगितले आहे. ओंकाराचा जप करण्याचा अधिकार संन्याश्यांना आहे. तेच त्यांचे नामस्मरण. तर जन्मापासूनच ओंकाराचा जप सुरु करणारा हा मुलगा काही सामान्य नाही याची सर्वांना कल्पना आली. सगळी गावातली मंडळी पहायला आली ना ! ओंकार म्हणणारा कोण आहे हा मुलगा ? कसा आहे ? पुढे त्या मुलाला दृष्ट लागू नये म्हणून त्या आईने सगळ्यांना दाखवायचे बंद केले. मग त्या आईला काळजी निर्माण झाली. काय म्हणाली, "मी इतकं शनिप्रदोषाचे व्रत केले. शंकराची उपासना केली आणि हा असला कसला मुलगा मला झाला ?" मुलाची योग्यता माहिती नाही. हा मुलगा अज्ञानी आहे, याला बोलता येत नाही अशीच कल्पना त्या आईची झाली. लोखंडाला हस्तस्पर्श केल्याबरोबर त्याचे सोने झालेले त्या आईने पाहिले. मग याला अज्ञानी कसे म्हणायचे ? मग का बोलत नाही ? त्याचे जातक पहाणाऱ्या ज्योतिषांनी हा कोणीतरी अवतार आहे असे सांगितले.

ज्योतिषशास्त्र हे सूक्ष्मशास्त्र आहे. त्याचा उत्तम अभ्यास करणाऱ्यांना पुष्कळ उलगडा होत असतो.

मग त्यांनी खुणेनेच आईला सांगितले की, "माझे उपनयन झाल्यावर मी बोलेन." मग आईबापांनी त्याचे उपनयन केले. गायत्री मंत्राचा उपदेश त्या पित्याने केलेला आहे. आणि मग बोलायला सुरवात झाली. बोलणं म्हणजे सर्व मंत्रपठण चालू झाले. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद. भारतामध्ये सर्वही वेद आणि त्यांच्या शाखांचा अभ्यास पूर्वी चालू होता. अथर्ववेद तर आता ऐकायलाही मिळत नाही.

नर्मदेच्या किनाऱ्यावर कोणी वासुदेवशास्त्री होते म्हणतात. खास अथर्ववेदाचा अभ्यास केलेले. आणखी नरहरींच्या मुखातून सर्वही वेद मंत्रांचा उच्चार सुरु झालेला आहे. आईने भिक्षा घातली पात्रामध्ये आणि लगेच ते म्हणाले, ''मला आता भिक्षा मागायला तुझी परवानगी मिळाली. मी आता जातो. मला आता संन्यासदीक्षा घ्यायची आहे. मी आता घर सोडून जाणार.''

असे नरहरींनी आईला सांगितल्यानंतर आईने त्यांना उपदेश केला, ''हा काही क्रम नाही. संन्यास दीक्षा ही आहे शास्त्रामध्ये.'' संन्यासाश्रम सध्या पाहायला मिळत नाही. सद्गुरु वासुदेवानंद सरस्वतीस्वामी महाराज यांचा संन्यासाश्रम म्हणजे मूर्तिमंत शास्त्राप्रमाणे. श्रृंगेरीच्या शंकराचार्यांनीसुद्धा त्यांचा मान-सन्मान केलेला आहे. ते महाराजांना म्हणाले, ''आपण खरे संन्यासी. भगवान दत्तात्रेयांचे निरंतर सान्निध्य आहे. त्यांच्या आदेशाप्रमाणे आपले सर्व जीवन चालू आहे.'' तर मुलाने जाऊ नये, रहावे म्हणून ती आई म्हणते आहे, ''उपनयन झाल्यानंतर वेदाध्ययन करायचे अशी शास्त्राची आज्ञा आहे. त्याकरता ब्रह्मचर्याश्रम आहे, विद्याभ्यास करण्याकरता. त्यानंतर गृहस्थाश्रम करायचाय, अग्निहोत्रादि, यज्ञयागादिक कर्म यथाशक्ति करायची. अतिथींचा सत्कार करणे हे गृहस्थाश्रमाचे मुख्य कार्य आहे. नंतर वानप्रस्थाश्रम आहे. त्यागाचा अभ्यास आहे आणि शेवटी संन्यास आहे.''

कर्माने संन्यास आहे असे आईचे म्हणणे आहे. आता इतक्यात मुंज झाल्याबरोबर संन्यास घेता येणार नाही. राहावं मुलाने अशा उद्देशाने ती म्हणत आहे. महाराजांनी सांगितले, ''क्रमानेही संन्यास घेता येतो आणि एकदमही संन्यास घेता येतो.''

**सदाशिवब्रह्मेंद्र** म्हणून मोठे अधिकारी स्वामी होऊन गेले. ब्रह्मज्ञानी महात्मे. मोठे योगी आणि शास्त्राचा उत्तम अभ्यास त्यांनी केला होता.

संन्यासाश्रमाला मुख्य वैराग्याची जरुरी आहे. संसारवासना मनामध्ये काहीही राहिल्या नाहीत. अशी मनाची तयारी झाल्यानंतर संन्यासाश्रम आहे. काहीही आणखी मनामध्ये वासना राहिली नाही. त्याकरता क्रमाने अगोदर ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि शेवटी संन्यासाश्रम. संसारातली सुखं घ्यायची आहेत गृहस्थाश्रमात. पुढे वानप्रस्थाश्रमात ती सोडायची आहेत आणि नंतर संन्यासाश्रम. तर संन्यासाला मुख्य वैराग्याची जरुरी आहे. ते वैराग्य एकदम उत्पन्न होणार नाही. म्हणून क्रमाने संन्यास घ्यावा असा सामान्य जीवांना उपदेश आहे. शंकराचार्य तर पाचव्या वर्षी मुंज झाली आणि लगेच घरातून बाहेर पडले. जन्मतःच वैराग्य. असे अधिकारी जे महात्मे असतील त्यांना हा क्रम नाही, म्हणाले. महाराज आईला सांगताहेत. माझ्यासारख्यांना नाही. पूर्ण वैराग्य मनामध्ये आहे. संसाराची आसक्ति मनामध्ये बिलकुल नाही. असा विचार करुन संसाराची आसक्ति त्यांनी सोडलेली आहे. कोणतेही दुःख ते सोसू शकतात. देहाची आसक्ति त्यांना बिलकुल राहिलेली नाही. तेच संन्यासी होऊ शकतात. ब्रह्मचर्याश्रमातून संन्यास घ्यायला हरकत नाही. असाही शास्त्राचा नियम आहे, असं महाराजांनी सांगितलं. कारण त्यांना मोठं कार्य करायचंय ना! पुष्कळ ठिकाणी भक्त साधनाभ्यास करताहेत. भगवंताचा साक्षात्कार व्हावा. आत्मज्ञान व्हावं याकरता आणखी त्यांचे प्रयत्न चाललेले आहेत. त्यांच्या मार्गामध्ये येणारी विघ्नं दूर करायची आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन करायचं आहे. हे मोठं कार्य आहे. तर आईची समजूत त्यांनी घातली. शंकराचार्यांसारखा एखादा अधिकारी महात्मा संन्यास घेऊ शकतो, म्हणाले.

सदाशिव ब्रह्मेंद्रांनी वैराग्य उत्पन्न झालं आणि लगेच संन्यास घेतला. आता ते वैराग्य कसं उत्पन्न होईल, काय होईल, त्याला कशी विचारशक्ति पाहिजे याबद्दलची कथा आहे. त्यांचा विवाह झाला. गर्भाधानाचा विधि

सुरु होता. पाहुणे-रावळे पुष्कळ आलेले आहेत. त्या दिवशी जेवायला उशीर झाला. त्यांनी आईला विचारले, ''आज जेवायला इतका उशीर का झाला?'' ती बिचारी सहज बोलून गेली, ''आज तुझ्या संसाराचा पहिला दिवस आहे.'' त्या वाक्याचा त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला की ते म्हणाले, ''संसाराच्या पहिल्याच दिवशी ही स्थिति आहे तर पुढे काय होईल?'' लगेच घर सोडून निघून गेले. एका वाक्याने मनावर इतका परिणाम झाला. तर हे जे वैराग्य उत्पन्न झालं ही ईश्वराची कृपा आहे आणि नंतर ते मोठे योगी ब्रह्मज्ञानी झाले. टिपू सुलतानाच्या काळात ते होऊन गेले म्हणतात. ते नेहमी समाधि अवस्थेमध्ये रहात होते. अंगावर वस्त्र नाही, काही नाही. देह त्यांचा चाललेला आहे. अरण्यामध्ये एक मुसलमान सरदार शिकारीकरिता आलेला होता. बरोबर त्याचा जनानखाना होता. हे समाधि अवस्थेत जनान्याच्या तंबूच्या एका दाराने आत गेले, दुसऱ्या दाराने बाहेर पडले. कोणाचा तंबू आहे याची त्यांना काही कल्पना नव्हती. द्वंद्वातीत अवस्था आहे. पण तो मुसलमान अधिकारी रागावून म्हणाला, ''आमच्या तंबूतून जाणारा हा कोण आहे? उन्मत्त मनुष्य दिसतोय.'' तलवार उपसली आणि सदाशिव ब्रह्मेंद्रांचे दोन्ही हात तोडून टाकले. तरी त्यांच्यावर काही परिणाम नाही. समाधि अवस्था आहे तसेच चाललेले आहे. रक्तस्राव हातातून होतो आहे.

पुढं त्यांची समाधि उतरण्याची वेळ झाली आणि एका झाडाखाली ते थांबले. त्या मुसलमानाच्या मनावरही परिणाम झाला. हा कोणीतरी मोठा महात्मा दिसतोय. हात तोडले तरी चालतो? सदाशिव ब्रह्मेंद्रांनी डोळी उघडून त्या मुसलमानाकडे पाहिले. तो यांच्या पाया पडला. क्षमा मागितली. ह्यांनी विचारले, ''काय झाले?'' तो म्हणाला, ''माझ्या हातून अपराध झाला आहे. तुमचे दोन हात तोडले मी.'' त्यांनी विचारले,

“कुठे तोडले?” आणि त्यांनी स्वत:कडे नुसते पाहिलं आणि त्यांना दोन्ही हात आले म्हणतात.

श्रृंगेरीच्या महाराजांनीसुद्धा त्यांची स्तुति केलेली आहे. म्लेंच्छाने हात तोडून टाकलेले असतानासुद्धा मनामध्ये ज्यांच्या क्रोध नाही, इतकी अंतर्मुख अवस्था ज्यांना प्राप्त झालेली आहे, त्यांचे वैराग्य किती असेल? देहाची आसक्ति किती सुटली असेल? त्याशिवाय संन्यास दीक्षा होऊ शकत नाही. हे आईचेही म्हणणे बरोबर आहे. पण महाराज सांगतात, “ज्याची देहाची आसक्ति सुटली आहे त्याला संन्यास घ्यायला काय हरकत आहे?” समजूत काढली आईची. मला संन्यासदीक्षा धारण करुन अधिकारी महात्म्यांना मार्गदर्शन करण्याचे मोठे कार्य करायचे आहे.

आता आईचा नाईलाज झाला. हे जाणार. 'तुला आणखी मुलं होतील' असा आशीर्वाद दिला महाराजांनी. पण त्या आईने निराळाच प्रश्न उपस्थित केला. ती म्हणाली, “कशावरुन मुलं होतील? तुमच्या शब्दांवर माझा विश्वास नाही. मुलगा होईपर्यंत तरी तुम्हांला राहावे लागेल.” “रहातो” म्हणाले. आता तिने अविश्वासच दाखवला. महाराज राहिले कारंज्यात.

ईश्वर कसा आहे? आत्मा कसा आहे? हे समजावण्याकरिता व्यासांनी वेदांतशास्त्र केले आहे. त्या ईश्वराचे वर्णन करताना संपूर्ण विश्वाच्या द्वाराने त्याचा परिचय करुन दिलेला आहे. ह्या विश्वाचा जो निर्माता आहे तो परमात्मा. विश्व काय कोणी केल्याशिवाय झालं थोडंच? स्वभावत: असं होईल कसं? रचना झालेली दिसते आहे ना जगाची? मोठा बंगला बांधला म्हणजे दगडं आहेत, माती आहेत, दारं आहेत, खिडक्या आहेत. या सगळ्याची व्यवस्थित एकत्र रचना झाल्यानंतर ते घर तयार होते. म्हणजे ही रचना करणारा कोणी तरी असला

पाहिजे. का आपोआपच झालं? कर्त्याशिवाय आणखी घर तयार कसं होईल? घराचे ज्ञान असणारा कोणीतरी आहे. **आपल्या शक्तीच्या बाहेरचे हे काम आहे म्हणून याचा कर्ताच कोणी नाही असे आजचे बुद्धिवादी म्हणतात.**

पुष्पदंताने शिवमहिम्नः स्तोत्रामध्ये याबद्दल सांगितले आहे.

**अजन्मानो लोकाः किमवयवयन्तोऽपि जगता -**

**मधिष्ठातारं किं भवविधिरनादृत्य भवति ।**

हे सगळं विश्व हे उत्पन्न झालेले नाही असे म्हणायचे का तुम्हाला? सावयव पदार्थ आहे. अनेक पदार्थ एकत्र करुन तयार झालेला पदार्थ जो आहे, समुदायात्मक जो आहे त्याचा कर्ता कोणीतरी आहे, तो उत्पन्न झालेला आहे. अनेक बांधकामाचे साहित्य वापरुन तयार झालेलं घर हे उत्पन्न झालेलं आहे. त्याचा उत्पत्तिकर्ता कोणीतरी असतो. म्हणून संपूर्ण विश्व हे सावयव आहे, संघातरुप आहे, त्याचा कर्ता कोणीतरी असला पाहिजे. हे मानावेच लागते. मग याचा कर्ता कोण आहे? सगळ्या जीवांचा शोध सुरु झाला. जीव पुष्कळ आहेत. देव आहेत, मानव आहेत, गंधर्व आहेत, ब्रह्मदेवापर्यंत सगळे आहेत. परंतु सगळेही जीवात्मे असमर्थ आहेत. संपूर्ण विश्व निर्माण करण्याचे सामर्थ्य कोणत्याही जीवात्म्याला नाही. महासागर आहेत, मोठमोठे विशाल पर्वत आहेत. या सृष्टीला अशी कितीतरी अरण्ये आहेत की ज्यांचा अद्यापि पत्ता लागलेला नाही म्हणतात. सगळ्या सृष्टीचा शोध अद्यापि लागलेला नाही.

तर याप्रमाणे संपूर्ण विश्वाला निर्माण करणे हे जीवाला काही शक्य नाही. जीवाची शक्ति परिमित आहे, मर्यादित आहे.

**अनीशो वा कुर्याद् भुवनजनने कः परिकरो**

**यतो मन्दास्त्वां प्रत्यमरवर संशेरत इमे ।। ६ ।।**

शंकरांच्याबद्दल, ईश्वराच्याबद्दल हे लोक का संशय घेतात? असे तो पुष्पदंत विचारतो.

तर याप्रमाणे संपूर्ण विश्वाचा विचार करणं, विश्वाचा निर्माता जो आहे त्याचा विचार करणं, तो कसा आहे, त्याचं स्वरुप काय आहे, त्याची शक्ति कशी आहे हा विचार जगाच्या द्वाराने करण्याकरता जगाचाही विचार शास्त्रकारांनी केला आहे. उपनिषदामध्येही जगासंबंधी विचार मांडलेला आहे. जगाचा निर्माता कोण आहे? हे समजून घेण्याकरता जगाचा विचार करायचा आहे आणि विचार करणारा मी कोण आहे? **जीवस्वरुप, जगाचं स्वरुप आणि जगाचा निर्माता ईश्वर या तीन तत्त्वांचा विचार हा मुख्य विचार आहे.**

वैज्ञानिकांच्या बुद्धीचं कार्य आणखी चाललेलं आहे. चंद्रलोकांपर्यंत ते गेलेले आहेत. अद्यापि आणखी त्यांचं पुष्कळ कार्य शिल्लक आहे. प्रयत्न चालू आहेत. **निराशा नाही, जिज्ञासा आहे. हे काही गुण आहेत.** परंतु केवळ भौतिक दृष्टीने हा विचार आहे. शरीराकडे पहातानासुद्धा शरीर म्हणजे पंचमहाभूतांचे हे एक स्थान आहे. पंचमहाभूतांपासून तयार झालेलं. एवढीच दृष्टि आहे. या शरीराच्या अंतर्गत काय काय आहे याचा विचार सगळ्या शास्त्रकारांनी केलेला आहे. आम्हाला दिसणारं जे आहे ते हातपाय वगैरे स्थूलशरीर ह्याच्या आत काय काय साधनवर्ग आहे याचा पत्ता आपल्याला वेदांतशास्त्र सांगते. संन्यासाश्रम त्याकरता आहे. **या स्थूल शरीराच्या आत असणारी ज्ञानेंद्रियं, कर्मेंद्रियं, मन वगैरे जी तत्त्वं आहेत ती काय आहेत? हाही विचार केला पाहिजे. इंद्रियं आम्हाला दिसत नाहीत. ईश्वर दिसत नाही म्हणून आम्हाला मान्य नाही. आम्ही म्हणतो, ''डोळे तरी कुठ दिसतात? डोळ्यांवर आमचा फार विश्वास आहे ना? डोळ्यांनी जे दिसतं ते खरं. भिंतीच्या पलिकडचे डोळे पाहू शकत नाहीत. मग डोळ्यांनी न दिसणारे पदार्थ भिंतीच्या पलिकडे**

**काहीच नाही म्हणायचे का? डोळ्यांची शक्ति स्पष्ट ज्ञान करुन देणं इतपत आहे. त्यालासुद्धा मर्यादा आहे. प्रकाश पाहिजे. प्रकाश नसताना डोळे पाहू शकत नाहीत. तो पदार्थ स्थूल पाहिजे. मोठा पाहिजे. जवळ पाहिजे. अगदी दूर असलेला पदार्थ डोळ्यांना दिसत नाही. म्हणून तो नाही म्हणायचे का? अंतरिक्षातले अनेक बारीक-बारीक तारे डोळ्यांना दिसत नाहीत म्हणजे ते नाहीत असे म्हणता येईल का? त्याकरता संत महात्म्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवावा लागतो."** आणि तसा विश्वास ठेवून प्रयत्न करणारी जी मंडळी आहेत त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता हा अवतार झालेला आहे. म्हणून संन्यासदीक्षा त्यांना घ्यायची आहे.

रामांच्या कृपेने सुग्रीवाला राज्य मिळालं. सीतादेवीचा शोध करण्याकरता सुग्रीवाने सगळी मंडळी चारी दिशांना पाठवली. दक्षिण दिशेला मारुतीराय, अंगद, जांबवान वगैरे समर्थ जी मंडळी होती त्यांना दक्षिण दिशेला पाठवलं. त्यावेळी रामचंद्रांनी मारुतीरायांना आपल्या हातातली अंगठी काढून दिली. मारुतीरायच शोध लावतील अशी खात्री आहे रामांची.

**जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।।**

असं त्याचं वर्णन आहे. ही अंगठी तुझ्याजवळ असली म्हणजे सीतेचा तुझ्यावर विश्वास बसेल. कारण या वानर रुपामध्ये तू गेलास आणि मी रामाचा दूत आहे असे सांगितले तरी ती तुझ्याशी बोलणार नाही. कारण रावणसुद्धा वानराचे रुप घेऊ शकतो. हा रावणच नसेल कशावरुन? पंण ही अंगठी तिला दाखवलीस म्हणजे तिचा विश्वास बसेल, असे रामांनी मारुतीरायांनाच सांगितले होते.

ही सगळी वानर मंडळी समुद्रापर्यंत येऊन पोहोचली. एवढा मोठा पसरलेला समुद्र, लंकेचा पत्ता नाही. एक महिन्याच्या आत सीतेचा शोध

लावून परत यायचं होतं त्यांना. शोध नाही लागला तर शिरच्छेद होणार होता त्यांचा. त्या लंकेमध्ये जायचं कसं? समुद्राच्या पलिकडे जायला रस्ता नाहीये. मग निराश झाले ते वानर. आता महिना होत आला. अजून शोध लागलेला नाही. तेव्हा परत जाऊन मरण पत्करण्यापेक्षा इथेच प्रायोपवेशन करुन देहत्याग केलेला बरा असा त्यांनी हताश होऊन विचार केला.

अशी ही मंडळी बसली असताना जटायूचा बंधू संपाती तिथे आला आणि त्यांनी ह्यांची चौकशी केली. ह्यांनी सगळे सांगितले. तो म्हणाला, ''ती समोर सीता मला दिसते आहे. त्या लंका नगरीत अशोकवन आहे. त्यातल्या एका मोठ्या वृक्षाखाली सीता बसलेली आहे. तिच्याभोवती राक्षसींचा पहारा आहे.'' तो पाहून सांगतोय. ह्यांना कोणालाही दिसत नाही. इथं काय बहुमताने निर्णय करायचा? का जो पाहून सांगतोय एकटा त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवायचा? तो नुसते सांगत नाहीये. त्याला ईश्वराने दूरदर्शनाची दृष्टि दिलेली आहे. गृध्र पक्षी फार दूरचे पाहू शकतो. कितीही वर असला तरी जमिनीवरच्या भक्षावर एकदम झडप घालतो. ईश्वरानेच त्यांच्या दृष्टीमध्ये शक्ति दिलेली आहे ना ! तेव्हा तो पाहून सांगतोय, तुम्हांला कोणाला शक्ति असेल तर जा. म्हणून त्या वानरांनी विश्वास ठेवला त्याच्यावर. तुला एकट्यालाच दिसते, आम्हाला कोणालाही दिसत नाही. अर्थात तू खोटं बोलतोयस असे म्हणाले असते तर मेले असते. माझ्यावर विश्वास नाही ना ठेवत मग मरा, म्हणून सांगितले असते संपातीने. मग मारुतीराय तयार झाले. एकटे गेले. सीतेची भेट घेतली. रावणाची भेट घेतली. त्यालाही आपले सामर्थ्य दाखविले. ती कथा रामायणामध्ये प्रसिद्ध आहे.

**म्हणजे श्रेष्ठ जे आहेत, ज्यांच्याजवळ काही ज्ञान आहे त्यांचा शब्द हा ऐकला पाहिजे. आपल्याला जरी त्याच्याबद्दल काही ज्ञान**

**नसलं तरी त्यांना ज्ञान असल्यामुळे ते शब्दप्रमाण मान्य करावे लागते. तर अशा प्रकारचे अधिकारी जे महात्मे आहेत, विश्वास ज्यांच्या अंत:करणामध्ये आहे आणि ईश्वराच्या दर्शनाची तळमळ ज्यांना लागलेली आहे असे पुष्कळ भक्त आहेत. त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता महाराजांना निघायचं होतं.**

एक वर्षानंतर त्यांच्या आईला दोन मुलं झाली. ''आणखी दोन मुलं होतील'', म्हणाले. ''आता मला जायला परवानगी दे. आता मी राहणार नाही.'' आणि निघण्यापूर्वी आईच्या इच्छेप्रमाणे तिला परत येऊन दर्शन देईन असे वचन देऊन महाराज निघाले. संचार करीत-करीत ते काशी क्षेत्रामध्ये येऊन पोहोचले. तिथे अनेक ज्ञानी संन्यासी मंडळी होती. त्यांनी महाराजांची योग्यता ओळखली.

त्यांचे गुरु कृष्णसरस्वती म्हणून होते. त्यांनी सगळ्या संन्याशांना सांगितले, ''तुम्ही जाऊन त्यांना प्रार्थना करा. वयही लहान आहे. पण त्यांचा अधिकार फार मोठा आहे. त्यांना म्हणावं तुम्ही संन्यासदीक्षा धारण करा. म्हणजे आम्हांला तुमची पूजा करता येईल. आम्हांला तुमच्याकडून पुष्कळ मार्गदर्शन मिळेल.'' मग सगळे संन्याशी महाराजांच्या जवळ आले आणि त्यांनी महाराजांची प्रार्थना केली. मग महाराजांनी कृष्णसरस्वतींकडून संन्यासदीक्षा घेतली. शंकरांच्यापासून ती ज्ञानाची आणि संन्यासाची परंपरा आलेली आहे. मग सगळ्या संन्याशांना उपदेश केलेला आहे. ज्याला जो मार्ग पाहिजे त्याचा उपदेश महाराजांनी करावा. योगाचा उपदेश आहे, ज्ञानाचा उपदेश आहे, उपासनेचा उपदेश आहे. संपूर्ण वेद ज्याच्यापासून निर्माण झालेले आहेत, त्याचे ज्ञान म्हणजे शास्त्र. मोठे-मोठे अधिकारी महाराजांचे शिष्य झालेले आहेत. तर अल्प वयामध्ये महाराजांनी संन्यासदीक्षा धारण केली हे काही सामान्य कार्य नाही.

ईश्वरावतार का म्हणायचे नरसिंहसरस्वतींना तर जन्मापासून ओंकाराचा जप सुरु झाला. वयाच्या दहाव्या वर्षी संन्यासाश्रम धारण केलेला आहे. आणखी संसाराची सर्व आसक्ति सोडून दिलेली आहे. काही नाही. वासना मनामध्ये काही नाही. पूर्ण वैराग्य आहे. इतक्या लहान वयामध्ये ही जी वैराग्यवृत्ति निर्माण झाली आहे हे अवताराचे लक्षण आहे. कृष्णसरस्वतींसारख्या मोठ्या-मोठ्या संन्याशांनासुद्धा महाराजांबद्दल आत्मीयता वाटते आहे म्हणजे महाराज काही सामान्य जीव नाहीत. आईबापांच्या पोटी जन्माला कारंजा क्षेत्रात आले. जन्म घेतला तरीसुद्धा ईश्वरानी जन्म घेतलेला आहे तो. सामान्य जीवाचा जन्म नाहीये. त्यामुळे अनेक संन्यासी पुरुषांना मार्गदर्शन होतंय.

**उपनिषदांचा अभ्यास करायचा अधिकार संन्याशांना आहे. त्याकरिता वैराग्य वगैरे साधनं पाहिजेत. संसार वासना मनातल्या कमी झाल्या पाहिजेत. तर वेदांत ऐकून काहीतरी उपयोग होतो.** काशी क्षेत्रामध्ये एकापेक्षा एक अधिकारी संन्याशी होते. वैराग्याच्या कमी-जास्तीपणावर त्यांचा अधिकार अवलंबून आहे. **संन्यास म्हणजे त्रैलोक्यातल्या सर्व वस्तूंचा त्याग. म्हणजे सगळे मनापासून टाकून दिलेले आहे. तर ही विरक्ति ज्याच्या मनामध्ये असेल तोच आणखी उपनिषदांचे श्रवण करु शकतो, आत्मज्ञान मिळवू शकतो. जन्म-मरणापासून, संसारापासून तोच कायमचा मुक्त होतो.** म्हणून अशा अधिकारी संन्यासी शिष्यांच्यावर कृपा करण्याकरिता महाराजांनी संन्यास घेतला. संन्याशांची त्यागाची परंपरा आहे ना ! राजा, संन्याशी किंवा समुद्र पाहिल्याबरोबर नमस्कार करावा असे सांगतात. कारण त्या संन्यासी पुरुषांनी सर्व एषणा सोडून दिल्या आहेत ना ! काहीही वासना मनामध्ये नाहीत. अशा अधिकारी महात्म्यांना मार्गदर्शनाची गरज आहे म्हणून अवतार झाला आहे. इतरांचा उद्धार होत नाही असे नाही.

गृहस्थाश्रमी शिष्य आहेत सायंदेवांसारखे त्यांच्यावरही कृपा केलेली आहे पण खरा अधिकारी म्हणजे संन्यासी जे शिष्य आहेत त्यांना मार्गदर्शनाची गरज आहे ना ! ते प्रयत्न करताहेत. संसारामध्ये असणारी मंडळी ईश्वराकडे जात नाही असे नाही. त्यांच्या संसारातली न्यूनता दूर व्हावी म्हणून ईश्वराकडे जातात. श्रद्धा, भक्ति आहे म्हणून पण त्या भक्तिबरोबर वासनाही मनामध्ये आहेत. पण संन्याशांनी सगळ्याच वासना सोडून दिलेल्या आहेत. मनातून सगळ्या वासना गेलेल्या आहेत आणि अशा अधिकारी शिष्यांना मार्गदर्शनाची जरुरी आहे. श्रेष्ठ पुरुषांच्या उद्धाराकरिता अवतार आहे. मग तोच श्रेष्ठ पुरुष बाकीच्यांचा उद्धार करतो आहे. असे काही अधिकारी महात्मे आहेत ज्यांना ईश्वरावाचून दुसरे काहीही नकोय. त्यांच्या चित्तातून परमात्मा बाहेर जाऊ शकत नाही. असा त्यांचा अधिकार आहे. इतके प्रेम त्यांनी ईश्वराबद्दल आपल्या चित्तात निर्माण केले आहे. मन मोकळे केल्याशिवाय ईश्वर त्यात राहू शकत नाही. मनामध्ये कोणताही विषय नाही.

**विषय तो त्यांचा झाला नारायण ।।**

म्हणतात. नारायणाशिवाय दुसरा विषय नाही. अनन्यमनसः राहतात ते.

**योगक्षेमं वहाम्यहम् ।।**

म्हणतात. त्यांना जे मिळालेले नाही ते मिळवून देणे. मिळवून दिलंय ते सुरक्षित ठेवणे. ही कामे मी स्वतः करतो म्हणतात भगवान्. संसारात काय मिळालंय काय नाही हा एक विचार पण परमार्थात आपल्याला अद्यापि काय मिळायचे आहे याची त्यांना ओढ लागते. चिंता लागून राहिलेली असते. ते त्यांना मिळवून द्यायचे. मनामध्ये कोणतीही वासना नाही. निर्मोह अंतःकरण आहे आणि अशा भगवत् भक्तांचे संरक्षण करण्याकरिता अवतार झालेले आहेत.

महाराजांनी स्वत: संन्याशदीक्षा धारण करुन काशीतल्या इतर अधिकारी संन्याशांना उपनिषदांचे रहस्य काय आहे ते समजावून दिले आहे. त्या उपदेशाचे चिंतन अखंड करीत राहून ते मुक्त झाले. पुष्कळ आणखी तीर्थयात्रा करीत-करीत महाराज काशी क्षेत्रातून बाहेर पडले. गोदावरीच्या काठावर आलेले आहेत. सर्व संन्याशी मंडळींना तीर्थयात्रेला पाठवून दिलेले आहे. जिज्ञासू संन्याशांची भेट झाली तर त्यांना मार्गदर्शन करण्याची शक्ति आहे. एका ठिकाणी राहायचे नाही, सारखे फिरत राहायचे.

सद्‌गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामीमहाराजांच्या चरित्रात एक कथा आहे. चातुर्मासात दोन महिने एका ठिकाणी राहिले ते. ते एकटे वाशिमला आले होते. तिथे एक दिवस एका घरी भिक्षेला गेले असताना त्या बाईने त्यांना तिचे दुर्दैव कळवळून डोळ्यात पाणी आणून सांगितले की तिच्या मुलाला बाहेरची बाधा असून अतिशय त्रास होतो आहे. महाराजांनी तिला या पीडेतून मुक्त करावे. महाराजांनी तिला एका मंदिरात येण्यास सांगितले. तिथे आल्यावर महाराजांनी एक यंत्र तयार करुन दिले आणि ते ताईतात ठेवून तो ताईत हाताला बांधायला सांगितला. त्याप्रमाणे केल्यावर तो मुलगा पीडामुक्त झाला. असे कितीतरी उपकार करण्याची शक्ति त्या महात्म्यांजवळ आहे. दया आहे आणि ती दया सार्थ आहे. आम्हालाही दुसऱ्याची दया येते. काही विपरित घडले की आम्ही त्या माणसाला भेटून काय हो प्रसंग आलाय, काय दैवगति आहे वगैरे चार शब्द बोलतो. पण त्या शब्दांनी त्या दुर्दैवी जीवाचे दु:ख आपण दूर करु शकत नाही. पण महात्मे समर्थ असतात. त्या मुलाची पीडा दूर करुन महाराज निघून गेले. वास्तविक एका ठिकाणी तीन रात्रीपेक्षा जास्त मुक्काम करायचा नाही अशी शास्त्राची आज्ञा आहे, पण उद्धारकार्याकरता नियमाला अपवाद केला आहे. **पुन्हा आपण अशा जीवाचा उद्धार केला**

**हे ते विसरुनही जाताहेत. आपण कोणावर उपकार केले ही भावनाच नाही. हा खरा त्याग आहे.** संतांनी लोकांना निष्क्रिय बनविले असे बुद्धिवादी लोक म्हणतात, पण संतांसारखे सामर्थ्य कोणाकडे आहे?

दत्तप्रभूंनी संन्यासदीक्षा धारण केली. शंकराचार्यांनीही संन्यासदीक्षा धारण केली होती. दत्तप्रभूंचे शिष्य नारायणस्वामीमहाराज म्हणून नरसोबावाडीला होऊन गेले. त्यांनीही संन्यासदीक्षा धारण केली होती. देहाची आसक्ति अजिबात नाही. ब्रह्मावर्ताला मोठ्या महाराजांचा मुक्काम असतानाचा एक प्रसंग आहे. शौचाला जाऊन आल्यावर स्नान करायचा त्यांचा नियम होतो. पावित्र्य म्हणतात ते सांगितले आहे. **स्वच्छता निराळी आणि पावित्र्य निराळे.** कपडा स्वच्छ झाला म्हणजे त्याला पवित्र म्हणता येत नाही. साबण लावतो आम्ही. पवित्रता म्हणजे काय हे शास्त्राने सांगितले आहे. **देवाला वाहायचे फूल आधी वास घेतला तर अपवित्र होते. काय झालं हो? आधी वास घेतला म्हणून काय झाले? ते देवाला बाहिले म्हणून काय बिघडते? झाडावरुन काढून ते देवाला वाहिले म्हणजे ते पवित्र आहे. वास घेतल्यावर ते अपवित्र होते. हा निर्णय शास्त्रानेच केलेला आहे. आपल्या बुद्धीने निर्णय करायचा नाही. त्यात काय बिघडते ते डोळ्याने दिसण्यासारखे नाही. डॉक्टर सांगतात, अमुक पदार्थ खायचा नाही. त्यांना त्याचे ज्ञान आहे ना ! त्या पदार्थात काय दोष आहे हे त्यांना माहित आहे. त्यांच्या शास्त्रात ते सांगितले आहे. त्या नियमांचे पालन करणाऱ्या रोग्याचे कल्याण होईल. नाही तर कुठाय दोष म्हणून वाद घालत बसला तर?**

सगळी गीता अर्जुनाला सांगून झाल्यावर भगवान अर्जुनाला म्हणतात, ''हा सगळा विचार कर आणि काय इच्छा असेल तसे कर. कसेही वागायला तू मोकळा आहेस. तुझा बुद्धिवाद तुझ्याबरोबर.'' पण त्याच्यावर कृपा झाली. भगवान गोपालकृष्णांचा परमभक्त होता तो.

आरंभाला जरी त्याची बुद्धि बिघडली होती, अविचार उत्पन्न होत होता, आपल्या बुद्धीने केलेला निर्णय बरोबर आहे असे समजत होता तो. पण शेवटी शरण आलेला आहे. ''मी बुद्धीने धर्माधर्माचा काहीही निर्णय करु शकत नाही. मी आपला शिष्य आहे. आपण मला मार्गदर्शन करुन माझा उद्धार करा'', असा अहंकार सोडून शरण आल्यावर त्याचा उद्धार झालेला आहे. त्यावेळी अर्जुनाचा मोह दूर झाला, त्याच्या कर्तव्याची त्याला जाणीव झाली आणि तो म्हणाला, ''करिष्ये वचनं तव''. तुमची आज्ञा मला मान्य आहे असे म्हणून अर्जुन धनुष्यबाण घेऊन उठल्यावर त्या संजयाने धृतराष्ट्राला सांगितले -

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। १८.७८ ।।**

धृतराष्ट्राचाच मंत्री धृतराष्ट्राला सांगतोय, तुम्हाला विजय मिळणार नाही. ज्या बाजूला योगेश्वर कृष्ण आणि धनुर्धारी अर्जुन आहे, त्यांनाच विजय मिळणार.

तर याप्रमाणे शास्त्राज्ञेप्रमाणे वागणारी जी मंडळी आहेत, त्यांनी आपला अहंकार बाजूला ठेवलेला आहे, आणखी आसक्ति मनातून काढून टाकली आहे. **परमेश्वराची कृपा आपल्यावर होण्याकरिता कितीही कष्ट पडले तरी सोसायची त्यांची तयारी आहे. त्यांना मार्गदर्शन करण्याकरिता भगवंताचे अवतार होतात.**

मग महाराज संचार करीत-करीत परळीला येऊन एक-दीड वर्ष राहिले म्हणतात आणि त्या परळीहून खाली कृष्णातीरावर गेले. औदुंबर क्षेत्रामध्ये चातुर्मास्य मुक्काम झाला. आणि तसेच खाली जाता-जाता सध्या जे नरसोबावाडी क्षेत्र आहे - कृष्णापंचगंगा संगम, त्या संगमावर त्यांनी बारा वर्षे मुक्काम केला आहे. गृहस्थाश्रमी मंडळींना आपापल्या घरी राहून आपापली कर्तव्य कर्म करण्यास सांगितली. संन्याशी शिष्यांना

तीर्थयात्रा करायला सांगितल्या. आणि एकटे इथे बारा वर्षे राहिले. त्यावेळी नरसोबावाडी गाव वगैरे काही नव्हते. कृष्णेच्या पलिकडे गाव होते. इकडे अरण्य होते. त्या अरण्यामध्ये महाराजांचा मुक्काम झालेला आहे. कृष्णापंचगंगा संगम आहे. समोर पूर्व दिशेला पलिकडे अमरेश्वरांचे स्थान आहे. तिथे चौसष्ठ योगिनी आहेत. त्या योगिनी महाराजांची पूजा, भिक्षा वगैरे करीत असत. आणि इथून महाराज गाणगापूरमध्ये जाऊन शेवटची काही वर्षे तिथे राहिले. आणि नंतर श्रीशैल्य मल्लिकार्जुन पर्वतावर गेले अशी श्रीगुरुचरित्रात कथा सांगितली आहे.

तर महाराज हे बारा वर्षे तिथे होते. चिकित्सक मंडळी असतातच. हे संन्यासी कुठे राहतात? काय करतात? कुठे जेवतात? अशी परीक्षा पहाण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यांना काही परीक्षा घेता आली नाही. अरण्यात जाऊन काय परीक्षा घेणार? निघून गेले. पण त्या शेतामध्ये काम करणाऱ्या गंगानुज नावाच्या शेतकऱ्याला ते सगळे दिसून आले आहे. **अधिकार कोणाचा कसा असतो हे सांगता येत नाही.** जरी गावातली मंडळी चांगली सधन होती पण महाराजांसारख्या संन्याशाची परीक्षा घ्यायची बुद्धि त्यांना झाली. म्हणजे संन्यासी म्हणजे ईश्वर किंवा महात्मा नाही अशीच त्यांची कल्पना. पण गंगानुज मात्र शुद्ध मनाचा साधा भोळा शेतकरी आहे. त्याला शेतातून हे सगळे दृश्य दिसलेले आहे की स्वामीमहाराज नदीतीरावर आलेले आहेत, नदी एकदम दुभंगली आणि ते आत गेले. हाही गेला त्यांच्या मागोमाग. तिथं त्या चौसष्ठ योगिनी आहेत, सिंहासन आहे आणि त्यांनी महाराजांना सिंहासनावर बसवून महाराजांची पूजा, अर्चा, आरती केली. भिक्षा झालेली आहे. महाराजांनी गंगानुजला विचारले, "कशाला आलास?" तो म्हणाला, "दर्शनाकरिता." महाराज म्हणाले, "काय पाहिलेस ते कोणाला सांगू

नकोस. जा तुला धन मिळेल. तो आपल्या शेतामध्ये परत आला आणि त्याला तिथे धन मिळाले. तो महाराजांच्याकडे यायचा, बसायचा, बोलायचा. त्याला आणखी महाराजांनी त्रिस्थळी यात्रा घडवली. सगळं झालं. अशी बारा वर्षे महाराज त्या निर्जन स्थानामध्ये राहिले आहेत. आणि तिथून निघून गाणगापूरला गेले.

गाणगापूरमध्ये गेले म्हणजे वाडीमध्ये नाहीत असे नाही. वाडी हे गाव नंतर वसले आहे. महाराज अरण्यात रहात होते. त्याच्या जवळच शिरोळ नावाचे गाव आहे दोन-तीन मैलांवर. नदीच्या पलिकडे अमरापूर म्हणून गाव आहे. तिथे त्यावेळी वस्ती होती. या बाजूला मात्र नदी तीरावर सबंध अरण्य होतं. तर त्या अरण्यातून महाराज गाणगापूरला गेले. गाणगापूरमध्ये प्रगट होऊन संगमावर राहू लागले. इथून वाडीमध्ये महाराज गेले म्हणजे इथे नाहीत असे आपल्यासारखी अज्ञानी मंडळी म्हणणार.

सद्गुरु वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी एका स्तोत्रात वर्णन करताना म्हटले आहे की, नरसोबावाडीला महाराज बारा वर्षे राहिले आणि तिथून गाणगापूरला गेले म्हणजे वाडीत नाहीत असे नाही. वाडीतही आहेत पण अव्यक्तरुपाने आहेत. वाडीत गुप्तरुपाने राहून गाणगापूरमध्ये राहिले. ही स्थिति ईश्वर सर्वव्यापी आहे हे दर्शवणारी आहे. गाणगापूरला जाण्यापूर्वी वाडीमध्ये त्यांनी औदुंबराखाली आपल्या मनोहर पादुका स्थापन केल्या. सध्या त्यांचीच पूजा चालू आहे. गाणगापूरच्या पादुकांना निर्गुण पादुका म्हणतात.

गुळवणी महाराजांच्या मातोश्रींना नरसिंहसरस्वतीमहाराजांच्या कडून प्रसाद पादुका वाडीत मिळाल्या. त्या श्रीवासुदेव निवासात असून त्यांच्यावर रुद्राभिषेक, एकादश्नी वगैरे पूजा-अर्चा होत असते. ईश्वराचा प्रसाद आहे. तर व्यक्तरुपाने महाराज गाणगापूरला निघून गेल्यानंतरही

वाडी क्षेत्र प्रसिद्ध झाले. त्याचा महिमा हा नंतर प्रसिद्ध झाला. ती एक कथा या स्तोत्रामध्ये महाराजांनी दिली आहे. भक्ति श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ याचा विचार त्यात महाराजांनी केला आहे.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**

---------------

१.

## ।। श्री दत्त प्रसन्न ।।

परमपूज्य श्री दत्तमहाराजांनी काही विशिष्ट विषयांवर केलेला सखोल परंतु समर्पक विचार (निबंध) त्यांच्याच हस्तलिखितावरून उतरवून काढला आहे.

विषय : धर्म - त्याची व्याख्या, त्यापासून फायदे, उपसंहार.

सभासदहो, आज धर्म या विषयावर मी काही बोलणार आहे. त्यात जे काही दोष असतील ते टाकून देऊन गुण ग्रहण करा. आजचा विषय 'धर्म' हा आहे. **धर्म म्हणजे वेदांनी स्नानसंध्यादि कर्मे जी सांगितली आहेत ती कर्मे करणे व सर्वांना सुख देणे, त्यासच 'धर्म' म्हणतात.** हा धर्म प्रत्येकाने आचरण केला असता त्यास सुख होऊन अंती स्वर्गप्राप्ति होते. प्रत्येक मनुष्य सुख मिळविण्याकरिता झटत असतो, परंतु त्यास सुख मिळत नाही. याचे कारण तो आपापल्या धर्माप्रमाणे कर्तव्याप्रमाणे वागत नाही हेच होय. कारण **धर्म हा सर्वांना सुख देणारा आहे.** धर्माचे आचरण कोणीही करीत नाही. म्हणून त्यास सुख मिळत नाही. याचे उदाहरण शिबी राजा हा होय. आपला धर्म राखण्याकरिता केवळ आपले सत्व राखण्याकरिता आपला देहसुद्धा ज्याने अर्पण केला, असा जो शिबी राजा, त्याच्या यज्ञात प्रत्यक्ष देवांनी आपापल्या रूपांनी येऊन हविर्भाग ग्रहण केले. अशा धर्माचे प्रत्येकाने आचरण केले पाहिजे. या धर्मापासून पुष्कळ फायदे आहेत. सुख, मानमरातब, देवाचे प्रेम इत्यादी गोष्टी केवळ धर्म आचरिल्याने होतात. अलीकडे कोणीही धर्म आचरण करीत नाहीत म्हणून त्यास सुख प्राप्त होत नाही. स्नानसंध्या, देवपूजा इत्यादी टाकून केवळ काँग्रेस वगैरेकरिता पैसे दिले म्हणजे आपण धर्म केला असे लोकांना वाटते. पूर्वी तानाजीसारखे वीर, समर्थांसारखे महात्मे हे धर्म रक्षणाकरिता खटपट करीत होते व शेवटी त्यांनी

धर्मरक्षणाकरिता देह ठेविले. परंतु हल्ली धर्माकरिता कोणीही खटपट करीत नाही हा कालाचाच महिमा होय. दुसरे काही नाही. पूर्वी ब्राह्मण आपापल्या धर्माप्रमाणे वागत होते, म्हणून त्यांना सर्व राजे व देवसुद्धा भीत होते. पूर्वकाळी या भारतखंडात सर्व लोक आपल्या धर्माप्रमाणे वागत होते, म्हणून या भारतवर्षामध्ये ब्रह्मादि देवांनीसुद्धा जन्म घेतले. 'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानंसृजाम्यहम् ।।' याप्रमाणे भगवंतांनीसुद्धा गीतेमध्ये म्हटले आहे. या श्लोकावरून असे दिसते की, देवांनासुद्धा धर्मच आवडत होता. अधर्माची चीडच होती. भगवान कृष्णांना सार्वभौम दुर्योधनाने जेवावयाला बोलाविले असता, ते त्याचे घरी गेले नाहीत. परंतु यःकश्चित दासीपुत्र विदूर त्याने बोलाविले असता त्याचे घरी मोठ्या प्रेमाने गेले. याचे कारण धर्मच होय. दुर्योधन हा धर्माने वागत नव्हता म्हणून त्याचे घरी गेले नाहीत. व विदूर धर्म आचरण करीत होता म्हणून त्याचे घरी गेले. पंचपक्वान्नाच्या भोजनापेक्षा त्यांना कण्याचे भोजनच चांगले वाटते. याचे कारण धर्मच होय. परदेशातील लोकांना आपल्या धर्माचा किती अभिमान आहे पाहा. आपल्या अधिकार बलामुळे आपला धर्म चोहोकडे पसरवीत आहेत. त्यांना अधिकार आहे त्या अधिकाराच्या जोरावर ते आपला धर्म चहूकडे सहज पसरवतील. परंतु ते तशा प्रकारे आपल्या धर्माचा प्रसार करीत नाहीत कारण तसे केल्याने लोक त्यांच्यावरच उलटून त्यांचा नाश करतील म्हणून हळूहळू ते आपल्या धर्माचा प्रसार चांगल्या रीतीने पण पुष्कळ करीत आहेत. आमच्या देशात ब्राह्मणांना शूद्राप्रमाणे व शूद्रांना ब्राह्मणांप्रमाणे वागावेसे वाटते. याचे कारण कालच होय. **पूर्वकाली बाकीचे तीन वर्ण ब्राह्मण चरणी लीन होते. परंतु हल्ली बाकीचे लोक ब्राह्मणांचा द्वेष करतात. याचे कारण ते आपल्या धर्माने वागत नाहीत.** पूर्वी ब्राह्मण आपापल्या

कर्तव्याप्रमाणे, आपल्या धर्माप्रमाणे वागत होते. म्हणून 'ब्राह्मणो मम दैवतम्' असे प्रत्यक्ष भगवंतांनी म्हटले आहे. अशा प्रकारे ब्राह्मण देवादिकांनासुद्धा आवडत होते. परंतु हल्ली ब्राह्मण देवांना आवडत नाहीतच तर मनुष्यांना देखील आवडत नाहीत. हल्ली इंग्रजी शिकलेल्या लोकांना हे तुमचे वडीलच काय असे विचारले असता, ते आमचे वडील नाहीत. आमच्या घरी राहिलेले एक ब्राह्मण आहेत अशी उत्तरे ते लोक देतात. याप्रमाणे लोकांना आईबापांचीसुद्धा किंमत नाही. 'मातृदेवो भव', 'पितृदेवो भव' असे वेद सांगत आहेत. परंतु तिकडे कोणाचेही लक्ष नाही. म्हणजे धर्माने वागण्याची कोणासही इच्छा नाही. आता धर्म प्रत्येकाने जो आचरण करायचा तो स्वधर्मच केला पाहिजे. परधर्म केव्हाही आचरण करू नये. तो आचरण केल्याने दुःखे होतात. कारण दुसऱ्या लोकात मिसळले म्हणजे परधर्म आचरण केला असता आपला जो धर्म असतो त्या धर्मामधील लोक त्याला बहिष्कृत करतात व परधर्मीय लोकही बहिष्कृत करतात. कारण तो खरा त्या धर्माचा नसतो. म्हणजे तो मनुष्य या धर्मातही नाही व त्या धर्मातही नाही म्हणजे मध्येच तो मनुष्य राहतो. म्हणून प्रत्येक मनुष्याने आपापल्या धर्माप्रमाणे वागावे. परधर्म आचरण करू नये. असा स्वधर्म आचरण करण्याकरिता निरंतर माझी बुद्धि असो, याप्रमाणे गजाननाजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करितो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

----------

## २.

विषय : **विद्या - अर्थ, फायदे, उपसंहार**

**''विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगांमाजी ।**
**न दिसे एकही वस्तू विद्येनेही असाध्य आहे जी ।।''**

याप्रमाणे एका कवीने म्हटले आहे. या जगामध्ये मनुष्याला मोठेपणा जो मिळाला आहे. तो केवळ विद्येनेच मिळाला आहे. एकही पदार्थ असा नाही की तो विद्येने मिळणार नाही तर सर्व वस्तू विद्येने साध्य होण्यासारख्या आहेत. विद्या ही सर्वांना आवडणारी आहे. मग ती कोणतीही असो. विद्येने मनुष्याला मान-मरातब इत्यादी सर्व सुखे प्राप्त होतात म्हणून विद्या ही मनुष्याने प्राप्त करून घेतली पाहिजे व दुसऱ्यालाही ती दिली पाहिजे. सध्या लोक विद्या शिकतात. परंतु ती विद्या दुसऱ्याला देत नाहीत. थोडी विद्या आली की लगेच त्या विद्येबद्दल गर्व उत्पन्न होतो.

**''यदा किंचिज्ञोडहं द्विप इत मदांधः सम....स्तदा**
**सर्वज्ञोस्मी व्यभवदव लिप्तं मम मनः ।।**
**यदा किंचित् किंचित् बुधजन सकाशादवगतं**
**तदा मूर्खोस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ।। १ ।।**

असे भर्तृहरीने म्हटले आहे. या श्लोकावरून असे दिसते की, थोडी विद्या येऊ लागली म्हणजे मनुष्य मदांध होऊन जातो. त्याला वाटते, माझ्यासारखा कोणीच विद्वान नाही. मीच मोठा विद्वान आहे. याप्रमाणे तो आपणासच मोठा विद्वान समजून इतरजनास तुच्छ करितो. परंतु जेंव्हा खरे विद्वान लोक जे असतात, त्यांची गाठ पडताच मी विद्वान नाही असे त्यांना वाटून त्यांचा सर्व गर्व आपोआप नाहीसा होतो. अशा प्रकारे जे धड विद्वान नाहीत व अविद्वानही नाहीत, त्यांची अशी स्थिती होते. पूर्वी सर्व लोकांना विद्वान लोक आपली विद्या देत असत. परंतु हल्ली विद्या

देत नसून त्या लोकांजवळ जी विद्या असेल ती आपल्याला कशी मिळेल असे चिंतन करीत असतात. असे न करता, मनुष्याने आपली विद्या दुसऱ्यास देऊन त्याची आपण घ्यावी. हल्ली विद्येचा प्रसार जोराने होऊ लागला आहे. विद्येचा प्रसार होण्यास मासिक, पुस्तके व इतर विद्येला उपयोगी अशी पुस्तके वाचावी. म्हणजे विद्येचा प्रसार लवकर होतो. रा.रा. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचे निबंध व इतर काही लोकांचे निबंध वाचावेत म्हणजे विद्या लवकर येते. पुष्कळ लोकांना वाटते की वर्तमानपत्रे वाचल्याने पुष्कळ ज्ञान होते. म्हणजे मोठी जी पुस्तके ती सर्व वाचण्यापेक्षा त्यांचे सार ज्यात आहे अशी मासिक पुस्तके वाचल्याने ज्ञान होते असे पुष्कळ लोकांना वाटते. परंतु **खरे ज्ञान होण्यास अशी पुस्तके, कादंबऱ्या, नाटके इत्यादि पुस्तके वाचण्यापेक्षा खरी ज्ञानदायक पुस्तके वाचावी.** वर्तमानपत्रकारांचा उद्देश लोकांना ज्ञान व्हावे असा नसून केवळ आपली वर्तमानपत्रे खपावी व आपल्याला पुष्कळ पैसे मिळावे असाच असतो. हल्ली बरेच लोक अशिक्षित आहेत. कारण त्यांना वळण देणारा असा कोणी नाही. विद्येच्या जोरावर मनुष्य वाटेल त्याला वळवू शकतो. **मोठमोठ्या श्रीमान् मुलांनाही विद्या शिकण्याची इच्छा होत नाही. गरीब मुलांपैकी काही जणांना इच्छा होते, परंतु त्यांना परिस्थिती अनुकूल नसते. हल्ली फी द्यावी लागते. परंतु ती फी काही जणांना देण्यास अनुकूल असते तर काही जणांना अनुकूल नसते. मग ज्यांना अनुकूल नसते त्यांनी विद्या शिकू नये काय ? तर त्यांना जे श्रीमंत असतील त्यांनी मदत करून विद्या द्यावी. म्हणजे पुष्कळ चांगले काम होईल. त्याला विद्या आली म्हणजे तो पुढे मोठमोठी देशाची कामे करून अशिक्षित लोकांना चांगले वळण लावून देतो व ज्यांनी त्याला विद्या शिकण्यास मदत केली, त्यांनाही सुख देतो.** असो. विद्या आली असता मनुष्याने गर्व कधीही करू नये.

कारण त्यापासून फार भयंकर तोटे होतात. याचे उदाहरण यवक्रीत हा होय. यवक्रीत हा विद्या प्राप्तीकरिता अनेक दुष्कर तप करून व थोडी विद्या प्राप्त झाली असता गर्व करून रैभ्याचा अपराध करून त्याच्या शापाने मृत झाला. याचे कारण विद्येसंबंधी गर्व होय. विद्या ही सर्व जगामध्ये अत्यंत उपयुक्त वस्तू आहे. या विद्येच्या जोरावरच सर्व यंत्रे वगैरे झाली. आगगाड्या, आगबोटी, विमाने वगैरे जे काही नवीन म्हणून सृष्टीत दिसत आहे ते सर्व विद्येच्या योगानेच आहे. मात्र ती विद्या म्हणजे भौतिक विद्या होय. आता विद्या म्हणजे परविद्या किंवा स्वविद्या शिकावी हा प्रश्न सध्या उपस्थित झाला. हल्ली मराठी विद्येकडे कोणाचेही लक्ष नाही. जो तो इंग्रजी शिकणेस जातो. एखादेवेळी संस्कृत किंवा मराठी यामध्ये पत्र लिहावयाचे म्हणजे अगदी लाज वाटते. परंतु इंग्रजीमध्ये पत्र लिहावयाचे असेल तर अगदी उत्साह वाटतो. परविद्येवर आसक्ति न ठेवता केवळ स्वविद्येवरच ठेवावी. पूर्वी ज्याची जी भाषा विद्या असेल त्या भाषेतच लोकांमध्ये पत्रव्यवहार वगैरे कार्ये होती. अशा प्रकारे प्रत्येक मनुष्याने स्वविद्याच शिकावी. निदान कोणतीतरी विद्या शिकावी त्याने मनुष्याचे मन मृदु व सुशिक्षित होते व त्या मनुष्यापासून सर्वांना सुख होते. असो. माझ्या हातून निरंतर विद्येची सेवा घडावी, मला विद्या प्राप्त व्हावी. याप्रमाणे गजाननाजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

-------------

३.

॥ श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ॥

विषय : **संतसेवा - अर्थ, फायदे, उपसंहार.**

संतसेवा म्हणजे संतांची सेवा, संत म्हणजे सहा जे कामक्रोधादि रिपू त्यांचा अंत करणारे, त्यांची सेवा ती संतसेवा. ही संतसेवा अत्यंत कल्याणकारक आहे. कशी तर या संतसेवेने मनुष्याचे सर्व बाजूंनी कल्याण होते. परंतु हल्ली संतांच्याकडे कोणाचेही लक्ष नाही. एखादा चांगला मनुष्य असला तर तो ढोंग करतो असं लोक म्हणतात. परंतु हल्ली ढोंगी लोकही बरेच निघाले आहेत. एखाद्या मनुष्याला ढोंगी साधू फसवितात व तो फसलेला सर्व गावात त्या मनुष्याच्या ढोंगाचा फैलाव करतो आणि त्या मनुष्यासारखे जे कोणी साधू गावात येतील ते सर्व ढोंगीच आहेत असे लोकांना वाटते. मग त्यात काही काही खरे साधूही असतात व गव्हाबरोबर किडा रगडला या न्यायाने त्यांचेकडेही लोकांचे दुर्लक्ष होते. संतांची सेवा सर्व मनुष्यांनी अवश्य करावी. आता आम्हांला वेळ नाही, आम्हाला कचेरीत जावे लागते असे काही लोक म्हणत असतात. ते लोक देवपूजा व संध्यादेखील सोडून देतात व कामे रात्रंदिवस करीत असतात. ही इतकी खटपट हे लोक कशाकरिता करतात तर केवळ आपल्याला सुखप्राप्ती व्हावी एवढ्याच करिता. परंतु त्यांना सुखप्राप्ती होत नाही. जे खऱ्या अंत:करणाने देवाची पूजा, संतांची सेवा करतात, त्यांनाच खरे सुख मिळते. परंतु लोकांना वाटते की, त्यांना सुखच मिळत नाही. कारण हे लोक त्यांच्यासारखे नोकरी करीत नसतात. म्हणून त्यांना पैसा मिळत नाही व ते असुखी आहेत असे लोकांना वाटते. परंतु **संतसेवेने देवाची प्रसन्नता होते. मग मनुष्याची कृपा असलीच पाहिजे. अगोदर लोक त्यांना हसतात, नांवे ठेवतात. परंतु आपोआप काही दिवसांनी त्या लोकांना वंदन करून त्यांची स्तुती करीत राहतात.**

**याप्रकारे संतसेवेचे फळ मिळते.** पूर्वी सर्व लोक संतांची सेवा सदासर्वकाळ करीत असत. म्हणून आपल्या या देशामध्ये सर्व लोक सुखी होते व पाऊस वेळच्या वेळी पडत असे व सर्व देश सुखी होता. परंतु सध्या सर्व देशामध्ये अंदाधुंदी माजून सर्व लोक असुखी झाले आहेत. कारण देशामध्ये सर्व लोकांनी धर्म सोडला. संध्या देवपूजा वगैरे व संतसेवा इकडे कोणाचेही लक्ष नाही. असो. सर्व लोकांनी संतांची सेवा केली असता, त्यांना सर्व बाजूंनी सुख होईल. आता आपण संत कसे आहेत ते पाहू. संत अत्यंत दयाळू व अपकाऱ्यावर उपकार करणारे असतात व ते सहनशीलही असतात. तुकारामबुवांना मंबाजी बुवांनी मारले व नंतर त्या मंबाजीबुवाचेच अंग दुखू लागले. परंतु आपल्याला याने मारले आहे, त्याच्याकडे कशाला जा वगैरेचा काही विचार न करता आपण स्वत: अपकारी जो मंबाजीबुवा त्यांचे अंग तुकारामबुवा रगडू लागले व त्यांचा हस्तस्पर्श होताच मंबाजीबुवांचे अंग दुखण्याचे कमी झाले. असे जे तुकारामबुवा त्यांची सुद्धा लोक निंदा करीत होते. तुकारामबुवा चांगले नाहीत, वेदांचा अर्थ अभंगामध्ये लिहितात, त्यांना वेद म्हणण्याचा अधिकार नाही वगैरे प्रकारांनी लोक त्यांची निंदा करीतच होते व मंबाजीबुवा सत्वशील व चांगले आहेत वगैरे मंबाजीबुवांची स्तुती करीत होते. **बाहेर त्या मनुष्याचे वर्तन चांगले असले की, लोक लगेच त्याची स्तुती करतात. मग अंतरंगात तो कसाही असो आणि अंतरंगी चांगला असून बाहेर गलिच्छ असला की लगेच त्याची निंदा सुरु होते. असा लोकांचा स्वभावच आहे.**

''यद्यदाचरतिश्रेष्ठस्तत्तदेवेतरोजन: सयत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते'' या न्यायाने ज्याप्रमाणे श्रेष्ठ लोक ठरवतील त्याप्रमाणे इतर लोक वागतात. **याला प्रमाण म्हणजे गांधीजींनी सांगितलेले लोकांना जितके पटते तितके एखाद्या प्रसिद्ध नसलेल्या मनुष्याने सांगितले**

**असता पटत नाही. म्हणून थोर लोकांनी हा ढोंगी आहे असे म्हटले की, सर्व लोक त्याला ढोंगी ठरवितात व त्यांनी चांगले म्हटले की चांगले म्हणतात. तेव्हा असे न करता प्रत्येकाने आपल्याला चांगला जो वाटेल त्याची सेवा करावी. मग तो ढोंगी असो किंवा खरा असो. देव त्या मनुष्याला त्याच्या सेवेचे फळ देतोच. ''जैसा भाव तैसी सिद्धी'' असे गुरुचरित्रात सांगितले आहे. असो.** संतांची सेवा प्रत्येकाने केली पाहिजे. संतांची सेवा करु नये अशी ज्याला बुद्धि होते त्याचे दुर्दैवच आहे असे समजले पाहिजे. ज्या मदनाने आपल्या प्रभावाच्या योगाने शंकराला त्रस्त करून सोडले, विश्वामित्राचे तप नाश केले व नारदाची नारदी करून टाकली, असा जो मदन त्याचे शुक्राचार्यांचेसमोर काही चालले नाही. संतांची अवज्ञा कोणीही करू नये. अवज्ञा केल्यास त्याला निरंतर नरकामध्ये रडावे लागते. परीक्षित राजाचा प्रभाव कितीतरी मोठा होता. त्याने कलीलासुद्धा बांधून टाकले. असा परीक्षित राजा ज्याला महाभागवत अशी पदवी ऋषींनी दिली आहे. असा परीक्षित राजा त्याने शमीकऋषींची अवज्ञा करताच तो सात दिवसातच मरण पावला. असो. संतांची अवज्ञा करणाऱ्यास असे फळ मिळते. म्हणून संतांची अवज्ञा कोणीही करू नये. असो. संतांची सेवा सर्वांनी अवश्य करावी, ती केली असता मनुष्याचे कल्याण होईल. अस्तु. संतांची सेवा करण्याचे ठिकाणी माझी बुद्धि असो व माझ्या हातून संतांची सेवा घडो अशी गजाननाजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

--------------

## ४.

**।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनम: ।।**

विषय : **देशाटन - अर्थ, त्यापासून फायदे, उपसंहार.**

''केल्याने देशाटन पंडित मैत्री सभेत संचार'' याप्रमाणे एका कवीने म्हटले आहे. देशाटन म्हणजे देशामध्ये फिरणे, याप्रमाणे देशाटन केल्याने पुष्कळ फायदे आहेत. **नुसते देशाटन केल्यास त्यापासून फायदे होणार नाहीत. कारण नुसते देशात फिरले तेथील लोकांचे रिवाज, तेथील व्यापार इत्यादी गोष्टींकडे लक्षच दिले नाही तर असे देशाटन केल्याने फायदे केंव्हाही होणार नाहीत. तेंव्हा असे न करता जो मनुष्य ज्या देशात जाईल त्याने त्या देशात जाऊन तेथील चालीरीति, त्या देशाचे कोणकोणत्या देशाशी दळणवळण आहे इत्यादी गोष्टींचा चांगला शोध करावा. असे केले असता मनुष्यास ज्ञान प्राप्त होते व त्याला व्यवहारामध्ये चांगले वागता येते व तो कोठेही गेला तरी फसत नाही व त्याला लोकांमध्येही मान मिळतो.** आपण असे पहा की, एखादा गप्पेखोर मनुष्य स्टेशनवर बसलेला असला की, त्याला लोक सहज विचारतात की, अमकी गाडी केंव्हा सुटते, अमकी केंव्हा येते? असे लोकांनी विचारले म्हणजे तो सांगतो की, ही गाडी साडेअकरा वाजता सुटते. पुढच्या गाडीला जाण्यास ही गाडी चांगली आहे, इत्यादी गोष्टी तो सांगतो. परंतु त्या मनुष्याने काही फार देशाटन केलेले नसते. परंतु जेवढा तो मनुष्य फिरला असेल तेवढ्या भागाचेच त्या मनुष्याला ज्ञान असते. बाकीच्या भागाचे ज्ञान नसते. परंतु लोक त्याला म्हणतात की, हा मनुष्य फिरलेला आहे. याला आपण आणखी काहीतरी माहिती विचारु असे ठरवून ते लोक त्या मनुष्याला विचारण्यास जातात. परंतु त्यावेळी मात्र तो मनुष्य बोलत नाही. कारण तो जास्त फिरला नसल्याकारणाने त्याला प्रश्नाचे उत्तर देता येत नाही. याचे कारण

देशाटन जास्त नाही हेंच. तेव्हा मनुष्याने असे न करता देशाटन करावे म्हणजे त्याला सुखप्राप्ती होईल. देशाटन केल्याने मोठमोठ्या विद्वान लोकांशी आपले सख्य होते व त्यांच्याशी सख्य झाल्यामुळे राजाच्या सभेत त्या मनुष्याचा प्रवेश होतो. ''यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पंडितान् तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिंदुरिवांभसि'', जो देशामध्ये संचार करतो आणि जो पंडितांची सेवा करतो, त्याची बुद्धि विस्तारित होते. कशाप्रमाणे तर एखादा तेलाचा थेंब पाण्यावर पडला असता, तो ज्याप्रमाणे पसरतो त्याप्रमाणे देशाटन करणाऱ्या मनुष्याची बुद्धि प्रसृत होते आणि एखादा तुपाचा थेंब जर पाण्यावर पडला तर तो काही प्रसृत न होता आकुंचितच होतो त्याप्रमाणे देशाटन न करणाऱ्या मनुष्याची बुद्धि विस्तृत न होता आकुंचित होते. म्हणून सर्वांनी अवश्य देशाटन करावे, देशाटन हे मनुष्यास अत्यंत अवश्य आहे. आपण असे पहा की, एखादा देशाटन न करणारा मनुष्य परदेशामध्ये गेला असता, त्याची सर्व ठिकाणी फजिती होते. कारण त्या ठिकाणच्या चालीरीति त्या मनुष्यास माहित नसतात. म्हणून प्रत्येक मनुष्याने अवश्य देशाटन केले पाहिजे. देशाटन करण्यास मनुष्याला पुष्कळ माहिती पाहिजे हे खरे आहे. कारण एखादा बिनमाहितीचा मनुष्य असला आणि त्याला एका देशाला जायचे असले तर त्याला गाड्यांची माहिती नसल्यामुळे तो मनुष्य भलत्याच देशाला जातो. म्हणून प्रत्येक मनुष्याला देशाटन करण्यास पुष्कळ माहिती पाहिजे. अगोदर देशाटन करणाऱ्या मनुष्याची सर्व ठिकाणी ओळख असावी लागते. आता प्रत्येक देशात काही ओळख नसते. म्हणून त्या मनुष्याने फार सावधगिरीने वागले पाहिजे. कारण कोठले लोक कसे असतात याचा काही नेम नाही. सर्वच लोक काही चांगले नसतात. म्हणून **देशाटन करणाऱ्या मनुष्याने अत्यंत सावधगिरीने वागले पाहिजे.** तसेच त्या मनुष्याजवळ द्रव्यही पुष्कळ

असावे. एखाद्या अनोळखी देशात द्रव्य आपल्या फार उपयोगी पडते. म्हणून त्या मनुष्याजवळ मुख्य द्रव्यसंचय बराच पाहिजे. आता देशाटन करणारा मनुष्य लोकांची मने सहज वळवितो. आता लोकांची प्रवृत्ति चहाकडे आहे, परंतु परदेशात जाऊन चहाचे कारखाने बघून आलेला मनुष्य जेव्हा चहाला व साखरेला रक्ताचा हात लावतात असे सांगतो तेव्हा लोकांना खरे वाटते. याचे कारण त्या मनुष्याने चांगल्या रीतीने देशाटन केले असते. म्हणून प्रत्येक मनुष्याने देशाटन अवश्य करावे. देशाटन केल्याने त्या मनुष्याची बुद्धि व्यापक होते. अर्थात असा सर्व ठाऊक असलेला मनुष्य सर्वांना प्रिय असतो. त्या त्या देशातील विद्या ज्या असतील त्या सर्वांची माहिती देशाटन करणाऱ्या मनुष्यास असते. म्हणून प्रत्येक मनुष्याने देशाटन केले पाहिजे. असो. प्रत्येक मनुष्याने अवश्य देशाटन करावे. म्हणजे त्याला सर्व लोक मानतात व त्याची व मोठमोठ्या विद्वान लोकांची गाठ पडते व त्याला राजदरबारीही मान मिळतो व त्या मनुष्यावर सर्वांची प्रीति राहून त्याला सुख मिळते. असो. म्हणून प्रत्येकाने देशाटन केले पाहिजे. मोठमोठे इतिहासप्रसिद्ध देश पाहण्यास मिळाल्याने त्या मनुष्याच्या मनावर परिणाम होतो. असो. सदैव माझ्या हातून देशाटन घडो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**-दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

-------------

## ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

### विषय : **षड्रिपू - अर्थ, फायदे, तोटे, उपसंहार.**

षड्रिपू म्हणजे सहा शत्रू कोणाचे? तर अर्थात मनुष्याचे. कारण जनावरांना शत्रू नसतात. आता हे शत्रू कोणते तर काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर हे सहा शत्रू होत व ते हळूहळू मनुष्यापाशी जाऊन त्याचा नाश करतात. ज्याप्रमाणे एखादा धूर्त मनुष्य एखाद्याच्या घरात शिरून त्याला आपण मित्र आहे असे दाखवितो व हळूहळू त्या मनुष्याचा नाश करतो, त्याप्रमाणेच हे शत्रू आहेत. आता आपण हे सर्वजण कसे आहेत ते पाहू. या रिपूंपैकी पहिला जो 'काम' तो अत्यंत अहितकारक आहे. त्याने मोठमोठ्या तपस्व्यांना आपल्या तपापासून भ्रष्ट केले. सर्व योग्यांमध्ये श्रेष्ठ असे जे शंकर त्यांनासुद्धा या कामाने आपला प्रभाव दाखविला. त्याचप्रमाणे विश्वामित्राने केलेले ६०,००० वर्षांचे तप नाश केले आणि नारद ऋषीला स्त्री करून सोडले. असा सर्वांना आपल्या मार्गापासून भ्रष्ट करणारा असा हा मदन आहे. म्हणून त्याचा अंगिकार न करता त्याला दूर टाकून द्यावे म्हणजे मनुष्य चांगल्या मार्गाला जाईल. आता दुसरा रिपु 'क्रोध'. तो यापेक्षा अहित करणारा आहे. कारण या क्रोधाने मोठमोठी उदयाला आलेली राष्ट्रे देशोधडीला गेली. हा क्रोध उत्पन्न झाल्यामुळे मनुष्याचे अकल्याण होते. आता एखाद्या मनुष्याचा दुसऱ्या एकाने अपराध केला तर तो मनुष्य क्रोधाला बळी पडून त्या मनुष्याचा खून करतो. आणि लोकांमध्ये फजिती पाहून शेवटी आपला प्राणही गमावून बसतो. या क्रोधापासून ईर्ष्या, द्रोह, असूया इत्यादी अवगुण उत्पन्न होतात. एखादा आचरणाने चांगला असला की, मी त्याच्यापेक्षा चांगला होईन असे मनुष्याला वाटते. परंतु तो आचरणाने त्या मनुष्याइतका चांगला होत नाहीच तर तो लोकांकडून अपमान पावतो

व नंतर जो चांगला मनुष्य असतो त्याचा द्वेष करतो व त्याचे जे गुण असतील ते दोष आहेत चांगले गुण नाहीत असे लोकांना सांगतो. परंतु लोक काही अशा मनुष्याचे ऐकत नाहीत व त्याची सर्व लोकांमध्ये फजिती होते. असा जो क्रोध त्याचा अवलंब न करता त्याला दूर टाकून द्यावे. आता लोभ कसा आहे तो पाहू. लोभाने पुष्कळांचे नुकसान झाले आहे. "लोभात्क्रोधः प्रभवति लोभात्कामः प्रजायते, लोभान्मोहश्च नाशश्च लोभः पापस्यकारणम्". लोभापासून काम, क्रोध, मोह इत्यादी उत्पन्न होतात व शेवटी या लोभामुळे त्या मनुष्याचा नाश होतो. या लोभापासून मनुष्याच्या हातून अनेक पापे घडतात. हरीण हा तृणाच्या मोहामुळे आपल्यावर आलेले संकट विसरून जातो व शेवटी व्याधाकडून मारला जातो. एखाद्याची स्त्री चांगली असली आणि तिच्यावर एखाद्या मनुष्याची प्रीति बसली आणि ती स्त्री जर त्या मनुष्याला प्राप्त झाली नाही तर त्याला क्रोध येऊन तो त्या मनुष्याचे नुकसान करण्यास प्रवृत्त होतो व शेवटी बंधनात पडतो. म्हणून या लोभाचा कोणीही स्वीकार करू नये. आता या लोभापासून फायदा आहे तो कोणता तर हा लोभ ईश्वराचे ठिकाणी जडल्यास त्या मनुष्याच्या अनंत जन्मींच्या पापराशी जळून जाऊन तो ईश्वराचेजवळ जातो. असा लोभापासून फायदाही आहे. परंतु हा 'लोभ' सत्कर्माकडे असावा. आता 'मोह' हा फार अकल्याणकारक आहे. या मोहाने अनेकांचे नुकसान झाले आहे. कोणत्याही पदार्थाचा मनुष्याला मोह असू नये. भरत राजाला मृगावरच्या मोहामुळे तीन जन्म घ्यावे लागले. या मोहाने कित्येकांना धुळीस मिळवले आहे. म्हणून या मोहाचा सर्व लोकांनी प्रतिकार करावा. आता 'मद' हा कसा आहे ते आपण पाहूया. गर्वाच्या योगाने रावण, दुर्योधन यांच्यासारखे सुखाच्या अत्युच्च शिखरास चढलेले लोक एका क्षणात नाहीसे झाले. द्रव्य मदामुळे इंद्राने दुर्वास ऋषींचा अपमान

केला व त्यांच्या शापामुळे आपले सर्वस्व घालवून बसला. त्याचप्रमाणे भीम हा गर्वामुळे मरून गेला. त्याचप्रमाणे त्याचे तीन भाऊ कोणाला आपल्या विद्येचा तर कोणाला आपल्या रुपाचा गर्व झाल्यामुळे मरून पडले. एकटा धर्मराज गर्वरहित असल्यामुळे तो देहासकट एकटा इंद्राच्या रथात बसून स्वर्गलोकी गेला. असा गर्व हा मनुष्याचे नुकसान करणारा आहे. म्हणून याचा कोणीही अंगिकार करू नये. आता 'मत्सर' कसा आहे तो पाहू. मत्सर हा अहितकारक आहे. कारण एखाद्याचा मत्सर करता-करता त्या मनुष्याला बुद्धि होते की, हा मनुष्य आपले ऐकत नाही. म्हणून तो मनुष्य त्याला आपल्या बलाने त्रास देतो व शेवटी आपलाच नाश करतो. म्हणून मत्सर कोणीही करू नये. मयसभेत दुर्योधनाला जलाचे ठिकाणी स्थल भास झाल्यामुळे तो पाण्यात पडला व त्याला धर्मराजाची चाकर माणसे हसली. तेव्हा दुर्योधनाने धर्मराजाचा मत्सर करून शेवटी तो नाश पावला. असो. असे षड्‌रिपू आहेत त्यांचा कोणीही अंगिकार करू नये. षड्‌रिपूंच्या योगाने मनुष्य संसारात गुंततो व शेवटी मायेत सापडून यमाकडून मार खातो. म्हणून यांचा शक्य तितका मनुष्याने प्रतिकार करावा. असे केल्याने त्याचे कल्याण सर्व बाजूंनी होईल. या षड्रिपूंत गुंतण्याची मला बुद्धि होऊ नये म्हणून ईश्वराजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर

---------------

६.

## ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

## विषय : **द्रव्य - अर्थ, फायदे, तोटे, उपसंहार.**

द्रव्य म्हणजे अत्यंत उपयुक्त वस्तू आहे. या द्रव्याच्या योगाने सर्व प्राणीमात्र आपणाला वश होतात.

**"वयोवृद्धास्तपोवृद्धा ज्ञानवृद्धा बहुश्रुताः ।**
**इत्ये ते धनवृद्धस्थ द्वारे तिष्ठन्ति किंकराः ।"**

याप्रमाणे एका कविने म्हटले आहे. वयाने वृद्ध झालेले, तप ज्यांनी पुष्कळ केले आहे असे तपस्वी, त्याचप्रमाणे ज्ञानी, पुष्कळ शास्त्रे, पुराणे ज्यांनी ऐकली आहेत असे हे सर्व लोक केवळ द्रव्यवान पुरुष जो असतो त्याच्या द्वारामध्ये रखडत पडलेले असतात. असा या धनाचा प्रभाव आहे. देशाटन, विद्या इत्यादी वस्तू केवळ धनाने प्राप्त करून घेता येतात. याकरिता प्रत्येकाने द्रव्यार्जन करण्याकरिता झटले पाहिजे. द्रव्याने परमार्थसुद्धा साधता येतो. एखादे तपस्वी आपल्या घरी आले असता त्यांचा आदर सत्कार करून त्यांना भोजन घालून व द्रव्य देऊन संतुष्ट केले असता परमेश्वर प्राप्ति सहज होणारी आहे. द्रव्याने व प्रेमाने बलरामास वश करून दुर्योधनाने त्याच्याकडून गदायुद्ध प्राप्त करून घेतले व शेवटी आपला शिष्य दुर्योधन हा श्रीमंत आहे, याच्या घरी आपली मुलगी दिली असता तिला सुख होईल असे मनात आणून दुर्योधनपुत्र जो लक्ष्मण याला आपली मुलगी देण्यास बलराम तयार झाला. हा केवळ द्रव्याचाच प्रभाव होय. ज्या मनुष्याजवळ द्रव्य नाही, त्याला कोणीही विचारीत नाही. आईबाप विचारीत नाहीत. बहीण-भाऊ कोणीही विचारीत नाहीत. आपल्याजवळ द्रव्य जोपर्यंत असते तोपर्यंत मित्रमंडळी घरी येतात. आपल्याला मान देतात. परंतु ज्याच्याजवळ द्रव्य नाही, त्याला पूर्वी मित्रपणा दाखविणारे जे लोक असतात ते विचारीत

तर नाहीतच, परंतु बोलतसुद्धा नाहीत. द्रव्य जवळ असले म्हणजे मनुष्याला पुष्कळ सुख होते. **द्रव्य मिळविण्याकरिता सर्व खटपट करीत असतात. परंतु त्यांना द्रव्यप्राप्ती होत नाही. याचे कारण ते दान करीत नाहीत.** या जन्मी दान केले म्हणजे पुढच्या जन्मी पुष्कळ द्रव्य मिळते व त्यापासून मनुष्याला सुख मिळते. दान करणे ते सुद्धा चांगल्या रीतीने करावे व सत्पात्र पाहून करावे. खाणी, आगगाड्या, आगबोटी इत्यादी साधने केवळ पैशाकरिता झाली आहेत. द्रव्य असेल तरच या सर्वांचा उपभोग घेता येतो. द्रव्य जवळ असले म्हणजे आपल्या हातून पुष्कळ पुण्यकर्मे होतात. अन्नदान घडते अशी पुण्यकर्मे आपल्या हातून घडून आपल्याला मृत्युनंतर चांगला लोक मिळतो. तेव्हा प्रत्येकाने द्रव्य मिळविण्याकरिता खटपट करावी. म्हणजे त्यात आपला स्वार्थ व परमार्थ दोन्ही साधेल. आता द्रव्य मिळविणारा जो असतो तो सुद्धा चांगला असावा लागतो. एखाद्या दुर्जनाने मिळविलेले द्रव्य राजा किंवा तस्कर यांच्याकडून हरण केले जाते. त्याने वाईट मार्गानेच ते द्रव्य मिळविलेले असते. म्हणूनच देवाला नाही व धर्मालाही नाही. फार तर काय इतकी पापकर्मे करून मिळविलेले द्रव्य स्वतःलासुद्धा मिळत नाही तर ते द्रव्य अशा प्रकारे घरातून जाते. म्हणून **मनुष्याने चांगल्या मार्गानेच द्रव्यप्राप्ती करून घ्यावी. वाईट मार्गाने कधीही घेऊ नये.** आता कृपण मनुष्य जो असतो तो आपल्याजवळच्या द्रव्याचा आपणही उपयोग करून घेत नाही व लोकांनाही देत नाही. या जन्मी तो दान वगैरे करीत नाही म्हणून त्याला पुढच्या जन्मी अन्नसुद्धा मिळण्याची पंचाईत पडते. म्हणून मनुष्याने केव्हाही कृपणपणा न करता सत्पात्री दान इत्यादी पुण्यकर्मे नित्य करीत असावे. म्हणजे त्याला सुख होईल. द्रव्यहीन पुरुषाला वारंवार दुःखे येतात. ''दारिद्रय मरण यातुनि मरण बरे बा दरिद्रता खोटी मरणात दुःख थोडे दारिद्रयात व्यथा असे मोठी'' असे

चारुदत्ताने म्हटले आहे. मरणात दु:ख थोडे असते.'' त्यावेळेपुरते असते. परंतु दरिद्रतेत सबंध जन्मभर दु:ख होते. त्यात ती दरिद्रता अगोदर श्रीमंती असून नंतर आलेली असली तर ती फारच वाईट होय. आपल्या या भारतवर्षात पूर्वी सर्व लोक सुखी होते. हल्ली कोणाजवळही द्रव्य नाही. ज्याच्याजवळ द्रव्य आहे त्याला दान करावेसे वाटत नाही आणि हल्ली पैसा नाटके, सिनेमा यांच्याकडे फार जातो. म्हणून देशामधील पैसा संपून हल्ली सर्व लोक दु:खी झाले आहेत. तेव्हा प्रत्येकाने आपला पैसा सत्कर्माकडे लावावा म्हणजे त्याचे कल्याण होईल. द्रव्यापासून वरील प्रकारचे पुष्कळ फायदे आहेत. आता द्रव्यापासून तोटेही पुष्कळ आहेत. द्रव्य पुष्कळ असले म्हणजे मनुष्याला गर्व उत्पन्न होतो. इंद्राने द्रव्यमदामुळे आपल्या गुरुंचा अपमान केला व नंतर त्याचे गुरु अदृश्य झाले. नंतर त्याला पुढे पुष्कळ त्रास झाला. म्हणून मनुष्याने द्रव्य जरी आपल्याजवळ पुष्कळ असले त्याजबद्दल गर्व न करता चांगले वागावे. आपल्याला द्रव्य मिळावे, आपण पेशवे व्हावे एवढ्याकरिता आनंदीबाईने नारायणराव पेशव्याचा वध केला. पुढे सर्व कारभारी मंडळींचे व राघोबादादांचे वाकडे आले. याप्रमाणे आपापसात भांडण लागल्यामुळे या राष्ट्रांत तिसरे जे इंग्रज त्यांचा प्रवेश होऊन त्यांना हे राष्ट्र मिळाले. म्हणून मनुष्याने द्रव्याबद्दल मनात गर्व न धरता चांगल्या कर्माकडे त्याचा व्यय करावा. म्हणजे त्याचे सर्व बाजूंनी कल्याण होईल. असो. द्रव्याचा सत्कर्माकडेच व्यय होवो व आमचे हे राष्ट्र उदयाला येवो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

---

## ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

### विषय : **इतिहास - अर्थ, फायदे, उपसंहार.**

या जगात इतिहास हा सर्वांना उपयुक्त असा आहे. या इतिहासाने मनुष्याचे ज्ञान वृद्धिंगत होते. म्हणून इतिहास वाचन प्रत्येकाने अवश्य करावा. म्हणजे त्याचा फायदा सर्व लोकांस त्या मनुष्यापासून मिळून सर्व लोकांची प्रीति त्या मनुष्यावर बसते व सर्व लोकांकडून त्याला मान मिळतो. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।' ज्ञानेन सदृशं पवित्रमिह न विद्यते' असे म्हटले आहे. या जगात पवित्र अशा वस्तू पुष्कळ आहेत. परंतु त्या वस्तूंमध्ये ज्ञान हे श्रेष्ठ आहे. आता ज्ञान हे दोन प्रकारचे आहे. एक व्यावहारिक ज्ञान व दुसरे पारमार्थिक ज्ञान. ही दोन्ही ज्ञाने या इतिहास वाचनापासून मनुष्यास प्राप्त होतात. ती कशी प्राप्त होतात ते आपण पाहू. या इतिहास अवलोकनामुळे मनुष्यास व्यापक बुद्धि येते. प्रत्येकास बुद्धि असतेच परंतु या बुद्धीला व्यापकता आली म्हणजे त्या मनुष्याचे कोठेही नडत नाही. तो मनुष्य आपल्या बुद्धीने लोकांना सन्मार्गाला लावतो. त्या मनुष्याने इतिहासातील संतांच्या व राजपुरुषांच्या गोष्टी वाचलेल्या असतात. त्या लोकांचे उज्वल चरित्र त्याचे डोळ्यापुढे सदोदित राहून तो मनुष्य त्यांच्याप्रमाणे आचरण करतो व सर्व लोकांना तसे वागा म्हणजे तुम्हीसुद्धा त्यांच्याप्रमाणे व्हाल असे सांगतो. पारमार्थिक ज्ञान इतिहासापासून मिळते ते कसे? तर पौराणिक कालाच्या इतिहास अवलोकनामुळे त्या त्या ऋषींचे आचार कळून व कशा आचरणामुळे ते सद्गतीला गेले हे कळून त्याप्रमाणे आचरण केले असता त्याला ज्ञान होऊन तो लोकांच्या कल्याणाकरता झटतो. आता इतिहासापासून ब्रह्मज्ञान कसे मिळते. नुसत्या वाचनामुळे ज्ञान झाले असते तर असे पुष्कळ लोक ज्ञानी झाले असते. वाचनापासून जे ज्ञान

होते ते नुसते शाब्दिक ज्ञान असते. ते काही खरे ज्ञान नाही. खरे ज्ञान सद्गुरुची कृपा झाल्यावाचून मिळत नाही असे जरी आहे, तरीदेखील खरे ज्ञान होण्यास मूळ कारण इतिहासच आहे. तो कसा हे प्रथम पाहू. पुराणे वगैरे वाचून किंवा नुसती ऐकून मनुष्याच्या मनाला तात्पुरती तरी तळमळ लागते की, पूर्वीच्या लोकांनी सदाचरणाने आपली कीर्ति अजरामर करून ठेवली आणि आम्ही दुराचरणाने मागचा-पुढचा काही विचार न करता केवळ द्रव्यार्जन करतो. असे विचार श्रवण किंवा वाचनामुळे मनात येतात: परंतु ते विचार सर्वकाळ मनात रहात नाहीत. एखाद्या बगिच्यात अगर दुसरीकडे कोठे गेल्याबरोबर ते विचार मनातून निघून जातात. सदोदित अशी तळमळ ज्याला लागते त्याला आपोआप सद्गुरुंची भेट होऊन खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. सर्व ज्ञानी होत नाहीत त्याचे हेच कारण होय. या इतिहासाने अनेक विद्वानांच्या, शूरपुरुषांच्या, राजकारस्थानी लोकांच्या हकीकती कळून त्याप्रमाणे आपण नाही असे पाहून इतिहास वाचणाऱ्या एखाद्या तरी मनुष्यास फार तळमळ लागते. त्या योगाने तो स्वत: त्याप्रमाणे आचरण करतो व लोकांनाही करण्यास सांगतो. आता 'भिन्नरुचिर्हि लोक:' या श्लोकाप्रमाणे सर्वच काही त्यांचे ऐकतात असे नाही. परंतु त्या विषयाच्या आवडीचे काही लोक असतात. म्हणूनच हल्ली इतिहास संशोधक मंडळे इत्यादी मंडळे निघाली आहेत व त्यांनी पूर्वीच्या इतिहासावरून पुरातन कालीन इमारती हुडकून काढून त्यामध्ये असलेली पुस्तके, बखरी इत्यादी शोधण्याचे ठरविले आहे व त्यामुळे हल्ली बरीच मंडळी इतिहासवाचन वगैरे करू लागली आहेत. देशाला ऊर्जितावस्थेस आणण्याला इतिहासवाचन हे बऱ्याच अंशी कारण आहे. शिवाजी, तानाजी, नाना फडणवीस इत्यादी वीर व मुत्सद्दी पुरुषांनी स्वराज्याकरिता इतकेच नव्हे तर आपल्या जातीचे हाल होतात म्हणून आपल्या गोमाता मोंगलाकडून मारल्या जातात, ज्यांना सुख

व्हावे इत्यादी कारणाकरिता आपल्या जीवाची सुद्धा आहुती त्यांनी दिली. त्या थोर पुरुषांची चरित्रे वाचून आपल्या मनावर काहीच कां परिणाम होणार नाही? काही ठिकाणी असे लिहिले आहे की, शिवाजीला लिहिता-वाचता सुद्धा येत नव्हते. ते खरे असो किंवा नसो. परंतु रामायण, महाभारत इत्यादिकांतील वीरांच्या गोष्टी ऐकून व आपल्या भारतभूंचे म्हणजेच त्यातील लोकांचे आर्त विलाप ऐकून आणि गोमातेचे हृदयद्रावक आलाप-श्रवण करून, आपल्या जीवाची देखील पर्वा न करता ज्यांनी आपल्या भारतभूमीला, गोमातेला यवनांच्या त्रासांतून सोडविले, त्यांच्या गोष्टी ऐकून-वाचूनसुद्धा धडधडीत आपल्या हाताने गोमातेला बाजारात कसायांच्या हाती देणारे कितीतरी लोक या समाजात दिसत आहेत. परंतु त्याच्याशी आपल्याला तूर्त काही कर्तव्य नाही. परंतु ज्याच्या मनावर पुरातन गोष्टींचा काहीतरी परिणाम झाला आहे, त्यांच्या हातून गोरक्षण इत्यादी संस्थांनी झालेले कार्य दिसून येतेच आहे. असो. असेच उत्तरोत्तर इतिहास वाचनामुळे गोमातेला तसेच भारतभूमीला विधर्मीयांच्या ताब्यातून सोडवण्याचे तेज काही लोकांच्या अंगामध्ये यावे अशी मयूरेशचरणी प्रार्थना करून हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

-----------------

## ८.

### ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

### विषय : **व्यसन - अर्थ, फायदे, तोटे, उपसंहार.**

व्यसन शब्दाची व्युत्पत्ति संस्कृतात अशी होईल - 'अस्यते अंतेन' म्हणजे अस्तित्व असते ज्याच्या योगाने ते असतं. 'विगतं असनं येन तत् व्यसनं' म्हणजे ज्याच्या योगाने मनुष्याचे अस्तित्वसुद्धा नाहीसे होते ते व्यसन. या व्यसनाने आपल्या शरीरावर परिणाम होतो. सध्यादेखील आपल्या देशातील लोक कमकुवत बनण्याचे कारण म्हणजे व्यसनांचा या राष्ट्रामध्ये प्रवेशच होय. शरीरावर परिणाम झाल्याने मनही कमकुवत बनते. जरी मनाने वाटेल तितक्या भराऱ्या मारल्या तरी मनगटात जोर नसल्यामुळे त्या मनुष्यास काही करता येत नाही. **महाप्रतापी स्वराज्य संस्थापक श्री शिवाजी महाराज हे हिंदी राष्ट्रास परकीय मोगलांच्या सत्तेतून सोडविण्याकरिता अहोरात्र रानावनांतून हिंडून शेकडो दरीकंदरातून फिरून प्राण असे तोपर्यंत कष्ट करणारे हे कोणीकडे आणि त्यांचेच पुत्र महाप्रतापी परंतु एका कनोजी ब्राह्मणाच्या नादाने आपल्या पूर्वजांच्या राज्यांतील आधारस्तंभांना चिरडून टाकणारे व शेवटी शत्रूंच्या हस्ताने मरण पावून त्यावेळच्या सर्व मराठ्यांना स्वराज्याच्या अस्तित्वाबद्दल शंका उत्पन्न करणारे श्री संभाजी राजे कोणीकडे?** हा सर्व प्रभाव व्यसनांचाच होय. व्यसनांमुळे आपल्या राष्ट्राची किती हीन दशा झाली आहे. हरहर! या भारतभूमीत आपल्या राज्यांतील लोकांस किंवा आपल्या देशबांधवास सुख व्हावे एवढ्याकरिता वेळी न जेवता मक्याचे दाणे तोंडात टाकून घोड्यावरून अहोरात्र हिंडणारे असे महापुरुष निर्माण झाले. त्याच भारतवर्षात आपल्या देशबांधवांकडे ढुंकूनदेखील न पाहता मोटारगाड्या उडवीत हिंडणारे व स्वार्थाकरिता आपल्या देशातील लोकांवर कसाही प्रसंग आला तरी तिकडे लक्ष न

देणारे, नाच-सिनेमा-नाटके इत्यादी अनेक वाईट कारणांकरिता आपले पैसे उधळणारे परंतु आपल्या देशातील एखाद्या भिकाऱ्यास मूठभर जोंधळ्याकरिता शिव्या देणारे असेच लोक उत्तरोत्तर निर्माण होऊ लागले आहेत. तर याला व्यसनांचा प्रादुर्भावच कारण नसेल काय? त्याशिवाय दुसरे कोणतेही कारण हिंदूभूला अशी दशा येण्याचे दिसत नाही. नलराजाला द्यूत व्यसनामुळेच दुसऱ्या राजाची चाकरी करावी लागली. या व्यसनामध्येसुद्धा चांगली अशी काही व्यसने आहेत. विद्येचे व्यसन हेही यापैकीच एक आहे. या व्यसनाने पुष्कळ लोकांना महत्त्व मिळते. परंतु विद्येच्या नावाने अनेक दुर्व्यसनांचा स्वीकार करणारे बरेच विद्यार्थी या देशात दिसून येतात. एका व्यसनामागून एक व्यसन वाढत गेल्यामुळे त्या मनुष्याला व्यसनपूर्ततेकरिता वाटेल तसली वाईट कृत्ये करावी लागतात व लोकांच्या दृष्टीने तो मनुष्य नालायक ठरून, आपल्या शरीराचा, अब्रूचा, आपल्या पूर्वजांच्या नावलौकिकाचा नाश करण्यास माघार घेत नाही. अशा मनुष्याच्या हातून देशकार्य कोणत्याही प्रकाराने घडणे शक्य नाही. त्याच्या शरीरात काही त्राण नसतोच व शरीराबरोबर त्याचे मनही कमकुवत बनते व त्याच्या वाणीत तर काही अर्थ नसतो. कारण आपण स्वत: आचरण न करता वाटेल तसे वागून लोकांना मात्र चांगले वागण्याचा उपदेश करणाऱ्या एखाद्या बोलघेवड्या मनुष्याच्या वाचेत कसे सामर्थ्य असणार? अशिक्षित, ज्यांना काही समजत नाही असे लोक व्यसनी बनतीलच, परंतु सुशिक्षित म्हणविणारे, कार्याकार्यविवेक बाळगणारे सुद्धा आपल्या अज्ञानी देशबांधवांना उपदेश न करता, आपण स्वत:च त्या मार्गाकडे प्रवृत्त होतात. ही फारच मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आपल्या देशातील लोकांना परकीय लोकांनी नाना तऱ्हेची व्यसने लावून आपल्या हातातील बाहुले बनविले आहे. सभ्यपणाच्या आवाने अनेक व्यसनांचा स्वीकार करणारे अनेक लोक आहेत. नाटक, सिनेमा,

विडी, सिगारेट, चहा इत्यादी सभ्य दिसणारी व्यसने केवळ अध:पाताच्या शाळाच होत. चहाचे व्यसन आपल्या देशातील शेकडा ९८ इसमांना तरी असेल. मोठ्यामोठ्या देशभक्तीच्या गप्पा मारणारे, व्याख्याने झोडणारे लोक चहाचा पाडा दिवसातून कितीतरी वेळा अंमलात आणत आहेत. ही केवढी खेदाची गोष्ट आहे. आपले व आपल्या देशाचे हिताहित कशात आहे हे कळत असूनसुद्धा वाईट आचरण करणारे लोक 'साक्षात्पशुः पुच्छविषाणहीनः' या कोटीत का जाणार नाहीत? शहरातील लोकांना हॉटेलमध्ये गेल्याशिवाय चैन पडत नाही. मनाला ती एक चटकच लागलेली असते. त्या प्रकारचे वळण लावावे तसे लागते. पूर्वीपासून तसे वळण असल्यावर मनाने तरी का हेका धरू नये व केव्हाही आत्मसंयमनाची सवय नसलेल्या मनाच्या मालकाने तरी तो का पुरवू नये? लोक आपण व्यसनी बनतातच, परंतु आपल्या मुलाबाळांनासुद्धा बनवितात. त्यांनी चहा न घेतल्यास त्यांना बळजबरीने पाजतात. अशा प्रकारे सर्व प्रजा लहानपणापासूनच निर्बल, निर्बुद्ध अशा रीतीची बनते. याला कारण पालकच होत. ज्या मद्यपानामुळे महाप्रतापी संभाजीराजेदेखील आपले राज्य, बांधव व प्राणसुद्धा गमावून बसले, त्याच व्यसनात हल्ली पुष्कळ लोक आपल्या पैशाची, अब्रूची व शेवटी प्राणाचीसुद्धा आहुती देत आहेत. हे पाहून एखाद्या स्वदेशप्रेमी मनुष्याला आपल्या देशबंधूंना या व्यसनांपासून परावृत्त करण्याची बुद्धि होणार नाही काय? होईलच. असो. आपल्या देशबंधूंना वाईट व्यसनांपासून पराङ्मुख होण्याची बुद्धि होऊन त्यांच्या हातून या परकीय सत्तेत पिळून निघणाऱ्या हिंदमातेची सोडवणूक होवो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

---------------

९.

## ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

### विषय : **संगीत - अर्थ, फायदे, उपसंहार.**

संगीत हा विषय लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना आवडतो. 'गीतं वाद्यं तथा नृत्यं-त्रयं संगीतमुच्यते' असे शास्त्रकारांनी म्हटले आहे. संगीतामध्ये गीत, वाद्य व नृत्य या तिघांचाही समावेश होतो. संगीत हे सर्वांना आनंद देणारे आहे. संसारात गोडी उत्पन्न करण्यास व त्यापासून विरक्त करण्यास हाच विषय कारणीभूत आहे. एखाद्याला कितीही दुःख झाले असले तरी त्याला गायन ऐकल्याबरोबर थोडातरी आपल्या दुःखाचा विसर पडतो. असे हे गायन आहे. या गायनापासून जगामध्ये मनुष्याला मान मिळतो. एखादा गायन करणारा मनुष्य दरिद्री असला तरी श्रीमंत मनुष्याप्रमाणे सुखात असतो. हल्ली पुष्कळ लोक गायनामुळे किंवा वादन, नृत्य यामुळे हजारो रुपये मिळवित आहेत व द्रव्यार्जन करून शिवाय मानही मिळवितात हे आपल्या निदर्शनास आलेच आहे. आता संगीत हे अर्वाचीन आहे असे लोक म्हणतात. परंतु अर्वाचीन नसून अनादीच आहे. याला प्रमाण सामवेद आहे. विराट पुरुषाच्या मुखापासून वेद उत्पन्न झाले असे आपली पुराणे सांगत आहेत. त्या वेदांपैकी जो सामवेद त्यात संगीताचे बरेच वर्णन केले आहे, यावरून संगीत हे अनादी आहे. या संगीताचा जो गायनाने परिणाम होतो त्याचे महत्त्व आपण पाहू. या गायनामुळे उर्ध्वरेत मुनी विश्वामित्र मोहून गेले. पूर्वीची एक गोष्ट अशी आहे की, नारद ऋषींना एकदा गायनाबद्दल आपणासारखा गाणारा कोणीही नाही असा गर्व झाला होता. त्याचा तो गर्व घालवण्याकरिता श्रीकृष्णानी असा मनुष्य निर्माण केला की त्या मनुष्याच्या गायनाने जमीन द्रवीभूत होऊन नारदांचा तंबोरा जमिनीत रुतला आणि त्यांचा अहंकार कमी झाला. **अहंकार कमी झाल्यामुळे**

पुन्हा त्याच मनुष्याच्या गायनाने त्यांचा तंबोरा त्यांना परत मिळाला. ही गोष्ट निराळी! परंतु असे त्यावेळी गाणे उच्च कोटीला जाऊन पोहोचले होते. त्यानंतर पुष्कळ काळ गेल्यानंतर मुसलमानी अंमलामध्ये हे पूर्वीपेक्षा पुष्कळ अधोगतीला गेले होते. त्यावेळची एक दंतकथा अशी आहे की, त्यावेळी कोणी एक राजा फारच चांगला गवई होता. चार-पाच वर्षात पर्जन्य नसल्यामुळे त्यावेळी जिकडेतिकडे दुष्काळ पडला होता. म्हणून त्या राजाने मेघमल्हार राग गायल्याबरोबर त्यावर ईश्वराची कृपा होती म्हणून किंवा त्याच्या गाण्यानेच एकदम पर्जन्यवृष्टी होऊन धान्य पिकून जिकडेतिकडे सुकाळ झाला. असे पूर्वीचे गाणे हल्लीपेक्षा फारच उच्च पदाला जाऊन पोहोचले होते. गाण्यापासूनच मनुष्य श्रेष्ठ पदवीला जाऊन पोहोचतो. गायनामध्ये सुद्धा प्रकार आहेत. ख्याल, टप्पा, धृपद, धमार. धृपद, धमार इत्यादी गाणे शास्त्रीय आहे. हल्लीचे गायन म्हणजे नुसते लोकांना गोडी लागण्यापुरतेच आहे. त्यात एखादा राग गाऊ लागले असता, त्याला अमूकच स्वर गातात असे नाही, तर केवळ कानाला गोड लागले म्हणजे झाले. हल्ली शास्त्रीय गाणे बरेच कमी झाले आहे. गायन हे पूर्वी कोणत्या स्थितीला जाऊन पोहोचले होते आणि हल्ली त्याची अधोगती कशी झाली आहे हे लोकांना सांगावयास नकोच. आता वादन हे कसे आहे हे आपण पाहू. वादनामुळे मोठे-मोठे भुजंग मोहून परवश होतात. मग इतरजन होतील यात आश्चर्य काय? हल्ली टेंबे इत्यादी लोक लोकांकडून मान मिळवून शिवाय लाखो रुपये मिळवित आहेत व आपली कीर्ति सर्व देशभर पसरवित आहेत. याचे कारण वादनच होय. हल्ली वादन हे बरेच प्रगतीला आले आहे. आपल्या हिंदुस्थानात बरेच लोक या वादनाच्या मार्गाला लागले आहेत. आता तिसरा संगीताचा प्रकार नृत्य हा होय. या नृत्याच्या योगाने मोठमोठे ऋषि विश्वामित्रा यासारखे ऋषि आपल्या तपापासून भ्रष्ट झाले. हल्ली नृत्य

लोकांमधून पुष्कळ कमी झाले आहे. नृत्यामुळे मनुष्याला काही फायदा नाही असे पुष्कळ लोक म्हणतात. परंतु असे म्हणता येत नाही. नृत्य, गायन हे अर्जुनाला येत होते. म्हणूनच त्याला विराट राज्याच्या घरी अज्ञातवास करता आला. तो गुणी होता. शूर योद्धाही होता. त्याला अन्य रीतीने अज्ञातवास करता आला असता, परंतु तो त्याचा कदाचित उघडकीस आला असता. परंतु या नृत्याच्या शिकवणीने त्याच्या अज्ञातवासाचे काम बेमालूम केले. असे हे नृत्य पूर्वीपासून चालत आले असून अतिशय उपयुक्त आहे असे मानण्यास हरकत नाही. अशा प्रकारे गायन, वादन व नृत्य हे सर्व मिळून संगीत होते. या तिन्हींपासून जो मोहित होत नाही तो 'सवै मुक्तोथवा पशुः' अशांपैकीच मानला पाहिजे. कारण हे संगीत असेच मोह उत्पन्न करणारे आहे. हे लोक विश्रुतच आहे. असे संगीत आमच्या हिंदुस्थान देशात उत्कर्षाला चढो व ते पुढे असेच वृद्धिंगत होत जावो अशी परमेश्वर चरणाजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर**

---

## १०.

### ।। श्री गणेश दत्तगुरुभ्योनमः ।।

### विषय : **देशसेवा - अर्थ, फायदे, उपसंहार.**

देशसेवा देशाची सेवा. या ठिकाणी देशस्य सेवा. देशसेवा असा षष्ठी समास करूनच बरोबर अर्थ होतो. नाही तर देशाय सेवा असा चतुर्थी समास केला तर आम्ही देशाकरिताच नोकरी करतो असे खंडन करणारे पुष्कळ लोक या देशात आहेत. खरोखर देशाची म्हणजे त्यातील जनतेची सेवा करणारे लोक थोडेच सापडतील. थोडे म्हणण्याचे कारण कळकळीने हृदयाला पीळ पडल्यामुळे सेवा करणारे थोडेच लोक आहेत. बाकीचे सर्व लोक आम्ही देशसेवा करतो अशा बढाया जनतेजवळ करून अज्ञानी, अशिक्षित जनतेकडून आपल्या पोटाची खळगी भरण्याचे काम मात्र उत्कृष्ट रीतीने पार पाडीत आहेत. देशसेवा या सदराखाली ते आपल्या पोटाची सेवा मात्र भरपूर उत्तम रीतीने करीत असतात. असे स्पष्ट मोठ्या धाष्टर्याने म्हणणे भाग पडते. आता देशसेवा ही कशा प्रकारची आहे ते पाहू. खरी देशसेवा म्हणजे नुसती व्याख्याने देण्यानेच होत असेल तर ती नुसत्या तोंडाच्या वायफळ बडबडीने मुळीच होणार नाही. वर्तमानपत्रे काढली, वर्तमानपत्रात आपल्या सहीचे म्हणजे ते दुसऱ्या विद्वान लोकांकडून घेतलेले किंवा आपले असे लेख देऊन देशाबद्दल तोंडापुरती सहानुभूती व्यक्त करणारे पुष्कळ लोक आहेत. एखादा अस्पृश्य प्राणी, अगदी गरीब असा - काही मागण्यास पोटापुरतेच जर आला तर ते त्यांना देववत नाही. त्याला काम करण्यास काय झाले आहे. चांगला धष्ट-पुष्ट आहेस असे जे उत्तर करतात आणि अस्पृश्य लोकांना विचारत देखील नाहीत. मग ते लोक अन्य धर्मात जातील यात नवल ते काय? अशा रीतीने आपल्या धर्माचा, जनतेचा, परंपरेने आपल्या देशाचा नाश करणारे हे देशभक्त कसे आहेत पहा. आता

देशसेवा कशा प्रकाराने ते पाहू. देशातील सर्व लोक आपले भाऊबंद आहेत अशी कल्पना करून आपल्या शक्तिनुसार त्यांना अन्नदान करून, द्रव्यदान करून आपल्यात तसे सामर्थ्य नसल्यास दुसरे काही श्रीमान लोक असतात, त्यांच्या कडून मदत घेऊन आपल्या सर्वधर्मबांधवास तृप्त केले पाहिजे. कितीतरी लोक रोज अन्नाच्या अभावी अर्धपोटी राहणारे देशात आहेत. अशा रीतीने सर्व लोक तृप्त झाले असता कितीतरी त्या आत्म्याला आशीर्वाद देतील. त्यांच्या आत्म्याला शांति मिळेल. अशा प्रकारे काम केले असता ती जनतेची सेवा देशाची सेवा म्हणण्यास हरकत का नाही व पर्यायाने जनतारूपी जनार्दनाचीही म्हणता येईल. शिवाजी, तानाजी इत्यादींनी अशा प्रकारानेच देशाची सेवा केली. देशातल्या जातीबांधवांना नुसत्या मराठ्यांनाच नाही तर ब्राह्मणांनासुद्धा परक्यांच्या ताब्यातून सोडवून, आपण स्वतः राज्य स्थापून सर्व लोकांचे पालन केले. त्यावेळी सर्व लोक शिवाजी राजावर संतुष्ट होते. शिवाजी, तानाजी इत्यादी लोकांनी आपल्या प्राणाचीदेखील पर्वा न करता जनतेची म्हणजेच देशाची सेवा केली. म्हणूनच त्यांचे सर्व लोक ऐकत होते. देशसेवा करणाऱ्यावर परमेश्वरदेखील कृपा करतो. याचे उदाहरण म्हणजे शिवाजी महाराजच होय. परमेश्वराच्या पूर्ण मर्जित असे जे खरोखर रामदास ज्यांनी सर्व लोकांना आपल्या रसाळ वाणीने भगवद्भजनी लावले, अशा थोर विभूतींच्या कृपेला पात्र शिवाजी उगीच का झाला? नाही त्याने देशसेवेच्या बलाने आपल्या अंगात तसे सामर्थ्यच आणले होते. म्हणून त्याच्यावर रामदासांना कृपा करावीच लागली. त्यांना आपल्या जनतेच्या सुखकारक राज्याची, घरादाराची कशाचीही पर्वा नव्हती. फार काय आपल्या प्राणावरदेखील त्यांनी उदक सोडले होते. सिंहगड परत घेण्याचे वेळेस शिवाजीने तानाजीस बोलाविले. त्यावेळी प्रत्यक्ष त्याच्या मुलाचे लग्न असून शिवाजीचे पत्र मिळताच 'आधी

सिंहगडाचे लग्न आणि नंतर रायबाचे' असे म्हणून लगेच तो शिवाजी महाराजांच्याकडे आला व ते नको म्हणत असतानासुद्धा अतिशय प्रयत्न करून फार काय आपला प्राण देखील घालवून सिंहगड सर केला. आपला प्राण कुणाला अप्रिय आहे काय? परंतु फक्त स्वामीकार्याकरिता त्याने आपले प्राणदेखील अर्पण केले. असे शिवाजीने आपल्या अंगात तेज आणले होते. म्हणूनच अशा अद्वितीय स्वामीकरता कोणता सेवक आपल्या प्राणांची पर्वा करील? असो. अशाच रीतीने सर्व लोकांनी जनतेची म्हणजेच देशाची सेवा करून सर्व भरतखंडात आपले नाव अमर केले आहे. अशा रीतीने देशसेवा करणारे लोक आमच्या भारतभूमीत निर्माण होवोत व त्यापासून सर्व जनतेला सुख होवो अशी ईश्वराजवळ प्रार्थना करून मी हा निबंध पुरा करतो.

**- दत्तात्रय धुंडिराज कवीश्वर.**

---------------

## - प.पू. दत्तमहाराज कवीश्वर यांनी भक्तांना लिहीलेली पत्रे...

### पत्र १

प्रपंचापासून निरासक्त होऊन परमार्थाची कास आपण धरलेली आहे तेव्हा ती उपासना करीत असतांना जर लहान मोठी संकटे आली किंवा आजारपण आले तर ते सर्व इष्टापत्तीच समजावी. समाधानी असावे.

***

### पत्र २

**ईश्वरावर विश्वास ठेवून सावधानतेने सर्व व्यवहार पाहिला पाहिजे. भगवान् सर्वरक्षक समर्थ आहे. तो सर्वांच्या हृदयात आहे. त्याला चुकवून चोरही चोरी करु शकत नाही. पण कांही काल मानसिक त्रास भोगावा लागतो.**

***

### पत्र ३

**प्रयत्न ईशस्मरणपूर्वक करीत राहिल्यास पुरुषाचे भाग्य केव्हां उदयास येईल याचा नियम नाही.** गृहस्थाश्रमात न्यायाने द्रव्य मिळवणे कर्तव्यच आहे. याने अनेक धार्मिक कार्ये होऊ शकतात. प्रपंचातही स्वस्थता लाभते. परिवारही सुखी होतो. **न्यायाने सर्वांचा विश्वास संपादून उद्योग करावा. ईशकृपेने कांही कमी पडणार नाही.**

***

### पत्र ४

प्रपंच हा अनेकांचा मिळून आहे. सर्व लहान मोठ्यांच्या अदृष्टानुसार ईश्वरेच्छेने योगक्षेमाची व्यवस्था होत असते. हा झाला सामान्य कायदा. ईश्वरावरच सर्व भार टाकणाऱ्या सद्भक्तांची व्यवस्था स्वतंत्रच होत असते. पण तो अनन्य भावच मुळी दुर्लभ आहे.

**न मिळो खावया । न वाढो संतान ।**

**परि हा नारायण । कृपा करो ।.......**

अशी फक्त नारायणाच्याच कृपेची ज्याला तळमळ लागून राहिली आहे त्याचे प्रपंचातील बऱ्या वाईट घटनांकडे लक्ष जात नाही. प्रपंचात कोणाकोणाच्या सुखाकडे लक्ष द्यावे तेच कळत नाही. मुलांची विद्या व्हावी, जावई चांगले मिळावेत, नोकर चाकर आनंदात असावेत, गांवातील सर्व मित्रांचेही कल्याण व्हावे अशा किती इच्छा जीवांनी कराव्यात? आणि यापैकी किती पूर्ण होतात? इकडे सूक्ष्मदृष्टीने पहात राहिले म्हणजे

**ठेविले अनंते तैसेची रहावे ।**

**चित्ती असू द्यावे समाधान ।**

ही श्री तुकाराम महाराजांची उक्ति समर्थ ठरते. समाधान मानले पाहिजे तर महाराज सांगतात -

**वाहिल्या उद्वेग । दुःखची केवळ ।**

**भोगणे ते फळ । संचिताचे ।।.....**

असो.

**प्रपंचात द्रव्य हे मनुष्यांचा बाह्य प्राणच आहे. त्याकरीता सोय म्हणून जरी विभक्त राहण्याचा प्रसंग आला तरी सर्वांविषयी अंतरंगात प्रेमभाव ठेवावा. प्रेमानेच खरे समाधान लाभते. पैसा वगैरे सर्व साधने येथेच राहणारी आहेत. फार काय हा देहसुद्धा येथेच पडतो.**

**गोड तुझे रुप । गोड तुझे नाम ।**

**देई मज प्रेम सर्वकाळ ।......**

हेच मागणे देवाजवळ नित्य मागत राहावे. यानेच सर्व जीवन सुखी होते.

***

## पत्र ५

११.१०.१९६५

इकडेही बरेच दिवस पाऊस नव्हता. काल थोडा पडला. या वर्षी सर्वत्रच अशांति निर्माण झाली आहे. कर्मभोग अपरिहार्य आहे. यांत कोठे परकीय निमित्त असतील तर कोठे स्वकीयही निमित्त असतात. पण 'भोगणे ते फळ संचिताचे' या वचनाप्रमाणे तो भोग स्वत:च्याच संचित कर्मांचे फळ असतो, असा संतांचा सिद्धांत विचारात घेतला तरच समाधानाला जागा आहे.

**त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव । त्वमेव सर्वं मम देव देव ।**

याप्रमाणे सर्वही 'संबंध रुप' खरा भगवान आहे हीच भावना निर्भयता प्राप्त करुन देणारी आहे.

श्रीतुकाराममहाराजांना देवाचाच खरा आधार होता. त्यांना पत्नीसुद्धा रोज टाकून बोलणारी भेटली होती म्हणतात.

परस्परांच्या विचाराने काळ परिस्थितिप्रमाणे शक्य तितक्या काटकसरीने दक्षतेने वागून हरिनामस्मरणपूर्वक प्रपंचाचा गाडा हांकण्याचे काम करीत राहावे. **कोणीही कांही नेत नाही कोणीही कांही देत नाही. 'हरिर्दाता हरिर्भोक्ता'** अशी स्थिति आहे. निर्भयपणाने व शांत चित्ताने व्यवहार चालू असावा.

***

## पत्र ६

श्री-----चे पत्र फारच निराशेचे आले होते. प्रपंच म्हणजे सुख आणि दु:ख यांचे संमिश्रण आहे. उलट श्रीतुकाराममहाराज तर म्हणतात की,

**सुख पहाता जवापाडे । दु:ख पर्वता एवढे ।**

अशी स्थिति आहे. कारण खरे सुख देणारे थोडेच भेटतात. स्वार्थाकडेच पहाणारे म्हणून दु:ख देणारेच अधिक असतात. अशाही स्थितीत श्रीतुकाराममहाराजांच्या सारखे कशामुळे शांत राहिले? तो स्वत:चाच अनुभव ते लिहितात -

**तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ ।**
**तेणे सुखी राहू सर्व काळ ।.....**

ही संतांची वाणी न विसरता ईश्वराचे नामस्मरण करीत राहण्यानेच मनुष्यजीवन सर्व काळ सुखी होते. आपले लक्ष भगवंताकडे आहेच. त्याच्याच कृपेने सर्व चिंता दूर होतील. काळजी करु नये. शांत चित्ताने ईशस्मरणपूर्वक कर्तव्य करीत असावे. सर्व प्रेमाच्या मंडळींनी

**एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ।**

ही संतांची आज्ञा पाळून कल्याण साधावे.

***

## पत्र ७

चि ---- ची भेट झाली. डॉक्टर व्हावे अशी त्याची इच्छा आहे. या व्यवसायांत अर्थार्जन बऱ्या प्रमाणात होऊ शकते. पारमार्थिक दृष्टीने भूतदया, परोपकार या गुणांचाही अभ्यास होणे शक्य आहे. आपणांस मात्र ४-५ वर्षे हा शिक्षणाचा खर्च चालविण्यास प्रयास पडतील पण भावी काळाकडे लक्ष देऊन ईशस्मरणपूर्वक प्रयत्न करावा. परमात्मा कृपा

करील. **चांगला संकल्प करुन प्रयत्न करीत राहावे म्हणजे परमात्मा त्याचे यश खात्रीने देतो.** प्रार्थना रोज चालू असावी. सर्व कल्याण होईल. काळजी नसावी.

***

## पत्र ८

निराश न होता धैर्याने राहून प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे. ईश्वरप्रार्थना, जप श्रद्धेने चालू ठेवावा. ईश्वरकृपेने सर्व प्रतिबंध दूर होऊन अनुकूलता निर्माण होईल काळजीचे कारण नाही. सर्वांनी प्रेमाने, शांततेने, एकीने कार्य करीत असावे म्हणजे ईशकृपेने यश मिळून समाधान होईल.

***

## पत्र ९

१३.१२.१९६७

तूर्त भूकंपाचे धक्के सर्वत्र चालू आहेत. तिकडेही असेच झाल्याचे वृत्तपत्रांत आले आहे. वाकीस (गांवाचे नांव) कांही त्रास झाला का? परमात्मा सर्व रक्षक आहे, त्याची प्रार्थना करीत जीवनयात्रा चालविणे कल्याणकारक आहे.

**अहंकाराचा वारा न लागो राजसा ।**
**माझीया विष्णुदासा भाविकांसी ।..**

ही श्रीनामदेवरायांची प्रार्थना उपदेशपर अशी आहे.

**ऐहिक व पारमार्थिक जीवनांत अहंकार प्रतिबंधक आहे. पतिपत्नी, पितापुत्र, स्वामीसेवक व सर्व प्रेमाची नाती असूनही अहंकार त्यांना विभक्त करुन दु:खात लोटतो. अहंकारामुळेच राष्ट्राराष्ट्रातून युद्धे उद्भवतात, सर्व जनता असुखी होते. जीवन क्षणभंगुर आहे हे**

**भूकंपासारख्या धक्क्यांनी कळूनही आमचा अहंकार जात नाही मग ईश्वराचे दर्शन करण्याची पात्रता कशी येणार ? परमात्मा दयामय आहे. त्याच्याच कृपेने जीव निर्दोष होऊन उद्धरुन जाईल.**

***

## पत्र १०

ईश्वरप्रार्थना, जप श्रद्धेने नित्य चालू ठेवावा. व्यवहारातही सर्वांबरोबर प्रेमाने वागण्याचा प्रयत्न असावा. म्हणजे कोणताही संघर्ष न होता चित्ताला समाधान मिळेल. इतरही सर्व बंधूंना तुमचे मार्गदर्शन असावे म्हणजे त्यांचेही समाधान राहील. असा व्यवहार परमार्थ सांभाळून वागण्याचे ठरविल्यास शांतिलाभ होईल. काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ११

आपले विहीरीचे बांधकाम ईशकृपेने पूर्ण झाल्याचे वाचून समाधान वाटले. पाणी व जमीन यांची मालकी ईश्वराने आपणांस दिली आहे. ही स्थिर देणगी आहे. याच्या बळावर धान्य, धन, पशू, कीर्ति या सर्वांचाही लाभ ईश्वरप्रसादाने आपणांस घेता येणे शक्य आहे. **ईश्वराचे देणे स्थिर व विपुल असते. मानवाचे देणे अल्प व अस्थिर असते. ही खात्री ठेवून ईशस्मरणपूर्वक प्रयत्नबलाने आपली इष्टसिद्धि निश्चित होणारी आहे.**

**फक्त अनुकूलता नसलेल्या वेळी जी ईश्वरविषयी भावना तीच पूर्ण अनुकूलता सर्व प्रकारची लाभल्यावरही कायम राहिली पाहिजे. हीच खरी ईश्वराची कृपा आहे. संपत्ति मिळाल्यावर ईश्वराची अखंड स्मृति राहाणे हे फार मोठे भाग्य आहे. म्हणून खऱ्या भक्तांना ईश्वर संपत्तीच्या मोहात पाडत नाही आणि त्यांनाही निर्वाहापुरत्या अन्न आच्छादनाचीच**

अपेक्षा असते. स्वत:च्या देहाचीही मालकी जीवाला दिसून येत नाही. तर देहाचा ताबा असलेल्या शेती वाडीची मालकी जीवाची कशी ठरणार? म्हणून 'दाता एक रघुनंदन' हाच खरा विश्वाचा मालक आहे हीच दृष्टि शांतिदायक ठरते.

***

## पत्र १२

चि. हर्षल याला लहान वयात येथे दूर ठेवण्यापेक्षा तेथे नगरला सोय असल्यास पाहणे बरे. मध्ये मध्ये समक्ष भेटून लक्ष ठेवता येईल. विचार करुन ठरवावे. आपणास सुट्टी असल्याने आपण दोघांनी स्वतंत्र वेळ काढून त्याचा अभ्यास लक्षपूर्वक करुन घेतल्यास काळजी राहणार नाही. ईश्वरप्रार्थना, मंत्रजप नित्य श्रद्धेने चालू ठेवावा. ईश्वरकृपेने संकटपरिहार होऊन कल्याण होईल.

***

## पत्र १३

आपल्या पत्रावरुन आपणांस मानसिक त्रास बराच होत असल्याचे समजून वाईट वाटले. श्री--- रावांनी लक्ष घालून सहाय्य केले पाहिजे. त्यांनी सध्या वाडीस येणे रहित करुन वाटल्यास सुट्टीत सर्वांनी जामखेडला जावे. तेथील मंडळींचीही इच्छा पूर्ण होईल.

राजीनामा देणेची गडबड करु नये. मुख्य अधिकाऱ्यांना आपण समक्ष भेटून वस्तुस्थिति त्यांना सांगावी व जामखेडला बदलीचा प्रयत्न करावा. ईश्वरप्रार्थना नित्य करीत असावे. ईशकृपेने संकटपरिहार होऊन जाईल काळजीचे कारण नाही. कर्मभोग संपून जाईल. कांही काळ सहन करावे.

***

## पत्र १४

आयुष्मान् वधूवरांचा संसार अमृतमय करणेबद्दल विश्वपालक सद्गुरुस्वरुप श्रीपरमेश्वराजवळ प्रार्थना आहे. आयुष्मान् वधूवरांना मंगल आशीर्वाद.

***

## पत्र १५

आपली व मुलांची शाळा सुरु झाली असेल. तिकडे लक्ष देऊन मुलांचे अभ्यासाचे कडेही लक्ष देत असावे. म्हणजे त्यांचाही अभ्यास चांगला होईल.

***

## पत्र १६

श्री --- रावांच्या मोठ्या मुलाचे अपघाती देहावसान झाल्याचे समजून वाईट वाटले. आईबापांना हा मोठाच दुःखाचा धक्का बसला. ईश्वरेच्छेपुढे इलाज नाही. **विवेकाने दुःख कमी करण्याचा प्रयत्न करुन इतरही पोष्य वर्गाचे सांत्वन करुन प्रत्येकाकडे लक्ष दिले पाहिजे.** काळच दुःख कमी करणारा आहे. --- आम्हीही दुःखात सहभागी आहोत.

***

## पत्र १७

नोकरी सोडण्याचा विचार मनांत ठेवू नये. प्रपंचाला ते चांगले सहाय्य आहे. हा विचार करावा. पूर्वीप्रमाणे सहनशीलतेने कर्म करावे.

***

## पत्र १८

विवेकाने दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करुन ईश्वरप्रार्थना, नामस्मरण, संतांच्या ग्रंथांचे सवडीने वाचन चिंतन करीत असावे. याने ईशकृपेने सर्व प्रतिबंध दूर होऊन चित्तास शांति मिळेल.

कर्ज काढतांना सर्वांनी मिळून काढले असते म्हणजे एकावरच ते फेडण्याची जबाबदारी पडली नसती. कर्जही झाले, मुलगाही बिचारा जाऊन दु:ख झाले. प्रारब्धभोग आहे. ईश्वरकृपेने तो संपून जाईल. इतर सर्वांनी या वेळी आपली परिस्थिति दु:ख पाहून कर्ज फेडीलाही सहाय्य केले पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. याची जाणीव त्यांना झाली पाहिजे. **प्रसंग सर्वांवरच येतात. अशा वेळी ईश्वरास स्मरुन 'एकमेका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ' ही परोपकारी वृत्ति ठेऊन वागल्यास ईश्वरकृपा होते.** परमात्मा दयाळू आहे. त्याचे स्मरण प्रार्थना नित्य ठेवून निराश होऊ नये.

दिगंबरा --- दिगंबरा महामंत्राचा जप एकंदर सव्वा लक्ष करणेचे ठरवून सवडीने होईल तितका रोज करीत जावा. सर्वांनी मिळून थोडा थोडा केल्यास जपसंख्या लवकर पूर्ण होईल. ईश्वरकृपेने सर्व विघ्नांचा परिहार होऊन कल्याण होईल. काळजीचे कारण नाही.

***

## पत्र १९

कोजागिरी पौर्णिमेच्या अंकात (श्रीवासुदेव निवास त्रैमासिक) श्रीदत्तकवच छापले असून त्यातच पुढे संकल्पही छापलेला आहे. तो आपण पाहिलेला दिसत नाही. त्याप्रमाणे संकल्प करुन कवच पठण करावे. ईशकृपेने कार्यसिद्धी होईल. काळजी नसावी.

***

## पत्र २०

आपल्या श्रीमाताजींचे देहावसान झाल्याचे वाचून वाईट वाटले ईश्वरेच्छेपुढे इलाज नाही. त्यांनी सर्वांना सांभाळले. आपणा सर्वांचे एव विशुद्ध प्रेमाचे छत्र नाहीसे झाले. इलाज नाही. विवेकाने दुःख कमं करण्याचा प्रयत्न करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे. त्यांन सद्गति देणेस परमात्मा समर्थ आहे. आम्ही दुःखात सहभागी आहोत

***

## पत्र २१

**प्रपंचात काटकसर, शिल्लक असणे जरुर आहे.**

***

## पत्र २२

**साधनाभ्यास श्रद्धा, प्रार्थनापूर्वक नित्य चालू असल्यास स्पर्शदीक्षेची आवश्यकता नाही. अनेकांचा अनुभव आहे.**

***

## पत्र २३

आपण प्रत्येक गुरुवारी नामस्मरण भजनादि उपासना सुरु केल्याचे वाचून समाधान वाटले. **प्रपंचात राहून कांही पारमार्थिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करण्याकरताच मनुष्यजन्म ईश्वराने दिला आहे याची जाणीव प्रत्येकाने ठेवून यथाशक्ति उपासना चालू ठेवणे हिताचे आहे** ईशकृपेने आपली सर्वांची मिळून उपासना चालू आहे हे आपले पूर्वसुकृत व ईशकृपेचे द्योतक आहे.

***

## पत्र २४

श्रीकृष्ण बलरामजी आपल्या मातापित्यांच्या दर्शनार्थ गेले असता त्यांच्या पिताजींनी ''तुम्ही ईश्वरच आहात सर्व कर्तृत्व आपलेच आहे'' अशी स्तुति केली असता श्रीकृष्ण त्यांना म्हणाले की आमच्या एखाद्याच्याच ठिकाणी ईश्वरभावना ठेवण्यापेक्षा हे सर्व विश्वच ईश्वररुप आहे हा भावनाभ्यास ठेवावा. **''सर्वं खलु इदम् ब्रह्म''** **''जे जे भेटीजे भूत । ते ते मानिजे भगवंत''** असे श्री ज्ञानराजही सांगतात.

***

## पत्र २५

**सद्‌विचारांचे अंतिम फळ समाधान हे आहे.**

***

## पत्र २६

कोणताही मार्ग चांगला किंवा वाईट हे केवळ बुद्धिवादाने कोणासही व्यवस्थित निश्चित ठरविता येणार नाही. नाही तर बुद्धिवादातही मतभेद दिसले नसते. **संतमहात्म्यांच्या लेखनाचा, आदेशाचा पूर्ण विचार करुनच योग्य ते समजणे व तसे आचरण घडणे, निर्णय होणे शक्य आहे.**

***

## पत्र २७

लिहिलेला अनुभव चांगला आहे. **श्रद्धेबरोबरच चिकित्सा असली तरी ती शास्त्र व संत महात्मे यांच्या सांगण्याप्रमाणे असणे बरे म्हणजे ती अंधश्रद्धा, कल्पना ठरत नाही.** नाही तरी साक्षात्कार होईपर्यंत केवळ मनानेच सर्व साधनाभ्यास घडतो. ध्यान, नामस्मरण, प्रार्थना हे सर्व

मनावरच अवलंबून राहाते. समाधिसिद्धिनंतर साक्षात्काराची वेळ येते त्यानंतर सर्व संदेह, भीति वगैरे विकार पूर्ण दूर होतात. तोपर्यंत शब्दप्रमाण हीच ईश्वराज्ञा मान्य करुन सर्व मानसिक कार्य श्रद्धेने करावे लागते. **चिकित्सा-प्रधानवृत्तीने श्रद्धा कमी होणेचा संभव आहे.** म्हणून फोटो पहात असताना एकदम दिवे जाण्याने आपणांस भीति बाळगण्याचे कारण नाही. ईश्वराच्या भीतीने वागल्यास चित्तातील विकार दूर होऊन पुढे प्रगतीही होते. पापभीरुता हा मुख्य गुण मनांत निर्माण होतो.

***

## पत्र २८

सध्या आपला चालू असलेला गायनाभ्यास भक्तियोगास पोषकच आहे. तशी भक्तिगीते शिकविणे म्हणजे स्वत:च्या व दुसऱ्यांच्याही चित्ताला शांति प्राप्त करुन देता येते. नृत्यकला ही भगवत्‌प्रिय आहे. तोही अभ्यास तुमचा चालूच आहे. नृत्याचे वेळीही गायन असतेच.

प्रकृति बरी आहे. कांही कर्मभोग अपरिहार्य असतोच तो भोगून संपून जाईल.

**एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा ।**
**हरिकृपे त्याचा नाश आहे ।**

या संतवचनावर विश्वास मात्र पाहिजे.

***

## पत्र २९

ईश्वराविषयी असणारी आपली श्रद्धा, भक्ति, कृतज्ञता यांचे फळ आपणांस मिळत राहणारे आहे, हेच शिकविण्याकरीता प्रपंच आहे. विशुद्ध ईश्वरप्रेमदृष्टि पूर्वसुकृतानुसार ईशकृपेने मिळाली असता प्रपंचातील

आनंदाचा अनुभव घेता येतो. इतरांचे मतभेद लक्षातही रहात नाहीत आणि

**'कोणाही जीवाचा न घडो मत्सर ।**
**वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे ।'**

ही भूमिका प्राप्त होऊन पूर्ण शांतिलाभ होतो. ईश्वरप्रार्थना, नित्यस्मरण, कृतज्ञता हे गुण केवळ एक जन्मातच नाही तर पुढील अनेक जन्म पूर्ण कल्याण करणारे असतात असा संत महात्म्यांचा दृढ विश्वास व आदेश आहे.

***

## पत्र ३०

आपले निराशेचे पत्र मिळाले. जगांत दुःख भरलेले आहे, हे दुःख भोगताना वाटणे साहजिकच आहे. पण त्यांत तरतमभाव पाहून समाधान मानता येते. प्रत्यक्ष, अनुमान, शब्द प्रमाणांनी जगातील आपल्यापेक्षा दुःखी माणसे किती हे समजून येते. त्यांच्यापेक्षा आपले दुःख कमी असल्याचे समजून आल्यास समाधान होऊ शकते. या करीता श्रीज्ञानराजांचा महान ग्रंथ आपल्या वाचनांत आहे. त्या सर्व भावंडांना किती मानापमान दुःखातून जावे लागले हे प्रसिद्धच आहे. तथापि, ईशगुरुभक्तीने, विवेकप्रधानवृत्ति ठेवून त्यांनी स्वतःची दुःखे विसरुन जगाला मार्ग दाखविण्याचेच काम शेवटपर्यंत केले. त्यानेच चित्तशांति मिळवून ते धन्य झाले. ---सुविद्य, सुशील व्यक्तीने निराश न होता ईश्वराची, संतांची चरित्रे वाचणे, ईशकृपेने विवेकशक्ति मिळाल्यास संतवाङ्मयाचे अनुसंधान करीत राहणे, ईशशक्तीचे नित्य अनुसंधान ठेवून काल घालविल्यास, पूर्वसंचितानुसार प्राप्त झालेले भोगणे सह्य होऊन संपून जाते. कारण जगांत सुखाप्रमाणे दुःखही संपून जाणारेच आहे. फक्त धीरवृत्ति ठेवून ती प्रतिक्षा केली पाहिजे. **विवेकी व्यक्ति**

**निराश कधीच होत नाही.** श्रीरामप्रभूंनी चौदा वर्षे वनवास भोगला. पांडवांनी तेरा वर्षे भोगला पण तो शेवटी संपून गेला हाही विचार केला पाहिजे.

**'दुःखेषु अनुद्विग्नमनः'**

हे साधकाचे साधन आहे. त्याकरीता प्रयत्न केला पाहिजे.

***

**पत्र ३१**

शुध्द संकल्पाचे फळ ईश्वरकृपेने निश्चित मिळते.

***

**पत्र ३२**

साधनाभ्यास रोज सवडीने चालू ठेवणे हितावह आहे. ईशकृपेने प्रगती होत राहील.

***

**पत्र ३३**

१९.७.१९९२

**बैठकीस बसताना " दिगंबरा " या महामंत्राचा जप सावकाश शांतपणे थोडा वेळ करून बैठक करावी.** ईशकृपेने एकाग्रता, शांति लाभेल. ईश्वरप्रार्थना नित्य श्रद्धाभक्तीने चालू ठेवावी. कल्याण होईल.

***

**पत्र ३४**

३१.१२.१९९३

ईश्वरप्रार्थना, दिगंबरा मंत्राचा जप यथाशक्ति संतांच्या ग्रंथांचे वाचन चालू ठेवावे. ईशकृपेने चांगले मार्गदर्शन मिळेल. चित्तशांति मिळेल.

***

## पत्र ३५

४.७.१९९२

येथे आश्रमात श्री प. प. श्रीवासुदेवानंदसरस्वतीटेंबेस्वामीमहारांजांचा पुण्यतिथि महोत्सव नुकताच पार पडला. वाडी, गरूडेश्वर येथेही मोठ्या प्रमाणावर हा उत्सव होतो. ईश्वरकृपेचे हे फळ आहे. आज ७०, ८० वर्ष प्रतिवर्षी ठिकठिकाणी उत्सव चालू आहे, **तपाचा प्रभाव आहे.**

***

## पत्र ३६

७.३.१९९२

श्रीमहाराजांचे संकल्पाप्रमाणे येथील सर्व कार्य निर्विघ्न व्यवस्थित चालू आहे. अशा प्रसंगाने आपणासारख्या सच्छिल ईशकृपापात्र साधकांची भेट होण्याचे समाधान ईशकृपेने आम्हाला लाभले.

***

## पत्र ३७

८.१०.१९९३

या वर्षी आठ दिवसच नवरात्र दातेपंचांगाप्रमाणे आहे. ईशकृपेने हे वार्षिक उपासना कार्य व्यवस्थित पार पडावे अशी प्रार्थना आहे. पुढे श्री गुरुव्दादशी प्रसादाकरिता वाडीस जाणेची इच्छा आहे. प्रभूचे इच्छेप्रमाणे काय घडते पहावे. कळावे.

***

## पत्र ३८

१०.११.१९९०

ईश्वरप्रार्थना करून विचार शांतचित्ताने करून काय ते ठरवावे.

**सहसा विदधीत न क्रियां अविवेकः परमापदां पदम्।**

या प्रमाणे गडबड न करता पूर्ण विचार करून निर्णय घेणेचे ठरवावे. आत्ताही आपली उपासना यशाशक्ति चालूच आहे. ईश्वरकृपेने ती वाढीस लागेल. काळजी न करता ईशप्रार्थना चालू ठेवावी. सर्व कल्याण होईल.

***

## पत्र ३९

१८.१०.१९९१

आपली सात सप्ताह पारायणांची सेवा पूर्ण झाली. अशा पुण्यकर्मांने दुरितक्षय होत राहून चित्ताला शांति मिळते. ईश्वरप्रार्थना नित्य चालू असावी.

***

## पत्र ४०

९.९.१९९१

रोज रात्री झोपताना प्रार्थना करून ''श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव- --- घोरात् कष्टात्'' या स्तोत्राचे ५ पाठ शांतपणे करुन झोपावे. श्रीकृपेने क्लेश दूर होतील.

***

## पत्र ४१

५.८.१९९१

आमचा तुर्त मुक्काम प्रकृतीमुळे व कार्यव्यग्रतेमुळे येथेच आहे. डॉक्टरांचे सांगण्याप्रमाणे विश्रांती पूर्ण मिळत आहे. वयोमानाप्रमाणे वाढता अशक्तपणा आहे. हे नैसर्गिक आहे.
ईशगुरुकृपेने स्नानसंध्यादि सर्व कार्य यथाशक्ति चालू आहे. आश्रमातही दुपारी दोन तास जाऊन दर्शन घेऊन येतो.

***

## पत्र ४२

आपली सव्दासना ईश्वरदत्त आहे. उपासना निराश न होता श्रद्धेने चालू ठेवावी. ईशकृपेने कार्यसिद्धि होईल. चिंता नसावी.

***

## पत्र ४३

१७.५.१९८३

आपली उपासना दृढ चालवावी. ईशकृपेने कल्याण होईल काळजी नसावी. काशीस एका मूर्तिप्रतिष्ठेकरता येत्या २५ तारखेला जाणेकरिता निघायचे आहे. याच वेळी त्रिस्थळी यात्रा करून येणेचा मानस आहे. **जीवनांतील ते आवश्यक कर्तव्य ईशगुरूकृपेने पार पडल्याचे समाधान लाभेल.**

***

## पत्र ४४

कर्तव्य करीत असावे. सर्व सत्ताधीश परमात्मा आपणाकडून सेवा करुन घेईल. काळजी नसावी.

***

## पत्र ४५

तात्पर्य देवाचे नित्य स्मरण ठेवावे.

***

## पत्र ४६

१७.११.१९९४

दक्षिणा मिळाली. सर्व दक्षिणा कशाला पाठविली. तुम्हालाही वाडी वगैरे क्षेत्रात महापूजा, अन्नदान, इ. मोठा खर्च करावा लागतो. सध्या महागाई फार आहे. आमच्याबद्दल प्रेम, आदर, श्रद्धा आली आहे याचेच आम्हाला समाधान वाटते.

***

## पत्र ४७

१०.९.१९९४

प्रपंच साधून परमार्थाकडेही आपले लक्ष असल्याचे पाहून समाधान वाटते. हे पूर्वसुकृत व ईश्वरकृपा आहे.

***

## पत्र ४८

४.७.१९९६

आपण प्रकृतीस सांभाळून असावे. चांगले औषध व विश्रांती घ्यावी. पावसाची हवा आहे. जपून असावे. १ - २ दिवस स्नान करु नये. भस्मस्नान चालते. इकडे आमची दोघांची प्रकृति निर्दोष झाली नाही. वैद्य, डॉक्टर औषध चालू आहे. ईश्वराची इच्छा. असो, चांगले औषध प्रकृति निर्दोष होईपर्यंत घ्यावे व पूर्ण विश्रांती घ्यावी. त्याकरिता रजा घ्यावी लागली तरी घ्यावी. जपून असावे.

***

## पत्र ४९

२९.४.१९९४

आमची दोघांचीही प्रकृति हळू हळू सुधारत आहे. वैद्य, डॉक्टरांची औषधे चालू आहेत. कर्मभोग केव्हा संपतो पहावे देवाची इच्छा.

***

## पत्र ५०

१५.६.१९९५

आपण पाठविलेले राजापूरचे श्री गंगाजल तीर्थ मिळाले. श्रीगंगाजलाने देवांना अभिषेक करुन ते तीर्थजल सर्वांनी ग्रहण केले. श्रीनारायणस्वामी चरित्रात गुप्त झालेली गंगादेवी पुन्हा प्रगट झाली ही कथा प्रसिद्ध आहे. आपल्यामुळे हा लाभ घर बसल्या आम्हाला झाला, असो.

***

## पत्र ५१

५.११.१९८६

आपली ईशसेवा व्यवस्थित चालू असल्याचे समजून समाधान वाटले. कांही काळ प्रारब्धाने प्रतिबंध झाला तरी ईश्वरकृपेने तो दूर होतो. तळमळीने ईश्वरप्रार्थना नित्य केल्यास परमात्मा सर्व साधनाभ्यास करवून घेतो. यांत संशय नाही. काया वाचा मनाने जेवढी होईल तेवढी सेवा करावी. म्हणजे दुरितक्षय होऊन ईश्वरसान्निध्य घडून येते. आपणांस तशी सव्दासना ईश्वरकृपेने मिळाली आहे. त्याप्रमाणे करावे.

***

## पत्र ५२

३.७.१९८०

ईश्वराने दिलेले धन त्याच्या कार्याकरिता मुक्तहस्ताने समाधानाने खर्च करणारी आपणासारखी धर्मशील सज्जनमंडळी ईश्वरकृपेस पूर्ण पात्र ठरणारी आहेत. पूर्वसुकृत आपले उत्तम असून या वेळेसही नित्य घडणाऱ्या सुकृताची त्यात भरच पडत आहे हे पाहून समाधान वाटते.

***

## पत्र ५३

२१.१२.१९८६

प्रपंच्यामध्ये सुख, दुःख, मान, अपमान हे व्दंव्द चालू असणारच. विवेकाने तिकडे दुर्लक्ष करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष देऊनच समाधान मिळविता येते. आदर अनादर या गोष्टी परिस्थितीवर अवलंबून असातात. तथापि योग्य व्यक्तीचा आदर यथाशक्ति केला पाहिजे. पण एखादे वेळेस चुकून तसे न झाल्यास आदरणीय व्यक्तीकडून उदार मनाने त्याची क्षमा केली पाहिजे. तरच समाधान मिळते.

**चित्ति असू द्यावे समाधान**

असे संतांचे सांगणे हितावह आहे. होऊन गेलेल्या अनुकूल प्रतिकूल गोष्टी तर विसरुन जाणेच कल्याण संपादक व शांतिकारक ठरते. नाही तर तोच तोच विचार मनांत ठेवल्यास चित्तशांति कशी मिळणार ? या करता संतांचे ग्रंथवाचनाने योग्य मार्गदर्शन मिळत राहाते व त्याचा शांतीला उपयोग होतो. उपास्य देवतेचे नामस्मरण, प्रार्थनाही समाधान देणारी आहे. **आप्तस्वकीय मंडळींचे दोष तर विसरून जाण्यानेच व्यवहार सुसंगत व्यवस्थित चालू राहातो. कुटुंबप्रमुखाचा स्वभाव तर अत्यंत सहनशील असला पाहिजे. नाही तर घरातील सर्वांची पोष्यवर्गाची मने उद्विग्न राहातात.** हाही विचार करुन

**गच्छत; स्खलनं क्वापि भवत्येव प्रमादत; ।**

**हसन्ति दुर्जनास्तत्र समादधति साधव; ।।**

याप्रमाणे वागून आपणही शांती मिळवावी व इतर पोष्यवर्गालाही सुखी करावे. हे कर्तव्य कुटुंबप्रमुखाचे मुख्य आहे. यापेक्षा अधिक काय लिहावे ?

***

## पत्र ५४

३.६.१९९५

ईश्वरप्रार्थना, नामस्मरण नित्य चालू ठेवावे. प्रयत्नही उत्कर्षाकरिता अवश्य करावा. कल्याण होईल काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ५५

आपले पत्र मिळाले. तूर्त बदली झालेल्या ठिकाणी आपण आनंदाने समाधानाने राहात आहात हे योग्य आहे. आपले वडीलबंधूही बरेच दिवस बाहेरच होते. त्यांच्याप्रमाणे आता कांही दिवस आपणास बाहेर राहावे लागेल असे समजून राहिले म्हणजे झाले. श्रीलोकमान्यांना श्रीसावरकरांना तर अंदमानात, मंडालेत राहावे लागले. तोही काळ शेवटी संपलाच तसे आपलेही येणे पुन्हा चिखलीत होईलच. प्रभूचे स्मरण, प्रार्थना कोठे असेल तिथे चालू ठेवावी याने सर्व कल्याण साधणारे आहे. सर्वांना मंगल आशीर्वाद.

***

## पत्र ५६

१.७.१९९२

**रोज संध्या करुन गायत्री मंत्राचा जप एक माळ करावा. बुद्धि चांगली होऊन यश मिळेल. प्रयोग करुन पहावा. १५-२० मिनिटात सर्व होते. देवाचे प्रार्थनेने सर्व कार्यसिद्धि होते. विश्वास ठेऊन असावे.**

***

## पत्र ५७

तुमची परीक्षा होऊन पुढील अभ्यास सुरू झाल्याचे समजले. अभ्यास लक्षपूर्वक निरलसपणे करावा म्हणजे पुढील जीवनांत काळजी राहाणार नाही. घरच्या मंडळींनाही आधार होईल. हे ध्येय ध्यानांत ठेवावे. संध्या गायत्रीमंत्रजप ईश्वरप्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईशकृपेने यश मिळेल. काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ५८

२१.२.१९९८

ईश्वरप्रार्थनापूर्वक अभ्यासाकडे लक्ष द्यावे. परीक्षेत यश मिळेल, नोकरीचाही प्रयत्न करावा. आता आपल्या पिताजींना स्वतंत्र व्यवसाय करावा लागेल. ते श्रद्धावान असून प्रयत्नवादी आहेत. प्रयत्नांती परमेश्वर आहेच. ईश्वरप्रार्थना नित्य चालू ठेवावी. ईशकृपेने सर्व कल्याण होईल. आपल्या पू. सौ. मातोश्रींनी उगीच काळजी करीत बसण्याचे सोडून ईश्वर नामस्मरण करावे. सर्व प्रतिबंध दूर होऊन जातील. काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ५९

२१.८.१९८०

काळजी न करता प्रयत्न ईशस्मरण प्रार्थनापूर्वक चालू ठेवावे म्हणजे झाले.

***

## पत्र ६०

२१.८.१९९०

ईशकृपेने प्रारब्धभोग संपून जाईल. हळू हळू अनुकूल काळ येईल. नोकरी चालू ठेवावी. मुद्दाम आपणहोऊन सोडण्याचे कारण नाही. नोकरी सोडल्यास आर्थिक अडचण निर्माण झाल्यास प्रापंचिक चिंता अधिक निर्माण होईल तरी निराश न होता धैर्याने आतापर्यंत सहनशीलतेने जसे काम केले तसेच पुढेही चालू ठेवावे. शेतीकडेही होईल तसे लक्ष ठेवावे. ताब्यात शेती आहे चांगले आहे.

***

## पत्र ६१

३.१२.१९९६

विवेकाने दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे.

**प्रपंच्यात काटकसर शिल्लक असणे जरुर आहे** असे त्यांना सांगून आशीर्वाद सांगावा.

***

## पत्र ६२

२.१२.१९८८

**प्रपंच्यात राहून कांही पारमार्थिक कल्याण साधण्याचा प्रयत्न करण्याकरिताच मनुष्यजन्म ईश्वराने दिलेला आहे याची जाणीव प्रत्येकाने ठेवून यथाशक्ति उपासना चालू ठेवणे हिताचे आहे.** ईशकृपेने आपली सर्वांची मिळून उपासना चालू आहे हे आपले पूर्वसुकृत व ईश्वरकृपेचे द्योतक आहे.

***

## पत्र ६३

२२.१२.१९९२

सत्कार्य नित्य करीत असावे. कल्याण होते.

***

## पत्र ६४

२७.७.१९८६

दीक्षेनंतरही अभ्यास चालू ठेवावा लागतो हे आपणास विदित आहेच. कोणत्या गुरुंना आपण विचारणार असाल तर ते परवानगी देतील काय याचे उत्तर आम्हाला कसे देता येईल ? देव जशी बुद्धि देईल तसे वाटल्यास करावे.

***

## पत्र ६५

३.८.१९९०

ईश्वराची प्रार्थना नामस्मरण, जप श्रद्धेने नित्य चालू ठेवावा व्यवहारातही सर्वांबरोबर प्रेमाने वागण्याचा प्रयत्न असावा म्हणजे कोणताही संघर्ष न होता चित्ताला समाधान मिळेल. सर्व बंधूंना तुमचे मार्गदर्शन असावे म्हणजे त्यांचेही समाधान राहील असे व्यवहार परमार्थ सांभाळून वागण्याचे ठरविल्यास शांतिलाभ होईल काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ६६

१८.२.१९९१

ईश्वरकृपेने सर्व संकटपरिहार होईल काळजी नसावी. **श्रीदत्तः शरणं मम** या मंत्राचा जप श्रद्धेने दोघांनीही सवडीने रोज पांच माळा चालू करावा. ईशकृपेने सर्व ठीक होईल. धैर्याने तेथेच स्थिर राहाणेचा प्रयत्न करावा. हाही प्रतिकूल काळ संपून जाईलच निराश होऊ नये. ईश्वरप्रार्थना स्मरण नित्य चालू असावे.

***

## पत्र ६७

३१.१२.१९७३

नगर जवळ सोनई येथे श्री रेणुकाश्रमात देवीयाग ८ तारखेपर्यंत आहे तो आटोपून देऊळगांवी जात आहे. तेथून अवसर नसल्यास लगेच नागपूरला जावे लागेल. या निमित्ताने कांही स्थळांचा शोध लागल्यास प्रयत्न करणेची इच्छा आहे. **यश हे भगवदिच्छेनुसारच मिळणार.**
येथे श्री महाराजांची (''श्री महाराज म्हणजे प.पू.श्री. गुळवणी महाराज'') प्रकृति वयोमानाप्रमाणे थोडी अस्वस्थ आहे. पूर्ण विश्रांती पाहिजे. भोग आहे. काळजीचे कारण नाही. क. प्रेमछत्र असावे.

***

## पत्र ६८

१०.५.१९७३

आपल्या सौ. मातोश्रींचा वृत्तांत (आजारपणाविषयी) वाचून विषाद वाटला. प्रारब्धभोग अपरिहार्य असला तरी भगवान भयकृत् व भयनाशनही आहेत. आपण सर्वांची ईशगुरुभक्ति आपणास तारक होणारी आहे यांत संशय नाही.

***

## पत्र ६९

आमच्याही कन्येचे अद्यापि कोठे जमले नाही. प्रयत्न चालू आहे. ईशेच्छेने वेळ केव्हा येते पहावे. अकोल्यास उत्सव समयी झालेल्या आपणा सर्व प्रेमळ सज्जनांच्या सहवासाचे स्मरण वारंवार होते. पुन्हा तिकडे (अकोल्यास) येणेचा योग केव्हां आहे पाहू. उपनिषदांवर प्रवचने व्हावीत श्रीमान् पारस्करांचा मानस त्यांनी बोलून दाखविला ते सवडीने ठरेल. कुलकर्णी यांनीही भागवत सप्ताहाबद्दल विचारले होते. ईशेच्छेने

सर्व घडून येणारे आहे. धर्मभावना व सक्रिय प्रेमशीलता विदर्भ प्रांतात असलेली पाहून समाधान वाटले.

***

**पत्र ७०**

११.३.१९७३

सर्वांची प्रसन्न वृत्ति पाहून समाधान वाटले. गृहस्थाश्रमाचे मुख्य कर्तव्य आतिथ्य हे तर आपल्या घरी मूर्तिमंत व अकृत्रिम असे दृष्टीस पडते. ही ईश्वरकृपा आहे. याच कृपेचे फळ म्हणजे श्रीगुरूभक्तीही आपण सर्वांचे ठिकाणी आहे हे कल्याणावह आहे. ईशकृपेने आपल्या विशुद्ध आत्मीयतेचा लाभ आम्हालाही झाला.

***

**पत्र ७१**

८.७.१९७४

ईश्वररुपाने श्रीमहाराजच सर्वत्र कृपादृष्टि ठेवून कार्य करुन राहीले आहेत यात शंका नाही.

***

**पत्र ७२**

१३.६.१९९२

प्रपंचात असूनही प्रथम पारमार्थिक कार्य व्यवस्थितपणे करण्याची व्यवस्था आपण केली ही आपली सत्कर्माची आवड प्रशंसनीय ईशगुरुकृपासंपादन ठरणारी आहे हे पूर्वसुकृत आहे. वित्तशाठ्य नाही. आपणाकडून नित्य अशी पुण्यकर्मे ईशगुरुकृपेने घडत असतात. पूर्वसुकृत उत्तम आहे.

***

## पत्र ७३

२.१.१९९४

सेवानिवृत्त होऊन या पुढे वाडीला राहून ईशसेवा निष्काम बुद्धीने करण्याचा आपला सत्यसंकल्प प्रशंसनीय आहे. ईशकृपेने तो पूर्ण होईल यात शंका नाही. कोणतेही अनुष्ठान निष्काम बुद्धीने करणे असल्यास
**ममोपात्तदुरितक्षयव्दारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थम्**
इतका संकल्प पुरे आहे. श्रद्धेने सात्विक आहार विहार ठेवून नित्य चालू ठेवले म्हणजे झाले. यापेक्षा अधिक कांही नाही.

***

## पत्र ७४

११.११.१९८९

विवेकाने दु:ख आवरुन पोष्यवर्गाचे सांत्वन करण्याचा प्रयत्न करुन प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे. विवेक आणि काळच दु:ख कमी करणारा आहे. ते स्वनाम धन्य होते. त्यांना उत्तम गति देणेस परमात्मा समर्थ आहे.

***

## पत्र ७५

१८.१.१९८१

संन्यासी, महात्मे, सिद्ध भूमिकेवरील महापुरुषांच्या कृपाप्रसादाने दुरितक्षय होऊन उन्नतीचा मार्ग मोकळा होतो हे खरे आहे पण कांही उत्कट प्रारब्ध भोगूनच संपवावे लागते.

***

## पत्र ७६

आपण थोडा कठोरपणा धारण केला पाहिजे. त्याशिवाय विरोधी पक्षावर परिणाम होणार नाही. घरी देवाची प्रार्थना करीत राहून शांत राहणेचा अभ्यास ठेवावा. पण एखाद्या उत्तम वकिलांकडून त्याच्या सर्व अपकृत्याचे मुद्दे लिहून त्याला वकिलाकडून नोटीस द्यावी म्हणजे त्याचे उद्योग बंद होतील. **मनांतून व्देष सोडावा पण बहिरंग व्यवहार सुरळीत चालण्याकरिता कठोरपणाने वागले पाहिजे.**

**ये येधा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।**

असे भगवान सांगतात. **आपले प्रारब्ध देवालासुद्धा नेता येत नाही.** काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ७७

आपली इच्छा व सवड असल्यास गायत्री मंत्राचा जप अधिकही करण्यास हरकत नाही. याने उत्तम आरोग्य लाभेल. प्रभूची प्रार्थना, नामस्मरण चालू ठेवावी याने प्रारब्धदु:खाचा परिहार होऊन शांति मिळेल संध्या, गायत्रीजपसाधना नित्यप्रार्थनापूर्वक करीत असावे हे सर्व कर्त्याला पोषक आहे.

***

## पत्र ७८

१७.६.१९८३

आपल्या वास्तूत राहणे पादुकापूजा भोजन इ. सर्व पाहून समाधान झाले. आपली सपरिवार धर्मभावना ईशगुरुभक्ति पहाण्यास मिळाली हेच खरे कल्याणकारक साधन आहे.

***

## पत्र ७९

हा भागवत सप्ताह श्रीभगवत्सेवा म्हणून यथामति करणेचा आहे. श्रद्धा व जिज्ञासा श्रोत्यांची असली म्हणजे झाले. परमात्मा सर्व पार पाडणेस समर्थ आहे.

***

## पत्र ८०

उगमाजवळ नदी लहान वाटत असली तरी ती पुढे अनेक नद्या मिळून मोठी झालेली दिसते. **ईशशक्तिवर विश्वास ठेवून नित्य अनुष्ठान प्रार्थना सकाळी लवकर उरकून उद्योगाला लागावे.** परमात्मा सर्वज्ञ सर्वशक्तिसंपन्न दयासागर आहे. धैर्य व विश्वास ठेवून शांत रहावे.

***

## पत्र ८१

प्रपंचातील चढ उतार अनुभवाने आपणास समजले आहेत. अशा अवस्थेत निराश न होता कांही सहिष्णुता, विवेक, ईशप्रार्थना चालू ठेवून आपले व पोष्यवर्गाचेही चित्त शांत ठेवणेचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ निराशेचेच विचार नेहमी केल्यास प्रपंचही नाही आणि परमार्थही नाही अशी स्थिति आहे म्हणून धैर्याने ईश्वरप्रार्थना नित्य चालू ठेवून व्यवहारिक अनुकूलता प्रयत्नाने मिळवावी.

***

## पत्र ८२

कोणी कोणाचे दु:ख घेऊही शकत नाही. ज्याचा कर्मभोग त्यानेच भोगायचा असतो. ईश्वर सर्वांचा त्राता आहेच. त्याची प्रार्थना करीत राहाण्यातच कल्याण आहे. यापेक्षा अधिक काय लिहावे ?

***

## पत्र ८३

कांही काळ प्रतिकूल असतो. अशा वेळी स्वत: विचार करुन, इतर हितैषी मंडळींचेही विचार ऐकून त्याप्रमाणे निश्चय करुन वागल्यास यश मिळू शकते. मुख्य ईश्वरप्रार्थना, नामस्मरण सवडीने, अभ्यास सांभाळून चालू ठेवावे. ईश्वरकृपेने सर्व प्रतिबंध दूर होऊन कल्याण होईल. काळजीचे कारण नाही. सर्वही विषयांचा अभ्यास बराच आहे पण तो झालेलाच आहे. त्याची उजळणी करावयाची आहे. ईश्वरप्रार्थनेने सर्व ठीक होईल अशा श्रद्धेने अभ्यास दक्षतेने चालू ठेवावा.

***

## पत्र ८४

ईश्वरप्रार्थनापूर्वक साधनाभ्यास नित्य चालू ठेवणेचा प्रयत्न करणे हितावह आहे. **मध्ये मध्ये प्रारब्धाने विघ्ने येण्याचा, खंड पडण्याचा संभव आहे. तथापि ईश्वरप्रार्थना तळमळीने घडल्यास विघ्नपरिहार ईशकृपेने घडून साधनाभ्यास समाधानकारक होऊ शकतो. रोज रात्री निजण्यास आपल्याला बराच वेळ लागतो. यामुळे झोप पूरी होत नाही. याचा परिणाम दिवसभर अस्वस्थता राहाते. यात कांही बदल झाला पाहिजे. १० ते ५ पूर्ण झोप होऊन सकाळी बैठक होऊ शकेल. दहा पूर्वी जेवणे सर्वांची उरकल्यास आपल्या मंडळींचीही झोप पूर्ण होऊन साधना घडेल. प्रयत्न करावा.** नामस्मरणही आपल्या दोघांचे चालू आहेच. तेही पोषक कल्याणकारक आहे.

***

## पत्र ८५

बारावीचा अभ्यास, परीक्षा महत्त्वाची आहे. तिकडे लक्ष द्यावे. **अभ्यास निरलसपणे करावा.** ईश्वरप्रार्थनाही नित्य करावी.

***

## पत्र ८६

साधनाभ्यास यथाशक्ति चालू ठेवावा. कांही प्राचीन कर्म- प्रतिबंधामुळे मध्ये अडथळे येत राहतील. तथापि शांतचित्ताने भगवन्नामस्मरणपूर्वक पारमार्थिक, व्यावहारिक सर्व कर्तव्य करीत राहावे. सोसाट्याचा वारा असतांना डोळे झांकून कांही काळ राहीले असता तोही शांत होऊन जातो. समुद्रात भरतीच्या वेळी स्नान करताना डोके वर करीत नाहीत. मान खाली घालूनच थांबले म्हणजे त्या लाटा आपल्या डोक्यावरुन निघून जातात. आपल्याही नाका तोंडात पाणी न जाता स्नान व्यवस्थित होते, **विचारांनी सर्व साध्य होते.** ***

## पत्र ८७

सूर्यग्रहणांत गायत्रीजप होईल तितका करावा. उपनीत मुलांनीही करावा. संख्येचे बंधन नाही. म्हणजे पुरश्चरण होते. **बायकांनी व इतरांनी दिगंबराचा जप करावा.**

***

## पत्र ८८

गृहस्थाश्रम हा अर्थ, कामाप्रमाणे धर्मकार्य यथाशक्ति करण्याकरीताच आहे. **धर्मशून्य जीवन निष्फल आहे. पूर्वसुकृताची जोड याकरीता असावी लागते.**

***

## पत्र ८९

प्रत्येक जीव हा कर्मसूत्राने बांधला गेला असल्याने ईश्वरेच्छेनुसार त्याला आपल्या प्रिय मंडळींच्या सहवासाप्रमाणे वियोगदु:खही कांही काळ सहन करावे लागते.

***

## पत्र ९०

आपल्या सारख्या भगवत्भक्तांच्या व्यवहारज्ञानाचे मार्गदर्शनाने त्याचे कल्याण होईल. आपणही सर्व मंडळी प्रपंचात राहूनच निर्माणकर्त्याचे नित्य स्मरण ठेवून आहात हीच मानवजन्माची खरी सार्थकता आहे.

***

## पत्र ९१

यावच्छक्य ईश्वरार्पणबुद्धीने सत्कर्म करीत राहून मानवाने आपला उद्धार करुन घ्यायचा आहे. असा संकल्प असणाऱ्यास परमात्म्याचे सहाय्य लाभते.

***

## पत्र ९२

**सद्वासना, व्यावहारिक परिस्थिति व ईश्वरेच्छा अशी तीन कारणे एकत्र जमल्यास सत्कार्य घडून येते.**

***

## पत्र ९३

**माणसाने झोपेच्या आधीन न होता नित्य जागृत असावे, सावधान असावे.**

***

## पत्र १४

प्रभूचे चरणाजवळ मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पडले. प्रभूंची कृपा व आपणासारख्या प्रेमळ सज्जनांचे आत्मीयतेने झालेले सहाय्य हेच कार्यसिद्धि करणारे ठरले. परमात्मा अनंतशक्तिसंपन्न असून प्रपंच्याचा स्वामीही तोच आहे. अर्थात त्याची चिंता व्यर्थ वाहणे कितपत योग्य होईल?

**'वाहू हा संसार देवा पायी'**

या वृत्तीतच समाधान आहे. असो.

श्री दादा आता व्यक्तरुप टाकून अव्यक्तात गेले. आता आपण दोघांनीच परस्पर सौहार्द्र असलेलेच वाढवून एकमेकांचा परामर्श घेतला पाहिजे.

**धर्म अर्जुनाचे बंधूप्रेम आदर्शभूत प्रसिद्धच आहे. द्रव्यामुळे होणारे बंधू व स्वाभाविक प्रेमामुळे असणारे बंधू यात महदंतर आहे. वित्त श्रेष्ठ की बंधूप्रेम श्रेष्ठ या प्रश्नाचे उत्तर विवेकी व अविवेकी या दोघांच्या दृष्टीने भिन्न भिन्न आहे.**

**अखंड आत्मा अविनाशी दत्त ।**
**तया पदी लाविती जे स्वचित्त ।**
**वित्तभ्रमा सोडिती ते कृतार्थ ।**
**तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ।।**

**असे श्रीमहाराज सांगतात. द्रव्य अचेतन व अस्थिर आहे. शुद्ध प्रेम हे परमात्मस्वरुप आहे. तेच सांभाळून प्रपंच चालवावा यात श्री दादांचे आत्म्यास समाधान आहे.**

***

## पत्र ९५

घरातील व्यावहारिक उद्योग तर पुष्कळच आहेत. त्यात वडील मंडळींना त्याने मदत तर केलीच पाहिजे. शिवाय फावल्या वेळी कांही चांगल्या ग्रंथांचे वाचनही ठेवावे. याने सद्‌विचारप्रवृत्ति वाढून मनास समाधान लाभेल. **क्रोधादिक मनोविकार सद्‌विचारबलाने शांत होऊ शकतात. विचारी पुरुष हाच सुखी होऊ शकतो व इतरांनाही मार्ग दाखवू शकतो. याकरीता नित्य भगवत्प्रार्थना करुन सद्‌विचार संपत्तीचा संग्रह मनुष्याने अधिकाधिक केला पाहिजे कारण तो अन्य जन्मांतही उपयोगी पडतो.**

***

## पत्र ९६

आपली प्रेमळ उदारवृत्ति प्रशंसनीय आहे. पण त्याच वृत्तीमुळे प्रपंच्यात आपणास कष्ट भोगावे लागतात. तथापि **गृहस्थाश्रम हा नुसत्या माणसांचेच नव्हे तर पशूपक्षी इ. चेही पोषण करणारा आहे. फक्त परोपकार करण्याकरीताच आहे. विद्यार्थी, तपस्वी, संन्यासी, अनाथ इ. सर्व गृहस्थाश्रमावरच अवलंबून असतात.**

***

## पत्र ९७

**ईशसेवा सुरु केली हे चांगले झाले. सर्व संकटांचा परिहार करणारा हा एकच उपाय आहे. मनामध्ये वाईट विचार आले म्हणून उगीच चिंता कशाला? विहीर खणण्याचे वेळी माती, दगड, खडक सर्व कांही लागते. ते सर्व वर काढून टाकल्यानंतरच स्वच्छ टिकाऊ पवित्र पाणी मिळते. तोपर्यंत प्रथम चिखल काढावयाचा असतो. तो जरी अंगाला लागला तरी पाणी लागल्यावर त्या पाण्याने तो चिखल धुवून टाकून शरीर स्वच्छ करावयाचे असते. जितकी अधिकाधिक भगवत्‌उपासना**

**होत राहील तितकी चित्तशांति अनुभवास येते. दुःख, अशांति हे सर्व जन्मांतरातील पातकांचे फळ आहे. अशा वेळी उदास होऊन स्वस्थ न बसता ईश्वराचे नामस्मरण नेटाने करण्यातच तरणोपाय आहे.**

**नामसंकीर्तन साधन पै सोपे ।**
**जळतील पापे जन्मांतरीची ।।**

उन्हाळा असह्य असला तरी तो सहन केला पाहिजे. तोही शेवटी संपून पाऊस सुरु होताच शांति मिळते.

**संतांचे ग्रंथ वाचणे त्याप्रमाणे यथाशक्ति आचरण करणे इ. संसारातील संकटरुप उन्हाळा शमविणारे आहेत. विश्वातील लहान थोर सर्वही प्राणी आपापल्या कर्माप्रमाणे सुखदुःखावस्था भोगीत असतात. त्यात कोणाची काळजी कोणी करावी ? आणि ती करुन तरी उपयोग काय ? सर्व सुखी असावेत, सर्वांना सद्‌बुद्धि लाभावी अशी प्रार्थना फक्त ईश्वराजवळ करणे आणि आपल्या हिताकडे लक्ष देणे इतकेच मानवाने करावयाचे असते. दुसऱ्याच्या वर्तनाने, दुःखाने आपण दुःखी होण्यात व्यर्थ आयुष्याचा व्यय मात्र होतो.**

***

## पत्र ९८

श्रीगुरुचरित्राची सात दिवसांची पारायणे श्रींनी (गुरुभक्त) सर्व दोष परिहारार्थ करावीत. प्रकृतिस्वास्थ्य पूर्ववत् लाभून व्यवहार सर्व समाधानकारक चालू रहावा याकरीता श्री दत्तगुरुंची प्रार्थना करुन पाठ करावेत. जितके होतील तितके चांगले. **स्वस्थ बसून राहण्यापेक्षा हे काम करावे.** याने सर्व चिंता दूर होईल. काळजी करु नये.

**आयुष्य ही एक शेतीच आहे. उन्हाळ्यातही जमीन नांगरणे, बांध दुरुस्त करणे इ. कामे शेतकऱ्याने करुन जमीन उत्तम तयार ठेवावयाची असते. योग्य वेळी पाऊस पडतोच. लगेच बी पेरुन पुढील**

धान्योत्पादनाचे काम सुरु होते.

**असेच जीवनरुपी शेतीत यावच्छक्य "सत्कर्मयोगे वय घालवावे" ही नांगरणी वगैरे कामे चालू ठेवावीत म्हणजे योग्य वेळी ही हरिकृपारुप पर्जन्यवृष्टि होऊन जीवनशेती सर्व प्रकारे समृद्ध होते.**

धीरवृत्तीने राहून भगवच्चिंतन विश्वासानं करावे लागते. भगवत्प्रार्थनेत निमग्न असावे.

***

## पत्र ९९

आपणही आपला व्यवहार निश्चिंत मनाने करावा. ईश्वर पाठीराखा आहे. श्री (गुरुभक्त) नी घरी बसल्या बसल्या श्रीगुरुचरित्र सप्ताह वाचन तरी करीत राहावे. याने सर्व दोष दूर होतील. श्री शंकराचार्य, विवेकानंद सर्व-संगपरित्यागी संन्यासी होते पण त्यांनीही धर्मप्रचार आजन्म केला मग गृहस्थांनी स्वस्थ कां बसावे? विचाराने सर्व सुधारावे.

***

## पत्र १००

वास्तविक 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे' अशी पूजा सर्वांनी करण्याचा प्रयत्न करावा असे श्रीतुकाराममहाराज सांगतात. हीच पूजा मुख्य असून शांतिदायक आहे. **चावतांना दाताखाली जीभ सांपडली तर दांत वाईट की जीभ वाईट? काय मानावे? तर तो कांही काळापुरता आपला भोग आहे असे समजून सहनच केले पाहिजे. न्यायी माणसास पूर्ण यश आहे.**

**श्रीरामचंद्रांचे राज्य तेही चौदा वर्षांनंतर त्यांना अर्पण करणेचे आहे. ही बुद्धि ठेवून उत्तम दक्षतेने राज्य करुन ते श्रीरामास अर्पण करणारा भरत शेवटी खरा सुखी व श्रीरामांचा सर्वाधिकारीच राहिला. आणि याच्या उलट पांडवांचे कपटाने राज्य घेऊनही ते तेरा वर्षांनंतरसुद्धा त्यांना परत**

**देणेचे नाही अशी स्वार्थ बुद्धि ठेवणारे कौरव समूळ नष्ट झाले. राजे पांडवच झाले. ही उदाहरणे नेहमी लक्षात ठेवावी.**

***

## पत्र १०१

आपले मंडळींनी तूर्त साधनाभ्यास बंद ठेऊन केवळ नामस्मरण, मंत्रजप, दिगंबरा मंत्रजप असे प्रकृति सांभाळून चालू ठेवावे. हा ही भक्तियोग आहे. तोही उत्तमच आहे. आपणही शास्त्रज्ञांचे मार्गदर्शनाप्रमाणे औषध चालू ठेवावे.

कृष्णयजुर्वेदीय उपनिषद, तैत्तिरीयोपनिषद् आहे. अशौचात फक्त अर्घ्यांते मानसी संध्या करतात. इतर सर्व अशौच निवृत्तिनंतर होणे योग्य आहे. एकादशीस आपण जे घेतो ते नैवेद्य दाखवून घेणेस हरकत नाही. पाठ असलेले गीताध्याय म्हणणेस हरकत नाही. श्रद्धाभक्तीने शरीरप्रकृत्ति सांभाळून जे घडेल ते करावे. ते देवाला मान्य होईल. रुद्राची संथा घेतली असल्यास पोथीवरुन म्हणणेस हरकत नाही. श्रीवामननिवासाचे काम प्रकृतीस जपून चालू ठेवावे. ईशगुरुकृपेने योग्य ते घडेल.

***

## पत्र १०२

प्रारब्ध कर्माने आरोग्याला दोघांच्याही प्रतिबंध होत आहे. ईशकृपेने तो दूर होईल. काळजी नसावी. "पापं तापं....... घोरात्कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते" या श्लोक मंत्राचे एकंदर पंचावन्न हजार पाठ करण्याचा संकल्प प्रभूप्रार्थनापूर्वक दोघांनीही करुन रोज सकाळी संध्याकाळी वेळ सापडेल तेव्हा होईल तेवढे पाठ करून रोजची पाठ संख्या लिहून ठेवावी. प्रथम हे संपूर्ण स्तोत्र एक वेळ म्हणावे व नंतर वरील मंत्राचे पाठ सुरु करावेत. सौ. (गुरुभगिनी) ताईंनी टेकून बसून, पडून सुद्धा, पाठ

मानसिक केले तरी चालतील. ईश्वरकृपेने आरोग्य लाभ होईल काळजी नसावी. ताप असतांना सौ. (गुरुभगिनी) ताईंनी रोज स्नान करु नये. देवाचे स्तोत्र म्हणण्यानेही स्नानफळ त्यांना मिळेल. जपून वागावे.

***

## पत्र १०३

आपली दोघांची ही प्रेमादरपूर्वक पत्रे वाचून संतोष झाला. श्रीगुरुपादुकांची पूजा इतर देवांबरोबर नित्याप्रमाणे करावी. केव्हातरी सवड होईल तेव्हां रुद्रैकादशिनीपूर्वक अभिषेक करावा म्हणजे झाले. स्तोत्रपठण प्रार्थना यथाशक्ति चालू ठेवावी. आरोग्यार्थ यथावसर जप प्रार्थना चालू ठेवावी. प्रभूकृपेने भोग संपून जाईल. काळजी नसावी. **अर्चन भक्तीही महत्त्वाची आहे. यातील अभिषेक, प्रदक्षिणा, वंदन इत्यादी उपचार दुरितक्षय करुन साधकाची पारमार्थिक योग्यता वाढविणारे आहेत.** यथावसर सर्व करावे. आपण पाठविलेली दक्षिणा व तिळगूळ मिळून तो सर्वांनी घेतला.

***

## पत्र १०४

जगात ईश्वरकृपासंपन्न सज्जन पुष्कळ आहेत. त्यांच्याप्रमाणे आपणांसही तशी ईशकृपा लाभावी अशी इच्छा होणे साहजिक आहे. त्यांच्याप्रमाणे प्रयत्न तप झाले पाहिजे. योग्य काळही यावा लागतो. म्हणजे सर्व जमून येते. आपण आपला साधनाभ्यास चालू ठेवणे इतकेच जीवाचे कर्तव्य आहे. फलदाता परमात्मा समर्थ आहे. कळावे.

***

## पत्र १०५

सवडीप्रमाणे होईल तेवढी साधना करावी. या अवस्थेत शारीरिक क्रियामुळे त्रास होऊ लागल्यास बंद ठेवावी. वाणीने नामस्मरण,

स्तोत्रपठण, संतांच्या ग्रंथांचे वाचन सवडीप्रमाणे चालू ठेवावे. यांनेही प्रसन्नता कायम राहाते.

***

## पत्र १०६

संसारी गृहिणींसाठी उत्कृष्ट मार्गदर्शन -

**सौ. (गुरुभगिनी) ताईंना मंगल आशीर्वाद. आपले पत्र वाचून समाधान वाटले. पतीची मनोवृत्ति धरुन वागणे हीच पतिसेवा आहे. सेवा करु इच्छिणाऱ्यांना हे कठीण नाही. घरची सर्व जबाबदारी गृहिणींवर असल्याने, गृहकार्य सांभाळून जेवढा वेळ साधन होईल तेवढे करावे. काम करतांनाही भगवंताचे नामस्मरण, काही स्तोत्रपठण इत्यादी करता येणे शक्य आहे. ''कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे'' ही सर्वेश्वराची खरी पूजा आहे. तसे राहण्याचा प्रयत्न मानवाने करावयाचा आहे. घरातील लहान, थोर, आला गेला सर्वांना प्रसन्न ठेवणे ही तपश्चर्या स्त्रियांनाच साधते. कुंतीने लहानपणी दुर्वास ऋषींची उत्तम सेवा करुन मंत्रसिद्धि मिळविली. स्त्रियांच्या ठिकाणी नैसर्गिक सहनशीलता आहे. त्यामुळे त्यांनी ठरविल्यास वरीलप्रमाणे प्रपंचात राहून तपश्चर्या व संसार अमृतमय करण्याचे श्रेय त्या मिळवू शकतात. विचारांती हे सर्व कळून येते.**

***

## पत्र १०७

परगांवी गेल्यावर नियम पालन व्यवस्थित होत नाही हे खरे. तथापि शक्यं तितका प्रयत्न करावा. ईश्वराची प्रार्थना करावी म्हणजे सर्व जमून येते. घरी असल्यावर नियम व्यवस्थित पाळावेत. प्रवासात नाईलाज

आहे. आपले डोके दुखते. आपण पहाटे उठल्यावर नाकाने पाणी पिऊन बघावे, त्याचा उपयोग होईल. आपले साधनांतील अनुभव चांगले आहेत. ईशशक्तीच्या प्रभावाने सर्व घडते. आपले कर्तृत्व काहीच नाही अशी भावना दृढ झाल्यास उत्तम प्रगति होईल. अभ्यास ईशस्मरणपूर्वक नित्य चालू ठेवावा. ईशकृपेने सर्व ठीक होईल. काळजी नसावी. कळावे हे. वि.

***

## पत्र १०८

८.१.१९९३

ईशस्मरणपूर्वक प्रयत्न चालू ठेवावेत. नोकरी सोडण्याचा विचार मनांत ठेवू नये. प्रपंचाला ते चांगले सहाय्य आहे.

***

## पत्र १०९

१५.१.१९८०

श्री (गुरुभक्त) कडून आपले घरी आपले अनुपस्थितीत चोरी बरीच झाल्याचे समजले. देवाकरिता ठेवलेले पैसेही चोराने नेले. इलाज नाही. चौकशी पलिकडे राज्यशासनही विशेष करु शकत नाही. **तथापि देवकार्याकरता आपला झालेला संकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी मात्र देवावरच आहे हे निश्चित.** त्याबद्‌दल काळजीचे कारण नाही.

***

## पत्र ११०

चि--- यांनी उत्तम परिक्षा देऊन योग्यता संपादन केली तरी नोकरीस वेळ लागतो याबद्‌दल निराश वाटणे नैसर्गिक आहे. अभ्यास करुन यश मिळवणे हे त्यांचे स्वाधीन आहे पण नोकरीचे पराधीन आहे. येथे स्वप्रयत्नही फलदायक होणेस विलंब लागतो असा अनुभव असल्याने

देवावर भार घालून प्रार्थना श्रद्धेने करीत राहीले पाहिजे. श्रद्धाळु सज्जनांना तोच एक मार्ग आहे. सारखी निराशा बाळगून काय उपयोग आहे ?

**व्दारकेचा राणा पांडवा घरी**

असूनही सत्यमेव जयते हे फल पदरात पडण्यास बारा वर्षे लागली. शेवटी द्रौपदीला निराशाच पदरी पडली. परंतु सर्वही काळात त्यांनी ईश्वरस्मरण ठेवूनच शांति मिळविली. **मुलांचे वडिलांनाच करावे लागते हे पुत्रप्रेमाचे कर्तव्य आहे. मुलांना नोकरी मिळाल्यावर ते पित्याची सेवा करणार नाहीत काय ? तोपर्यंत त्यांचा धीर न खचावा म्हणून पित्याने धीर दाखवून त्यांची निराशा घालविणेचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे.**

***

## पत्र १११

हरितालिकेची पूजा प्रतिवर्षी स्त्रियांनी करावी. ते भगवतीचे गौरीमातेचे पूजन सर्वमंगल करणारे आहे. मुलींनी नोकरी करण्याची पद्धती पूर्वी नसली तरी हल्ली आर्थिक दृष्टीने करावी लागते. तशी देवीची पूजा करणेस हरकत नाही. प्रत्यक्ष पूजा घडू शकली नाही तरी मनाने चिंतन करुन पूजा करता येते. मानसपूजा श्रेष्ठ आहे म्हणजे घरातील रुढीही सांभाळली जाऊन आपलेही समाधान व देवीप्रसाद होतो. चित्ताची शांतता ईश्वरप्रार्थनेने निश्चित होते. परमात्मा इंद्रियांना बुद्धीला प्रेरक, नियामक आहे. संतांच्या ग्रंथांचे वाचन चिंतनही सवडीप्रमाणे रोज थोडा वेळ करता आल्यास उत्तम मार्गदर्शन मिळत राहून शांति समाधानही राहू शकते.

***

## पत्र ११२

प्रापंचिक व पारमार्थिक कामात चित्त गुंतविले म्हणजे चिंता दूर होते. ईशचिंतनही आपले चालू आहेच. शत्रुत्व करणाऱ्याबरोबर साधूंनी कसे वागावे याबद्दल एक कथा आहे.

एका नागाला त्याच्या गुरुंनी सांगितले की तूं कोणाचेही वैर करु नकोस. निर्वैर राहा. त्याप्रमाणे तो नाग नेहमी स्वस्थ पडून राहायचा. कोणालाही त्याचा उपद्रव होईना. असे पाहून कांही पोरांनी, मोठ्यांनीही त्याला काठ्या माराव्यात, दगड मारावेत यामुळे त्याला फार त्रास होऊ लागला हे पाहून त्याला पुन्हा त्याच्या गुरुंनी सांगितले की तुला निर्वैर मनाने राहा असे मी सांगितले. तूं तर लोकांचा मारही खातोस. याकरता कोणी दुर्बुद्धीने जवळ आल्यास तूं एकदम फणा काढून उभा राहात जा. एखादे वेळी फणा जमिनीवर आपटल्यासारखे दाखीव म्हणजे कोणीही तुझ्याजवळ येणार नाही. तुझा उपद्रव आपोआप थांबेल. प्रत्यक्ष कोणाला चावायचे नाही पण तसे दाखवून भीति दाखविणेची आहे. मग तो नाग तसे दाखवू लागताच त्याचा त्रास आपोआप कमी झाला.

या गोष्टीचा विचार करून व्यवहारात वागणारा सुखी होतो, असो.

***

## पत्र ११३

पहाटे उठून नाकाने पाणी पिता आल्यास पहावे. गडबड न करता थोडे थोडे नाकपुडीने घ्यावे. याने डोके, डोळे वगैरे सर्व साफ होईल. दुखणे बंद होईल. प्रयत्न करुन पहावे. श्रींची प्रार्थना चालू ठेवावी. भोग आहे तो संपेल. काळजी नसावी. कांही कष्ट प्रारब्धभोगामुळे होतात. ते तितिक्षा बाळगून भगवन्नामस्मरण करीत राहून हळू हळू दूर होतील. धीर धरण्यास व जप २ माळा करणेस सांगावे.

***

॥ श्री राम ॥

विषय : श्री. अजित कवीश्वर यांनी केलेल्या 'संभ्रम' या कवितेचा विचार व मुक्त अर्थ लेखन.

'संभ्रम' या नावावरून लक्षात येईल की, ही कविता मुळात प्रश्नार्थक आहे. प्रश्न हा बहुतांश वेळा विशिष्ट परिस्थिति, व्यक्ति, घटना अथवा वयावर अवलंबून असतो. इथे मुद्दाम फक्त सांगावसं वाटतं या कवीचं २५-२६ वर्षांचे वय. सर्वसाधारणपणे या वयात शिक्षण पूर्ण होऊन अर्थार्जनाची सुरुवात झालेली असते. पूर्वसंस्कार व आजूबाजूची परिस्थिति यामुळे आलेलं प्रपंचाचं वेगळं भान व त्यामुळे निर्माण होणारं प्रचंड दडपण हे अत्यंत विचारशील कवीच्या या कवितेचं कारण वाटतं.

'माथा प्रपंचाचे ओझे । घेऊन म्हणे माझे माझे ।' या समर्थोक्तीप्रमाणे कवीही मार्गक्रमण करतो आहे. पण त्यामुळे आलेला प्रचंड मानसिक तणाव त्याला संभ्रमित करतो. साधारणपणे अशी परिस्थिति आली की माणूस स्वतः एकाकी दिसतो आणि सर्व जबाबदारी स्वतःवर घेऊन अजून जास्त दडपणाखाली जातो. यातून पुढे हे एकट्या माझ्याच नशिबी का आले आहे, या विचाराने तो अजूनच केविलवाणा होतो. शतकानुशतकं चालत आलेली ही प्रपंचाची वाट तुडवताना कंटाळा येऊनसुद्धा सुख-दुःखाच्या या बेड्या तोडता येत नाहीत याची स्पष्ट जाणीव यात दिसते. पण हे बंधन कवीला दुसऱ्या कुणीतरी लादले आहे असे वाटते. थोडक्यात बालपणापासून आजूबाजूच्या परिस्थितीने व शैक्षणिक तसेच सामाजिक संस्कारातूनच माणूस या वाटेवर अनपेक्षितपणे ढकलला जातो.

सततच्या दडपणाने येणारा विद्रोहाचा विचारसुद्धा इथे आपल्याला दिसतो. परंतु पुढे सुस्पष्ट न दिसणारा मार्ग हा विवंचनेला कारणीभूत होतो

आणि विद्रोह करणारा आपले मूळ कारण, जो आनंद मिळवणे आहे तेच हरवून बसतो याचा उल्लेख कवीने मुद्दाम केलेला आहे.

एकीकडे जीवनाची चौकट मान्य करणारा, त्यामुळे येणाऱ्या स्वाभाविक बंधनाला मान्य करू शकत नाही. एकाच नाण्याच्या दोन्ही बाजू पहाव्या लागतात व जीवनातील द्वैतामध्ये हीच तडजोड संभ्रमाला जन्म देते.

शाब्दिक अद्वैतज्ञानाची माहिती असणारा कवी स्वतःच्या चैतन्यरूपाची जाणीव घेता यावी व तो त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हे जाणतो. परंतु असे करण्यास त्याला कोण अडवते आहे, हेच त्याला समजत नाही. निसर्गसुद्धा शुद्ध चैतन्याची जाणीव माणसाला देतो, परंतु योग्य मार्ग चुकलेला मनुष्य त्या पूर्ण आनंदापासून दूरच राहतो.

अखेर इथे तडजोड मान्य करून पुढचे जीवन चालावे हा विचार जरी पटला तरी प्रत्यक्षात कृति करताना मात्र कवीला हा संभ्रम मागे खेचतो. मला काय हवे आहे? काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे? या जीवनातील मूलभूत प्रश्नांपर्यंत कवी पोचतो. इथून पुढे त्याला संपूर्ण अंधार दिसतो आहे. अनेक कष्ट सोशीत या वाटेवर निघालेला पांथस्थ आता खरा मार्गदर्शक शोधतो आहे.

इथे विशेष गोष्ट म्हणजे, असे अनेक कवी होऊन गेले, जे या प्रश्नापर्यंत पोचले. पण जे पुढे स्वतःच्या विचारांनी मार्ग काढत गेले ते या संभ्रमातच गुंतून पडले. पण हा कवी उत्तम संस्कारयुक्त आणि मननशील असल्याने स्वतःची अपूर्ण शक्ति जाणणारा आहे. म्हणूनच त्याला कवितेच्या शेवटी मला इतका विचार करून खरंच काही कळत नाही हे सांगताना कमीपणा वाटत नाही. योग्य पथदर्शी गुरू मला मिळेल काय? या करुण भावनेने संपलेली कविता सर्वज्ञ सद्गुरूंना अनपेक्षित साद घालते.

॥ श्री राम ॥

विषय : चि. अजित कवीश्वर यांनी केलेल्या 'संभ्रम' या कवितेस प.पू. श्रींनी (श्री दत्तमहाराज कवीश्वर) दिलेल्या कवितारूपी उत्तरासंबंधी विचारमंथन.

'संभ्रम' ही कविता बरीचशी नकारात्मक विचारसरणीची वाटते आणि अशा प्रश्नांना अथवा गोंधळाच्या परिस्थितीला हाताळताना श्रींनी अनेक उदाहरणे देऊन संसारातील सत्य परिस्थिति प्रथम मांडली आहे. एका अर्थाने कवीला पडलेल्या संभ्रमास दुजोरा दिलेला आहे. परंतु ज्याप्रमाणे लहान मुलाला कडू औषध देताना आई गोड गोळी जवळ ठेवते, त्याप्रमाणे संपूर्ण जनव्यवस्थेबद्दल आणि व्यवहाराबद्दल निर्माण झालेल्या संशयाला स्पष्ट निराकरण नाही हे कडू उत्तर देतानाच प्रभूलीलेचे व नामाचे महत्त्व सांगून जीवनात गोडवा कसा आणावा हे प.पू. श्री अत्यंत समर्पक शब्दात वर्णन करतात. न्यायशास्त्रातील त्यांचा हातखंडा, वेगवेगळे संदर्भ देऊन प्रश्नाचे उत्तर देण्याची त्यांची हातोटी आणि सरतेशेवटी पूर्ण कल्याणाचा मार्ग दाखवून स्वतः अलिप्तपणे राहण्याची त्यांची सिद्धि या काव्यलेखनात दिसते.

सर्वप्रथम या जगात राहणाऱ्या माणसांचे दोन विभाग त्यांनी दाखविले. एकीकडे देवभक्त व त्यांचे जीवन तर दुसरीकडे अभक्तांची स्थिति मांडली आहे. प्रयत्न हे कमी-जास्त प्रमाणात सर्वच लोक करतात. पण इथे वर्णिलेला देवभक्त हा केवळ 'प्रयत्नरत' नसून 'सुयत्नरत' आहे. व्यावहारिक प्रयत्नांची कास धरून फक्त अर्थ आणि काम या पुरुषार्थांच्या मागे लागणारा नसून, 'कर्तव्यो धर्मसंग्रहः' हे जाणणारा व त्याप्रमाणे आचरण करणारा आहे. आणि याचं फळ म्हणजे त्याचं संपूर्ण जीवन हे सौख्यामध्ये म्हणजेच समाधानात, आनंदात जातं

आहे. याउलट दुसरा वर्ग हा काय कुठल्यातरी विवंचनेत, संशयात सापडलेला दिसतो. आणि बहुतांश वेळा त्यातून बाहेर येण्याचा मार्ग शोधण्याऐवजी तो त्याच संभ्रमाची कास धरून वाटचाल करत राहतो. एकदा त्यात अडकले की त्याची मालिकाच तयार होते. दोन्ही वर्गांची ही स्थिति पूर्णतः मनावर अवलंबून आहे, बाह्य परिस्थितिवर नाही. आणि हे असं का, याची उकल सहज होणारी नाही. हीच त्या परमात्म्याची लीला आहे, अशी प.पू. श्री सुरवात करतात.

या लीलेचेच पुढे दृष्टांत देऊन वर्णन केलं आहे.

एका ठिकाणी दैनंदिन जीवनात लागणाऱ्या सर्व वस्तू मिळालेल्या आहेत आणि त्यायोगाने समाधान व शांति मिळालेली दिसते. तर कुठे हे सर्व मिळूनही केवळ अशांतीचा अनुभव येतो. सर्व दृश्यव्यवहारास कारण असणारी नियती ही विरुद्धता दर्शवते असे म्हणले आहे. याचाच जर थोडा आणखी विचार केला तर थोडक्यात प.पू. श्री असे सुचवतात की, मनःशांति ही केवळ माध्यमावर म्हणजेच यश, पैसा, प्रसिद्धि किंवा व्यवहारातील इतर अनुकूलतेवर अवलंबून नाही. तसं असतं तर ही संभ्रमित करणारी अवस्था निर्माण झाली नसती.

परंतु हाच विचार सर्वसामान्य माणसाचा पक्का न झाल्याने व याहीपेक्षा पुढे विचार करायचा म्हणजे पूर्ण सुखाची इच्छा व खरी साधना न समजल्याने अधिकाधिक संशयाची स्थिति बळावत जाते. अभ्युदय आणि निःश्रेयस साधन सांगणारा असा जो धर्म आहे तो मान्य करावा तर वेदविहीत कर्मांचे अनुष्ठान करून शास्त्रीय मार्गाने जीवन व्यतीत करण्याची परमेश्वराची आज्ञा मान्य करणे होय. पण सर्वसामान्य व्यवहार याला महत्व न देणारा व अर्थप्रधान आहे. आपल्याला मिळालेल्या जीवनात जेवढी जास्त भौतिक अनुकूलता मिळवता येईल तेवढी मिळवली पाहिजे आणि असा प्रयत्न करणाराच

खरा शहाणा आहे अशी जनपद्धति दिसते आणि हेच दुर्दैव आहे.

याच संभ्रमात अधिक भर पडते ती कायम येणाऱ्या दृश्य अनुभवावरून. सर्वसामान्यपणे असे दिसते की, शास्त्राज्ञेप्रमाणे धर्मपालन करणारा आपल्या जीवनात अनेक अडचणी, हालअपेष्टा आणि दुःखाचा अनुभव घेतात. परंतु याउलट अधर्माने वागणारे निरंकुश असे सुखरुप आयुष्य जगतात. इथे प.पू. 'श्रीं'नी दाखविलेल्या सूक्ष्म दृष्टीने पाहता वरील अनुभव हा केवळ 'दृश्य सौख्य' अथवा 'दृश्य दुःख' असते. तो परिणाम कायम राहणारा नाही. **अधर्माने वागू जरी तात्पुरते सुख मिळाले तरी ते अंती दुःख देणारेच ठरते. हा विश्वास ज्याने मिळवला व प्रभूकृपेने तो टिकला तर अनेक दुःख सहन करूनसुद्धा कायम सुखापर्यंत पोहोचवणारा श्रेष्ठ असा धर्ममार्ग सज्जन लोक सोडत नाहीत आणि आपले पूर्ण कल्याण करून घेतात** तर व्यावहारिक विचार करणारे तात्कालिक सुखाच्या मागे लागू शेवटी आपले नुकसानच करून घेतात. जनपद्धतीत असलेला ह संभ्रम ही त्या परमात्म्याचीच लीला आहे.

या जगात कोणी कितीही मोठा असला तरी त्याची स्वतःची किंव इतरांची सुख-दुःख निवारण करण्याला तो असमर्थ असतो. अत्यं प्रेमाने वाढवलेल्या पुत्राचे मातापित्याच्या हयातीत निधन होते. अथव अत्यंत लहान वयामध्ये बालकास मातृवियोग सहन करावा लागत अशी अनेक करुणामयी स्थितींची उदाहरणे देता येतील. परंतु कुणी अशी दुःख निवारण्यास समर्थ नाही आहे. एखादा माणूस राजा होऊ उत्तम भोग व सत्ता यांचा आनंद घेतो तर दुसरा जन्मभर दारिद्र्या पिचून कष्ट करतो. भागवतामध्ये ध्रुवाची कथा येते. उत्तानपाद राजाल दोन राण्या होत्या. सुनीति व सुरुची. सुरुची आवडती होती तर ध्रुवाच माता सुनीति नावडती. याची कारणमीमांसा करता येत नाही. का

पूर्वकर्मसंबंध आहे असे मानावे लागते व आहे त्या परिस्थितीस सामोरे जावे लागते. भगवंताच्या सत्तेने चालणारी नियतीच सर्व व्यवहार नियामक आहे हे मानावे लागते. त्यापासून सुटका कोणाचीही नाही.

व्यक्तीचा अहंकार वाढत गेला की स्वत:मधील दोष दिसणे बंद होते. आमचे कधीही चुकत नाही हाच विचार दृढ होतो आणि मग दुसऱ्यामध्ये असलेले गुणही दोषरूप भासतात. यालाच ईर्ष्या, मत्सर किंवा असूया म्हणतात. परंतु कुठलाही वासनादोष नसणारी 'त्रिमूर्तिमाता' यासर्वांहून वेगळी आहे. संकटात पडलेल्या आपल्या भक्ताची योग्य काळजी घेऊन त्याला या संभ्रमातून मुक्त करणारी माऊली असे दत्तप्रभूंचे वर्णन इथे केलेले आहे. सदा सर्वकाळ कायम असणारी शक्तिस्वरूप सद्‌गुरुमूर्ति हीच नित्य विजयी आहे आणि हीच त्या परमात्म्याची लीला आहे.

सद्‌गुरुंवर इतकी श्रद्धा किंवा विश्वास बसण्यासाठी आपल्या विचारांमध्ये परिवर्तन आवश्यक आहे. वरील अनेक उदाहरणावरून हे स्पष्ट होते की, आपली जीवाची स्वत:ची शक्ति अगदी कमी आहे. प्रसंगाला ती पुरणारी नाही, पण त्याचबरोबर सर्वनियामक एक शक्ति त्या परमात्म्याची आहे हेही तितकंच पक्कं समजलं पाहिजे. अशा प्रकारे विचार करून स्वत:च्या मिळालेल्या शक्तीने होईल तितकं सत्कर्म करणारा, इंद्रियदमन करून ईश्वर आणि गुरुंविषयी अत्यंत आदर ठेवणारा आणि सर्वही मंडळींचे कल्याण चिंतन करणाराच या धर्ममार्गावर अग्रेसर होऊ शकतो आणि असा गुरुभक्त हा या संभ्रमातून निश्चित मुक्त होतो.

या जगात जे जे घडते अथवा घडत नाही ही सर्वच त्या परमात्म्याची कृपा आहे. आणि ती अमोघ म्हणजे कुठल्याही प्रकारे न बदलणारी आहे. कुणाचीही शक्ति त्यात बदल करू शकत नाही. ती कशीही दिसली

अथवा क्षणकाल विपरीत जरी भासली तरी अंततः सर्वांचे मंगल करणारीच आहे. हा विश्वास मनात बाळगून प्रेमाने जो या लीलांचं चिंतन करील तो आणि फक्त तोच नित्य सुखी होईल.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

-------

# द्वैताकडून अद्वैताकडे जाणाऱ्या आनंदयात्रींना वंदन

ती. सौ. आईसाहेबांचे रेखाचित्र त्यांच्याच वेळोवेळी झालेल्या संवादातून शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. प.पू. श्रीदत्तमहाराज व ती. सौ. आईसाहेब यांचा विश्वव्यापी संसार आहे. एक साध्या गृहिणी परंतु प.पू. श्रीदत्तमहाराजांच्या थोरपणाला जाणून एका वेगळ्या आत्मियतेने त्यांना जपणारे त्यांचे मन या संवादातून दिसत आहे.

परमार्थाचा आधार असलेले हे संसारचित्र वाचताना कोणाचेही मन हेलावून जाते. संसार सारीच करतात पण हा संसार ईश्वरी कृपेचा आहे. साधुसंतांच्या आशीर्वादाचा आहे व त्याचा आधार हजारो लोकांना आहे.

आज ती. सौ. आईसाहेबांच्या वयाला ८० वर्षे होत आहेत. त्या उभयतांच्या पण अद्वैता असणाऱ्या या अनादि शिवपार्वतीच्या चरणी भक्तिभावपूर्वक त्यांचीच शब्दसुमने त्यांना अर्पण करीत आहोत.

**- नीला कृष्ण जोशी**

१. मी एक साधी गृहिणी आहे.
२. यांच्या ज्ञानाची सर मला नाही.
३. परमार्थाचा अर्थ 'यांच्या सहवासात असणे' एवढेच मला समजते.
४. त्यांच्या सत्कर्मात माझा उद्धार होईल याची खात्री वाटते.
५. धुणीभांडी आदी संसाराचे कष्ट करण्यात त्रास वाटला नाही.
६. भाग्य म्हणजे काय ते मी कवीश्वरांच्या घरात पूर्ण उपभोगले आहे.
७. देवाला प्रदक्षिणा आमच्या घराण्याचा मोठा वारसा आहे.
८. नदीवरून घागर भरून पाणी आणण्यात फार छान वाटे. कृष्णामाईच आपल्याबरोबर येते आहे असे वाटे.
९. यांचा अबोल व विवेकी स्वभाव आणि माझा बोलका स्वभाव दोन्ही समान होऊन जाते.

१०. सुना-मुलांनी भरलेल्या घरात माझ्या वाट्याला प्रेमच येते.

११. देवी रेणुका माता आईसारखी सर्वांना सांभाळते.

१२. श्रीदत्तुबाळ सर्व मनीषा पुऱ्या करतो.

१३. **शरीरकष्ट केल्याने वार्धक्यात प्रकृति निकोप राहते असे यांचे सांगणे असते.**

१४. मामंजी सारे देवाचे मानावे असे सांगत त्याप्रमाणे मनात विचार करण्याची सवय केली.

१५. मुलगी सासरी जाऊ लागली की वाईट वाटे. मग हे म्हणत, "वाईट वाटून काय उपयोग ? ती आपल्याजवळ राहिली तर चालेल का ?" समजूत पटे.

१६. प.पू. श्रीगुळवणीमहाराज रोज सकाळी घरी येत असत. त्यांच्या दर्शनातच माझा सारा परमार्थ होई.

१७. सकाळी घाई असे पण महाराज मांडलेल्या पाटावर बसले की मन आनंदित होई. देवच येऊन बसले असे वाटे.

१८. प.पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत, "तुझी घाई-गर्दी आहे. चालू दे काम. पण मुखाने नाम घे."

१९. प.पू. श्रीगुळवणीमहाराज सांगत, "त्यांचे नीट करतेस ना ! त्यात तुझी पूजा-अर्चा सर्व आले."

२०. प.पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत, "अगं लक्ष्मी, त्यांचे जवळ ज्ञान आहे. म्हणून वैराग्य आहे हे समजले पाहिजे तुला."

२१. **प.पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत, "खाण्यापिण्याचे हाल करू नकोस म्हणजे तब्बेत ठीक राहते. आनंदात असावे. कुरकुर स्वभावात असू नये."**

२२. माझी मुलगी गेली तेव्हा वडिलांप्रमाणे माझे सांत्वन गुळवणीमहाराजांनी केले व म्हणाले, "श्रीदत्तमहाराज येथे नसले तरी मी स्वत: तिचे सर्व करतो आहे ना ! काळजी करू नकोस."

२३. दु:ख होते, पण मन आवरले पाहिजे.

२४. सुनबाई तुला पसंत पडली ना? तुला वागवून घ्यायचे आहे. आईच्या प्रेमाने सर्वांशीच वागावे.

२५. लोक त्यांच्या सरळ स्वभावाचा फायदा घेत. त्यामुळे मला राग येई. पण ते म्हणत, "**सरळ स्वभाव देवाला आवडतो. देवाला काय आवडते ते पहावे.**"

२६. प.पू. श्रीगुळवणीमहाराज म्हणत, "तुला आवडेल असा शालू घे. त्यात काटकसर नको. विचारीत असत, "इतरांप्रमाणे ते हौशी आवडी पुरवीत नाहीत असं वाटते का तुला." पुढे म्हणत, "अगं कसले शालू-शेले घेऊन बसलीस? केवढी विद्वत्ता, ज्ञान, नम्रता त्यांचे ठिकाणी आहे. याच्यापेक्षा तुला काय पाहिजे?"

२७. सतत परगावी जाणे असे. काळजी वाटे मनाला, पण सतत यांचे सांगणे. खरे रक्षण करणारा देव असतो. असे मला सोपे सांगत पण प्रत्यक्ष करायला अवघड पडे.

२८. सासुबाई सप्तशती गुरुचरित्राची पोथी नेहमी वाचत असत व म्हणत, "ती नेहमी वाचीत जावी. गजानन महाराजांच्या पोथीचे पारायण करीत असत."

२९. स्वामीमहाराजांची पुस्तके नेहमी त्यांच्या बरोबर असत. स्वामीच आपल्याबरोबर आहेत असे त्यांना वाटे.

३०. कॉफीत साखर न घालणे किंवा पदार्थांत काही घालायचे विसरणे हे घडत असे. परंतु हे चुकूनही रागवत नसत. 'घाईगर्दीत असता, त्यामुळे होते", असे म्हणत.

३१. प.पू. श्रीगुळवणीमहाराजांना यांचा बाहेर गौरव झाला की खूप आनंद होई. त्यांचा तो आनंद पाहिला की मला एकच वाटे. ''तो देवाचा आनंद आहे.''

३२. प.पू. श्रीगुळवणीमहाराज मला जेवायला जायला उशीर झाला की निरोप पाठवित. असे त्यांचे विलक्षण प्रेम आम्हांला लाभले.

३३. परमेश्वर कुठेही असो, तो आम्हाला दिसो न दिसो. पण प.पू. श्रीगुळवणीमहाराज हे मात्र देवच होते. त्यांच्या दर्शनाने देव भेटल्याचा आनंद मिळे.

३४. माझे सासरे खूप मोकळेपणांनी वागत. त्यामुळे त्यांच्याबरोबर सिनेमा पाहिला तरी संकोच कमी होई. वडिलांसारखे वाटे.

३५. साखर वाढते. तब्बेत बिघडते **हे सांगतात, जप वाढवा देवाचे नाम घेण्यानेसुद्धा रोग बरे होतात.** माळ माझ्या हातात असते. मी नाव मात्र मनापासून घेण्याचा प्रयत्न करते.

३६. प्रारब्धानुसार जेवढे मिळावयाचे ते कोणी काढून घेऊ शकत नाही. अशी मनाची धारणा ठेवावी असे सतत ऐकून तशी ठेवते.

३७. नवीन लग्न होऊन कोणी नववधू दर्शनाला आली असली की मी विचारते, ''काय गं फिरायला वगैरे जाऊन आली की नाही? घेऊन जात जा बरं का?'' असे ही सांगते.

३८. प्रथम काटकसरीने राहण्याची सवय होती. **संसारात काटकसर केल्याशिवाय भागत नाही. तीच सुखाची ठरते.**

३९. मुली लग्न होऊन गेल्या, परंतु सुना आल्या. आता तर सविता मला जास्त लागत असते. ती मोठी असल्यामुळे तिला सर्व करावेही लागते.

४०. अनिताची नोकरी, मग इकडेतिकडे आमच्याबरोबर येणे त्यांचे जमत नाही. पण यांचे लक्ष असते, सुट्टी असली की तिलाच बरोबर

येण्याची संधी देतात.

४१. सर्व लोक नित्य प्रेमाने भक्तीने घरी येतात. त्यांच्याशी बोलण्यात सहवासात आम्ही आनंद उपभोगीत असतो.

४२. सहस्रचंद्रदर्शनशांती सोहळा झाला. इतकी भक्त थोर मंडळी आली होती. 'आपण किती भाग्यवान, केवढी देवाची कृपा' असे वाटले.

४३. 'तुला' झाली. त्यावेळी तुळशीपत्र घालण्याचा मान मिळाला व श्रीकृष्णाच्या कृपेत न्हाऊन निघाल्यासारखे वाटले.

४४. गोप्रदान करताना गोमातेकडे पाहून अंत:करण भरून येत होते. मनात येत होते. जिथे जाशील तेथे सुखी रहा.

४५. कुमारिका पूजन खरोखर देवी दर्शनाचा आनंद लाभला. वाडवडिलांची गुरुदेवांची कृपा म्हणून असे भाग्य लाभले.

४६. या सोहळ्याला श्रीशंकराचार्य महाराज आले होते. सर्वांचे आशीर्वाद लाभले. परमेश्वरा, अशीच कृपा तू सदैव ठेव.

४७. रौद्रीशांत देऊळगावराजाला झाली. जुन्या आठवणी मनात उमलून आल्या. स्मृतिगंध मनात दरवळू लागला.

४८. श्रीबालाजीचे देवस्थान आमचे सर्वांचे श्रद्धास्थान. त्याच्यापुढे गौरव झाला. भाग्यात भाग्य उजळले असे वाटले.

४९. बीड, हिंगोली सर्वांची श्रद्धा-भक्ति यांच्यावर असलेली पाहिली तरीही ईश्वरी सामर्थ्याची कल्पना येत नाही.

५०. प्रेम, लोभ, श्रद्धा हे दर्शन वेगळे वाटते. घरात भाकरी-पोळ्या करण्यात गेलेल्या माझ्यासारखीच्या जीवनाला हे विश्वरूप दर्शन मापता येत नाही, पण आनंद वाटतो. आनंद ओसांडतो एवढे मात्र खरे.

५१. मुला-नातवंडांनी हे भरलेले घर पहात-पहात मला वाटते, ''माझी न दृष्ट लागो माझ्याच वैभवाला.''

५२. हत्तीवरील मिरवणूक, ती दिगंबराची धून, भक्तीने मळलेली वाट साऱ्याच गोष्टी मनात खोल रुतून राहतात. माझ्यासारख्या साध्यासुध्या गृहिणीला केवढे मोठे केलेस. भगवंता केवढी कृपा ही तुझी.

५३. राष्ट्रपतींच्या हस्ते पुण्यात गौरव समारंभ झाला. मुलासुनांनी सत्काराला जावयाचे म्हणून लुगडे घेतले. मी नेसलेही मुलांच्या हौसेसाठी. पण परमेश्वराला म्हटले, "अरे, अभिमान वाटावे असा देवाचा सहवास तू देत आहेस. त्यापुढे आणखी काय मौल्यवान आहे?"

५४. कधी कधी मनात येते, मलाही संस्कृत येत असते तर यांचे जाडे-जाडे ग्रंथ वाचून समजले तरी असते.

५५. **ग्रंथ वाचून समजण्यापेक्षा त्या ग्रंथाप्रमाणे आचरण जे करताहेत तेच प्रत्यक्ष आपल्यापुढे आहेत.** असे मनात आल्यावर माझे मलाच हसू आले.

५६. एक मोठे जेवणाचे वर्णन असलेले गाणे मी म्हणते. एकदा केव्हातरी यांनी ऐकले. तेव्हा बोलणे झाले. किती वेळ देवाला तिष्ठत बसावे लागले. इतके मोठे गाणे आहे.

५७. औदुंबरला प्रदक्षिणा घालताना अशी चित्रे खूप काही वेळा मनात गर्दी करतात. मी त्या औदुंबरला सांगते, 'तुझ्या साक्षीने हे पुण्यस्मरण मी करीत आहे.'

५८. मध्यंतरी यांची प्रकृति बरी नव्हती. मग मात्र काळजीने जीव आटून गेला. वाटलं, मला काही झालं तरी चालेल पण यांना होऊ नको देऊ.

५९. देऊळगाव राजाला इतका उन्हाळा होता, मी आपली हायहुश करीत होते. परंतु यांना काही त्याचे वाटले नाही. स्थितप्रज्ञ का काय

म्हणतात ना तसे वागणे असते.

६०. वासुदेव निवास रोज दर्शनाशिवाय त्यांना चैनच पडणार नाही.

६१. प.पू. श्रीगुळवणीमहाराज व प.पू. श्रीधुंडीराजमहाराजांचे ही सर्व मोठाले उत्सव यांचे हातून झाले व ते पाहण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

६२. हे म्हणतात, हा ऐश्वर्ययोग देवांनी दिलेला आहे. त्याची भक्ति मनात अधिक वाढावी अशी प्रार्थना करावी.

६३. अलिकडे-अलिकडे वाटू लागते की, हे एका चिंतनात रंगून गेलेले असतात. आपल्यालाही तसे जमावे.

६४. एकदा नीलाताई म्हणाल्या, "तुम्ही रोज संध्याकाळी जाऊन का बसत नाही? म्हणजे महाराज सांगतील तुम्हांला रोज छोटे प्रवचन. पण कसे हो जमेल?"

६५. अहो नीलाताई, अशी सवय नाही जाऊन बसण्याची. केव्हाच ते जमणार नाही मला. मी आपली रोज नमस्कार मनातूनच करीन.

६६. परवा वाडीला आमच्या जुन्या घरात गेले. साऱ्या भावना उफाळून आल्या. कितीतरी मी बोलत सुटले. खरच वाडी रम्य ! वाडीच्या आठवणी रम्य ! किती झाले तरी यांचा जन्म वाडीचा आहे. आमचे लग्नही वाडीचे आहे.

६७. स्वामीमहाराजांची पाऊले या घरात यांना बघण्यासाठी आली.

६८. या घरात राहून जे आयुष्य गेले तोच परमार्थ नाही का म्हणता येणार?

६९. माझे बालपण इथे मन मोकळे खेळण्यातही गेले आहे. लहान वय, चार कामे केली की जबाबदारी संपली.

७०. सासुबाई म्हणायच्या, "जा खेळायला. सागरगोटे खूप खेळले आहेत. तो डाव जिंकला तरी संसाराचा डाव साधणे कठीण ! परंतु

सासर संतांचे घर आहे म्हणून डाव जिंकायला सोपे.''

७१. वाडीला गेले की या साऱ्या संतमंडळींना डोके टेकून नमस्कार करते. 'खरंच सांभाळलंस' असे म्हणते व दोन अश्रू डोळ्यात येऊन जातात.

७२. वर्तकवाडा तीन जीने खालून पाणी भरणे तेही दिवस आनंदात गेले. **चांगली माणसे लाभली की कष्टही भासत नाहीत.**

७३. प.पू. श्रीगुळवणीमहाराजांची रोज आठवण येते. कारण यांचे अंत:करण त्यांनी ओळखले. जे मलाच काय पण कोणालाच ओळखता आले नाही. त्यांच्या साऱ्या ज्ञानाची, विद्वत्तेची, भक्तीची गुळवणीमहाराजांना ओळख पटली.

७४. **प.पू. श्रीगुळवणीमहाराजांनी त्यांना ईश्वरसंपत्तीचे वारस केले नाहीतर हे कोणी जाणलं असतं. कारण यांचा स्वभाव पुढे येण्याचा अजिबात नाही.**

७५. लोकांनी त्रास दिला, नावं ठेवली तरी हे कधी रागवत नाहीत. सारे मुकाट्याने सोसतात. यातच यांचे मोठे मन दडलेले आहे हे मलापण समजते.

७६. विद्यार्थीवर्गाचे प्रेम यांच्यावर फार होते.

७७. जीव लावून शिकविण्याची पद्धत होती.

७८. कुणाही वडील माणसाबरोबर बसलेले पाहिले नाही. सदैव उभे असत.

७९. भागवतावर फार श्रद्धा आहे. सांगताना रंगून जाणे होई.

८०. आज माझी ऐंशी वर्षे पूर्ण झाली. श्रीगुरूमहाराज उदंड दिलंत. तृप्त झाले, कृतार्थ झाले. यांच्या पायाशी सारे काही मिळाले.

परमेश्वरा यांना मुलाबाळांना यांच्या भक्त मंडळींना सदैव सुखी ठेव व मला कृतार्थ कर ही प्रार्थना.

***

## लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम्।

**(प.पू.श्रींनी रामनवमीच्या दिवशी श्रीदत्त आश्रम,**

**जालना येथे केलले प्रवचन २०.४.१९९४)**

आरंभालाच आपण ऐकले की दोन वर्षांपूर्वी इथल्या जागेत काही नव्हते तिथे आज कायाकल्प झालेला आहे. दोन वर्षांपूर्वी भूमिपूजन झाले आज या ठिकाणी दत्तात्रेयांची स्थापना त्याचप्रमाणे ताईमहाराजांचे पूज्य पिताजी आणि सद्गुरुमहाराज यांच्या मूर्तींची स्थापना झालेली आहे. चित्र हेसुद्धा ईश्वराचे प्रतीक आहे. शास्त्राने ज्यांच्या पूजा करायला सांगितल्या आहेत अशा प्रतीकांपैकी प्रतिमा हीसुद्धा मूर्ति आहे. आणि त्या मूर्तींची पूजा हेसुद्धा मोठे पुण्यकारक कर्म आहे.

स्थापना झाल्यावर आता इथे यज्ञ व्हायचा आहे. देवतांचे आवाहन करायचे आहे. सत्पुरुषांच्याकडून देवतांना फक्त आवाहन केले जाते.

**सर्वेपि सुखिनः सन्तु**
**सर्वे सन्तु निरामयाः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु...**

सर्व सुखी व्हावेत म्हणून संत, महंत, सत्पुरुष हे देवतांना आवाहन करीत असतात आणि त्यांनी आवाहन केल्यावर देवतांचे वास्तव्य होते.

मीराबाईने मनानेच भक्तिपूर्वक संकल्प करून गोपालकृष्णांची मूर्ति स्थापन केली होती. त्यांचे वास्तव्य त्याठिकाणी असायचे. विषाचा प्याला मीराबाईने घेतला पण ती मूर्ति काळी झाली म्हणतात. मीराला काही विषबाधा झाली नाही. त्याप्रमाणे सत्कर्म करणारी, ज्यांच्या अंत:करणात देवाने सद्वासना दिलेली आहे त्यांनी, दोन वर्षात दत्तमूर्ति आणि पिताजींच्या मूर्तींची स्थापना या ठिकाणी केली.

भगवंतांनी गीतेत सांगितले हे की देव, द्विज, प्राज्ञ वगैरेंची रोज पूजा व्हावी. संसारातील कर्म आपल्याकडून पुष्कळ घडतात. पण ही पूजा

झाली पाहिजे. 'गुरू' शब्दाचा अर्थ ज्ञानेश्वर महाराजांनी दोन प्रकारे केला आहे.

मातापितरांची पूजा करावी. आणखी

**संसार ऐसा दारुण**
**भेटताची हरि शीण**
**ज्ञानराजे....**

मातापितरांची आणि गुरूंची पूजा म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचीच पूजा आहे. त्याप्रमाणे ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे मूर्तींची पूजा या ठिकाणी झालेली आहे. मूर्तींची स्थापना करण्याकरता भक्त मंडळींनी हा दत्ताश्रम निर्माण केला. त्याची व्यवस्था केली. 'सत्कर्म योगे वय घालवावे' हे समर्थांनी म्हटल्याप्रमाणे काही तरी पुण्यकर्म रोज घडले पाहिजे. तेच आपल्या बरोबर येणार आहे. पैसा अडका किंवा कीर्ति बरोबर येत नाही. शास्त्राने सांगितलेले पुण्यकर्म आपल्या यथाशक्तीने करीत राहाणे म्हणजे पुण्य जोडल्यासारखे आहे. त्याप्रमाणे या ठिकाणी हे मोठे पुण्यकर्म झाले. या कार्याला सहाय्य करणाऱ्या मंडळींवर ईश्वराची कृपा व्हावी. सर्वांचे चांगले व्हावे एवढीच ताईमहाराजांची इच्छा आहे. संतांचा तो स्थायीभावच आहे. ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे हे सर्व घडून आले आहे. सर्व मंडळी त्यात सहभागी झाली आहेत. सर्व मंडळींना या ठिकाणी येऊन नामस्मरण करता येते. यज्ञयाग तर आता होणारच आहेत पण यापुढे प्रवचन वगैरे कार्यक्रम इथे होणार आहेत.

आज रामचंद्रांचा जन्मदिवस! तसेच आज सौभाग्यसंपन्न ताईमहाराजांचाही वाढदिवस आहे. फार चांगली घटना आहे. रामचंद्रांच्या चरित्राचे अवलोकन करणारे भावार्थ रामायण एकनाथ महाराजांनी लिहिले आहे, समर्थांनी तर रामचंद्रांचे गुण वर्णन करून पुष्कळ साहित्य निर्माण केले. वाल्मिकी महर्षि म्हणतात -

## 'रामोविग्रहवान् धर्मान्'

वाल्मिकी रामायणामध्ये हे वाक्य त्या मारिचाने उच्चारले आहे. रावणाने त्याला बोलावून सांगितले, ''तू सुवर्णमृगाचे रूप घेऊन सीतेला मोहात टाक, राम तुझ्यामागे गेले म्हणजे मी सीतेला घेऊन जाईन.'' पण राक्षस असूनसुद्धा मारिचाने सांगितले, ''राम हे धर्मशील आहेत. त्यांच्यावाटेला तू जाऊ नकोस.'' पण रावणाने ते ऐकले नाही. रावणापेक्षा रामांच्या हातून मरण आले तर आपल्याला चांगली गति तरी मिळेल असे वाटून त्याने रावणाचे म्हणणे कबूल केले.

तर अशा रीतीने संपूर्ण धर्मस्वरूप म्हणजे भगवान रामचंद्र आहेत. त्यांनी सगळ्या जगाला धर्ममर्यादा कशा असाव्या, त्या कशा पाळाव्यात हे नुसते समजावूनच सांगितले नाही तर त्याप्रमाणे आचरण करून दाखवले आहे. त्यांच्या चरित्रात अनेक मोठे मोठे भक्त आलेले आहेत. मारूतीराय तर प्रसिद्धच आहेत. सबंध आयष्य रामचंद्रांच्या सेवेकरता त्यांनी वाहिलेले आहे. प्रत्यक्ष शंकर परमात्माच या रूपाने जन्माला आलेले आहेत असे म्हणतात. त्यांना रामांची सेवा करायची इच्छा झाली. कोणचे रूप घ्यावे असे वाटल्यावर विचार करून ठरविले की वानराचे रूप आपले बरे आहे. कोणाकडे भिक्षा मागायला नको, कोणाची चाकरी करून वेतन घ्यायला नको कांही नको. झाडाची फळे खावीत, नदी, तळ्यातले पाणी प्यावे आणि रामांची सेवा करावी. निष्काम भक्ति आहे. कांही याचना नाही. तेव्हां भगवान शंकरांनी रामचंद्रांची सेवा करण्याकरता हे रूप घेतले. हनुमंतांचे चरित्र प्रसिद्ध आहे.

तुलसी रामायणातील सुंदरकांड म्हणजे मारुतीरायांचे चरित्र आहे. त्याचे वाचन, चिंतन मनन करणे, यथाशक्ति त्याचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करणे आणि तो प्रयत्न यशस्वी होण्याकरता त्यांचीच प्रार्थना करणे

तर तो यशस्वी होतो. त्याच प्रमाणे भरताचे चरित्र आहे, लक्ष्मणांचे चरित्र आहे. रामचंद्र मुद्दाम लक्ष्मणांना बरोबर घेऊन गेले. कारण त्यांच्याकडून मोठे काम होणार होते ना! रावणाचा नाश रामचंद्रांनी केला पण इंद्रजिताचा नाश लक्ष्मणानी केला. इंद्रजितसुद्धा तपस्वी होता. देवीचा उपासक होता. त्याचा नाश फक्त बारा वर्षे ब्रह्मचर्य व्रत धारण करून सेवा करणारा जो असेल तोच करू शकत होता. म्हणून रामराय लक्ष्मणांना बरोबर घेऊन गेले. आणि रामांचे ते कार्य लक्ष्मणांनी केले. लक्ष्मणाने चौदा वर्षपर्यंत फक्त रामांची सेवा केली. दुसरं काही केलं नाही.

त्या मातेने, सुमित्रेने, वनात जाताना आनंदाने लक्ष्मराला सांगितले, "रामाची सेवा करण्यासाठी जा." आपला मुलगा वनामध्ये जायचा! कोणत्या आईला बरे वाटेल? रामांनी वनवासात जाऊन पित्याला वचनातून मुक्त करायचे होते. पण सुमित्रेने लक्ष्मणाला अनुज्ञा दिली. तिने सांगितले, "राम व सीता हे तुझे आई-बाप आहेत. रामांना दशरथांच्या ठिकाणी मान आणि जानकीला मातेसमान बघ. वन हे अयोध्या आहे असे समजून राहा. आनंदाने सेवा कर."

रामायणातल्या काही काही पात्रांची चरित्रं इतकी प्रसिद्ध नाहीयेत. सुमित्रा अत्यंत धर्मशील होती. लक्ष्मणाला इंद्रजिताने मारलेली शक्ति लागून तो मूर्च्छित पडला. त्याला जर सूर्योदयाच्या आंत सोमवटी वनस्पती मिळाली तरच तो जिवंत राहाणार होता, असे वैद्यांनी सांगितले होते. रामरायांनी ही हकीकत मारूतीरायांना सांगितली. ते ती वनस्पति आणण्यासाठी निघाले आणि त्यांना ती सोमवटी ओळखता आली नाही म्हणून त्यांनी द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला.

सुमित्रेला लक्ष्मण मूर्च्छित पडल्याचे समजले. आपला मुलगा मूर्च्छित पडला असून सोमवटी दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयापूर्वी

मिळाली नाही तर तो जिवंत राहणार नाही. पण सुमित्रेला रामांची काळजी जास्ती. रामांना सहाय्य करण्याकरता गेलेला लक्ष्मण आता पडला. तिला प्रश्न पडला रामांना आता कोण सहाय्य करणार? एवढ्यात दुसऱ्या मुलाची शत्रुघ्नाची आठवण झाली. शत्रुघ्नाला तिने मारुतीरायांच्या बरोबर जाऊन रामाला सहाय्य करायला सांगितले. आईची आज्ञा म्हणून तोही निघाला. म्हणजे दोन्हीही मुले रामांच्यासाठी तिने वाहिली आहेत. 'वाहू हा संसार देवा पायी।' तुकाराम महाराज सांगताहेत. पण त्यांची वृत्ति नुसती सांगण्यापुरती नाही.

**ताईमहाराजांना लोकांनी दिले पण त्या ते या यज्ञाला द्या, त्या कार्याला द्या असे करून देऊन टाकतात. स्वत:करता काहीही ठेवत नाहीत.**

एक मुलगा गेल्याचे दुःख नाही. दुसऱ्या मुलाला रामांना सहाय्य करण्याची आज्ञा केली. तो निघाला. पण वसिष्ठांनी सांगितले, "तुला जायची जरूरी नाही. मारूतीराय द्रोणागिरीच घेऊन येताहेत. त्यावरची ती वनस्पति वापरून औषध दिले की लक्ष्मण पुन्हा सावध होईल." मग शत्रुघ्न थांबला. शत्रुघ्नाच्या मातेची तयारी इतकी होती; मग तो शत्रुघ्न किती तयारीचा असेल! त्याचा तर फार कोंडमारा झाला आहे. लक्ष्मण निघून गेला, भरत राहिला. रामाने भरताला राज्य करण्याची आज्ञा केली. ते म्हणाले, "मला वनवासात जायची आज्ञा आहे आणि तुला राज्य करण्याची आज्ञा आहे. तुला माझ्याबरोबर येता येणार नाही आणि मीही तुला बरोबर नेणार नाही." भरताने रामांच्या पादुका मागून घेतल्या. आणखी त्या पादुकांची सिंहासनावर स्थापना करून रामचंद्र आहेत ही भावना धारण करून जटा धारण केल्या, अन्नपाणी वर्ज्य केले. बिछान्यावर न झोपता साध्या चटईवर झोपायचे. अशा तऱ्हेने त्याने राज्य केले. पण त्यागभावनेने केले. चौदा वर्षे झाली की रामांच्या हातात राज्य

सोपवून द्यायचे. संसारातून आपण केव्हा बाहेर पडू ही उत्कंठा धारण करून एकेक दिवस मोजतोय. रामांना वनवासात जाताना त्याने सांगितले, ''चौदाव्या वर्षाच्या शेवटच्या रात्रीपर्यंत मी राज्य सांभाळीन पण १५ व्या वर्षाचा सूर्योदय भरत पहाणार नाही तो पहायला भरत जिवंत राहाणार नाही.'' म्हणून रामरायांनी मारूतीरायांना तत्परतेने भरताकडे पाठवले १४ वर्षे झाल्यावर आणि म्हणाले त्याला सांग, राम येताहेत. तर ही झाली भरताची स्थिति.

शत्रुघ्नाचे व्यक्तिमत्त्व एक वेगळेच होते. प्रत्यक्ष भगवंतांची सेवा ही तर आहेच आहे पुण्यकारक परंतु भगवत् भक्तांची सेवा करणे हे जास्ती महत्त्वाचे आहे. देव न्यायी व थोडेसे कठोर आहेत. ते म्हणतात, ''तुम्ही कर्म केले आहे त्याचे सुखदु:खरूपी फल तुम्ही भोगले पाहिजे. आम्ही त्यात कांहीही बदल करणार नाही. पण एखाद्या वेळेला भगवत्भक्तांनी मध्यस्थी केली, वशिला लावला तर! मग देवाला नाही म्हणता येत नाही. ही वृत्ति शत्रुघ्नाची होती. मातेची सेवा करायची भरताची सेवा करायची; (भरत सावत्र का असेनात), तिन्ही मातांनी त्याला सांगितले, ''जटाबिटा वाढवून राहू नकोस, तुला भरताप्रमाणे करता येणार नाही. राजवेष धारण करूनच तुला राहिले पाहिजे.'' म्हणजे मनामध्ये त्याग जरी असला तरी तो त्याग प्रकट करायचा नाही. ही त्याला आज्ञा होती. हे किती कठीण आहे! रामचंद्र म्हणाले, ''माझ्यापेक्षा तुझा त्याग मोठा आहे. मला वनवासात जायची आज्ञा होती पण तुला तुझ्या आईने राज्य मिळवून दिले होते, वसिष्ठादिकांनी तुला राज्य करण्याची आज्ञा केली होती.पण तू विरक्ति धारण केलीस.'' रामापेक्षा भरताचा त्याग फार मोठा आहे. वाल्मिकी महर्षींनी सर्व लोकांची बुद्धि शुद्ध होण्याकरता रामायण लिहिलेले आहे, ब्रह्मदेवांच्या आज्ञेवरून, कशी वृत्ति पाहिजे, मनुष्य जन्म प्राप्त झाल्यानंतर कसे वागले पाहिजे हे शिकवण्याकरता रामायण

आहे.

तर शत्रुघ्न राजवेष धारण करून राहिला. नामधारी म्हणून राजसभेत बसायचा. भरतासारखा त्याग दाखविता येत नाही. खरंतर दाखवण्याकरता त्याग नाहीच आहे. पण राम वनवासातून परत येईपर्यंत राजवेष धारण करून त्याप्रमाणे राहाताना त्याच्या मनाला किती क्लेश झाले असतील! पण ते सर्व सहन करून त्याने सर्व एकंदर कारभार सांभाळला. आणखी भगवत्‌भक्तांची सेवा केली. त्या सेवेमुळे रामरायांची त्याच्यावर कृपा झाली.

लक्ष्मणाची पत्नी उर्मिला ही सुद्धा तशीच मोठी होती. तिला काही वनामध्ये जाता आले नाही. आणि तसे शक्यही नव्हते. उर्मिलेने लक्ष्मणाला सांगितले, ''मी जर तुमच्या बरोबर वनांत आले तर माझ्याकडेच तुमचे जास्त लक्ष लागणार. तुम्ही रामांची सेवा करण्याकरता चाललेले आहात, तुमच्या बरोबर मला येता येणार नाही.'' लक्ष्मणाची तशी इच्छा नव्हती. पण तिने उलट त्याला सांगितले, ''नाही, मी इथेच राहाणारं.'' म्हणून तिनेही आपल्या सासुसासऱ्यांची उत्तम प्रकाराने सेवा केलेली आहे. रामाची सेवा लक्ष्मणाने भगवंताची सेवा आपण करतोय या भावनेने केली. अशा रीतीने मनामध्ये कोणतीही आसक्ति न ठेवता सेवा करणाऱ्या भक्तांची चरित्र आली आहेत. ईश्वराच्या सेवेचे हे मुख्य फल आहे.

सद्‌गुरू वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराजांनी तर असे सांगितले आहे की संसाराची इच्छा असल्यास ती परमेश्वराजवळ मागा. आपल्या प्रयत्नांनी तुम्ही संसारात सुखी होण्याचा प्रयत्न करू नका. 'मुक्ति' ही त्या मागणीत मुद्दाम घातली आहे. त्याचा विशेष फायदा म्हणजे देवाचे आपल्याकडे लक्ष राहाते. देव म्हणतो, ''आपण याने मागितले म्हणून का होईना संसारसुख दिले आहे. तेव्हा आपणच याला यातून काढले

पांहिजे.'' म्हणजे अशा रीतीने देवाचे तुमच्याकडे लक्ष राहील.

त्याग कसा असावा, त्यागाने काय मिळते हे सर्वही त्यांनी सांगितले. आणि एक मोठे दिव्यचरित्र रामायणात आलेले आहे.

रामचंद्र आलेले आहेत. त्यांना गंगेपलीकडे जायचे आहे. निषादगुह, लक्ष्मण आणि सीता त्यांच्याबरोबर आहेत. तिथल्या एका नावेजवळ ते आले. त्यांना पाहिल्यावरसुद्धा तो नावाडी आपल्या त्याच्या जागेवर स्तब्ध बसून राहिला. जागचा हललासुद्धा नाही. राम जवळ आले. त्याला म्हणाले, ''बाबा, आम्हांला तेवढे पलिकडे पोहोचवशील का?'' ब्रह्मांड निर्माण करण्याची ज्यांची शक्ति आहे त्यांनी त्या सामान्य नावाड्याजवळ याचना केली, तरी तो काही बोलला नाही. लक्ष्मणाला राग आला. त्याने दरडावून विचारले, ''पोहोचवतोस की नाही?'' आणि धनुष्याला बाण लावला. ''हा बाण. तुला मारू?'' तरी काही नावाडी बोलेना सीतेलाही आश्चर्य वाटले त्या नावाड्याची ही वागणूक पाहून. तिनेही त्याला विनवले.

तेव्हां तो म्हणाला, ''देवा, तुमची मी कीर्ति ऐकली आहे.'' (अहिल्या शिळा राघवे मुक्त केली' हे समर्थांनी वर्णन केलेले आहे.) तुमच्या पायाचा धुरळा पडल्यावर ती पुन्हा पूर्वीप्रमाणे सामर्थ्यशाली ऋषि-पत्नी झाली, उद्धरून गेली. तेव्हा तुम्ही जर माझ्या नावेत आल्यावर तुमच्या पदस्पर्शाने माझ्या नावेची स्त्री झाली तर!'' त्याची एक वेगळी दृष्टि आहे. खरी भक्ति त्याच्या अंत:करणात आहे. पण बाहेरून ही भूमिका आहे. तो पुढे म्हणाला, ''या नावेवर माझे पोट भरतो मी. या नावेची स्त्री झाली तर मी उदरनिर्वाह कसा करू? माझ्या घरात आणखी एक स्त्री येऊन राहाणार. तिचे पालन पोषण मलाच करावे लागणार. तेव्हा माझे जर म्हणणे तुम्हाला कबूल असेल तर मी तुम्हाला पलीकडे पोहोचवतो.'' रामचंद्र म्हणाले, ''तू काय सांगशील ते करायला

मी तयार आहे.'' त्यावर त्याने सांगितले, ''नावेत बसण्यापूर्वी मी स्वतः तुमचे पाय स्वच्छ धुणार आहे. आणि मग नावेतून तुम्हाला घेऊन जाणार.'' रामचंद्रांनी हे कबूल केले. लक्ष्मण, सीता, निषादगुह हे सगळे पहाताहेत.

त्या नावाड्याने त्याच्या घरातल्या मंडळींना बोलावून एक लाकडी चौरंग आणला. त्याला एकीकडे रामचंद्रांची परीक्षाही पहायची आहे ना! त्याच्या बायकोने आणलेल्या पाण्याने त्याने रामांचे स्वच्छ पाय धुतले. सगळ्यांना ते तीर्थ दिले. आणि आपणही तीर्थ घेतले. रामचंद्र म्हणाले, ''बस झाले. चल आता लवकर. आम्हांला आता उशीर झाला आहे.'' तो म्हणाला, ''थांबा जरा. नंबराप्रमाणे तुम्हाला पोहोचवणार आहे.'' राम म्हणाले, ''इथे तर दुसरे कोणीच दिसत नाही.'' तो म्हणाला, ''हे माझे पितर आहेत ना. त्यांचा नंबर लागलेला आहे. ते अगोदर तीराला जाणार आहेत. तुम्ही आणि मी एकच काम करणारे आहोत. मी प्रवाशांना परतीरावर पोहोचवतो आणि आपण भक्ताला भवसागरातून परतीरावर पोहोचवता. मी मात्र तुम्हाला पैलतीरावर पोहोचवणार आहे पण त्याचा काहीही मोबदला घेणार नाही. हे तुम्ही कबूल केले पाहिजे.'' रामचंद्र म्हणाले, ''ठीक आहे. चला.''

त्याने रामचंद्राचे स्वच्छ पाय धुतले. तीर्थ सगळ्यांना दिले. आपण प्राशन केले. आणि नंतर त्या सगळ्यांना घेऊन पलीकडे गेला. सगळ्या पितरांना मुक्त केले. भगवत्प्रेमामुळे सगळ्या पितरांचा उद्धार झाला. पलीकडे सगळी मंडळी उतरली. नावाड्याला काहीतरी द्यायला पाहिजे. देण्यासाठी जवळ तसे काहीच नव्हते. सीतादेवींच्या लक्षात आले. त्यांच्या बोटातली रत्नाची अंगठी काढून त्याला देताना त्या म्हणाल्या, ''हे घे. तुझे आमच्यावर उपकार नकोत.'' तो म्हणाला, ''तुम्हाला अगोदर सांगितले होते मी. कांहीही मी घेणार नाही.'' **देवाची सेवा**

**करणाऱ्याने हे लक्षात ठेवले पाहिजे. सेवा करायची पण त्याबद्दल कांहीही देवाजवळ मागायचे नाही. देव देत असले तरी घ्यायचे नाही.**

तो पुढे म्हणाला, ''मी कांही घेणार नाही हे तुम्ही कबूल केले होते. आज तुमची ही जी सेवा घडली त्यामुळे माझ्या पितरांचाहीं उद्धार झाला, पुन्हा तुम्ही याच रस्त्याने या, देवा आणि पुन्हा मला तुम्हाला पलीकडे नेण्याचे भाग्य लाभो.'' बाकी कांही मागून घेतले नाही कारण मनामध्ये काही इच्छाच नव्हती. त्याने देवाची परीक्षा पाहिली, असे वाटण्याचा संभव आहे. पण ही परीक्षा नाही.

हा भक्त कसा आहे पहा! पायाचा धुरळा थोडासुद्दा शिल्लक राहिला नाही, तर नावेत बसविणार. म्हणजे त्याला देवाचे पाय धुवायचे होते. ते आपलं निमित्त त्याने काढले. ओळखणाऱ्याने ओळखले. वाल्मिकी रामायणामध्ये हे सर्व त्यांनी लिहिले आहे. एकेक लोकोत्तर भक्त होऊन गेलेले आहेत. फक्त सेवा करायची, बाकी कांही इच्छा नाही. तर अशा रीतीनं भगवान् रामचंद्रांचे दिव्य चरित्र सर्वांनी श्रवण करावे म्हणून संत महात्म्यांनी त्यांची चरित्रे लिहून ठेवली आहेत. ती वाचणं, ऐकणं त्यांचं चिंतन करणं, मनन करणं आणि मनावर त्याचे चांगले संस्कार व्हावेत म्हणून रामरायांचीच प्रार्थना करणं हे आपलं कर्तव्य आहे.

आजचा चांगला दिवस आहे रामनवमीचा! ताईमहाराजांच्या संकल्पाप्रमाणे आपण सर्वही मंडळींनी हे स्थान निर्माण केले. भगवान् दत्तात्रेयांची आणि सद्गुरूंची उपासना या ठिकाणी चालू आहे.

रामरायांच्या काळात मोठे भक्त होऊन गेले आहेत. कैकयी फार मोठी भक्त होती. कैकयीने सगळ्या जगाची अपकीर्ति आपल्या डोक्यावर घेतली. आणि रामाला राज्याच्या बाहेर काढले. राम जर राज्यभिषेक होऊन राज्य करीत राहिले असते तर रावणाचा नाश कसा झाला असता? कोणी मारले असते त्याला? प्रजेचे रक्षण कसे झाले असते? रामचंद्रांनी

एकट्याने १४,००० राक्षस एका प्रहरात मारून टाकले.

तर सरस्वतीदेवीने कैकयीच्या वाणीत देवांच्या प्रार्थनेप्रमाणे प्रवेश केला, तशी तिला बुद्धि निर्माण केली. मंथरा दासी भेटली आणि कांही तरी कार्य झाले. देवांचे कार्य! रावण जरी शंकरांचा भक्त असला तरी तो पापपुण्याचा विचार न करता उद्दाम झाला होता. त्याचा नाश करण्यासाठी रामांना राज्याबाहेर काढणे आवश्यक होते. ते देवांनी त्या सरस्वतीदेवीला प्रार्थना करून कार्य साधले. कैकयीलासुद्धा शेवटी पश्चात्ताप झाला. कैकयीसारखी दुष्ट कोणी नाही अशी तिची अपकीर्ति झाली. भरताने तर तिच्याबरोबर भाषण बंद केले. रामांनी वनवासातून आल्याबरोबर त्याला बोलावून आणले. त्याला सांगितले, ''आईच्या पाया पड. क्षमा माग. आईला असे दुःख देणे योग्य नाही.'' चित्रकूट पर्वतावर सर्व मंडळींची भेट झाली. कैकयीसुद्धा गेली. तिला वाटले. आपण देवापुढे कसे जायचे? रामरायचं पुढे आले. कैकयीला नमस्कार करून म्हणाले, ''माझ्यावर किती प्रेम आहे तुझे! मला वनवासात पाठवून तुझे माझ्यावर जास्ती प्रेम आहे हेच दाखवलेस. तिथे मला काही काळजी होती का? भूक लागली की फळे खायची, पाणी प्यायचे, संपले. राज्यामध्ये काय चाललंय, कुठे संघर्ष चाललाय, सगळं नीट आहे की नाही वगैरे काही नाही वनवासात. तेव्हा वनवासात जायचे सोपे काम माझ्याकडे आणि पोटचा मुलगा भरताला मात्र सबंध राज्य सांभाळायची जबाबदारी दिली. त्याला राज्य सांभाळायचे म्हणजे काही शांत झोप लागली असेल का? हे अवघड काम भरताला दिले म्हणजे मुलावर तुमचे जास्ती प्रेम आहे की माझ्यावर? तेव्हां तुम्ही काही मनाला लावून घेऊन नका.'' अशी उलट तिची समजूत काढली. ''कैकयी दुष्ट' ही बदनामी डोक्यावर घेऊन तिने आयुष्य कंठले, असेही एकेक भक्त झालेले आहेत. संत महात्म्यांचीही चरित्र लिहून ठेवलेली आहेत. म्हणून

आपल्याला त्यांचे ज्ञान, त्यांचे चिंतन करता येते, विचार करता येतो; ईश्वरांची कृपा असेल तर त्याप्रमाणे अनुकरणही घडते.

**या स्थानात ताईमहाराजांनी देवतांचे आवाहन केलेले आहे. देवतांचा वास याठिकाणी आहे. देवतांच्या प्रेरणेनेच सर्व मंडळी येतात-जातात. सात दिवसांचा नामसप्ताह आम्ही कुठे कुठे करताना पाहिला आहे. पण इथे महिना महिना संकीर्तन चालायचे. दिगंबरा.... चे अखंड नाम मात्र चालू आहे. त्या आपल्या बसलेल्या असतात. देवाचे कार्य जास्तीत जास्त चाललेले पाहून आनंद मानायचा. हे फार मोठे कार्य आहे. त्या काही एकट्या नाहीत. संसार आहे, मुले आहेत, सुना आहेत, नातवंडे आहेत. हे सर्व असूनसुद्धा सर्वेपिसुखिनः संतु... या प्रमाणे सर्व सुखी व्हावेत. सुखी होण्याचे मुख्य साधन म्हणजे ईश्वराची भक्ति आहे, भगवत् भजन आहे हे सर्वांना पटावे ही त्यांची प्रार्थना चालू आहे. त्याकरता हे केंद्र आहे. अशी केंद्र संतांच्या संकल्पाप्रमाणे निर्माण झालेली असतात.**

त्याठिकाणी जाऊन आपली संकटे दूर करण्याकरता प्रार्थना करावी किंवा आपल्या जीवनाचे कल्याण व्हावे अशी प्रार्थना करावी पुढच्या जन्मांत आपण कुठे जाणार आहोत कांही माहीत नाही. लांबचा प्रवास आहे. हे जीवन फार लहान आहे. त्या लांबच्या प्रवासामध्ये कांहीही सोय करून ठेवता येत नाही. पुण्याहून आम्ही जालन्याला येणार असल्याचे फोनवर कळवतो. अगरवालसाहेब लगेच सांगतात, 'आम्ही गाडी पाठवतो.' पण त्या लांबच्या प्रवासात कांहीही सोय नाही, पैसा असून कांहीही विकत घेता येत नाही, पण त्या दूर मार्गाने जावेच लागते आपल्याला. त्याकरता काही तरी ईश्वराची कृपा आपल्याजवळ असावी. म्हणजे त्या कृपेने त्याही मार्गामध्ये आपल्याला सुखी राहाता येते. दुःख त्या ठिकाणी होत नाही. धर्मराज हे स्वर्गलोकापर्यंत देहाने गेलेले आहेत.

इतकं पुण्य त्यांनी केलं. बाकीचे सगळे भाऊ, द्रौपदी खाली पडले पण धर्म आपल्या पुण्याने स्वर्गाला गेले. अशा रीतीने सर्वांच्या अंत:करणात पुण्यवासना निर्माण व्हावी, वृद्धिंगत व्हावी. सर्वांकडून पुण्यकर्म झाल्यानंतर सर्व सुखी होतील. ज्याला पुण्यवासना नाही त्याच्या ठायी पुण्यवासना निर्माण होईल. आणि त्याच्याकडूनही पुण्यकर्म होईल. त्यादृष्टीने आपण सर्व मंडळींनी दत्ताश्रम निर्माण केला. याबद्दल आपल्यावर ईश्वराची कृपा आहे. **अहंकार उत्पन्न न होणं हे पुण्यकर्माचे मोठे फळ आहे. 'कर्म मी केलंय', अशी जर भावना उत्पन्न झाली तर त्याचे फळ पदरात पडत नाही.**' याप्रमाणे चांगले स्थान निर्माण झाले, चांगले मार्गदर्शन यांच्याकडून आपल्याला मिळतंय. त्याचा फायदा सर्वांनी करून घ्यावा, संसार करता करता परमार्थ साधावा, सर्वांना तशी सद्बुद्धि उत्पन्न व्हावी एवढीच प्रार्थना करून आज भगवान् रामचंद्रांच्या चरणी, त्यांनी दत्तात्रेय प्रभूंनी, सर्वांना प्रेरणा करावी एवढीच प्रार्थना.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ।।**

**

# परमेश्वरी अवताराचे कार्य

(प.पू. श्रींनी आशीर्वादपर केलेले प्रवचन - श्रीदत्त आश्रम, जालना)

**परित्राणाय साधूनां विनाशायच दुष्कृताम्।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे।।**

भगवंतांची प्रतिज्ञा आहे. धर्मराजासारख्या धर्मशील महात्म्याचे रक्षण करण्याकरता भगवंतांचा अवतार झाला. त्यांना धर्माचरण न करू देणारे, विरोध करणारे जे आहेत त्यांचा विनाश करायचा, त्यांना जिवंत ठेवायचे नाही. क्षमा नाही. आणि त्या रूपाने धर्माची स्थापना करायची. हे भगवंतांचे अवतार कार्य त्यांनी स्वतःच सांगितले आहे.

धर्म हा कांही दिसणारा नाही. धर्म अधर्म शास्त्राने सांगितले आहेत. शास्त्र म्हणजे ईश्वरची वाणी आहे या शास्त्रद्वाराने आपल्याला धर्माधर्माचे मान होते. आणि तसेच ज्ञान धर्मशील महात्म्यांच्या आचरणावरूनही होते. शिष्टाचार हेही एक प्रमाण स्मृतिकारांनी दाखविलेले आहे.

धर्मराज हे धर्मशील होते म्हणून गोपालकृष्णांचे त्यांच्यावर पहिल्या पासून प्रेम होते. धर्मराजालाच राजा करायचा असा त्यांचा निश्चय झालेला होता. धर्मराजांचीही निष्ठा तशीच होती. शेवटपर्यंत धर्माचरण करायचे. संयमी राहून, तितिक्षासंपन्न राहून, सर्व सहन करून धर्म विरोधी आचरण कधीही न करता वागायचे. त्यामुळे द्रौपदी, भीम यांनासुद्धा फार वाईट वाटत होते. द्रौपदीनेही त्यांना वारंवार सांगावे, 'तुमच्या धर्माचा उपयोग काय झाला? धर्माचे फळ या काळात मिळत नाही असं मला वाटायला लागलंय. फळ देणारा ईश्वर, आहे की नाही असं मला वाटतय.' असं तिने बोलून दाखवावं. परंतु धर्मराजांची धर्माचरणाबद्दल इतकी निष्ठा होती की त्यांनी सांगावे, "द्रौपदी, धर्माचरण करून कांही फळ माझ्या पदरात पडावे अशा इच्छेने मी धर्माचरण करीतच नाही. कांही फळ मिळवण्यासाठी धर्माचरण करणं हा धर्माचा व्यापार केल्यासारखा

आहे. तेव्हा ही ईश्वराची आज्ञा समजून धर्माचरण करायचे आहे'' त्यामुळे श्रीकृष्णांचे त्यांच्यावर अत्यंत प्रेम होते. सर्व देवतांचे प्रेमही त्यांच्यावर होते. म्हणून यमधर्मांनी त्यांची यक्षरूपाने परीक्षा पहाण्यासाठी प्रश्न विचारले आणि धर्मराजांनी आणि योग्य उत्तरे देऊन चारही भावांना जिवंत केले. हे धर्माचे सामर्थ्य आहे.

गोपाळकृष्णही त्या करताच अवतार घेऊन आलेले होते. धर्मराज्य व्हायला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. आणि भारतवर्षामध्ये असे धर्माचरण करणारे संत महात्मे सर्व काळात होऊन गेले आहेत.

आजही या ठिकाणी सौभाग्य संपन्न ताईमहाराजांचे धर्माचरण सर्वांच्या दृष्टीला पडले आहे. अनेक श्रद्धाळू लोकांना मार्गदर्शनही मिळते आहे. त्याप्रमाणे त्याचे फळही त्यांना मिळते. हा पंचायतन देवतायाग हे त्याचेच उदाहरण आहे. पांच दिवसपर्यंत अनेक वेदशास्त्रज्ञ मंडळी या ठिकाणी आली. कर्माचरण हे ईश्वराने करायला सांगितले. ते जर अशा रीतीने मन:पूर्वक झाले तर त्याचे फळही ईश्वराकडून अवश्य मिळते. श्रीदत्त आश्रम हे एक स्थान या ठिकाणी निर्माण झाले आहे घरामध्ये आपल्याला इतका अवसर मिळत नाही, शांती व समाधान मिळत नाही त्या दृष्टीनेही का होईना अशा स्थानामध्ये येऊन नामस्मरण करणं, भजन करणं शक्य होईल असे एक केंद्र जालन्यामध्ये निर्माण झाले आहे. या ठिकाणी भगवंतांच्या चरित्राचे चिंतन झाले.

धर्माचरण ही मोठी भगवत् भक्ति आहे. ईश्वराच्या आज्ञेचे पालन करायचे. त्याच्या फळाकडे लक्ष द्यायचे नाही. राज्य गेले म्हणून ईश्वर विरुद्ध आहे अशीही कल्पना नाही. जे कांही ईश्वराने सांगितले असेल ते संयमाने राहून करायचे ही भूमिका अजातशत्रू धर्मराजांची होती त्यामुळे त्यांना भगवंतांचे सहाय्य झाले. सर्व बंधूही अनुकूल झाले सर्वांनाही फलप्राप्ती झाली.

तेव्हा आज हा याग समाप्त झालेला आहे. संध्याकाळच्या वेळेला

चित्ताला समाधान देणारे कार्यक्रम आयोजित केले होते. अशा प्रकारचे वैयक्तिक सामुदायिक सत्कर्म घडत राहिली तर कांही तरी ईश्वर कृपेने सर्वांना समाधान प्राप्त होणार आहे. ईश्वराचे भजन सर्वांनी करावे अशी संत महात्म्यांची इच्छा आहे.

**'भजिजो आदिपुरूषी अखंडीत।'**

असे मागणे मागताहेत ज्ञानराज, सर्व सुखं मिळू देत, कोणीही दुःखी राहू नये. पण त्या आदिपुरुषाला कधी विसरू नये. कृतज्ञ राहिले पाहिजे हे देवाजवळच त्यांनी मागितले आहे. संत महात्म्यांचे हे मोठे कार्य आहे.

त्या प्रमाणे आज हा मोठा समारंभ पूर्ण झालेला आहे. या समारंभात सर्वांनाही निरनिराळ्या दृष्टीने मार्गदर्शन झालेले आहे, पुण्यकर्मांचे दर्शन झाले. पुण्यकर्म कसे आहे याची प्रत्यक्ष माहिती जरी आपल्याला नसली तरी जिज्ञासू बुद्धीने त्याचे ज्ञानही करून घेता येते अशा ठिकाणी. सर्व देवतांचे आवाहन झाले. सर्व दृष्टीने उपकारक अशा प्रकारचे पुण्यकर्म या ठिकाणी घडून आलेले आहे. इथल्या तन मन धनाने सहाय्य करणाऱ्या मंडळींचे पुष्कळ सुकृत आहे, ईश्वराची त्यांच्यावर कृपा आहे म्हणून अशा सर्व मंडळींच्या सहाय्याने, भाग्याने अशा प्रकारचे कार्य पार पडलेले आहे. यामुळे सर्वांनाही सद्बुद्धि उत्पन्न व्हावी, आणि अशीच सत्कर्म वारंवार होऊन सर्वांचा पापक्षय व्हावा, ज्ञानराजांनी सांगितल्याप्रमाणे पापक्षय झाल्यानंतर सुखलाभ होणार आहे, तेव्हा भगवान महाविष्णु इतरही त्यांच्या परिवार देवता या सर्वांच्याही कृपेने सर्वांच्या मनामध्ये सद्बुद्धि राहावी, सद्वासना निरंतर राहावी, आणि त्याप्रमाणे ईश्वराची आज्ञा पालन करण्याकरता म्हणून त्यांच्याकडून निरंतर सत्कर्म घडावीत म्हणजे रामराज्य व्हायला कांही वेळ लागणार नाही अशी प्रार्थना विश्वरूपी परमेश्वराजवळ करून हे निवेदन संपवतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरूदेव दत्त ।।**

## ईश्वराचे स्वरूप - काही विचार

## प.पू. श्रींनी श्रीदत्त आश्रम जालना येथे केलेले प्रवचन

ज्ञानेश्वर महाराजांनी जगाच्या उद्धारा करता काय उपकार करून ठेवलेले आहेत हे ज्ञानेश्वरीचा आदराने अभ्यास करणाऱ्या मंडळींपासून आपल्याला समजून येते. नित्य वाचन असावे. वाचलेलंच वाचावं, चिंतन करावं. त्या चिंतनाचा संस्कार आपल्या चित्तावर झाला पाहिजे.

भगवान् सर्वज्ञ आहे आणि सर्वशक्तिसंपन्न आहे, ही संतांना जाणीव आहे. त्यामुळे चिंता करण्याचे कारणच नाहीये ना! आपण इच्छा केल्यानंतर भगवंतांनी आपल्याला दिलं किंवा न दिलं तर आपली चित्तवृत्ति बिघडून जाईल. इतकी मी सेवा करतो, इतकी भक्ति करतो पण देवाचे माझ्याकडे कांही लक्ष नाही, असेही वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्यांच्या मनामध्ये भगवान् सर्वज्ञ आहेत ही भावना आहे त्यांना खात्री असते की सर्व त्याला कळते, आपण सांगायलाच पाहिजे असे नाही. ''तुझी चिंता त्यासी सर्व आहे।।'' नाथमहाराजांनी सांगितले आहे. सर्वही विश्वाचं संरक्षण करणाऱ्या परमात्म्याला किती मोठं ज्ञान असलं पाहिजे! किती विशाल बुद्धि असली पाहिजे! ही एक भावना फार मोठी आहे. सर्वज्ञ आहे परमात्मा आणि सर्वज्ञ असून सर्वशक्तिसंपन्न आहे. सगळी शक्ति आहे, प्रारब्धभोग जरी विरुद्ध असले तरी त्याच्या कृपेने ते दूर होतात, अनुकूल होतात. अशी त्याची शक्ति आहे.

म्हणून संत महात्म्यांच्या चरित्रावरून आपल्याला हे सगळे समजून येते. त्यांची भावना कशी आहे आणि त्या भावनेप्रमाणे त्यांचे मनोरथ कसे पूर्ण होतात हेही आपल्याला ह्यावरून दिसून येते. आणि आपल्याही मनामध्ये तशा प्रकारची वृत्ति उत्पन्न होते.

ईश्वर स्वरूपामध्ये ज्ञान तीन प्रकाराने होते असे भगवान गीतेमध्ये

ईश्वर स्वरूपामध्ये ज्ञान तीन प्रकाराने होते असे भगवान गीतेमध्ये सांगतात.

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम्।**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति।।**

ईश्वर कसा आहे हे तीन प्रकाराने समजून घ्यावे असे भगवान् म्हणतात. भारत वर्षामध्ये कर्मयोग अखंड चालू आहे. वेदाध्ययन, शास्त्राध्ययन हे त्याकरता आहे, आचरण करण्याकरता आहे. या सर्वही कर्मांचा भोक्ता परमात्मा आहे. ही जाणीव पाहिजे. भरत राजा मोठा ज्ञानसंपन्न होता, ईश्वरभक्त होता. त्याने अनेक यज्ञयाग करावेत परंतु त्या यज्ञाच्या देवता ह्या परमेश्वराचे अंश आहेत अशी त्याची भावना होती विशिष्ट एक देवता वगैरे असा कांही संबंध नाही. अनेक देवता अशा यज्ञकर्मात असतात. त्या सर्वही देवता विश्वरूपी परमेश्वराच्या स्वरूपांतर्गत आहेत. त्यांच्यापासून आपल्याला सर्व भोग मिळणार आहेत. कर्म करणाराही त्याच्या स्वरूपामध्ये अंतर्गत आहे. म्हणजे कर्मानुष्ठान करतानासुद्धा सर्व यज्ञकर्माचा भोक्ता परमात्मा ही भावना अंतःकरणामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. 'मी कर्ता आहे,' अशी भावना असेपर्यंत भोक्ता परमात्मा आहे ही भावना होणार नाही. कर्ता एक आणि भोक्ता दुसरा, असे कसे असू शकेल? जो कर्ता तोच भोक्ता असणार. म्हणून कर्तृत्व भावनाही गेली पाहिजे. म्हणजे कर्मबंधन नाही.

**ऐसा कर्तृत्वाचा मदु। आणि कर्मफळाचा आस्वादु।**
**या दोहोंचेही नांव बंधु। कर्माचाही।**

नाथमहाराज म्हणतात. मी कर्ता ही भावना सोडणे म्हणजे परमात्माच भोक्ता आहे ही जाणीव निर्माण होणे. कर्ताही तोच आहे. कर्तृत्वबुद्धि त्याच्याच कृपेने उत्पन्न होते म्हणजे खरे कर्तृत्व त्याचेच आहे. ही भावना हवी.

**त्यानंतर, 'सर्वलोकमहेश्वरम्'**

ब्रह्मादिक देवांचाही ईश्वर आहे. परमेश्वर आहे. तो नियामक आहे. सर्वांची बुद्धि नियंत्रित करणारा परमात्मा आहे हे ज्ञान पाहिजे.

आणि तिसरी भावना जी आहे ती भक्तियोगाची! भक्तियोग सर्व संतांच्या मनामध्ये उत्पन्न झाला त्याला कारण आहे. 'सुहृदं सर्वभूतानां' म्हटलंय. भगवान् सर्वही भूतांचा सुहृद आहे. 'सुहृद' याचा अर्थ भगवान् आचार्य महाराजांनी केलेला आहे -

**प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणम्।**

**माझी पूजा करावी. मला चांगले म्हणावे, माझी स्तुति करावी असे झाले की मग काही तरी उपकार करायचा, हा व्यवहार झाला, पण ईश्वराला प्रत्युपकाराची अपेक्षा नाही. काय मागेल ते द्यायचे. सकाम असतील त्यांची कामना पूर्ण करायची निष्कामांची योग्यता अधिकाधिक वाढवायची. त्या बद्दल कांहीही अपेक्षा नाही.**

परमात्मा सर्वज्ञ आहे, सर्व शक्तिसंपन्न आहे आणि निरपेक्ष आहे. हे जर ईश्वर स्वरूपाचे ज्ञान झाले तर पूर्ण शांति प्राप्त होते. त्या करता भक्तियोग आहे. काहीही द्यायचे नाही. देवाला कांहीही लागत नाही. सर्वांचा तो सुहृद आहे. आपल्यावर परत उपकार करावेत, आपला लोकांनी मान-सन्मान करावा अशी त्याला कांहीही अपेक्षा नाही. म्हणून सर्व संत महात्म्यांची भगवंताची भक्ति करण्याकडे नैसर्गिक प्रवृत्ति आहे. तर हा भक्तियोग समजावून सांगणे हेही अधिकारी पुरूषांचे काम आहे. ज्यांचा ज्ञानेश्वरीचा अखंड व्यासंग आहे, त्यामुळे ज्ञानेश्वर महाराजांच्या, ईश्वराच्या प्रसादाने ज्यांच्या बुद्धिमध्ये ज्ञानेश्वरीचा (गीतेचा) सगळा भावार्थ प्रकाशित केलेला आहे. तो त्यांना समजून येऊ लागतो. ज्ञानेश्वरीला भावार्थ दीपिकाच म्हटलेले आहे. श्रद्धेने, आदराने त्याचे चिंतन, मनन झाल्यानंतर तो कळून येतो. असा व्यासंग करणारी श्रद्धाळू मंडळी आहेत.

जे संत महात्मे आहेत ते खरा लोकसंग्रह करू शकतात. 'लोकसंग्रहाकरता तुला कर्म केले पाहिजे,' असे भगवंतांनी अर्जुनाला सांगितले. ते पुढे म्हणतात, ''मी करतो. वास्तविक मला कांही आवश्यकता नाही.'' तर तो खरा लोकसंग्रह म्हणजे कुमार्गाकडे झालेली प्रवृत्ति बदलणे. सन्मार्गाकडे प्रवृत्ति करणे. हा लोकसंग्रह करण्याची योग्यता संत महात्म्यांच्या चरित्राचे उत्तम प्रकाराने, आदराने चिंतन ज्यांच्याकडून घडलेले आहे, अशा महात्म्यांच्या मुखातून आपल्याला समजली पाहिजे. म्हणजे आपल्या चित्तावर चांगले संस्कार होतील. असे झाले तर आपल्यावर ईश्वराची कृपा झाली असे समजायला हरकत नाही.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।**

## अर्जुनाचा मानसिक गोंधळ

### प.पू. श्रींनी श्रीदत्त आश्रम, जालना येथे केलेले प्रवचन

अर्जुनाने गीतेच्या पहिल्या अध्ययात स्वतःचा बुद्धिवाद मांडला. हे आप्तेष्टांना मारणे पापकर्म आहे आणि या पापकर्मामुळे मला नरकाला जावे लागेल, वगैरे विचार त्याने मांडले. हे सर्वही विचार व्यासमहर्षींनी महाभारतात भगवत्गीतेच्या रूपाने लिहून ठेवले आहेत. त्याच्यानंतर भगवत्गीतेची भावार्थ दीपिका म्हणून ज्ञानेश्वरी लिहिली गेली. आपले सद्गुरू निवृत्तिनाथ हेच लेखन करीत आहेत असे ज्ञानराज सांगतात. **अलौकिक कार्य जरी झाले तरी ते सर्व विसरून जाणं, ते सद्गुरूंना अर्पण करणं, म्हणजे कर्तृत्व सगळं सद्गुरूंना देणं हे मोठे कार्य आहे** त्याशिवाय ते कसे होणार?

मराठी भाषेमधल्या या ग्रंथात भगवत्गीतेचा भावार्थ सगळा सांगितला आहे. तरीसुद्धा त्याचा अभ्यास केल्यावाचून कांही लक्षात येणार नाही. मराठी भाषा आहे. आपण वाचू शकतो. पण ज्ञानेश्वरांचा अभिप्राय काय आहे हे समजून घ्यायला पुष्कळ वाङ्मय तप केले पाहिजे. याठिकाणी रोज कर्मयोग चालू आहे. पण त्याच्याबरोबर भक्तियोगही आहे. प्रत्येक कर्म करताना 'यस्य स्मृत्या च नामोक्त्या तपः पूजा क्रियादिषु न्यूनं संपूर्णतां याति....'

असे शेवटी म्हणतात. म्हणजे नुसत्या स्मरणानेसुद्धा कर्माची पूर्तता होते. प्रत्येक कर्मामध्ये भक्तियोग हा अंतर्भूत आहे.

संध्याकाळच्या या कार्यक्रमात संत महात्म्यांचे विचार काय आहेत हे ऐकायला मिळाले आणि आपल्या मनाची परिस्थिति कशी होऊ शकते, मनाचा गोंधळ कसा उडू शकतो याची कल्पना आली. अर्जुनाचा गोंधळ कसा झाला आणि त्यातून कोणी त्याला बाहेर काढला हे त्या गीतेच्या शेवटी आहे.

**करिष्ये वचनं तव।**

हे मान्य केले. तुमची आज्ञा मला मान्य आहे. मला आता विचार करायचा नाही. मी विचार करू शकतच नाही. पहिल्या अध्यायात त्याने बुद्धिवाद मांडला. आपल्या मनाची भ्रांत अवस्था दाखविली. परंतु दुसरा अध्याय सुरू झाल्यानंतर त्याने म्हटले,

**'शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम्'**

मला कळत नाही देवा. माझ्या बुद्धीला कल्याणाचा मार्ग कोणचा आणि अकल्याणाचा कोणचा हे समजणे अवघड होऊन बसले आहे.' अगोदर त्याने पुष्कळ बुद्धिवाद मांडला. पण ज्या वेळेला, 'मला कांही कळत नाही' असे म्हणून जेव्हा तो भगवंतांना शरण गेला त्यावेळेला गीता ज्ञानाच्या उपदेशाला आरंभ झाला आहे. त्याला आता वर काढायचे देवांनी ठरविले.

ज्ञानराजांची ज्ञानभूमिका पूर्ण आहे. मनांत कोणचीही वासना नाही. इच्छा नाही कांही नाही. सर्व लोकांचे कल्याण व्हावे अशा प्रकारचीच इच्छा आहे. संतांचा तो स्वभावच आहे. त्यामुळे निवृत्तिनाथांनी आज्ञा केली आणि ज्ञानराजांनी निवृत्तिनाथांकडे कर्तृत्व देऊनच ज्ञानेश्वरीची रचना केली. विवेक, विरक्ति उत्पन्न होणे, अहंकाररहित मन होणे ही सगळी साधनं आहेत. या साधनांचा जेव्हा आपल्याकडून अभ्यास होईल त्यावेळी अशा ग्रंथांचे विशेष ज्ञान आपल्याला होईल. अभ्यास झाल्यावर ज्ञानराजांचा भावार्थ आपल्याला कळून येईल आणि मनाला शांति प्राप्त होईल.

तेव्हा इथे विष्णुयागाच्या निमित्ताने कर्मांतर्गत भक्तिरूपयज्ञ चालू झालेला आहे. मोठी मोठी शास्त्रज्ञ मंडळी या यज्ञाकरता सहाय्य करताहेत. सौ. ताईमहाराजांचेही इकडे पूर्ण लक्ष आहे, या यज्ञामध्ये असा एक ज्ञानयज्ञ या निमित्ताने घडून आला. ज्ञानेश्वरीचे सामान्य रूप

आपल्याला आज कळलेले आहे. जास्ती अभ्यास करायला पाहिजे. अधिकारी महात्म्यांच्या वाणीतून ते ऐकले म्हणजे आपल्याला विशेष बोध होतो. अशी वाणी पाहिजे. लोकांना हे रहस्य समजून यावे आणि त्यांचेही कल्याण व्हावे अशी प्रार्थना करून त्यांना हा यज्ञाचा प्रसाद देतो.

**।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त।।**

# नोंद

# नोंद

# नोंद

# नोंद